मराठी अर्थशास्त्र परिषद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थ:।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थ:।

भारतीय सौर मार्गशीर्ष–फाल्गुन–शके १९४३

जानेवारी–फेब्रुवारी–मार्च २०२२/खंड ४५, अंक ४

गो.सी. टोम्पे महाविद्यालय सार्वजनिक ट्रस्ट व्दारा संचालित,

# गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

## चांदूर बाजार, जि. अमरावती

नॅक व्दारा B++ दर्जा मानांकित (CGPA-2.89)

गो. सी. टोम्पे कनिष्ठ महाविद्यालय ( कला, वाणिज्य व विज्ञान)

Web -Site -www.gstompetrust.org फॅक्स क्र (०७२२७) २४३२३३

email : principalgstompe@gmail.com gstompeprincipal@yahoo.com

ANNIVERSARY 50 YEARS

सुवर्ण महोत्सवी वर्ष







अध्यक्ष
दादासाहेब टोम्पे

प्राचार्य
डॉ. राजेंद्र रामटेके

सचिव
भास्कर टोम्पे

अभ्यासक्रम

Skill India | N·S·D·C National Skill Development Corporation | MEPSC | IT - ITeS SSC NASSCOM | GOVERNMENT OF INDIA MINISTRY OF SKILL DEVELOPMENT & ENTREPRENEURSHIP | Healthcare Sector Skill Council

| ( कला, वाणिज्य व विज्ञान) | B. VOC DEGREE | COMMUNITY COLLEGE | Skill Based Technical Courses 1 Year & 2 Years |
|---|---|---|---|
| ▪ बी.ए. भाग १,२ व ३ M.Sc -<br>▪ बी.कॉम. भाग १,२ व ३<br>▪ बी.एस.सी .भाग १,२ व ३ m<br>p<br>एम. ए. - मराठी, समाजशास्त्र<br>राज्यशास्त्र, इतिहास<br>एम. कॉम. | Skill Based Technical Degree Course<br>FASHION TECHNOLOGY<br>&<br>APPAREL DESIGNING | Skill Based Technical 1 Year Courses<br>1) Apparel Designing & Tailoring<br>2) Textile & Clothing Technology<br>3) Embroidery & Printing Technology<br>Skill Based Technical 2 Year Course<br>ADVANCED DIPLOMA IN APPAREL & TEXTILE DESIGNING | 1) Advance Diploma in Public Health & Hospital Management<br>2) Diploma in Pharmacy Assistance & Health Care<br>3) Diploma in Web Designing Technology<br>4) Diploma in Management and Entrepreneurship |

NIRMITEE PUBLIC SCHOOL

NURSERY, KG I, KG II, & GRADE I to VIII

Nirmitee Public School, Near Late Smruti Swimming Pool, Nanori Road, Chandur Bazar-444704, Dist. Amravati.

मनुष्याणाम् वृत्तिरर्थ:।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तित:।।

# अर्थसंवाद

(तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२२/ खंड ४५ / अंक ४

प्रमुख संपादक
राहुल शं. म्होपरे
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

सहाय्यक संपादक
चंद्रकांत जाधव
(य.च.वारणा महाविद्यालय, वारणानगर)

सल्लागार मंडळ
(२०१८-२२)
जनार्दन काकडे
राजू शिंदे
अजय देरेकर
मोहन सदामते

संपादकीय पत्रव्यवहार
राहुल शं. म्होपरे
'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२,
प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी,
दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे,
उजळाईवाडी, ता. करवीर,
जि. कोल्हापूर - ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

लेखातील मते लेखकांचीच

## अ नु क्र म णि का

• राहुल शं. म्होपरे
संपादकीय ........................................ २१५

१. जे. एफ. पाटील, कमल जे. पाटील
सोन्याची चित्तरकथा ........................................ २१८

२. दि. व्यं. जहागिरदार, मुक्ता दि. जहागिरदार
१९ व्या शतकातील काही भारतीय अर्थतज्ज्ञांचे
शेतीविषयक विवेचन ........................................ २३०

३. वसंतराव बी. जुगळे, योजना व. जुगळे
सामूहिक कृती सिद्धांत आणि सहकार ........................ २४०

४. विनायक श्री. देशपांडे, स्नेहा वि. देशपांडे
राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या संदर्भात स्थानिक विद्यापीठ
आणि शैक्षणिक संस्थांची भूमिका ............................ २५४

५. अनिलकुमार कृ. वावरे, सविता अ. वावरे
आभासी चलन : एका नव्या चलन युगाची नांदी............. २६०

६. राहुल शं. म्होपरे, विद्या रा. म्होपरे
आर्थिक पाहणी अहवाल २०२१-२२
परिचय आणि चिकित्सा..................................... २६७

७. सुरेश ए. घुमटकर, भाग्यश्री सु. घुमटकर
भारतातील आर्थिक विषमतेची स्थिती आणि
धोरणात्मक पुष्टी ........................................... २७३

८. राजू ल. आदे, संजीवनी रा. आदे
''स्वयंसहायता बचतगट आणि महिला सक्षमीकरण'' ......... २८४

९. दिपक गो. चव्हाण, कल्पना दि. चव्हाण
शाश्वत कृषिविकास : महिला सबलीकरणाची एक संधी! ....... २९३

१०. बाळासाहेब सु. वाकचौरे, तृप्ती बा. वाकचौरे
मानव विकास निर्देशांक ...................................... ३०२

११. संजय फु. फड, सुचित सं. फड
वसई तालुक्यातील भूमिहीन शेतमजूर महिलांची
सामाजिक-आर्थिक स्थिती .................................. ३०८

• संदर्भ सूची ................................................ ३१४

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## कार्यकारी मंडळ २०२१-२२

- **अध्यक्ष**
  **अनिल बा. सूर्यवंशी (सोलापूर)**
- **कार्याध्यक्ष**
  **कैलास के. पाटील (परभणी)**
- **कार्यवाह खजिनदार**
  **मारोती वि. तेगमपुरे (अंबड)**
- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**
  **राहुल शं. म्होपरे (कोल्हापूर)**
- **विश्वस्त**
  **आप्पासाहेब पुजारी (मंगळवेढा)**
  **रामकृष्ण टाले (नागपूर)**
  **अजय दरेकर (बारामती)**
- **सदस्य**
  **विजय भोपाळे (नांदेड)**
  **स्नेहा देशपांडे (नागपूर)**
  **बळवंत कोरे (कराड)**
  **गणेश मांगडे (दापोली)**
  **माधव शिंदे (अहमदनगर)**
  **सुरेश ढाके (भुसावळ)**
  **शिवाजी काकडे (बीड)**
  **अरुण पिसे (धुळे)**
  **राजाराम पाटील (सोलापूर)**
  **दयाळू राठोड (अकोला)**
  **मनीषकुमार कायरकर (बल्लारपूर)**
- **स्वीकृत सदस्य**
  **जयवंत इंगळे (विटा)**
  **गोरक्षनाथ सानप (संगमनेर)**
- **स्थानिक कार्यवाह**
  **संजय जगदेव कोठारी (नांदगाव)**



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**
(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, 'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना. पिन - ४३१ २०४ भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७

**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**
  आजीव सदस्य : रु. ३०००/- (एकरकमी)
  इमारत निधी : रु. २०००/-
  सदस्य सूची : रु. १००/-
  एकूण : रु. ५१००/-
- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**
  शैक्षणिक संस्था, व्यावसायिक संस्था, ग्रंथालये } रु.२०००/-(त्रैवार्षिक) रु.३०००/-(पंचवार्षिक)
- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.

**'अर्थसंवाद'साठी अनुदानाबद्दल आभार:**
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

टीप : म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

हे त्रैमासिक, प्रकाशक मारोती वि. तेगमपुरे (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड - ४३१ २०४ येथे प्रसिद्ध केले.

# संपादकीय

विवाहाचे अर्थशास्त्र (Economics of Marriage) या अर्थशास्त्राच्या एका जुन्या, महत्त्वाच्या परंतु थोड्याशा दुर्लक्षित असलेल्या शाखेकडे नव्याने लक्ष देण्याची गरज आज संपूर्ण जगात निर्माण झाली आहे, असे वाटते. अर्थशास्त्राच्या या शाखेत कौटुंबिक कामांचे विश्लेषण, कौटुंबिक उत्पादनाचे आणि वितरणाचे निर्णय, घटस्फोटाचे आर्थिक परिणाम यांसारख्या सर्वच कौटुंबिक बाबींचा अभ्यास केला जातो. जगातील प्रत्येक देशातील वैवाहिक स्थितीचा (Marital Status) आणि आर्थिक विकासाचा परस्परसंबंध असल्याचे संशोधनाअंती पुढे आले आहे. अर्थात, ज्याप्रमाणे विवाहबद्ध जोड्या आर्थिक विकासाला पूरक ठरतात असा विचार प्रवाह आहे. अगदी त्याचप्रमाणे विवाहातून आर्थिक विकासाला तथा बाधा पोहचते असे मत मांडणाऱ्यांच्या तज्ज्ञांचा देखील एक गट आहे.

विवाह आणि आर्थिक विकास यांकडे धनात्मक दृष्टीने पाहणाऱ्या काही अर्थतज्ज्ञांनी यावर संशोधन केलेले आहे. वर्ष १९७६ मध्ये कोरेनमन आणि न्यूमार्क या अमेरिकन संशोधकांनी कामगारांचे एक सर्वेक्षण केले. सदर सर्वेक्षणाअंती त्यांना असे दिसून आले की, ज्या कामगारांचा विवाह झाला आहे, त्यांचे प्रतितास सरासरी वेतन ६.५७ डॉलर आहे, तर ज्यांचा विवाह झालेला नाही अशा कामगारांचे प्रतितास सरासरी वेतन ५.५६ डॉलर आहे. थोडक्यात, ज्या कामगारांना वैवाहिक जोडीदार आहे, त्यांचे प्रतितास वेतन हे अविवाहित व जोडीदार नसलेल्या कामगारांच्या तुलनेत साधारणत: १५% नी अधिक आहे.

विवाह न करण्याचे काही वित्तीय फायदे असल्याचे देखील तज्ज्ञांनी स्पष्ट केलेले आहेत. डॅन ब्रोलिंग यांनी फोर्ब्स या जगप्रसिद्ध मासिकात प्रसिद्ध केलेल्या एका लेखाद्वारे वृद्ध लोक विवाह करून एकत्र राहण्यापेक्षा विवाह न करता पती-पत्नीप्रमाणे एकत्र राहण्यास का पसंद करतात याची मीमांसा केलेली आहे. अर्थात, भारतासारख्या संस्कृतीप्रधान देशात सध्यातरी नक्कीच हे मान्य होण्यासारखे नाही. परंतु अलीकडील तरुणाईचा लिव्ह इन रिलेशनशिपचा ट्रेंड पाहता भविष्यात नेमके काय होईल, हे आताच सांगणे थोडे धाडसाचे ठरेल. असो. डॅन ब्रोनिंग आपल्या लेखात सांगतात, विवाहबंधनात राहून एकत्रित आरोग्य विमा उतरल्यास वयोमर्यादेच्या अटीमुळे काहीवेळा जोडीदाराला वृद्धापकाळात आरोग्य विमा मिळविण्यात अडचणी निर्माण होतात. यापुढे जाऊन ते असे स्पष्ट करतात की, पती-पत्नीने एकत्रितरीत्या कर विवरणपत्र भरल्यास त्यांना एकत्रित उत्पन्नावर अधिकचा कर भरावा लागतो. हेच विवरणपत्र प्रत्येकाने स्वतंत्र भरल्यास कराची भरावी लागणारी रक्कम कमी होते. ब्रोनिंग यांनी यासंदर्भात एक उदाहरणसुद्धा दिले आहे. अमेरिकेत एका ६० वर्षांच्या वयोवृद्ध जोडीने विवाह केला. परंतु त्यांनी लगेच घटस्फोटसुद्धा घेतला. कारण विवाह केल्यामुळे त्यांच्या व्यक्तिगत मालमत्तेवरील कराचे प्रमाण ४०,००० डॉलरनी वाढले. याबरोबरच विवाहासाठी करावा लागणारा खर्च, काही जोड्यांमध्ये भविष्यात निर्माण होणारे वाद-विवाद, कोर्टकचेऱ्या यातून कल्याण साधण्याऐवजी अडचणीच निर्माण होतात आणि अप्रत्यक्षरित्या देशाच्या आर्थिक विकासाला बाधा पोहचते, असे देखील काहीजण सांगतात. अर्थात, आपल्याकडे या अनुषंगाने

असे म्हटले जाते की, ''शादी का लड्डू, जो खाये ओ पछताये, और जो न खाये ओ भी पछताये!'' शेवटी ज्याप्रमाणे नाण्याला दोन बाजू असतात त्याप्रमाणेच विवाहाचे तथा लग्नाच्या अर्थशास्त्राचे विश्लेषण केले जाते.

अर्थशास्त्राच्या अनुषंगाने विचार केला असता जागतिक तथा राष्ट्रीय स्तरावर अर्थशास्त्रात उत्तम योगदान दिलेल्या अनेक पती-पत्नी जोड्या आहेत. वर्ष २०१९ मध्ये नोबेल पारितोषिक मिळालेली अभिजित बॅनर्जी आणि एस्थर डुफ्लो यांची जोडी, अर्थतज्ज्ञ श्रीमती जोन रॉबिन्सन आणि ऑस्टीन रॉबिन्सन तथा माँटेकसिंग अहलुवालीया आणि श्रीमती आयशर अहलुवालीया यांची जोडी ही त्यांची सुंदर उदाहरणे आहेत. अर्थसंवादचा प्रस्तुत पती-पत्नी विशेषांक हा देखील अर्थसंवादच्या आणि कदाचित देशाच्या सर्व नावाजलेल्या व मान्यताप्राप्त साप्ताहिके, मासिके आणि त्रैमासिकांच्या इतिहासातील थोडेसे वेगळेपण जपणारा वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाचा अंक आहे, असे नमूद करावेसे वाटते. कारण प्रस्तुत अंकातील सर्व लेख हे अर्थशास्त्र विषयात अध्ययन, अध्यापन आणि संशोधन केलेल्या आणि महाराष्ट्राच्या विविध विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या पती-पत्नी जोडीचे आहेत. विशेष म्हणजे प्रस्तुत अंकात वय वर्षे ३५ ते ४० ते वय वर्षे ८० ते ८५ या दरम्यानच्या विविध ११ पती-पत्नी जोडीदारांनी लेख लिहिलेले आहेत.

प्रस्तुत अंकातील पहिला लेख जे.एफ. पाटील आणि कमल जे. पाटील यांनी 'सोन्याची चित्तरकथा' या शीर्षकाखाली लिहिलेला असून, यामध्ये सोने या अत्यंत मौल्यवान धातूचा संक्षिप्त इतिहास, किंमत, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आर.बी.आय. तसेच सोन्याचा औद्योगिक वापर इ. च्या अनुषंगाने सुंदर विश्लेषण केलेले आहे. या अंकातील दुसरा लेख दि. व्यं. जहागिरदार आणि मुक्ता दि. जहागिरदार यांनी '१९ व्या शतकातील काही भारतीय अर्थतज्ज्ञांचे शेतीविषयक विवेचन' या शीर्षकांतर्गत लिहिलेला असून, यामध्ये महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, रोमेशचंद्र दत्त, लोकमान्य टिळक, गोपाळ कृष्ण गोखले आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या अर्थशास्त्रीय विचारांची अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी केलेली आहे. वसंतराव जुगळे आणि योजना व. जुगळे या पती-पत्नी जोडीने आपल्या लेखात 'सामूहिक कृती सिद्धांत आणि सहकार' यांचा परस्परसंबंध उत्कृष्टरीत्या मांडला आहे. सहकाराचा उद्देश, सामूहिक कृतीचा पारंपारिक दृष्टिकोन, ओल्सन मॉडेल इ. बाबींचा सविस्तर ऊहापोह जुगळे दाम्पत्याने आपल्या लेखात सुंदररीत्या केलेला दिसून येतो. विनायक देशपांडे आणि स्नेहा वि. देशपांडे यांनी 'राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या संदर्भात स्थानिक विद्यापीठ आणि शैक्षणिक संस्थांची भूमिका' विषद केलेली आहे. प्रस्तुत लेखात देशपांडे उभयतांनी संख्यात्मक आणि गुणात्मक शिक्षण, शिक्षण क्षेत्रापुढील आव्हाने, नवे शैक्षणिक धोरण आणि विद्यापीठांची भूमिका, एक राष्ट्र आणि एका अभ्यासक्रमाची योग्यता, सामाजिक शास्त्रापुढील भाषेची आव्हाने इ. विविध पैलूंचे अभ्यासपूर्ण विवेचन केलेले आहे. अनिलकुमार वावरे आणि सविता अ. वावरे या जोडीने 'आभासी चलनाच्या' अनुषंगाने लिहिलेला लेख या अंकातील एक अत्यंत उत्कृष्ट लेख आहे. आभासी चलन व्यवहार, ब्लॉग चेन, बिट क्काईन इ. बाबतची अत्यंत क्लिष्ट माहिती या जोडीने आपल्या लेखात अत्यंत सोप्या भाषेत आणि उत्कृष्टरीत्या मांडल्याचे दिसून येते. राहुल शं. म्होपरे आणि विद्या रा. म्होपरे यांनी 'आर्थिक पाहणी २०२१-२२' वर आधारित आपल्या लेखाची मांडणी केलेली आहे. प्रस्तुत लेखात म्होपरे पती-पत्नींनी आर्थिक पाहणी अहवालाचे अंतरंग उलगडून त्याचा प्राथमिक परिचय करून दिलेला आहे. तसेच या अहवालावर चिकित्सक भाष्यदेखील केलेले आहे. सुरेश ए. घुमटकर आणि भाग्यश्री सु. घुमटकर या जोडीने आपल्या लेखाद्वारे 'भारतातील आर्थिक विषमतेची स्थिती सांख्यिकीय माहिती' आणि सुंदर आलेखांच्या आधारे उत्तमरीत्या वर्णन केल्याचे दिसून येते. राजू ल. आदे आणि संजीवनी रा. आदे या जोडीने 'स्वयंसहाय्यता बचत गटाच्या

माध्यमातून महिला सक्षमीकरण' कसे करता येते, याबाबतचा ऊहापोह आपल्या लेखाद्वारे केलेला आहे. दिपक चव्हाण आणि कल्पना दि. चव्हाण यांनी आपल्या लेखामध्ये 'शाश्वत कृषिविकासाच्या माध्यमातून महिलांच्या सबलीकरणाची एक संधी' याबाबतचे अभ्यासपूर्ण विश्लेषण केलेले आहे. बाळासाहेब वाकचौरे आणि तृप्ती बा. वाकचौरे यांनी 'मानव विकास निर्देशांक' या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर आपल्या लेखात प्रकाशझोत टाकलेला आहे. तर अंकातील अखेरचा लेख संजय फड आणि सुचिता सं. फड या जोडीने 'वसई तालुक्यातील भूमिहीन महिला शेतमजुरांची स्थिती' आपल्या लेखाद्वारे वाचकांसमोर अभ्यासपूर्णरित्या ठेवलेली आहे.

अर्थसंवादच्या माध्यमातून मागील ४५ वर्षे मराठी अर्थशास्त्र परिषद, मराठी लेखकांचे आर्थिक प्रश्नावरील दर्जेदार लेखन देशभर पोचवित आहे. संपादकपदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून माझ्या कारकिर्दीतील हा चौथा विशेषांक आहे. (पहिला विशेषांक - माजी अध्यक्षांचा विशषांक, दुसरा विशेषांक - महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या अर्थशास्त्र विभाग प्रमुखांचा विशेषांक, तिसरा अंक - महाराष्ट्राच्या विविध भागातील महिलांचा विशेषांक आणि चौथा विशेषांक - अर्थशास्त्रातील पती-पत्नी विशेषांक) हे सर्वच विशेषांक अर्थसंवादच्या इतिहासातील नावीन्यपूर्ण आणि वेगळी वाट चोखाळणारे विशेषांक आहेत असे प्रमुख संपादक या नात्याने मला मुद्दाम नमूद करावेसे वाटते. अर्थात, या सर्वच अंकांचे संपादनाचे काम जरी मी करीत असलो, तरी प्रत्येक अंकासाठीचे महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील लेखक निवडण्यासाठी मला परिषदेचे मा. अध्यक्ष, मा. कार्याध्यक्ष, मा. कार्यवाह, सर्व कार्यकारिणी सदस्य आणि सन्माननीय माजी अध्यक्ष यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले आणि लाभत आहे. संपादक या नात्याने मी सर्वांचेच मनापासून आभार मानतो. सरतेशेवटी एवढेच सांगू इच्छितो, प्रस्तुत अंकातील जे काही चांगले असेल ते तज्ज्ञांचे असून यातील उणिवा संपादक या नात्याने पूर्णत: माझ्या आहेत. सदर उणिवा आपण माझ्या निदर्शनास आणून दिल्यास मला आनंद तर होईलच; परंतु अर्थसंवादची गुणवत्ता आणखी सुधारण्यास देखील संधी मिळेल. धन्यवाद!

**- राहुल शं. म्होपरे**

प्रमुख संपादक

## निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना कळविण्यात येते की, अर्थसंवादची वाढती तूट लक्षात घेता गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूरबाजार येथे दि. १३/०३/२०२२ रोजी पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत एकमताने असा ठराव करण्यात आला आहे की, एप्रिल-जून २०२२ पासून अर्थसंवादचे पुढील सर्व अंक आजीव सदस्यांना **पोस्टाद्वारे न पाठवता आभासी पद्धतीने (Online)** उपलब्ध करून देण्यात यावेत. परिषदेचे संकेतस्थळ विकसित करण्याचे काम प्रगतीपथापवर आहे. संकेतस्थळ सरू झाल्यानंतर एप्रिल-जून २०२२ व त्यानंतरचे सर्व अंक संकेतस्थळावर प्रसिद्ध होतील, याची नोंद घ्यावी.

(टीप : उपरोक्त ठराव झालेल्या सभेचे इतिवृत्त कायम व्हायचे आहे तरीदेखील परिषदेच्या आर्थिक बाजूचा विचार करता या ठरावाची अंमलबजावणी करण्यास सभासदांची हरकत नसावी.)

**- कार्यवाह - खजिनदार**

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

# सोन्याची चित्तरकथा

**जे. एफ. पाटील †**
**कमल जे. पाटील ††**

**प्रस्तावना :**

गोल्ड, ऑरम (लॅटीन) ही इंग्रजी तर सोने, सुवर्ण, स्वर्ण, हेम व कनक (आणखीही असावीत) ही नावे असणारा धातू जगाच्या अर्थकारणाला (राजकारणालाही) वेड लावणारा मौलिक धातू आहे.

हे टिप्पण रूढार्थाने संशोधन निबंध नाही. त्याचे स्वरूप साहित्यिक स्वरूपाचे, पण लघु निबंधाचे नव्हे, असे आहे. अर्थशास्त्राचे क्लिष्ट लेखन व संदर्भ पद्धती टाकून मांडणी केली आहे. कोणताही सिद्धांत व/वा गृहीतक सिद्ध करण्यासाठी हे लेखन नाही. शुद्ध, वास्तववर्णन (Description) वा माहिती (Information) असे या मांडणीचे स्वरूप आहे. अर्थात, महत्त्वाचे संदर्भ दिले आहेत.

**इतिहास :**

चकाकणारे पिवळे खडे (Nuggets) या स्वरूपात सोने मानवी समाजाला प्रारंभीच्या संस्कृतीपासून माहीत आहे. अरोरा हे प्राचीन लॅटिन देवतेचे नांव. 'अरोरा' म्हणजे पहाट - सूर्योदय! सोने देवत्व स्वरूप आहे. सत्तेचे प्रतीक आहे. म्हणून त्याचे प्रारंभिक महत्त्व. सत्तेबरोबरच सोन्याचा संबंध सौंदर्याशी येतो. उच्चभ्रू संस्कृतीशी येतो.

उत्खनन (Archeology) शास्त्राप्रमाणे सोने मध्यपूर्वेत सुरू झालेल्या पहिल्या मानवी संस्कृतीला परिचित होते. तज्ज्ञांच्या संदर्भाप्रमाणे प्रारंभी पॅलिओलिथिक माणसाने स्पेनमधील गुहेत सोने ठेवले. इ.स.पूर्वी झेर व सुमेरियाची (Ca) राणी पौबी यांच्याजवळ इ.स.३००० पूर्वी सोन्याची शवपेटी व दागिने वापरलेले सापडले. त्याची कलाकुसर अप्रतिम होती. पार्शियन साम्राज्यात - सध्याचे इराण - येथे झोराष्ट्रीयन धर्माच्या कलाकारीत सोन्याचा वापर करीत. त्यात जनावरांच्या चित्रांचा वापर होता. नंतर त्यावर अरबी सत्तेचा प्रभाव पडला.

चलनासाठी सोन्याचा प्रथम वापर इ.स.पूर्व ७०० वर्षात लिडीयन व्यापाऱ्यांनी (पश्चिम तुर्कस्तान) सोन्याच्या नाण्याच्या स्वरूपात केला. त्या नाण्यात ६३% सोने व २७% चांदी असे मिश्रण होते. त्या नाण्याचे नाव 'इलेक्ट्रम' असे होते.

**सोन्याचे रसायनशास्त्र :** प्राथमिक पातळीवर सोने धातूचे शुद्ध स्वरूप प्राप्त करून त्याचे रूपांतर सर्व प्रकारच्या दागिन्यात, चलनात्मक, गंजविरोधी, विद्युत

† माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष व विश्वस्त मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. ६२, भ्रमणध्वनी : ९४२२०४६३८२, ई-मेल : jfpatil@rediffmail.com
††एम. ए., एम.फील. (अर्थशास्त्र), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
भ्रमणध्वनी : ९४२२५२००५३, ई-मेल : jfpatil@rediffmail.com

साधनांसाठी करणे एवढेच आहे. पण रासायनिक विश्लेषण लक्षात घेता, त्यात अलीकडच्या काळात बरीच प्रगती झाली आहे.

सोन्याची रासायनिक व वस्तुरूप वैशिष्ट्ये :

- सोने कठीण नाही.
- सोन्याचे वजन मोठे आहे.
- सोन्याची घनता मोठी आहे.
- सोन्याचा कमाल पातळीवर धागा करता येतो. (Ductibility).
- सोन्याला कोणताही आकार कमाल पातळीवर देता येतो. (Malleability).
- सोन्याचे काप करता येतात. (Sectility)
- सोन्यावर केव्हाही डाग पडत नाहीत. (Never tarnishes)
- सोने पिवळे धमक, झगमगते असते. सोन्याची झीज मर्यादित असते.

या सर्व गोष्टींमुळेच सोन्याचा वापर दाग-दागिन्यांसाठी केला जातो.

- सोन्यावर इतर कोणत्याही रसायनाची प्रतिक्रिया होत नाही. कोणत्याही आम्लामध्ये (Acid) ते विरघळत नाही. गंधकाम्ल, नत्राम्ल व नेहमीचे हरिता आम्ल (HCL) यांचे विशिष्ट प्रमाणात मिश्रण केल्यास त्यात सोने द्राव्य होते. या मिश्रणास - अक्वारेजिया म्हणतात.
- सोने संपत्ती, सत्ता व प्रतिष्ठा यांचे प्रतीक मानले जाते. साहजिकच ते राजेपणाचे लक्षण मानले जाते. मोठ्या साम्राज्याचे चलन सोन्यातच असे.

**सोन्याचा शोध :** सोन्याच्या शोधाच्या अनेक कथा सांगितल्या जातात. त्यात सत्याचाही अंश आहे. मिडास राजाने वरदानात सुवर्ण स्पर्श मिळविला. पण स्वत:ची कन्या गमावली. तिचे - राजाच्या स्पर्शाने सोन्याच्या मूर्तीत (निर्जिव) स्वरूपात रूपांतर झाले. सोने महत्त्वाचे का चैतन्य महत्त्वाचे? हा गहन प्रश्न (?) आहे. ट्रेझर आयर्लंड, ओक आयलँड रहस्य, यु.एस.ट्रेझर, गोल्ड रश, मकेन्नाज गोल्ड, एन.डोरॅडो, क्लोडाईक, इजिप्तचे पिरॅमिडस्, भारताचा सोने साठा - जहाँ डाल डाल पे सोने की चिडीया - या संबंधात अनेक कथा (दंतकथा) आहेत.

**सोने उत्पादक प्रमुख देश :**

विकीपेडियाच्या माहितीप्रमाणे २०१८ मध्ये सोने उत्पादन व साठप (निधी) या निकषावर पुढीलप्रमाणे आकडेवारी महत्त्वाची आहे.

२०२० मध्ये चीनचे सोने उत्पादन जगात सर्वाधिक होते. एकूण उत्पादनात चीनचा हिस्सा ११% होता. त्यानंतर ऑस्ट्रलिया, अमेरिका, कॅनडा व घानाचा नंबर लागतो. चीन हा जगातील सर्वात मोठा सोन उत्पादक देश असला तरी दक्षिण आफ्रिकेतील जोहान्स बर्ग याठिकाणी सोन्याची जगातील सर्वात मोठी खान आहे. भारतात दक्षिण कर्नाटकात कोलार याठिकाणी मोठ्या प्रमाणावर सोन्याचे उत्पादन होते. ही जगातील दुसऱ्या क्रमांकाची खान आहे. (संदर्भ - बी.बी.सी. न्यूज चॅनल)

**सुवर्ण निधी :**

सुवर्ण निधी वा साठा देशाच्या मध्यवर्ती बँकेने -

- ठेवीदारांना देणे देण्यासाठी
- चलनी नोटा धारकांना देण्यासाठी
- व्यापारी भागीदारांना देण्यासाठी
- सुवर्ण चलन पद्धतीत ठेवलेला सोन्याचा साठा
- अर्थात, मूल्यसंग्रह व राष्ट्रीय चलनाच्या मूल्य आधारासाठीही या सुवर्ण साठ्याचा वापर होतो.

२०१९ च्या अखेरपर्यंत ज्या सोन्याचे आजपर्यंत खणन झाले व ज्याचा हिशोब आहे असे सोने १९००४० मेट्रिक टन इतके आहे. या अंदाजात २०% वाढ - घट शक्य आहे. एका ट्रॉय औंसला १२५० डॉलर्स (१ ग्रॅमला ४० डॉलर्स) या ऑगस्ट-२०१७ च्या किंमतीला

१ मेट्रिक टन सोने = ४०.२ दशलक्ष डॉलर्स तर

जगाच्या एकूण सोन्याचे मोल ७.५ लाख कोटी डॉलर्स होते.

**तक्ता क्र. १ जगातील प्रमुख देशांतील सोने उत्पादन आणि साठा (२०१८)**

| क्रम | देश | सोने उत्पादन टन्स - वार्षिक | सोने साठा - टन्स |
|---|---|---|---|
| १ | चीन | ४०४ | २००० |
| २ | ऑस्ट्रेलिया | ३१९ | ९८०० |
| ३ | रशिया | २९७ | ५३०० |
| ४ | अमेरिका | २२२ | ३००० |
| ५ | कॅनडा | १८९ | २२०० |
| ६ | चेक | १५८ | २६०० |
| ७ | इंडोनेशिया | १३७ | २५०० |
| ८ | घाणा | १३० | १००० |
| ९ | द.आफ्रिका | १३० | ६००० |
| १० | मेक्सिको | ११५ | १४०० |
| ११ | ब्राझिल | ९७ | २४०० |
| १२ | उझबेकिस्तान | ९२ | १८०० |
| १३ | सुदान | ७७ | १५५० |
| १४ | पापुआ न्युगिनी | ६९ | १३०० |
| १५ | कझाकिस्तान | ६८ | १००० |
| १६ | उर्वरित जग | १००१ | १२००० |
| | एकूण जग | ३५०३ | ५४००० |

स्रोत : विकीपीडिया

**युद्धकाळ महत्त्व :**

एकूण इतिहासाचा आढावा घेतल्यास, देशाचा सोने साठा ही सर्वात महत्त्वाची वित्तीय मत्ता होती. सोन्याचा साठा सर्वात मोठा युद्धलाभ मानला जात असे. सोन्याच्या साठ्याचा वापर तटस्थ राष्ट्रांकडून वस्तू व शस्त्राचे खरेदी करण्यासाठी केला जाई. फक्त सोन्यासाठी लष्करी व व्यापारी युद्धे केली जात.

**आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व सोने साठा -**

२०११ पासून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीत सोने साठा २८१५ टन (९०.५ दशलक्ष ट्रॉय औंस) इतका होता. वर्ल्ड गोल्ड कौन्सिलच्या आकडेवारीप्रमाणे जगातील प्रमुख ४० देशांकडे (त्यांच्या मध्यवर्ती बँकेकडे) २०२१ मध्ये असलेला सोन्याचा साठा व त्याचा परकीय चलन साठ्यातील हिस्सा (कंसात दिल्याप्रमाणे) तक्ता क्र. २ मध्ये दिलेला आहे.

**सुवर्ण चलन पद्धत** (The Gold Standard) -

सोने कठीण, टिकावू, शाश्वत आहे. मानसिक व भौतिक आधार देण्याचे काम सोने जगातील सर्व प्रदेशात, सर्व लोकांसाठी करत आले आहे. भयंकर, हिंसात्मक, प्रतिक्रिया निर्माण करण्याचे सामर्थ्य सोन्यात आहे.

जगाच्या इतिहासात एक प्रदीर्घ कालखंड सोन्याला चलन व्यवस्थेचा कणा मानणारा होवून गेला. मानवी संस्कृतीचे एक व्यवच्छेदक लक्षण म्हणजे सोने.

अमेरिकेचे प्रेसिडेंट रीगन यांनी जून-१९८१ मध्ये गोल्ड कमिशन-सुवर्ण आयोग नेमला व मार्च-१९८२

**तक्ता क्र. २ जगातील प्रमुख ४० देशांच्या मध्यवर्ती बँकेकडील सोने (२०२१)**

| अ.क्र. | देश | हिस्सा (मेट्रिक टन) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अमेरिका | ८१३३.५ | (६५.६%) |
| २ | जर्मनी | ३३५९.१ | (६५.२%) |
| | आंतरराष्ट्रीय नाणेनिधी | २८१४.० | उपलब्ध नाही |
| ३ | इटली | २४५३.८ | (६२.१%) |
| ४ | फ्रान्स | २४३६.४ | (५७.२%) |
| ५ | रशिया | २२९८.५ | (२१.०%) |
| ६ | चीन | १९४८.३ | (३.२%) |
| ७ | स्वित्झर्लंड | १०४०.० | (५.३%) |
| ८ | जपान | ८४६.० | (३.४%) |
| ९ | भारत | ७४४.८ | (६.५%) |
| १० | नेदरलँड | ६१२.५ | (५४.८%) |
| | युरोपियन सेंट्रलबँक | ५०४.८ | (३३.५%) |
| ११ | तैवान | ४२३.६ | (४.२%) |
| १२ | तुर्की | ३९३.४ | (२०.९%) |
| १३ | कझाकिस्तान | ३९२.७ | (६०.३%) |
| १४ | उझबेकिस्तान | ३८३.५ | (६२.२%) |
| १५ | पोर्तुगाल | ३८२.६ | (६४.७%) |
| १६ | सौदी अरेबिया | ३२३.१ | (३.९%) |
| १७ | इंग्लंड | ३१०.३ | (९.०%) |
| १८ | लेबनान | २८६.८ | (४२.९%) |
| १९ | स्पेन | २८१.६ | (१७.२%) |
| २० | ऑस्ट्रेलिया | २८०.० | (४६.९%) |
| २१ | थायलँड | २४४.२ | (५.६%) |
| २२ | पोलंड | २३१.८ | (७.८%) |
| २३ | बेल्जियम | २२७.४ | (३१.६%) |
| २४ | अल्जेरिया | १७३.६ | (१७.२%) |
| २५ | व्हेनेझुलिया | १६१.२ | (८२.४%) |
| २६ | फिलिपिन्स | १५७.० | (८.२%) |
| २७ | सिंगापूर | १५३.७ | (१.७%) |
| २८ | ब्राझिल | १२९.७ | (२.०%) |
| २९ | स्विडन | १२५.७ | (११.४%) |
| ३० | द.आफ्रिका | १२५.३ | (१२.३%) |
| ३१ | मेक्सिको | ११९.९ | (३.२%) |
| ३२ | लिबिया | ११६.६ | (८.२%) |
| ३३ | ग्रिस | ११४.० | (४५.३%) |
| ३४ | द. कोरिया | १०४.४ | (१.३%) |
| ३५ | रोमानिया | १०३.६ | (१०.८%) |
| | बिस (Bank for Int.settlement) | १०२.० | उपलब्ध नाही |
| ३६ | इराक | ९६.४ | (९.०%) |
| ३७ | हंगेरी | ९४.५ | (११.९%) |
| ३८ | इजिप्त | ८०.७ | (११.५%) |
| ३९ | ऑस्ट्रेलिया | ७९.८ | (७.९%) |
| ४० | कुवेत | ७९.० | (८.६%) |

आधार - विकीपेडिया

मध्ये या सुवर्ण आयोगाचा वादग्रस्त अहवाल सादर झाला. या अहवालाचा मुख्य हेतू सोन्याला पुन्हा चलन व्यवस्थेच्या केंद्रभागी आणणे हा आहे. सर्वसाधारणपणे सोन्याला चलन व्यवस्थेचा केंद्र करण्याची मुख्य कारणे पुढीलप्रमाणे सांगितली जातात.

१. किंमत स्थैर्याची पुनर्स्थापना व व्यवस्था
२. महत्त्वाच्या चलनामध्ये निश्चित विनिमय दर ठेवणे
३. चलन धोरण व आर्थिक व्यवस्थापनामध्ये ''आपोआपपणा'' (Automaticity) निर्माण करणे.

**संक्षिप्त इतिहास -**

सोन्याचा वापर मूल्यसंग्रह - देयता माध्यम म्हणून प्राचीन काळापासून झाला असला, तरी आंतरराष्ट्रीय सुवर्ण चलन व्यवस्था १८७० पासून सुरू झाली. तसे पाहिले तर ब्रिटन १८१६ पासूनच पूर्ण सुवर्ण चलन पद्धतीचा वापर करीत होते (त्या काळात सर आयझॅक न्यूटन, मास्टर ऑफ मिंट या पदावर होते). नंतरच्या काळात जर्मनी व जपानमध्ये सुवर्ण चलन व्यवस्था रूढ झाली. १९ व्या शतकात बहुतेक देशात द्विधातू (सोने-चांदी) चलन पद्धत होती. अधूनमधून अपरिवर्तनीय कागदी चलनाचाही वापर होई. (अमेरिका-

इंग्लंड). चीन व मेक्सिकोमध्ये फक्त चांदीचाच वापर चलनासाठी होई. नंतरच्या काळात हॉलंड व बेल्जियममध्येही फक्त चांदीचा चलनासाठी वापर सुरू झाला. अमेरिकेत १९०० मध्ये गोल्ड स्टँडर्ड कायदा झाला.

ऑर्थर ब्लूमफिल्ड यांच्या मते, सुवर्ण चलन पद्धतीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती.

- राष्ट्रीय चलन एककाचे मूल्य सोन्याच्या वजनात ठरे.
- मध्यवर्ती बँक वा सरकारी खजिना उपरोक्त दराला सोन्याची खरेदी वा विक्री राष्ट्रीय चलनात करण्यास सतत तयार असत.
- सोन्याची नाणी मुक्तपणे पाडली जात.
- परिचलनात असलेल्या चलनामध्ये अशा सोन्याच्या नाण्याचा मोठा हिस्सा असे.
- सोन्याची आयात-निर्यात मुक्त होती.

या वैशिष्ट्यांमुळे, सुवर्ण चलन पद्धतीवर असलेल्या देशाच्या चलनातील विनिमय दर स्थिर (Fixed) होते. जर सोने आयात वा निर्यात करावे अशी अवस्था निर्माण झाल्यास, किफायतशीर सोने गाळा निर्माण व्हायचा. अर्थात, टांकसाळ खर्च व सोने वाहतूक खर्च त्यात महत्त्वाचे घटक ठरत. ही व्यवस्था एकूणच स्वयंदुरुस्तीची होती (Self-Correcting). साहाजिकच स्थैर्य हे तिचे वैशिष्ट्य होते. व्यापार तोलातही किमान प्रश्न निर्माण होत.

एकंदरीत इतिहास लक्षात घेता, सुवर्ण चलन पद्धतीचा वापर प्रमुख राष्ट्रांनी १८७० ते १९१४ पर्यंतच केला. दोन महायुद्धांच्या काळातही सुवर्ण चलन पद्धत होती.

अर्थात, सुवर्ण चलन पद्धतीतही किंमत पातळी अस्थिर होती. त्याचे मुख्य कारण सुवर्ण पुरवठ्याच्या वाढीचा वेग लक्षणीय बदलत असे. सुवर्ण पुरवठ्याच्या वाढीचा वेग मुख्यत: सोन्याच्या उत्पादनावर अवलंबून होता. हेही मान्य केलेच पाहिजे की, किंमत पातळी स्थिर असण्यासाठी सोने व इतर वस्तुमधील व्यापार शर्ती स्थिर असल्या पाहिजेत. पण सोने उत्पादनातील बदल यावर प्रभाव टाकू शकतो. अति सोन्यासाठी चलनेत्तर मागणी हाही महत्त्वाचा घटक असतो. चलनेत्तर सोने साठ्याचा सोने किंमतीवर कसा परिणाम होतो, हे बरेच अस्पष्ट आहे.

अनेक अर्थशास्त्रज्ज्ञांनी चलनासाठी सुवर्ण पुरवठ्याचा प्रभावही लक्षात घेतला आहे. किटचिन, कॅसेल, केन्स, वारेन व पिअर्सन हे ते अर्थशास्त्रज्ज्ञ. वारेन व पिअर्सन यांच्या मते -

"Prices rose whenever the rate of growth in monetary gold exceeded the rate of growth of total output and fell whenever the growth in gold fell short of the growth of production."

सध्या स्वित्झर्लंड सोडल्यास, अगदी अमेरिकेतदेखील सोन्याला चलन व्यवस्थेत औपचारिक भूमिका नाही.

रूपांतर क्षमता (Convertibility) नसताना, चलनासाठी सोन्याचा आधार (Backing) ठेवण्याचा हेतू चलन पुरवठा मर्यादित करणे हा असतो. तसेच चलनासाठी मानसिक आधार मिळविणे हाही भाग ज्यांना सोन्याशी चलनाचा संबंध आहे, असे वाटते, त्यांच्यासाठी आवश्यक आहे. पैसा किंवा चलन ही सामाजिक परंपरा आहे. यावर त्यांचा विश्वासच नसतो. १९३४ च्या अमेरिकन बँकिंग कायद्याने सर्व सोन्याची नाणी व सुवर्ण रोखे काढून घेण्यात आले. त्याऐवजी फेडरल रिझर्व्ह बँकांनी त्यांच्या ठेवीच्या ३५% व ४०% शिल्लक सुवर्ण रोख्यांचा सोने ठेवावे असे ठरले. १९४५ मध्ये या अटी दोन्हीसाठी २५% समान करण्यात आल्या. १९९५ मध्ये ठेवीसाठी आधारही रद्द करण्यात आला. पण हेही खरेच की, चलनाचे रूपांतर सोन्यात करण्याच्या अटींचा चलन व्यवस्थेच्या - चलन पुरवठ्याच्या शिस्तीवर योग्य तोच परिणाम होतो.

असेही म्हटले जाते की, सोन्याचा नवा पुरवठा, वर्तमान साठ्याचा विचार करता अल्प असतो. परिणामी, चलन पुरवठ्यावर (वाढीवर) नैसर्गिक मर्यादा येते. परिणामी, भाववाढही मर्यादित होते. सुवर्ण रूपांतर क्षमता तांत्रिक अर्थाने शक्य आहे. पण राजकीय शक्यता काय? हा प्रश्न शिल्लक राहातो. कारण राजकीय नेत्यांना अडचणींच्या वेळी - एकदम विस्तार व एकदम संकोच करणे कितपत टाळता येईल, हा मोठा प्रश्न आहे.

अर्थात, सोन्याची किंमत चलनात जास्त ठेवल्यास नवीन सोन्याचा पुरवठा लक्षणीय वाढेल. पण चालू साठ्यातील सोन्याची विक्रीही वाढेल.

सोनं लोक का साठवतात? दागिन्यासाठी, राजकीय वा आर्थिक अडीअडचणीसाठी; पण मुख्यत: गुंतवणूक म्हणून सोने साठविले जाते. अर्थात, हे लक्षात ठेवले पाहिजे की, सोन्याच्या किंमतीचा (रूपांतर) चलन व्यवस्थेवर परिणाम होणारच. हे उघड आहे की, इतिहास वा तर्कशास्त्र दोन्हींकडून सोन्यांच्या रूपांतर क्षमतेमुळे स्थिर किंमत पातळी हमखास प्राप्त होईल याची खात्री नाही. विनिमय दर स्थिरावण्यासाठी इतर देशांनीही रूपांतर क्षमता ठेवली पाहिजे.

आणखी एक प्रश्न आहे, जगाच्या एकूण सोने उत्पादनापैकी ८०% उत्पादन द.आफ्रिका व सोव्हिएट रशिया करतात. हे दोन्ही देश वाढीव सोने उत्पादन बाजारात किती आणायचे याचा काळजीपूर्वक हिशोब ठेवतात. सुवर्ण रूपांतर क्षमता लागू केल्यास या दोन देशांना प्रचंड नफा (Windfall) मिळण्याची शक्यता आहे.

बदलत्या किंमतीमुळे, सोन्यामुळे चलन व्यवस्थेला शिस्त लागेल, असे मानणे फारसे समर्थनीय नाही. चलन व्यवस्थेला सामाजिक निकषावर उत्पादन करण्यासाठी मानवी व्यवस्थापनाची - मागणी ... असूनही, गरज आहे.

इतरही चलन पद्धतींचा विचार झाला आहे. २०व्या शतकात वस्तू आधारित व्यापक 'टॅब्युलर' चलन पद्धतीचा विचार मांडला गेला. यात चलनाची, व्याख्या वस्तू किंमत निर्देशांकाप्रमाणे (त्यातील बदल) बदलते. चलन धोरण या किंमत निर्देशांकाशी पूर्णत: जोडले जाते. या पर्यायी प्रकारात द्विधातू चलन व्यवस्था व समधर्मी धातू (Bimetallation & Symmetallation) यांचा समावेश होतो. द्विधातू पद्धतीत सोने व चांदी यांना स्थिर किंमतीला चलन दर्जा दिला जातो. त्यातून अधिक किंमत स्थैर्य प्राप्त होवू शकते. अर्थात, त्यासाठी दोन्ही धातूंचा मोठा साठा आवश्यक असतो. त्यांच्या किंमतीतील विनिमय दर पूर्व निश्चित असतो.

आल्फ्रेड मार्शलने हे दाखवून दिले की, द्विधातू चलन पद्धतीत दोन चलनांची किंमत संबंधित धातूच्या निश्चित वजनात ठरविली जावी. यालाच एजवर्थने ''सिमेटॅलिझम'' असे नाव दिले. मार्शलला ही पद्धत अधिक योग्य वाटली. अर्थात, त्यासाठी तर्कशास्त्रीय निकषांवर वस्तूंची यादी वाढवावी लागेल. या दृष्टीने १९३० मध्ये बेन्जामिन ग्रॅहम व फ्रँक ॲहम यांनी प्रथम २३ वस्तू व नंतर १५ वस्तूंची (आंतरराष्ट्रीय व्यवहारासाठी) यादी केली. अशा वस्तूंच्या गोदाम पावत्यांच्या आधारावर चलन पुरवठा ठरवायचा होता. वस्तूंची निवड करताना, त्यांचे आर्थिक महत्त्व व साठप क्षमता महत्त्वाचे घटक होते. खरे तर परंपरावादी लोकांना चलनासाठी सोने वापरणे योग्य वाटे. कारण ऐतिहासिकता व भावनिकता तर आधुनिकांना नियंत्रित चलन व्यवस्था योग्य वाटे.

वस्तू चलनाचा विचार १९६४ मध्ये अल्बर्ट हार्ट, निकोलस कॅल्डॉर व जॅन हिनबर्जन यांनी पुनरुजीवित केला. त्या चलनास त्यांनी ICRC (International Commodity Reserve Currency) असे नांव दिले. त्यासाठी त्यांनी ३० वस्तूंची (उदाहरणदाखल) यादी दिली. आंतरराष्ट्रीय व्यापारातील संबंधित वस्तूंचे महत्त्व हा निकष असावा. दर ५ वर्षांनी वस्तूंची यादी फेरतपासणी करावी. विनिमय नाणेनिधीने (IMF) सोने

व ICRC यांच्यातील विनिमय दर ठरविणे अभिप्रेत होते. या प्रस्तावाला अंक्टॅडचा पाठिंबा मिळाला होता. (विकसनशील देशांचा पाठिंबा मिळविण्यासाठी).

डॉलरमध्ये व्यक्त झालेल्या करारांचे व्यापक किंमत दर्शकांकात बदल करण्याचा विचार (Indexation) जुन्या काळात १८२९ मध्ये जोसेफ लोवे व नंतर १० वर्षांनी जॉर्ज पौलेट स्क्रोपे यांनी मांडला होता. दर्शकांकी करणाचे समर्थन नंतर मार्शलनेही केले.

टॅब्युलर चलन पद्धतीमध्ये दर्शकांकीकरण एक पाऊल पुढे जाते. स्टन्ले जेव्हन्स (१८७५) व आर्यविंग फिशर (१९२०) यांनी व अगदी अलीकडे रॉबर्ट हॉल यांनी सर्व व्यापारी करारांचे दर्शकांकीकरण, सोन्यात न करता, चार वस्तूंच्या भारांकित दर्शकांमध्ये करण्याचे ठरले. या चार वस्तू अमोनियम नायट्रेड, कॉपर, ॲल्युमिनियम व प्लायवूड म्हणजेच ॲंकप.

याच वस्तू निवडण्याचे कारण असे की, पूर्वीच्या २० वर्षात त्यांचा किंमत दर्शकांक अमेरिकेच्या उपभोक्ता किंमत दर्शकांकाशी सुसंगत होता. डॉलर व ॲंकपचे सूत्र घातले जाईल. ॲंकपना विधी सिद्ध चलनाचे स्थान दिले जाईल.

उपरोक्त सर्व मांडणी लक्षात घेता, सुवर्ण चलन पद्धतीचा विचार करताना तीन संख्या लक्षात घ्याव्या लागतात. हे स्पष्ट होते.

- सोने
- कागदी चलन (त्यात चालू ठेवीही समाविष्ट) (डॉलर)
- वस्तूंचा गट (किंमत पातळी ठरविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या)

वेगळ्या शब्दात या तीन संख्यांना जोडणाऱ्या तीन किंमती लक्षात घ्याव्या लागतात.

- वस्तूंची डॉलरमधील किंमत
- सोन्याची डॉलरमधील किंमत
- वस्तूंची डॉलरमधील किंमत (सोने व इतर वस्तूमधील वस्तू व्यापार शर्ती) असेही म्हटले जाते की, वस्तूंची डॉलर किंमत स्थिर करणे हे उद्दिष्ट असल्यास सोन्याची डॉलर किंमत ठरविणे हा मार्ग ठरत नाही.

मधल्या काळात (मध्ययुगात) मौलिक धातूंचे (सोने, चांदी) महत्त्व अर्थव्यवस्था, राजसत्ता व लष्करी सामर्थ्यासाठी अतिशय महत्त्वाचे असते. या विचारावर आधारित व्यापारी धोरण व्यापारवाद (Mercantilism) पुढे आला. व्यापार शिल्लक ही फक्त मौलिक धातूतच घ्यायची (सोने), सोन्याच्या आधारावर चलन पुरवठा वाढवायचा, लष्कर मोठे करायचे अशा प्रकारे सत्ता बळकट करण्याची, अशी ती विचारधारा होती. त्यासाठी आयात किमानीकरण व निर्यात कमालीकरण धोरण वापरायचे. त्यासाठी प्रेतवस्त्राच्या (रेशीम) आयातीवरही जबर कर बसवायचा व प्रतिबंध करायचा, अशी भूमिका निर्माण झाली.

**सोने व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी** (Gold and IMF)

जानेवारी-२०२१ च्या अखेरीस, प्रचलित विनिमय दराला नाणेनिधीचा सुवर्ण साठा, ऐतिहासिक खर्चाचा विचार करता, ३.२ अब्ज विशेष आहरण अधिकार (SDR) (४.६ अब्ज डॉलर्स) पण चालू किंमतीला ११० अब्ज SDR (१६८.६ अब्ज डॉलर्स) इतका आहे.

१९७० पर्यंतचा विचार केल्यास नाणेनिधीकडे पुढील मार्गांनी सोने संचय होत गेला.

- १९४४ मध्ये, स्थापनेच्यावेळी सभासद राष्ट्रांनी त्याच्या प्राथमिक वर्गणीचा २५% हिस्सा सोन्यात द्यायचा होता. नंतरची वर्गणी वाढही सोन्यातच द्यायची होती, हा सर्वात मोठा सोने साठा घटक आहे,
- नाणेनिधीकडून घेतलेल्या कर्जावरचे व्याज व इतर खर्च सोन्यातच द्यावे लागतात.
- इतर देशाचे चलन प्राप्त करण्यासाठी सभासद राष्ट्र आपल्याकडील सोने नाणेनिधीला विकते (१९७०-७१ मध्ये हा प्रकार द.आफ्रिकेने केला.)

- नाणेनिधीच्या गत कर्जाची परतफेड सभासद राष्ट्र सोन्यात करू शकते.

- एप्रिल १९७८ च्या दुसऱ्या घटना दुरुस्तीप्रमाणे विनिमय दरांचा समान पाया म्हणून सोन्याचा वापर थांबविण्यात आला.

- विशेष आहरण आधिकारासाठी (SDR) सोने हा महत्त्वाचा आधार ही भूमिकाही रद्द झाली.

- सोन्याची अधिकृत किंमत (Official Price) हाही प्रकार रद्द झाला.

- नाणेनिधी व सभासद राष्ट्रातील व्यवहार सोन्यातच करणेही रद्द झाले.

- सोन्याच्या किंमती ठरविण्यात नाणेनिधीने भाग घेवू नये, असेही ठरविण्यात आले.

- अर्थात, नाणेनिधी बाजार किंमतीला सोने विकू शकते.

- कर्ज परतफेडसाठी नाणेनिधी सोने स्वीकारू शकते. ८५% मतदानाने.

- याखेरीज सोने विकत घेणे, कर्जावू देणे, वापरास देणे, अदलाबदल करणे वा सोने तारण मानणे यालाही प्रतिबंध करण्यात आला.

- १९९९ मध्ये अतिरिक्त कर्जबाजारी गरीब देशांना मदत करण्यासाठी १४० लाख औंस सोने नाणेनिधीने विकले. तसेच ब्राझिल व मेक्सिको यांच्या कर्जपरत फेडीसाठी १२९.४ लाख औंस सोने विकले गेले.

- २००९ मध्ये ''न्यू इन्कम मॉडेल''साठी ४०३.३ मेट्रिक टन सोन्याची (नाणेनिधीच्या सोन्यापैकी अंदाजे १२.५%) विकण्यात आले. अशा सोने विक्रीतून होणारा नफ्यातून एक 'निकाय निधी' स्थापन करण्यात आला.

- सध्या सोन्याच्या विक्रीतून नाणेनिधीला होणारा नफा - उत्पन्न त्याचा किमान ९०% भाग "Poverty Reduction and Growth Trust" साठी देण्याचे मान्य करण्यात आले.

**सोन्याची किंमत :**

सोने सुंदरतेचं, संपत्तीचं व सत्तेचं प्रतीक आहे. विविध संस्कृतीच्या व जगभरच्या चलन व्यवस्थेत सोन्याची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. मूल्यसंग्रह व मत्तेचा माध्यम (गुंतवणूक) म्हणून सोने सदैव महत्त्वाचे राहिले आहे. या गोष्टी लक्षात घेता, सोन्याची किंमत ज्या त्या वेळी कशी ठरते, हे पाहाणे उपयुक्त ठरेल.

१९७१ पर्यंत (जेव्हा सुवर्ण चलन पद्धत सार्वत्रिक बंद झाली) विनिमयात येणाऱ्या कोणत्याही इतर वस्तूप्रमाणे सोन्याची किंमत नेहमीप्रमाणेच सोन्याचा पुरवठा व सोन्यासाठी मागणी यावर ठरत होती.

किटचिन यांच्या मते (१९९६), सोन्याची किंमत व अमेरिकेची अर्थसंकल्पीय तूट यात घन सहसंबंध दिसून आला.

ख्रिस्टी-डेव्हीड व इतर (२०००) यांच्या अभ्यासाप्रमाणे, सोन्याच्या किंमतीवर क्षमता वापर, उपभोक्ता किंमत निर्देशांक, स्थूल राष्ट्रीय उत्पादन व उत्पादक किंमत निर्देशांकाच्या बदलाचा (माहितीचा) परिणाम होतो. तसाच परिणाम बेरोजगारी दर व संघ राज्यीय अर्थसंकल्पीय तुटीचाही होतो. चलन पुरवठ्यातील बदलाचाही घनात्मक परिणाम सोन्याच्या किंमतीवर होतो.

सोन्याची किंमत व राष्ट्रीय उत्पन्नाचा स्थिरक (Ddeflator) यांच्यात उच्च धनात्मक सहसंबध आहे, असे कॉफमन व विंटर्स यांच्या अभ्यासात दिसून आले.

टंडन व उरिच यांच्या अभ्यासाप्रमाणे, चलन पुरवठ्यातील अनपेक्षित बदलांचा सोन्याच्या किंमतीवर धनात्मक प्रभाव पडतो.

साजस्टाड व सकीनिलानी यांच्या अभ्यासाप्रमाणे, १९८२-९० या काळात जागतिक भाववाढीत १ बिंदूंनी वाढ झाल्यास सोन्याच्या किंमतीत ०.६६ ते ०.७५% वाढ होताना दिसते.

रॅन्सन यांच्या अभ्यासाप्रमाणे (२००५), भाववाढीच्या दराच्या २.५२ ते ३ पट सोन्याच्या किंमतीत

वाढ होते.

बास्र्की व समर्स (१९८८) यांच्या अभ्यासाप्रमाणे, दीर्घकालीन वास्तव व्याजदर सोन्याच्या किंमतीशी ऋणात्मक सहसंबंधित असतात. म्हणजेच जेव्हा वास्तव व्याजदर वाढतात. तेव्हा सोन्याच्या किंमती घटतात. किंवा नेमके त्याविरुद्ध.

रेडेटझकी (१९८९) यांचा अभ्यास असे स्पष्ट करतो की, सोन्याचा साठा असणारे घटक सोन्याच्या किंमतीवर पुरवठा बदलातून प्रभाव टाकू शकतात.

कॉफमन विंटर्स (१९८९) यांच्या मते, वार्षिक सरासरी सोने किंमत व जागतिक सोने उत्पादन (वार्षिक) यांचा घनिष्ठ संबंध असतो.

सेल्वनाथन यांच्या मते, सोन्याच्या उत्पादन खर्चाच्या संदर्भात १०% वाढल्यास व सोन्याची किंमत तीच राहिल्यास (५ वर्षासाठी), सोन्याचे उत्पादन वाढून नवी संतुलन किंमत तयार होते.

वाढत्या पुरवठ्याचा सोन्याची किंमत करण्यात परिणाम होतो. बदलाचे प्रमाण अत्यल्प असते.

१९७४-१९८८ या काळाचा कॉफसन व विंटर्स यांनी १९८९ मध्ये केलेल्या अभ्यासाप्रमाणे असे दिसते की, सोन्याचे उत्पादन, डॉलर दर्शकांक व भाववाढ या तीन घटकामुळे वार्षिक सरासरी सोने बदलाचा ९४% भाग स्पष्ट होतो.

जागतिक स्तरावर सोन्याची किंमत, व्यवहार सुरु असताना लंडन येथून निश्चित केली जाते. दिवसातून दोन वेळा ही किंमत ठरते. या पद्धतीस 'लंडन गोल्ड फिक्स' असे म्हटले जाते. (संदर्भ - बी.बी.सी. न्यूज चॅनल)

**जागतिक सुवर्ण परिषद :**

जागतिक सुवर्ण परिषद हा संस्था सोन्यासंबंधी संशोधन, विपणन व विक्री, मानांकन, बाजार व्यवस्था व सरकारी धोरण यासंबंधी धोरणात्मक निर्णय व व्यवस्थापकीय कार्य गेली ३० वर्षे करते. या परिषदेत २८ सोने कंपन्या, ५०० प्रकल्प, १००+ उत्पादक खाणी या सभासदांची आहे. एकूण ४५ राष्ट्रांत ही परिषद काम करते.

**भारतीय रिझर्व्ह बँक व सोने :**

भारताची चलन व्यवस्था राष्ट्रीय पातळीवर, ब्रिटिश काळात सुवर्ण विनिमय चलन स्वरूपाची होती.

स्वातंत्र्यानंतर, रिझर्व्ह बँकेच्या राष्ट्रीयीकरणानंतर भारताच्या चलन व्यवस्थेचा आधार - Minimum Reserve System हा होता. तोच आजही तत्त्वत: चालू आहे.

मूळ तरतुदीप्रमाणे भारतीय चलनाचा (रुपयाचा) पुरवठा ११५ कोटी रुपये सोने + ८५ कोटी परकीय चलन (मुख्यत: डॉलर, पौंड, मार्क, फ्रँक, येन) या स्वरूपात किमान निधीच्या (Minimum Reserve) आधारावर, तत्कालीन विनिमय दरावर कितीही चलन पुरवठा करता येणे शक्य होते.

**प्रत्यक्षात मात्र :**

२०१९-२० मध्ये रिझर्व्ह बँकेने ४०-४५ टन सोने विकत घेतले. २०१९ - २०२० अखेरीस रिझर्व्ह बँकेकडे ६१२.५६ टन सोने होते. सोन्याच्या साठ्याचे मूल्य मार्च २०१९ ला २३.०७ अब्ज डॉलर्स *होते*. ते मार्च-२०२० ला ३०.५७ अब्ज डॉलर्स झाले.

३६०.७१ टन सोने परदेशी सुरक्षित खजिन्यात (बँक ऑफ इंग्लंड व बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंट) ठेवले होते. उर्वरित सोने देशातच, रिझर्व्ह बँकेच्या ताब्यात आहे.

एकूण परकीय चलन साठ्यात सोन्याचा हिस्सा २०१९ मध्ये ५.५९% तर २०२० मध्ये ६.४०% होता.

परकीय चलन विनिमय मूल्य व सोन्याच्या किंमतीचा बदल यामुळे होणारा साठा मूल्य बदल रिझर्व्ह बँकेच्या (फायदा-तोटा) (CGRA) (Currency and Gold Revaluation Account) या खात्यात जमा होतात. त्यांचा वापर विनिमय दर व सोन्याच्या किंमतीतील बदलापासून सुरक्षा देण्यासाठी होतो.

आजच्या सोन्याच्या किंमती व एकूण चलन पुरवठ्याची स्थिती लक्षात घेता भारताची/ रिझर्व्ह बँकेची चलन पुरवठ्याची व्यवस्था आदेश चलन, कागदी चलनाची आहे, असेच म्हणावे लागेल.

भारतीय रिझर्व्ह बँक कायद्याच्या कलम ३३ प्रमाणे, बँकेच्या इश्यु.डिपार्टमेंटच्या मत्ता (Assets) पुढीलप्रमाणे असतील.

- सोन्याची नाणी
- धातूस्वरूप सोने
- परकीय कर्जरोखे

या सर्वांची एकत्रित किंमत सोने नाणी व सोने धातू व परकीय कर्जरोखे २०० कोटी रुपयेपेक्षा कमी नाही. त्यापैकी सोन्याची नाणी व सोन्याचा धातू याचे मूल्य ११५ कोटी रुपयांपेक्षा कमी असता उपयोगी नाही.

सोन्याची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारातील सोन्याच्या किंमतीप्रमाणे असेल. रुपयाच्या नाण्यांचे मूल्य दर्शनी मूल्याइतके तर परकीय कर्जरोखे बाजार मूल्याप्रमाणे धरले जाईल.

किमान १७/२० एवढ्याप्रमाणे (८५%) सोने व सोने नाणी रिझर्व्ह बँकेच्या वा तिच्या हस्तकांच्या ताब्यात असते.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायद्याच्या (१९३४) कलम ४७ प्रमाणे, सर्व प्रकारच्या बुडित व संशयात्मक कर्जाची सोय करून, भांडवली झीज वजा करून तसेच कर्मचाऱ्यांच्या वर्गण्या व सेवा निवृत्ती तरतुदी केल्यानंतर उर्वरित नफा रिझर्व्ह बँकेने भारत सरकारला द्यायचा आहे. यालाच Economic Capital Framework असे म्हणतात. याबाबतीत २०१८ मध्ये डॉ. बिमल जालान (माजी गव्हर्नर) यांच्या अध्यक्षत्वाखालच्या समितीने पुढील गोष्टी सुचवल्या आहेत.

रिझर्व्ह बँकेचे इकॉनॉमिक कॅपिटल जगात सर्वात अधिक म्हणजे ताळेबंदाच्या २६.८% आहे. अशा भांडवलात मूळ भांडवल, निधी, धोका तरतुदी व पुनर्मूल्यांकन शिलका यांचा समावेश होतो. त्यात शेवटचा घटक सर्वात मोठा ७३% असतो. नव्या पद्धतीत काँटीनजंट रिस्क बफर तयार करणे आवश्यक आहे. त्याचे प्रमाण ताळेबंदाच्या ५.५% ते ६.५% या कक्षेत पाहिजे. एकूण इकॉनॉमिक कॅपिटल ताळेबंदाच्या २०.८% ते २५.४% पर्यंत असावे. दर पाच वर्षांनी या व्यवस्थेची फेरतपासणी व्हावी.

रिझर्व्ह बँकेच्या क्षमतेच्या सातत्यासाठी वरील तरतुदी योग्य व आवश्यक वाटतात.

**सोन्याचे औद्योगिक वापर :**

इ.स.पूर्वी ४००० वर्षापासून Au या चिन्हाचा सोने हा धातू दिसण्यासाठी उपयोगसाठी व मोलासाठी लोक वापरत आले आहेत. हा पिवळा धमक धातू कमतरतेमुळे (Rarity) दिसणे, विद्राव्यतेमुळे, बदल क्षमतेमुळे, घनतेमुळे टिकावूपणा व तारक्षमतेमुळे व गंज न होण्याच्या वैशिष्ट्यामुळे सर्वांचेच आकर्षक ठरला आहे. सोने खाद्य स्वरूपातही मिळते.

कॅनडामध्ये सोन्याचे उत्पादन हा मोठा खनिज उद्योग आहे. इजिप्तच्या फॅरोहाच्या मृत-मुख आच्छादनासाठी सोन्याचा वापर झाला. पुतळे बनविण्यासाठी इजिप्तचे लोक सोने वापरत. लिडिया या राज्यात इ.स.पूर्व ५६० मध्ये सोन्याची नाणी पाडली गेली. रोमन लोकांनी इ.स.पूर्व ५० मध्ये सोन्याची नाणी तयार केली. त्यांना - Aurus (म्हणजे लॅटीनमध्ये सोने) ऑरस असे नाव होते. १०६६ च्या पुढे इंग्लंडमध्ये धातूची नाणी सुरू झाली. ब्रिटनमध्ये १२८५ मध्ये "Florin" हे पहिले सोन्याचे नाणे सुरू केले. अमेरिकेत १७८७ ला इफ्रेम ब्रशर या सोनाराने पहिले सोन्याचे नाणे तयार केले. १७९२ मध्ये अमेरिकेचा Coinage Act झाला. तेव्हापासून सोने व चांदीचा वापर नाण्यासाठी होवू लागला.

**सोन्याचा औद्योगिक वापर मुख्यत:**

- इलेक्ट्रॉनिक्स
- सोने उत्तम वाहक (Conductor) आहे.
- सोने गंजत नाही.

- कोणताही आकार व तार क्षमता यामुळे दाग-दागिने उद्योगात मोठा वापर

- संगणकासाठी

- औषधीवापर

- काच उत्पादन

- विशेष वाहने - अवकाश याने यात वाहक म्हणून

- मूल्य साठप

यासाठी होतो आहे.

**सोन्याचा चोरटा व्यापार** (Smuggling) :

भारतात चोरट्या व्यापाराने (आयातीने) येणारे बहुतांश (७५%) सोने युनायटेड अरब एमरतीमधून येते.

एखाद्या राष्ट्रात गैर मार्ग/ पद्धतीने, कायदा मोडून, कर चुकवून सोने आणणे म्हणजे चोरटी आयात. ज्या देशात/ केंद्रात सोने स्वस्त (कमी करामुळे) तेथून जास्त मागणी असणाऱ्या (भारतासारख्या) देशात वरील प्रकारे चोरट्या पद्धतीने, सोनं बेकायदेशीर आयात होते.

इम्पॅक्ट या कॅनडास्थित संस्थेच्या अभ्यासाप्रमाणे, भारतात एकूण ८००-९०० टन आयात सोन्यापैकी २५% सोने चोरट्या मार्गाने येते. अर्थात, १९९० पूर्वी गोल्ड कंट्रोल कायदा रद्द होण्यापूर्वी चोरटी आयात जास्त होती. तथापि, सोन्याच्या आयातीवर अतिरिक्त आयातकर व शुल्क आकारणीमुळे चोरट्या आयातीचे जाळे पुन्हा सुरू झाले. मधल्या काळात १० ग्रॅम सोन्यावर रु.४५० चा कमाल आयात दर, ठरल्यावर चोरटी आयात कोसळली. चोरट्या सोने आयातीसाठी गरजू लोकांचा वापर केला जातो. सोन्याच्या वाढत्या किंमतीबरोबर चोरट्या आयातीचे प्रमाणही वाढत गेले.

**सार्वभौम सुवर्णरोखे योजना** (SGB - Soverign Gold Bonds) :

नोव्हेंबर-२०१५ मध्ये भारत सरकारने सार्वभौम सुवर्णरोखे योजना सुरू केली. योजनेचे मूळ नाव सुवर्ण चलनीकरण योजना (Gold Monetization Schemes) असे होते. या योजनेत सोने घेणाऱ्यास आपला पॅन नंबर देणे आवश्यक आहे. ठरावीक कालावधीने, रिझर्व्ह बँक सरकारशी मसलत करून सुवर्णरोखे विक्रीच्या अटी जाहीर करते. या योजनेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

सरकारतर्फे रिझर्व्ह बँक सुवर्णरोखे विकते. सुवर्णरोखे १ ग्रॅमच्या पटीत असतील. सुवर्णरोख्याचा कालावधी ८ वर्षाचा असेल. ५ व्या, ६ व्या, ७ व्या, वर्षात योजना व्याज देयतेच्या दिवशी सोडता येते.

किमान गुंतवणूक १ ग्रॅम सोन्याची असेल.

व्यक्तीसाठी कमाल मर्यादा (अविभक्त हिंदू कुटुंब) ४ किलो तर विश्वस्त वा तत्सम संस्थांसाठी कमाल मर्यादा २० किलो सोन्याची असेल.

सुवर्णरोख्याची विक्री किंमत रिझर्व्ह बँक जाहीर करेल. ही किंमत भारतीय रुपयात ठरवली जाईल. (९९९ शुद्धतेच्या सोन्याची ३ दिवसाच्या सरासरी सोने किंमतीवर आधारित असेल.)

रोख्याची किंमत रु.२००००/- पर्यंत रोख, चेक वा डी.डी.मार्फत करता येईल. हा रोखा सरकारी रोखा म्हणून वितरित होईल. (Govt. Security Act 2006).

रोखे धारकाला धारणा प्रमाणपत्र दिले जाईल. रोखे डीमॅट करता येतील. परतफेडीची किंमत भारतीय रुपयात, ९९९ शुद्धतेच्या सोन्याच्या तीन दिवसांच्या प्रचलित किंमतीच्या सरासरीवर आधारित असेल.

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सर्व शाखा सुवर्णरोख्याचा व्यवहार करू शकतील.

गुंतवणूकदाराला २.५% दराने दर्शनी मूल्यावर, वर्षातून दोनदा व्याज दिले जाईल. या रोख्यांचा वापर कर्जासाठी तारण म्हणून करता येईल. नेहमीच्या सोने कर्जाप्रमाणे कर्ज मूल्य प्रमाण ठेवले जाईल. रोख्यावर हक्क नोंद होईल. हे कर्जरोखे भांडवल बाजारात विक्रेय असतील.

२०२२-२३ च्या अर्थसंकल्पात सुवर्णसंबंधी कोणतीच भूमिका घेण्यात आली नाही. सार्वभौम सुवर्ण

रोखे योजना चालूच राहील.

**सोन्यासाठी धावपळ (शोध)** (Gold Rush) :

या संबंधात किमान ५० पेक्षा अधिक पुस्तके आहेत. तसेच चार्ली चॅपलीनचा गोल्ड रश - जेएफप्राडक्शन्स, युरेका, ॲटकामाचा दि ३३ गोल्ड, घानाची डॉक्युमेंटरी - दिमनी स्टोन हे सोने शोधासंबंधीचे ५ जगप्रसिद्ध चित्रपट आहेत.

**इतर संबंधित मुद्दे :**

भारताची रिझर्व्ह बँक १९२६ च्या हिल्टन यंग कमिशनच्या शिफारशीतून स्थापन झाली. या कमिशनमध्ये ख्यातनाम अर्थतज्ज्ञ लॉर्ड जे.एम.केन्स सदस्य होते व अहवालाचा बौद्धिक आधार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ग्रंथ The Problem of Rupee - व त्यांची आयोगापुढे झालेली साक्ष - यावर आधारित होता.

सोन्यामुळे अतिलोभाचे सर्व गुन्हे निर्माण होतात. चोरटी आयात, चोरी, हिंसा, भेसळ, दहशतवाद व भ्रष्टाचार हे त्याचे प्रकार आहेत.

सोने अजूनतरी, मध्यमवर्गासाठी, सर्वाधिक सुरक्षित गुंतवणूक आहे. अल्पावधीतचा अपवाद वगळता सोन्याचे चलनी मूल्य दीर्घकाळात सतत वाढत जाते. सोने सर्वात सुरक्षित तारण मानले जाते. सोन्याच्या संदर्भातील सर्व मानके वर्ल्ड गोल्ड कौन्सिल ठरवते. विशेषतः भारतात, स्त्रीचे सुवर्णालंकार स्त्रीधन मानतात. सोन्याच्या प्रदर्शनातून व्यक्ती/ कुटुंबाची आर्थिक प्रतिष्ठा सिद्ध होते. सुवर्ण भरणाचा वापर उत्तेजक/ औषधी म्हणून केला जातो. सोन्याच्या मालकीत सर्वाधिक आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त होते.

एकूणच काय - Gold is for ever.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. एम्.कन्सेपशिअन गियेनो- दि केमिस्ट्री ऑफ गोल्ड मॉडर्न सुप्रा मोलेक्यूलर गोल्ड केमिस्ट्री - गोल्ड मेटल इंटर ॲक्शन्स अँड ॲप्लिकेशन्स - संपादक - अँटोनियो लगुना (२००८). वाईली - व्हीसीएच व्हर्लग जीएम्बीएच अँड के.वेनहेम

२. विकीपेडिया

३. रिचर्ड एफ.कूपर - हारवर्ड युनिव्हर्सिटी बुकिंग इन्स्टिट्यूशन - दि गोल्ड स्टँडर्ड, दि स्टॅटिस्टिकल फॅक्टस अँड फ्यूचर प्रोस्पेक्टस् - एन्सव्यक्लोपेडिया ऑफ इकॉनॉमिक्स - मॅकग्रा - हिल - १९८१.

४. सैद एलफाकानी गोल्ड प्राईस डिटर्मिनंटस : एम्पीरिकल व ॲनालिसीस अँड इम्पलीकेशन्स इपाद बी.बालबकी आणि हिंद रिअक् इन जर्नल फार इंटरनॅशनल बिझीनेस अँड एंटरप्रेन्यूरशीप डेव्हलपमेंट - खंड क्र.३ - २००९.

५. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा - १९३४ (२००९ पर्यंतच्या दुरुस्त्यासह)


**संकेत स्थळे :**


१. https://mountpolley.com/tng/industrial uses of gold

२. https://www.cbnctv18.com/business/microsoft

३. https://www.goodroads.com/chdf/shelf/goldrush

४. https://www.lunchbox-productions.com/movies.about. gold


◆

# १९ व्या शतकातील काही भारतीय अर्थतज्ज्ञांचे शेतीविषयक विवेचन

**दि. व्यं. जहागिरदार** †
**मुक्ता दि. जहागिरदार** ††

**प्रस्तावना :**

भारतातील आधुनिक कालखंड हा १९व्या शतकापासून सुरू होतो, हे मान्य केल्यास १९व्या शतकास आपण परिवर्तनाचे शतक म्हणू शकतो. या काळात देशात राजकीय, सामाजिक आणि आर्थिक अशी वेगवेगळी परिवर्तने झालीत. या शतकाच्या दुसऱ्या दशकात ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता सर्वदूर प्रस्थापित झाली व भारताच्या १८५७च्या स्वातंत्र्य युद्धानंतर भारतावर ब्रिटिश अंमल सुरू झाला. शेकडो संस्थाने जरी आपापले व्यवहार स्वतंत्रपणे करीत असली, तरी त्यांच्यावर ब्रिटिश शासनाचे नियंत्रण होते. जुन्या व अनिष्ट परंपरा जनतेच्या मागणीनुसार कायद्याद्वारे बंद केल्या गेल्या. सर्वदूर एक कायदा व्यवस्था व सारख्या प्रकाराचे प्रशासन निर्माण झाले. शाळा सुरू होऊन पाश्चिमात्त्य प्रकारचे शिक्षण देण्यासाठी तीन नवीन विद्यापीठे स्थापन झालीत. रस्ते वाहतूक सुधारणा झाल्याने अंतर्गत व्यापार वाढून देशातून कच्चा माल गोळा करून ब्रिटिनला पाठविणे व विदेशी माल वेगवेगळ्या क्षेत्रात पोहचविणे शक्य होऊ शकले. अधिकोषण विषयक सुविधा वाढल्यात. हे सर्व जरी खरे असले, तरी भारत हा ब्रिटनची वसाहत म्हणून प्रस्थापित झाला. भारतीय अर्थव्यवस्थेच्या आधारावर ब्रिटनची अर्थव्यवस्था संपन्न करण्याच्या उद्देशाने ब्रिटिश शासन विविध धोरणे आखत होती. भारतीय अर्थव्यवस्थेचे शोषण सुरू होते. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धानंतर भारतीयांकडून ब्रिटिश साम्राज्यवादाविरोधात विचारांचे व कृतींचे मंथन सुरू झाले. एका बाजूने भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांत ब्रिटनच्या धोरणाचा झालेला विपरीत परिणाम भारतीय अर्थतज्ज्ञ सांगू लागलेत व दुसऱ्या बाजूने त्यावर कोणते उपाय केले पाहिजे, यावरही आपली मते स्पष्ट करू लागलेत.

१९ व्या शतकातील दादाभाई नौरोजी, महात्मा फुले, न्या. रानडे, लोकमान्य टिळक, आर. जी. दत्त, गोपाळ कृष्ण गोखले, छत्रपती शाहू महाराज अशा अर्थतज्ज्ञांनी भारतीय अर्थव्यवस्थेचे चालू असणारे शोषण, विविध क्षेत्रांचे होत असलेल्या अवनतीचे स्वरूप आणि कारणे शास्त्रीय पद्धतीने विषद केली आहेत. वास्तविक पाहाता जरी विविध क्षेत्रांच्या बाबतीत भारतीय

† माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद आणि संचालक कौटिल्य ज्ञानप्रबोधिनी, अमरावती.
आजीव सभासद क्र. ४११, भ्रमणध्वनी- ९८२२३८८९५१, ई-मेल : Jahagirdardv26@gmail.com
†† माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. ४०६, भ्रमणध्वनी- ९६५७७०१७४८, ई-मेल : Jahagirdardv26@gmail.com

अर्थतज्ज्ञांनी विश्लेषण केले असले तरी देखील हे विचार भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा एक भागच आहेत. आपण प्रस्तुत लेखात शेती संबंधातील यांचे विचार पाहू.

**अर्थतज्ज्ञांच्या शेतीविषयक विचारांचा आढावा :**

१९ व्या शतकातील विविध अर्थतज्ज्ञांनी कृषी संबंधात जे विवेचन केले त्यांच्यापैकी सहा अर्थतज्ज्ञांचे विचार येथे सांगितले आहेत. त्यापैकी छ. शाहू महाराजांचे विचार हे त्यांनी आखलेल्या धोरण व त्यांच्या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीच्या आधारे मांडले आहेत.

**१) महात्मा जोतिराव फुले (१८२७-१८९०)**

महात्मा फुले यांच्या आर्थिक विचारांचे विवेचन करताना आपल्याला त्यांच्या 'शेतकऱ्यांच्या आसूड', हंटर आयोगापुढे सादर केलेले निवेदन आणि 'गुलामगिरी' अशा महत्त्वपूर्ण साधनांचा उपयोग करावा लागतो. आपणास त्यांचे शेती व त्या अनुषंगाने शेतकरी यांच्याविषयी त्यांची मते विचारात घ्यायची आहेत. या सर्व विचारांचे समग्रपणे स्पष्टीकरण लक्षात घेतले, तर त्यातून त्यांनी शेतकऱ्यांच्या शोषणाचा सिद्धांत सांगितल्याचे लक्षात येते.

शेती व शेतकरी यांच्या हालाखीची स्थिती स्पष्ट करताना त्यांनी ह्या हालाखीच्या स्थितीची जी कारणे सांगितली आहेत, ती अत्यंत वास्तवदर्शी आहे, हे प्रथमतः मान्य करायला हवे. ही कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१) शेतकऱ्यांचे प्रमाण फार जास्त आहे. शेतकऱ्यांनी किती शेतसारा भरावा हे ठरविण्यासाठी जमिनीची मोजणी करण्यासाठी जे शासकीय कर्मचारी असतात त्यांनी ही मोजणी योग्य करावी म्हणून शेतकऱ्यांना अशा कर्मचाऱ्यांना लाच द्यावी लागते. ही लाच न दिल्यास ते कर्मचारी शेतसारा आपल्या इच्छेनुसार वाढवतो. अशा कर्मचाऱ्यांविरुद्ध तक्रार करता येत नाही. कारण त्यांचेच नातेवाईक शासन सेवेत असतात.

२) शेतकरी वर्ग सावकारांपासून कर्ज घेतात. कधी कधी त्यांना कर्ज देण्यास सावकार राजी नसतात. शेतकरी वर्गाचा लागवड खर्चही भरून निघत नसल्याने तो कर्ज काढतो.

३) अनेकदा कर्ज न मिळाल्याने त्याला दागिने गहाण ठेवावे लागतात. कर्ज न मिळाल्याने त्यांना शेतासाठी साधने / सामान विकत घेता येत नाही. कधी कधी पीक कापणीही करणे शक्य होत नाही, बैलांना चारापाणीही करता येत नाही

४) शेतकरी बैलजोडी विकून पैसा उभा करू शकत नाही. कारण त्यास माहीत असते की, पुढच्या वर्षी बैलजोडी नसल्यास शेतीच करता येणार नाही.

५) शेतकरी हा अन्य व्यवसाय करण्याचे कौशल्य नसल्याने तो शेतीखेरीज दुसरा व्यवसाय करू शकत नाही. शेती व शेतकऱ्यांच्या विपन्नावस्थेचे वर्णन करून जोतिबा म्हणतात की, अशा स्थितीमुळे शेतकऱ्यांना आत्महत्या करावीशी वाटते. पण आई, पत्नी व लहान मुले यांचे पुढे कसे होईल या चिंतेमुळे तो आत्महत्या करीत नाही. विशेष म्हणजे शेतकऱ्यांच्या या दारुण स्थितीची उच्चवर्गीयांना कल्पनाही नसते. शेतकऱ्यांना आपल्या दरबारात पानविड्यासाठी निमंत्रित करण्याचीही गव्हर्नर साहेबांना लाज वाटते.

शेती व शेतकऱ्यांच्या स्थितीचे विवेचन महात्मा फुले यांनी सभोवतालच्या निरीक्षणावरून केले असले, तरी ते संपूर्ण देशातील शेती व शेतकऱ्यांची स्थिती याचे योग्य प्रतिनिधित्व करते. शेती क्षेत्राचे वास्तव स्वरूप ग्रंथातून स्पष्ट करून, त्याचे विश्लेषण करणारे महात्मा फुले हे बहुधा पहिलेच भारतीय अभ्यासक असले पाहिजे. शेतीच्या समस्या स्पष्ट करून त्यावर काही महत्त्वाचे उपायही त्यांनी सांगितले आहे. त्या दृष्टीने त्यांनी शेतीचे मुलांना शिक्षण देण्याची गरज असून शेतकऱ्यांसाठी व शेतीतील अडचणी दूर करण्यासाठी शेतकऱ्यांच्या मुलांना मामलेदार व अन्य पदावर नेमण्याची शिफारसही केली आहे. शेतीची

सुधारणा करण्यासाठी युरोपियन शेतकऱ्यांना जे शेतीविषयक प्रशिक्षण दिले जाते तसे इथल्या शेतकऱ्यांना दिले पाहिजे. शेतीसाठी गाई-बैलांची गरज लक्षात घेता, बैलांचे मजबूत वाण निर्माण केले पाहिजे. प्रत्यक्ष शेती लागवडीत व पर्यायाने उत्पादन वाढीच्याबाबत सिंचन सोई उपलब्ध करून देण्याची महत्त्वाची शिफारस त्यांनी केली आहे. डोंगरमाथ्यावरून जे पाणी वाहते ते जमिनीत मुरविण्यासाठी तालीवजा बंधारे बांधावेत व त्यासाठी पोलीस व लष्करी शिपायांच्या वापर करावा. तळ्यात साचलेला गाळ शेतीसाठी उपयुक्त असल्याने तो शेतकऱ्यांना फुकट गोळा करू द्यावा. फॉरेस्ट विभागाने जी गावराने ताब्यात घेतली आहेत, ती मोकळी करून द्यावी. त्यामुळे गुराढोरांना चरण्याची सहज सोय होईल. शेतकरी वर्ग जो शेतीतील कामे करतो, त्या कामांच्या परीक्षा घ्याव्यात व शेतकऱ्यांना पारितोषिके द्यावीत. शेतकऱ्यांच्या मुलांना सुतार व लोहार कामासंबंधी शिक्षण द्यावे. जेणेकरून शेतकऱ्यांना घरच्या घरी शेती अवजारांची दुरुस्ती करता येईल.

समाजातील बहुसंख्य जनतेचे प्रामुख्याने शेतकरी वर्गाचे जे शोषण होत असे ते स्पष्ट करण्यासाठी त्यांनी जुन्या धार्मिक व सामाजिक परंपरा, धार्मिक ग्रंथांच्याद्वारे शेतकरी वर्गास विविध धार्मिक कार्य करण्यास बाध्य करणारा ब्राह्मण वर्ग आणि शेतीची विपन्नावस्था व शेतकरी वर्गाची दिसून येणारी हालाखीची स्थिती याद्वारे महात्मा फुले यांनी अंतिमत: शेतकऱ्यांच्या शोषणाचा सिद्धांत स्पष्ट केल्याचे दिसते व हे शोषण थांबविण्यासाठी त्यांनी जे उपाय सुचविले त्यामुळे ते श्रेष्ठ दर्जाचे समाजसुधारक आर्थिक विचारवंत व न्यायासाठी लढणारे अग्रणी नेते ठरावेत.

### २) न्यायमूर्ती म. गो. रानडे (१८४२-१९०१)

महादेव गोविंद रानडे यांना भारतीय अर्थशास्त्राचे जनक मानले जाते. त्यांच्यापूर्वी विविध आर्थिक प्रश्नांची चर्चा कोणी केल्याचे दिसून येत नाही. भारतासारख्या अविकसित देशात आर्थिक प्रश्नांचा अभ्यास अमूर्त निगमन पद्धतीने करणे योग्य नसून ऐतिहासिक पद्धतीने करणे योग्य असल्याचे त्यांचे मत होते.

देशाच्या आर्थिक विकास प्रक्रियेबाबत विविध निबंधांमध्ये त्यांनी सविस्तर विवेचन केले. त्यांनी आर्थिक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला व त्यासाठी देशातील औद्योगिकरणावर सतत भर दिला होता. देशात उद्योग आणि शेती यांच्यातील परस्पर अवलंबित्वाची त्यांना पूर्णत: कल्पना होती. त्यामुळे शेती, उद्योग तसेच व्यापाराच्या संतुलित विकासाला त्यांनी महत्त्व दिले. देशात शेतीवर जनसंख्येचा जो अतिरिक्त भार आहे तो कमी करण्याची गरज आहे. त्यासाठी देशात निर्माणी क्षेत्र (Manufacturing Sector) उभारून ते विकसित केले पाहिजे. त्यामुळे शेतीवरील लोकसंख्येचा असणारा भार कमी होईल असा न्या. म. गो. रानडे यांचा विश्वास होता. औद्योगिकरणामुळे देशात शेतीत (Non-agricultural) व्यवहार वृद्धिंगत होतात. यामुळे एकूण आर्थिक व्यवहार वाढत जातात. या प्रक्रियेतून बुद्धिमत्ता, कौशल्य व उपक्रमशीलता वाढते. ज्याचा उद्योग व शेतीवर अनुकूल प्रभाव पडतो.

शेतीवरील लोकसंख्येचा जो भार आहे तो निर्माणी क्षेत्राच्या स्थापनेमुळे व विकासामुळे कमी होईल, असे प्रतिपादन करण्यासोबत त्यांनी शेतीच्या काही व्यवहारिक वा वास्तविक प्रश्नांकडेही लक्ष वेधले. देशात जमीनधारणा व्यवस्थेत रयतवारी पद्धतीची शिफारस केली आणि शेती ही मोठ्या आकाराची असणे गरजेचे आहे, असे त्यांनी प्रतिपादिले. शेती विकासासाठी वित्त वा प्रत्यय (Credit) या घटकाचे महत्त्व असल्याने शेतीसाठी कर्ज वा वित्त उपलब्ध व्हावे म्हणून वित्त व्यवस्थेच्या पुनर्संघटनेची आवश्यकता आहे. फ्रान्स, हंगेरी, ऑस्ट्रिया या देशांचे उदाहरण देऊन कर्ज घेणे व कर्ज देणे हे व्यवहार सुरळीतपणे घडून येण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादली आहे. केवळ शेतीसाठीच नाही तर ग्रामीण क्षेत्रातील विणकर, सुतार अशा वर्गाच्या दृष्टीने किंबहुना एकूणच ग्रामीण अर्थव्यवस्थेत या प्रश्नाचे

महत्त्व त्यांनी अधोरेखित केले आहे. उद्योगांच्या उभारणीचे समर्थन करताना शेतीवर आधारित उद्योग स्थापने गरजेचे आहे, असे ते मानतात.

भारतात ब्रिटिश कालखंडातील भूमीकर व्यवस्थेचे विशेषत: अति भूमीकर वा शेतसारा याचे विपरीत परिणाम गरीब शेतकऱ्यांचे जीवन कसे उद्ध्वस्त करतात हे तत्कालीन भारतीय अर्थतज्ज्ञांनी मांडले; पण न्यायमूर्ती रानडे हे असे पहिले अर्थतज्ज्ञ होते की, ज्यांनी या विषयावर तात्त्विक पद्धतीने टीका केली. त्यांनी भारतीय शेतीच्या संदर्भात रिकार्डोच्या खंड सिद्धांताची वैधता (Validity) प्रश्नांकित केली. ब्रिटिश सत्तेद्वारा अधिक दराने भूमी कर (Land Revenue) बसविला जातो व वसूल केला जातो. त्याचे वैधतेवर रानडे यांनी आक्षेप घेतला आहे. रिकार्डोच्या मते, खंड हा जमिनीच्या गुणभेदजन्यतेमुळे निर्माण होतो. ब्रिटनमध्ये शेतीवरील खाजगी मालकी ही निरपेक्ष मानली गेल्यामुळे तेथे जमीन मालकाकडून खंड घेतला जात नसे. पण भारतातील ब्रिटिश सत्ता स्वत:ला जमिनीचे मालक समजत. त्यामुळे त्यांनी भारतात जमिनीवर खंड स्वरूपात कर बसविण्याची भूमिका घेतली. प्रत्यक्षात हा खंड एकाधिकारी खंड झाला. अशा खंडाचा दर एवढा जास्त होता की, त्या खंडात शेतकऱ्याची मजुरी तसेच नफादेखील अंतर्भूत झाला. म्हणजे हा कररूपी खंड अतिक्रमणकारी म्हणजे जमिनीवरील सरकारच्या मालकीचा हा खंड न राहाता त्यात मजुरी व नफा यांचाही अंतर्भाव झाला. रानडे यांनी या प्रकारच्या भूमी कराची वा शेतसाऱ्याची जी वैधता तपासली व त्याद्वारे हा खंड कसा अन्यायकारी होता हे शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध करून या विषयावरील त्यांची तात्त्विक बैठक कशी परिपक्व होती, हे दाखवून दिले.

शेती, उद्योगाच्या विकासात त्यांनी सूचविलेल्या उपाययोजना ह्या दीर्घकालीन होत्या. त्यांचा इतिहासाचा अभ्यास गाढा असल्याने त्यांना हे माहीत होते की समाजात बदल हे संथ गतीने होतात. त्यांना सामाजिक सुधारणा घडवून आणावयाच्या होत्या. आर्थिक सुधारणा या सामाजिक सुधारणांची पूर्व अट आहे, हा त्यांचा ठाम विश्वास होता.

### ३) रोमेशचंद्र दत्त (१८४८-१९०९)

रोमेशचंद्र दत्त हे आय.सी.एस. झालेले पहिले भारतीय होते. ते आर्थिक, राजकीय आणि ऐतिहासिक दृष्टिकोनातून अध्ययन करीत असत. उत्कृष्ट सनदी अधिकारी म्हणून त्यांनी जरी नावलौकिक मिळविला असला, तरी इ.स.१८९६ मध्ये त्यांनी या पदाचा राजीनामा दिला व स्वातंत्र्य आंदोलनात उडी घेतली. Economic History of India, (Vol. I, II) या प्रसिद्ध ग्रंथासोबत Open Letters to Lord Curzen ही त्यांची महत्त्वाची पुस्तके गाजली. शेती, उद्योग, व्यापार या क्षेत्रांच्या स्थितीचे त्यात विवेचन असून ब्रिटिश साम्राज्यवादाचे चित्र त्यांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने रेखाटले आहे.

रोमेशचंद्रांच्या काळात भारतातील दारिद्र्य स्थिती फारच विदारक होती. तसेच ह्या दारिद्र्याची व्याप्ती अन्य देशांच्या तुलनेत जास्त होती. दुष्काळ स्थिती व दुष्काळ स्थितीत मृत्यू पावणाऱ्यांची संख्या फार जास्त असे. या पार्श्वभूमीवर देशातील आर्थिक स्थितीचे अध्ययन करताना त्यांनी कृषी क्षेत्रावर विपुल लिखाण केले. १८८४ मध्ये कूळपद्धती विधेयकाच्या वेळी त्यांनी बंगालमधील कूळपद्धतीवर अहवाल तयार केला होता. कुळांना कसण्यासाठी जमीन खंडाने मिळण्याबाबत संरक्षण, खंडावर कमाल मर्यादा अशा शिफारसीमुळे कूळ पद्धतीबाबत त्यांनी केलेल्या शिफारसीमुळे त्यांच्या योगदानाचे महत्त्व लक्षात येते. विशेषत: कुळे जमीन विकू इच्छित असतील, तर त्यात जमीनदारांना खरेदीत अग्रहक्क न देणे ही शिफारस फारच मूलगामी ठरली. कूळ आणि दुष्काळ अशा बाबींवरील दत्त आणि लॉर्ड कर्झन यांचा पत्रव्यवहार मुळातून वाचावा एवढा महत्त्वाचा आहे. देशाच्या संपन्नतेचा किंवा विपन्नतेच्या प्रश्नाचा शोध घेताना त्यांचा मुख्य प्रश्न होता, शेती

भरभराटीच्या स्थितीत आहे का?

शासनाच्या धोरणांमुळे अनेकदा शेतीवर विपरीत परिणाम होतात. असे विपरीत परिणाम हे शासन धोरणाचे नाहीत तर अन्य घटकांचा परिणाम आहे असा युक्तिवाद शासनाद्वारे व अन्य तज्ज्ञांच्याद्वारेही केला जातो. परिणाम अशा चुकीच्या कारणमीमांसेची चर्चा ज्याला आपण भ्रांतीजनक कारणे म्हणतो त्यांचे परखडपणे व सप्रमाण निरसन दत्तांनी केले. भारतात लोकसंख्या ही वेगाने वाढल्याने शेतीवर लोकसंख्येचा अतिरिक्त भार असून, त्यातून दारिद्र्य निर्माण झाले, अशी शासनाची भूमिका होती. यावर दत्त यांनी म्हटले की, भारतीय लोकसंख्या ब्रिटिश लोकसंख्येपेक्षा कमी वेगाने वाढते, तर मग इंग्लंडमध्ये दारिद्र्य का नाही? भारतीय शेतकरी आळशी, अदूरदर्शी, निष्कारण खर्च करणारा अशा आक्षेपांचा रोमेशचंद्र यांनी आपल्या प्रशासनातील अनुभवांच्या आधारे प्रतिवाद केला. त्यांच्या मते, भारतीय शेतकरी जगातील शेतकऱ्यांप्रमाणेच परिश्रमी व दूरदर्शी आहेत. शेतीत नैसर्गिक व अन्य कारणांमुळे नापिकी झाल्यास दुष्काळ पडले व भूकबळी झालीत, अशी शासनाची भूमिका होती. यावर दत्त म्हणतात की, विशिष्ट क्षेत्रात नापिकी होऊन दुष्काळ पडला; पण देशाच्या अन्य भागांत शेतीत नापिकी नव्हती, तेथे दुष्काळ पडले नाहीत. अशावेळी अन्य भागांतून दुष्काळी भागात धान्य आणता आले असते. तसे धोरण अंमलात आले असते तर भूकबळी पडले नसते. देशात भौगोलिक व मानवी वैशिष्ट्ये संपन्नतानुकूल असूनही जी कृषीची दुरावस्था निर्माण झाली ती ब्रिटिशांच्या प्रगतीशील दारिद्र्यकारी धोरणाचा (Progressive Poverty Policy) परिणाम होता. ब्रिटिशांनी अर्थव्यवस्थेत दारिद्र्यकारी प्रक्रिया राबविली. ही प्रक्रिया म्हणजे आर्थिक धोरणाचेच अविभाज्य अंग होते.

निसर्गावर आधारित शेतीबाबत जशी उत्पादनाची अस्थिरता होती; तसेच शेतकरी व कुळांना जमीन कसण्याच्याबाबत अनिश्चितता होती. ग्रामोद्योगाचे ब्रिटिशांनी जाणीवपूर्वक केलेल्या नाशामुळे जनतेला जीवेकेसाठी केवळ शेती हाच व्यवसाय शिल्लक राहिला. त्यातून शेतकऱ्यांचे शेतीवरील अगतिक अवलंबन आणि पर्यायविहीत निर्भरता निर्माण झाल्याचे विश्लेषण दत्त यांनी केले आणि ही बाब भारतातील दारिद्र्याचे कारण आहे, हे दर्शवून दिले. कृषीवरील लोकसंख्येच्या वाढत्या भारामुळे शेती करणे आर्थिकदृष्ट्या परवडते की नाही हा मुद्दा शेतकऱ्यांना गैरलागू ठरला. यावर उपाय म्हणून ब्रिटिश शासनास सिंचनसोयी मोठ्या प्रमाणावर निर्माण करता आल्या असत्या; पण त्याकडे त्यांना दुर्लक्ष केले. यासोबत शेतीवरील करभारामुळेही कृषी कुंठितावस्थेत आल्याचे मत दत्त व्यक्त करतात. दैन्यावस्थारहित आणि संपन्नतेची अपेक्षा असू शकणारी कृषीव्यवस्था कशी असेल याचे उत्तर म्हणजे दत्त यांच्या मनातील आनंदभूमी, जेथे शेती कसण्याच्या अधिकाराची सुरक्षितता असणारी, शेतकऱ्यांना श्रमाचे संतोषजनक प्राप्तीफल देणारी, शेतीची निसर्गनिर्भरता कमी करणारी असून तिच्यावर अति करभार नाही अशी व्यवस्था होय.

### ४) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक (१८५६-१९२०)

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील अग्रणी नेते म्हणून आपण लो. टिळकांना ओळखतो. ब्रिटनचे जे अधिपत्य भारतावर होते ते केवळ राजकीय नव्हते, तर ते आर्थिकही होते याची जाणीव जशी दादाभाई नौरोजी, न्यायमूर्ती रानडे, गोपाळ कृष्ण गोखले यांना होती तशीच ती लो.टिळकांनाही होती. त्यांचे लिखाण व त्यांनी दिलेली भाषणे काळजीपूर्वक लक्षात घेतली, तर ४५ वर्षांच्या त्यांच्या राजकीय जीवनात त्यांनी आर्थिक विषयही हाताळले होते. साधारणपणे १८८१ ते १९०४ पर्यंत त्यांनी विविध आर्थिक प्रश्न हाताळले होते. या संदर्भात धनंजयराव गाडगीळ म्हणाले होते की, दादाभाई नौरोजी, आर. बी. दत्त, रानडे, गोखले यांच्याप्रमाणेच लो. टिळकही अर्थतज्ज्ञ आहेत. त्यांनी शेती, उद्योग, दुष्काळ, श्रमिक, सार्वजनिक वित्त, चलन व्यवस्था

अशा विविध आर्थिक विषयांवर लिखाण केले आहे.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय शेतीत सतत पडणाऱ्या दुष्काळांमुळे विपन्नावस्था होती. शासनाने केलेले उपाय अत्यंत जुजबी होते. एकूणच शेतीच्या प्रश्नांकडे शासन दुर्लक्ष करीत असे. या पार्श्वभूमीवर लो. टिळकांनी शेती, शेतकरी व दुष्काळ अशा महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा करताना शेतीची दुरावस्था, शेतीचा खुंटलेला विकास, शेतकऱ्यांची विपन्नावस्था, भूमीवरील करांचे स्वरूप व त्याचे परिणाम, दुष्काळातील उपायांचा अपुरेपणा अशा विविध पैलूंवर १९ व्या शतकाच्या शेवटच्या १५-२० वर्षात व २० व्या शतकाच्या सुरुवातीस चर्चा केली. त्यांना शेतकऱ्यांविषयीचा कळवळा हा इ.स. १८९६ मध्ये कराची येथील राष्ट्रीय अधिवेशनात शेतकऱ्यांच्या संदर्भात केलेल्या उत्स्फूर्त उद्गारातून दिसतो. ते म्हणालेत, "Me must feel that they are ours and they must feel that we are theirs."

भारतातील दारिद्र्याची जी विविध कारणे सांगितली जातात; त्यात जमिनीवरील जास्त प्रमाणात शेतसारा हे प्रमुख कारण असल्याचे सांगितले जात. विशेष म्हणजे शेतसाऱ्याचे निर्धारण स्थायी नव्हते. विशिष्ट वर्षांनी त्यात बदल केले जात आणि निर्धारणाची योग्य तत्त्वे नव्हती. असे दोष टिळकांनी वेळोवेळी दैनिक केसरीतून दाखवून दिले होते. शेतकरी कर्जासाठी सावकारांकडे जातात ज्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी व दोषांची त्यांना कल्पना होती. यासाठी सावकारांच्या व्यवहारांवर नियंत्रण ठेवणे हा उपाय पुरेसा नाही, असे मत व्यक्त करून त्यांनी शेतकरी सावकारांकडे कर्जासाठी का जातात? असा प्रश्न उपस्थित करून शेतकरी सावकारांकडे कर्जासाठी जाणार नाही, या दृष्टीने पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याची गरज स्पष्ट केली. यासाठी ग्रामीण भागात शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थांची स्थापना केली पाहिजे. शासनाने २०व्या शतकाच्या सुरुवातीस को.ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटीज बिल मांडले. त्याचे स्वागत लो. टिळकांनी व जी. बी. जोशींनी केले.

शेतीतील व्यवहार आणि शेतकऱ्यांचे जीवन याबद्दल टिळकांना परिपूर्ण माहिती होती. शेतकऱ्यांना चांगल्या बी-बियाणांची माहिती नसते. त्याची माहिती शेतकऱ्यांना दिली पाहिजे; खेड्यांमधील शाळांमध्ये शेतीचा अंतर्भाव करावा. लांब धाग्याचा कापूस देशात निर्माण झाला पाहिजे, असे त्यांचे मत होते. सिंधमधील जमीन ही इजिप्तमधील नाईल व्हॅलीतील जमिनीप्रमाणे असल्याने असा कापूस सिंधमध्ये होऊ शकतो, असे त्यांचे मत होते. देशात उसाचे उत्पादन करून आपल्याला पुरेल एवढी साखर निर्माण होऊ शकेल, हे त्यांचे मत स्वावलंबी अर्थव्यवस्था उभी करणे शक्य आहे याकडे निर्देश करते. शासनने केलेली उपाययोजना व पारित केलेले कायदे शेतकऱ्यांना माहीत असावे, यादृष्टीने शासनाच्या फेमिन कोडचे मराठीत भाषंतर करून त्याच्या पुस्तिका खेड्यापाड्यात वितरीत केल्यात. शेती आणि जंगलाबाबत शेतकऱ्यांचे कोणते अधिकार आहेत याची शेतकऱ्यांना योग्य, खात्रीलायक माहिती असली पाहिजे, असे टिळकांचे मत असून, त्यासाठी शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींनी काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनांना उपस्थित राहिले पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे.

कृषी आणि उद्योगामधील संबंधांची टिळकांना जी जाण होती, ती जाण मूलगामी स्वरूपाची असल्याचे ४ सप्टेंबर १८९१च्या मराठीत लिहिलेल्या त्यांच्या लेखावरून दिसून येते. श्रम बाजारात कृषी श्रमिकांची संख्या जास्त आहे. या क्षेत्रातील अतिरिक्त कृषी श्रमिक काढून घेऊन जर त्या श्रमिकांना उद्योग क्षेत्रात सामावून घेतले, तर शेतीतील अतिरिक्त कृषी श्रमिकांचा प्रश्न दूर केला जाऊ शकतो आणि उद्योगासाठी श्रमिकांचा पुरेसा पुरवठा प्राप्त झाल्याने औद्योगिकरणही होऊ शकते, असे या लेखात टिळक आपला विचार मांडतात. २०व्या शतकाच्या उत्तरार्धात जी सैद्धांतिक मांडणी विल्यम ऑर्थर लेविस यांनी केली होती. जवळपास असाच

विचार लो. टिळकांना ७० वर्षांपूर्वी केला होता, ही विशेष बाब आहे. ही बाब लक्षात आल्यावर आपण आश्चर्यचकितच होतो.

### ५) गोपाळ कृष्ण गोखले (१८६६-१९१५)

गोखले यांनी इम्पिरियल लेजेस्लेटीव्ह कौन्सिलमध्ये तसेच बॉम्बे लेजेस्लेटीव्ह कौन्सिलचे सभासद म्हणून वेळोवेळी मांडलेले विचार आणि १८९५ मध्ये लॉर्ड वेल्बी कमीशनसमोर तसेच विविध सभा व अधिवेशनांमध्ये व्यक्त केलेले विचार अशा स्रोतांतून अभ्यासकांना उपलब्ध आहेत. केंद्राचा वाढता खर्च व त्यावर नियंत्रण, दारिद्र्य, राजस्व अंतर्गत येणारे विषय, उत्पादन शुल्क, आयात-निर्यात कर, स्थानिक वित्तीय व्यवस्था, चलन व्यवस्था, भूमीवरील कर, शिक्षण अशा विपुल आर्थिक विषयांवर त्यांनी अधिकारवाणीने विवेचन केले असून, अंदाजपत्रकावरील त्यांची भाषणे विशेषत: त्यावर त्यांनी मार्मिक टीका, शास्त्रीय पद्धतीने केलेले विश्लेषण आजही उद्‌बोधक ठरते. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असला, तरीही शेती व शेतकरी यांची स्थिती खालावत जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्याकरिता विविध पिकांखालील क्षेत्र घटत गेल्याची आकडेवारी ते सादर करतात. १८९०-९१ मध्ये पिकांखालील निव्वळ क्षेत्र ब्रिटिश इंडियात १९४.४१ मिलियन एकर होते ते १८९९-१९०० मध्ये घटून १८०.१५ मिलियन एकर झाले. तसेच गहू, तेलबिया, कापूस या पिकांखालील क्षेत्रही घटत गेले. त्यासोबत विविध पिकांची जी निर्यात केली जाते, त्याचे निर्यात मूल्यही घटत गेल्याची बाब ते आकडेवारीच्याद्वारे मांडतात. १८८०-८१ ते १९००-१९०१ या २१ वर्षांच्या काळात विविध पिकाचे निर्यात मूल्य घटल्याचे ते दर्शवितात. कापसाच्या बाबतीत १८८९-९० मधील निर्यात मूल्य १८.६ कोटी रुपये होते ते घटत जाऊन १०.१ करोड रुपये झाले. या प्रकारच्या आकडेवारीद्वारे गोखले भारतीय शेतीची दुरावस्था मांडतात. विशेष बाब अशी की, हा देश इंग्रज सत्तेची वसाहत असली तरी अशा दुरावस्थेवर मात करण्यासाठी प्रभावी उपाय अंमलात आणण्याची जबाबदारी शासनाची आहे, असे ते स्पष्टपणे म्हणतात.

देशातील विविध प्रांतामध्ये भूमी कर अथवा शेतसारा बराच जास्त आहे. प्रतिएकर शेती उत्पादन अल्प आहे. सरकारकडून कर वसूल करण्यासाठी ज्या पद्धतीने जमिनीचे मूल्यांकन केले जाते जे चढत्या दराने केले जाते. शेतकऱ्यांवर एका बाजूने शेतसाऱ्याचा भार आणि सोबत सावकारांचा पाश त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. दक्षिण भारतातील एका जिल्ह्याचे उदाहरण देऊन त्यांनी सांगितले की, कर्जबाजारीपणामुळे ३३ प्रतिशत शेतकऱ्यांनी आपल्या मालकीच्या जमिनी गमावल्यात. अनेक शेतकरी हे भूदास (Serfs) झालेत. प्रांत सरकारांनी ट्रिब्युनल्स नेमून कर्जबाजाराची पाहाणी करावी. ट्रिब्युनल्ससाठी मोठी रक्कम द्यावी त्या रकमेतून शेतकऱ्यांना अग्रिम रक्कम द्यावी. शेतकरी मिळालेल्या रकमेची सुलभ हप्त्यात परतफेड करू शकतील. शेतकऱ्यांना कमी व्याज दरावर कर्ज देऊ शकणाऱ्या संस्थांच्या स्थापनेची गरज असल्याचे गोखले मानतात. इ.स.१९०४च्या कायद्यानुसार सहकारी तत्त्वावर कर्ज देणाऱ्या संस्था स्थापन होण्यासाठी योग्य वातावरण तयार होत होते. १९०४ च्या कायद्यानुसार अशा संस्थांमध्ये असीमित दायित्वाचे (Unlimited Liability) तत्त्व होते. हे तत्त्व अडचणीचे असल्याने त्याऐवजी सीमित दायित्वाच्या तत्त्वाचा गोखले यांनी पुरस्कार केला. असीमित दायित्व तत्त्व हे जर्मनीत परंपरेतून स्वीकारणाऱ्यास आले होते; पण ते भारतातील जनतेस परवडणारे तत्त्व नाही. सहकारी संस्थांचा निधी वाढविण्यासाठी अशा संस्थांना जिल्हा पातळीवरील सेंट्रल बँकांशी जोडून घ्यावे, असे गोखले नमूद करतात. तसेच ग्रामीण पातळीवरील अनेक सहकारी संस्थांनी परस्पर सहकार्य करण्याचीही ते शिफारस करतात.

सिंचन प्रकल्पांचे शेती विकासातील महत्त्व गोखले

यांना माहीत होते. हे प्रकल्प तज्ज्ञ कंत्राटदारांकडून उभे करावेत. यासाठी विदेशातील तज्ज्ञ व्यक्तींना पाचारण करण्याची गरज असेल, तर ती व्यवस्था तात्कालिक असावी. मुंबई इलाख्यात जे सिंचन प्रकल्प आहेत. पण, सिंचन होऊ शकणारे क्षेत्र व प्रत्यक्षात सिंचन झालेले क्षेत्र यात बरीच तफावत आहे. १८९९-१९०० मध्ये प्रांतात प्रत्यक्ष सिंचन झालेले क्षेत्र हे सिंचन होऊ शकणाऱ्या क्षेत्राच्या केवळ ३७ प्रतिशत आहे. तसेच पाणीपट्टीचे प्रांतातील दर इतर प्रांताच्या तुलनेत जास्त आहेत ते कमी करावेत. प्रकल्प सिंचनाप्रमाणे विहिरींच्याद्वारे शेतीला पाणीपुरवठा केला जाणे आवश्यक आहे. या दृष्टीने विहिरींचा या कामासाठी उपयोग करण्यासाठी योग्य ते उपाय करावेत.

शेती क्षेत्रातील शेतसारा निर्धारण हा वादग्रस्त प्रश्न असून त्याचे निर्धारण व मूल्यांकन (Assessment) गोखले यांनी बॉम्बे लेजेस्टलेटिव्ह कौन्सिलचे सभासद असताना २२ ऑगस्ट, १९०१ मध्ये झालेल्या चर्चेत भाग घेताना ठामपणे सांगितले की, भूमीकराचे मूल्यांकन जास्त दराने केले जाते. बऱ्याच वेळा असे दिसते की, प्रांतांमध्ये निकृष्ट दर्जाच्या अशा जमिनी आहेत की, जेथे पैशात मोजला जाणारा खंड हा निर्माणच होत नाही. शासनाचे असे मत होते की, जमिनीचे मूल्यांकन माफक आहे. कारण सध्या जमिनीचे दर एकरी विक्रीमूल्य हे तिच्या मूल्यांकन केलेल्या जमिनीच्या २५ पट आहे. पण अनेक जिल्ह्यांत (सोलापूर व अहमदनगर) जमिनीची विक्री किंमत ही तिच्या मूल्यांकन केलेल्या किंमतीच्या ११ पट होती हे आकडेवारीवरून सांगून वास्तविक स्थितीही सरकारने सांगितलेल्या स्थितीला अनुरूप नाही, असे त्यांनी दाखवून दिले. योग्य भूमी कर व्यवस्था ही सरकारला किती उत्पन्न मिळवून देते यावर अवलंबून नसून, ती व्यवस्था शेतीत सुधारणा घडवून किती प्रमाणात शेतकऱ्यांना प्रोत्साहन देते, यावरून ठरविली जाते, असा महत्त्वाचा मुद्दा गोखले यांनी अधोरेखित केला आहे.

### ६) राजर्षी शाहू महाराज (१८७४-१९२२)

राजर्षी शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानचे राजे होते. त्यांनी व्यक्त केलेले आर्थिक व सामाजिक विचार हे त्यांच्या कृतीतून तसेच दिलेल्या भाषणांमधून व्यक्त झाले आहेत. आपल्या विचारांना कृतीत परिवर्तित करणारा तत्त्वज्ञ राजा म्हणून त्यांची संपूर्ण देशाला ओळख आहे. अर्थव्यवस्थेच्या संदर्भात विविध प्रश्नांचे स्वरूप लक्षात घेऊन समाजाचे आर्थिक-सामाजिक कल्याण साधण्याचा त्यांनी यशस्वी प्रयत्न केलेला दिसून येतो. येथे आपण त्यांचे शेती आणि शेतकरी यावरील विचार पाहू.

संस्थानात देशाप्रमाणेच मालकी हक्काच्या दृष्टीने शेतीचा आकार (Size of Holdings) लहान होता. तसेच वारसा हक्काचे नियमानुसार हा आकार लहान होत जाऊन शेती विभाजन प्रक्रियेमुळे त्याचे शेतीवर विपरीत परिणाम होतात, याची त्यांना पूर्णत: जाणीव होती. संस्थानच्याद्वारा रयतेला जी इनामे दिली जातात, ती बहुतांश जमिनीच्या स्वरूपात असते. शेती विभाजन समस्येवर उपाय म्हणून शाहू महाराजांनी इनामात मिळणाऱ्या जमिनी अविभाज्य म्हणून घोषित केल्या. अशा जमिनी या कुटुंबातील पहिल्या मुलाकडे राहातील, असे ठरविले व अशा जमिनीचे विभाजन थांबविले.

शेतीवर नवनवीन पिके घेण्यासाठी शाहू महाराजांनी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले. शेतीवर वेलदोडे, रबर, बेळगावी बटाटे, हिरडा, फणस, आंबा, काजू अशी रोख पिके घेण्यासाठी प्रोत्साहित केले. शेतमालास योग्य किंमत मिळावी, या उद्देशाने त्यांनी योग्य विक्री व्यवस्था सुरू केली. तसेच सहकारी पतपेढ्या निर्माण करण्यावर भर दिला. त्यासाठी सहकारी कायदा संमत केला. पावसाळ्यात समाधानकारक पाऊस पडत असला, तरी बरेचसे पाणी वाहून जाते. या पाण्याचा शेती व पिण्याचे पाणी यासाठी वापर करता येईल, या दृष्टीने सार्वजनिक पाटबंधारे धोरण आखले. संस्थानातील विविध खेडी व गावांची त्यांनी तपशीलवार पाहाणी केली. विशेष म्हणजे अत्यंत शास्त्रीय पद्धत स्वीकारून जुन्या विहिरी,

छोटे-मोठे तलाव, लहानसहान बंधारे यांच्या नोंदी केल्यात. या विविध जलस्त्रोतांची योग्यप्रकारे दुरुस्त्या केल्यात. त्यातून शेतीसाठी सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणे; तसेच जनतेस पिण्याचे पाणी पुरविणे ही उद्दिष्ट्ये पूर्ण होऊ शकली. शेतीला पाणी पुरवठा उपलब्ध केल्यास शेतीचे रूप पालटेल, या विचारांनी प्रभावित होऊन त्यांनी कोल्हापूरच्या पश्चिमेस असणाऱ्या भुदरगड तालुक्यातील फेजीवडे या गावी राधानगरी या धरणाचे बांधकाम इ.स. १९०९ मध्ये सुरू केले.

शेतकऱ्यांना बहुतेकवेळा वित्ताची वा भांडवलाची समस्या भेडसावत असल्याने शेतकरी कर्जबाजारी होत असतात. भारतभर दिसणारी ही गंभीर समस्या संस्थानातही होती. शेतकरी वर्गास कर्जमुक्त करण्याची गरज आहे, हे महाराजांनी लक्षात घेतले. इ.स.१८९५ मध्ये त्यांनी या प्रश्नावर झटपट उपाय म्हणून शेतकऱ्यांना विशिष्ट अटींवर कर्ज देण्यास सुरुवात केली. शेतकऱ्यांना शेतीसाठी चांगली अवजारे आणि खते उपलब्ध झाली, तर शेतीची उत्पादकता वाढू शकते. या दृष्टीने उपाययोजना म्हणून शेतकऱ्यांना सुधारित अवजारे पुरविली व रासायनिक खते मोफत वाटली. शेतकऱ्यांना सुधारित शेतीचे ज्ञान असले पाहिजे म्हणून महाराजांनी 'दी किंग एडवर्ड ॲग्रीकल्चरल इन्स्टिट्यूट'ची स्थापना केली. शेतकऱ्यांच्या मुलामुलींना आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान प्राप्त व्हावे, हा प्रमुख उद्देश त्या इन्स्टिट्यूटच्या स्थापनेमागे महाराजांचा होता. जनतेस चांगल्या प्रकारे शेती करण्यास प्रोत्साहित करण्याची व त्यांना शेतीविषयक ज्ञान प्राप्त व्हावे म्हणून शाहू महाराजांनी शेतीविषयक प्रदर्शने भरविली. या प्रदर्शनात जनावरांचे दालन, शेतीविषयक विविध बाबींचे दालन असे शेतीबरोबरच शेतीसंबंधित अन्य उद्योग वाढवून शेतकऱ्यांची स्थिती सुधारावी म्हणून दूधदुभती जनावरे व बैल यांच्या गुणात्मक पैदाशीकडे त्यांनी लक्ष पुरविले. यावरून हे सहजच लक्षात येते की, शेती व शेतकऱ्यांच्या विकासासाठीचे प्रश्न त्यांच्या सतत विचारात असत. हे प्रश्न सोडविण्याची नीळ प्रत (Blue Print) त्यांच्यासमोर असे. शाहू महाराजांनी आपल्या कारकिर्दीत कोल्हापूर संस्थानात शेतीला सहकाराची जोड दिली होती.

छ. शाहू महाजारांच्या काळात चार वेळा (१८९६-९७, १८९९-१९००, १९०२-०३ आणि १९०५-०६) संस्थानात दुष्काळ पडलेत. दुष्काळावर मात करण्यासाठी शेतीसाठी पाणी उपलब्ध करून देणे आणि जनतेलाही पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देणे, रस्ते उभारणी, शेतकरी वर्गास रोजगार उपलब्ध करून देणे आणि विशेषत: जनावरांसाठी चारा-पाणी उपलब्ध करून देणे अशा प्रकारची उपाययोजना केल्याने शेती व शेतकरी वाचविण्याच्या दृष्टिकोन त्यातून दिसून येतो. शेती व ग्रामीण विकासाच्या दृष्टिनेही दुष्काळी कामाची अंमलबजावणी करण्याची त्यांची आर्थिक भूमिका होती.

**समारोप :**

१९ व्या शतकातील भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीक्षेत्राची अवनती लक्षात घेऊन तिच्यातील गंभीर प्रश्नांची १९व्या शतकातील भारतीय विचारवंतांना योग्य जाणीव होती. त्यादृष्टीने त्यांनी शेतीसंबंधित प्रश्नांची विशेषत: भूमीकर, भूमीकराचे निर्धारण, शेती व उद्योग संबंध, सिंचनाची कमतरता, शेतकरी वर्गाची होणारी होरपळ, शासनाचे विपरीत धोरण अशा प्रमुख प्रश्नांवर प्रकाश टाकून अर्थव्यवस्थेच्या सर्वात मोठ्या क्षेत्राचे तर्कसंगत विवेचन करून त्यावर प्रभावी उपाय सुचविलेत. भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाला वैचारिक पाठबळ देण्याचे कार्य ह्या विचारांनी केले आणि ब्रिटिश शासनाच्या धोरणांची चिकित्सा करताना तिचे शोषणाचे धोरण स्पष्ट केले. या आर्थिक विचारवंतांनी आर्थिक राष्ट्रवादाचा पुरस्कार करून शासनाने शेती व अन्य क्षेत्रांच्या विकासाची जबाबदारी स्वीकारावी, हे स्पष्टपणे सांगितले.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. Bhattacharya Dhiraj (1988) : - Concise History of Indian Economy,

Prentice Hall India Pvt. Ltd. New Delhi.

२. Dasgupta Ajit (1993) : History of Indian Economic Thought, T. R. Publication, Madras.

३. Das Debandra Kumar (Ed.) (2004) : Great Indian Economist Mahadeo Govind Ranade, Deep Deep Publication, New Delhi.

४. Dutta R. C. (1968) : Economic History of India Vol. I II, Publications Division, New Delhi.

५. Ganguli B. N. (1977) : Indian Economic Thought, Tata Macgraw Hill.

६. Guha Ramchandra (2012) : Makers of Modern India, Penguin Books.

७. Jahagirdar D. V. and Mukta Jahagirdar (1993) : Research Methodology adopted by Policy suggested by Justic Ranade, I E - Conference Volume.

८. Paravate T. V. (1985) : Tilak : The Economist, M. S. Board for Literature Culture, Bombay.

९. Ranade M. G. (2008) : Essays an Indian Economy, National Book Trust, Govt. of India, Delhi.

१०. Patwarddhan R. D. Ambekar D. V. (Edit.) (1962) : Speeches Writings of Gopal Krishna Gokhale, Asia Publishing House, Bombay.

११. कुबेर गिरीश (२०२०) : लोकमान्यांचा दुर्लक्षित अर्थव्यवहार, लोकमान्य स्मृती शताब्दी अंक, लोकसत्ता.

१२. जहागिरदार दि. व्यं. (२०१५) : गोपाळकृष्ण गोखले यांचे आर्थिक विचार, अर्थसंवाद, खं-३९ अंक-४.

१३. जहागिरदार दि. व्यं. (२०२०) : महात्मा फुले यांचे स्मरण, दै. हिंदुस्थान, १३ एप्रिल.

१४. जहागिरदार दि. व्यं. (२०२०) : स्मरण लो. टिळकांचे, दै. हिंदुस्थान, १ ऑगस्ट.

१५. जहागिरदार दि. व्यं. (२०१४) : न्या. महादेव गो. रानडे यांचे आर्थिक विचार, दै. हिंदुस्थान, २२ जून.

१६. जहागिरदार दि. व्यं. (२०२१) : राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचार, दै. हिंदुस्थान, दि. २८ जून.

१७. जहागिरदार मुक्ता (२०११) : रोमेशचंद्र दत्त आणि भारतीय शेती विश्लेषण कालचे, प्रत्यय आजचा, अर्थवेध या मुक्ता जहागिरदारांच्या पुस्तकातील लेख, सेंटर फॉर एकॉ. ॲण्ड सोशल स्टडीज, अमरावती.

१८. जहागिरदार मुक्ता (२००९) : आर्थिक चिकित्सा, सेंटर फॉर एकॉ. ॲण्ड सोशल स्टडीज, अमरावती.

१९. पवार जे. के. (संपादक) (२०१२) : राजर्षी शाहूंची अर्थनीती, राज प्रकाशन कोल्हापूर.

२०. पाटील ज. फा. (२०११) : महात्मा फुले यांचे आर्थिक व सामाजिक विचार-३७ शोधनिबंधाचा चिकित्सक आढावा, म.अ.परिषदेचे २५ वे आर्थिक अधिवेशन अंक.

◆

# सामूहिक कृती सिद्धांत आणि सहकार

**वसंतराव बी. जुगळे** †
**योजना वसंतराव जुगळे** ††

**प्रस्तावना :**

कोणत्याही मानवी गटाच्या अथवा संघटनांच्या सामाजिक आणि आर्थिक हिताला संरक्षण देण्याच्या सामूहिक कृतीला सहकार म्हटले जाते. सहकारी संघटनासाठी किमान अकरा सदस्य संख्येची अट असते. गटाला ती नसते. सहकारी गटाचे सदस्य होण्यासाठी व्यक्तिगत हित सामावलेले असते. पण, जे सदस्य झालेले असतात, त्यांना मात्र सदस्य संख्या वाढू नये असे वाटते. ती एक मानसशास्त्रीय अवस्था असते. कारण, संख्या वाढल्यामुळे माझ्याकडे गटाचे लक्ष राहाणार नाही, याची त्याला भीती वाटते. त्यामुळे व्यक्तिगत हितासाठी स्वीकारलेले गटाचे सदस्यत्व रद्द करण्याची पाळी त्याच्यावर येते.

सहकाराची विशिष्ट तत्त्वे असतात. तशी गटांची अथवा संघटनांची असतीलच असे नाही. मात्र ध्येय, उद्दिष्टे निश्चित केलेली असतात. सहकाराची किमान तत्त्वे निश्चित नसतील, तर सदस्यांच्या प्रबोधनाची आवश्यकता निर्माण होते. प्रारंभीच्या काळात सहकारी चळवळीला सदस्य संख्येचा प्रश्न निर्माण झालेला होता. अशावेळी धर्म-जात, नातेवाईक आणि मित्रमंडळींना सदस्यत्वाचे महत्त्व पटवून देण्यासाठी त्यांचे प्रबोधन केले जाते; ते सोपे असते. कारण, अनोळखी माणसाला प्रबोधनाद्वारे पटवून देणे तितके फलदायी होऊ शकत नाही. पण, सगे-संबंधितांचे प्रबोधन सोपे असते. कारण, एकमेकांवर त्यांचा विश्वास असतो.

गट का तयार होतात? अनेक विद्वान आणि तत्त्ववेत्त्यांनी त्यांच्या व्यक्तिगत चिंतनातून त्यासंबंधी मंथन केले आहे. सहकार हे सामाजिक आणि आर्थिक संघटन आहे. सर्वांचे कल्याण सर्वांच्या सहभागातून साध्य करण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक कार्यक्रम निश्चित केलेले असतात. ही एक अखंड प्रक्रिया असते म्हणूनच ती चळवळ बनते. त्याचे सामूहिकीकरण म्हणजे सहकार. सर्वांसाठी सर्वकाही हे या सामूहिकीकरणाचे मूलभूत तत्त्व असते. सामूहिक कृती गट हा एकजिन्नसी असतो.

**गट अथवा संघटन :**

गट, संस्था, संघटन सिद्धांताकडे पाहाण्यात अर्थशास्त्रज्ञ नेहमी अपयशी ठरले आहेत. कारण, मानवी

† अर्थशास्त्राचे वरिष्ठ प्राध्यापक (निवृत्त) तथा माजी अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र. : ५६८, भ्रमणध्वनी : ९४२२०४०६८४ ई-मेल : vbjugale@gmail.com
†† प्राचार्या, आण्णासाहेब डांगे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, हातकणंगले, जि. कोल्हापूर.
भ्रमणध्वनी : ९४२२०४०११४, ई-मेल : yojanajugale@gmail.com

जीवनातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, नैतिक, मानसिक अशा अनेक पैलूंशी आणि आंतर-विद्याशाखीय संबंधांशी ते पक्षपात करतात. मानवी दुःखे अनिश्चित आहेत. कोणत्याही गटावर विश्वास असलेली सहानुभूती आणि दृढविश्वास यामुळे जीवन यशस्वीरीत्या जगण्यासाठी पराक्रम अपरिहार्य असतात. त्याला समूहाचे सामर्थ्य लाभल्यास पराक्रमाला यश प्राप्त होते. अथवा मानसिकदृष्ट्या व्यक्तिगत सामर्थ्ये गटामुळे लाभतात.

आर्थिक आणि सामाजिक घडामोडींमध्ये सर्व सामान्य पीडित किंवा सर्वसामान्य लाभार्थी त्यांचे स्वतःचे गट तयार करतात. हा गट एकजिनसी लोकांचा असतो. त्याचे लाभ उठविण्यापर्यंत ते एकसंघ राहातात किंवा त्यांचे हित जोपासण्यासाठी त्यांना सोयीस्कर वाटेल इथपर्यंत ते गटासोबत राहातात. सहकारावरील सध्याचे संकट हे एकीकडे सदस्यांचे बदलते हितसंबंध (राजकीय, सामाजिक आणि आर्थिक) आणि दुसरीकडे नेत्यांचा भ्रष्टाचार, घराणेशाही आणि राजकारण यामुळे आहे. कोणत्याही संघटना आणि कामगार संघटनेच्या चळवळीचे मानसशास्त्र सहसमान आहे. लोकांना त्यांच्या जीवनशैलीत नेहमीच असुरक्षितता वाटते. साहाजिकच त्यांना संस्था किंवा गटांमध्ये सामील होण्याचा मोह होतो. जेणेकरून धोकादायक किंवा गुंतागुंतीच्या प्रसंगी गटातील सदस्यांना दिलासा मिळतो आणि आवश्यक तो पाठिंबा मिळतो. गटाच्या सदस्यांना कोणत्याही जोखमीत आणि जबाबदाऱ्यांमध्ये गटाचा पाठिंबा अथवा आधार वाटतो. एखाद्या संस्थेतील व्यक्तिगत हितसंबंध आणि सर्वसामान्य हितसंबंध यांचे संयोजन स्पर्धात्मक बाजारपेठेशी साधर्म्य सूचित करतात (ओल्सन, १९६५ पृष्ठ क्रमांक ९). विशेषतः खुल्या व्यवस्थेत गटाचे महत्त्व व्यक्तिगत पातळीवर महत्त्वपूर्ण ठरते. बाजारव्यवस्थेशी जुळवून घेणे क्रमप्राप्त असते. सामूहिक कृतीवर पहिला विचार १९६५ मध्ये मँकोर ओल्सन यांनी स्पष्ट केला होता. सामूहिक कृतीच्या पहिल्या सिद्धांताचा त्यांनी शोध लावला. त्यांनी असा युक्तिवाद केला होता की, ''सार्वजनिक हित प्रदान करण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीच्या कोणत्याही गटाला कार्यक्षमतेने हाताळण्यासाठी नेहमीच त्रास होतो.'' कोणत्याही गटाला नेतृत्व आवश्यक असते. पण यासाठी नेतृत्वाने निश्चित केलेल्या शिस्तीचे पालन करावे लागते. शिस्तीचे पालन करणारे गट सदस्य गटातील कार्यक्षम स्वार असतात. समूहात राहाण्यासाठीचे विविध फायदे असतात. त्या फायद्यासाठी काही अंशी सदस्यांना व्यक्तिगत हितसंबंधाला बाजूला ठेवावे लागते. अन्यथा, तो गटातून अलग होऊ शकतो. समूहाने केलेला क्रियाकलाप म्हणजे, समूह सदस्यांच्या सामाजिक आणि आर्थिक कल्याणाने प्रेरित झालेले सार्वजनिक हित असते. अशा समूहाने केलेल्या क्रियाकलापांचा लाभ उठविणारे विनामूल्य मुक्त स्वार (फ्री रायडर्स) असतात. त्यांना नेतृत्वाची गरज असते. कोणत्याही गटामध्ये असे काही लोक असतात, की जे सातत्याने गटासाठी काम करतात. त्या गटाचे ते नेते बनतात किंवा ते भावी लोकनेते (पुढारी) होतात. प्रारंभी व्यक्तींना विशिष्ट गटांमधील इतरांच्या प्रयत्नावर फ्री रायडर्स होणाऱ्यांना गटांमध्ये येण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. पण गटाचा आकार अधिक महत्त्वाचा असतो. त्याचा इष्टतमपणा निश्चित करणे कठीण असते. गटाचा आकार मोठा होऊ लागला की, गट सदस्य चिंतेत असतात. कारण संख्येमुळे व्यक्तिगत दुर्लक्ष होते की काय याची त्यांना शंका असते.

**गट /संस्था / संघटना /सहकाराचा उद्देश :**

हेरॉल्ड लास्की आणि अरिस्टॉटल यांच्या मते, गट किंवा संघटनांचा उद्देश अनुक्रमे ''व्यक्तींच्या गटाला समूहाचे सर्वसामान्य लाभ होतात'' आणि ''व्यक्तीच्या गटाला राजकीय सहवासाचा सर्वसामान्य लाभ होतो'' असा आहे. समूह / संघटना / सहकार यांचे प्राथमिक कार्य म्हणजे समूह किंवा संघटनेच्या सामाईक प्रयत्नातून

साकारलेल्या वस्तू व सेवांचा लाभ घेणे. विशेषतः सहकारातून आर्थिक लाभ अपेक्षित असतो. तेच समूहाचे प्रेरणास्रोत असते. ते फलदायी ठरल्यानंतर समूहाच्या प्रेरणेने राजकीय प्रवेश निश्चित केला जातो. सहकारात राजकारण का आले याचे कारण अरिस्टॉटलच्या राजकीय सहवासाचा सर्वसामान्य लाभ घेण्याच्या उद्देशाने. शिवाय, भारतामध्ये सहकाराचे सरकारीकरण झालेले असल्याने राजकीय हस्तक्षेपाने सहकार वाढला. सहकाराचे राजकारण आणि राजकारणातील सहकार एकमेकांला परस्परपूरक ठरलेले दिसतात. प्रत्येक गटाच्या राजकीय संबंधासाठी सहकारी संस्थांचे जाळे निर्माण केले गेले. कारण, ती एक सत्ताकेंद्री आर्थिक प्रेरणा आहे. पॉलिटिक्स ऑफ डेव्हलपमेंट आणि डेव्हलपमेंट ऑफ पॉलिटिक्स हे सहकाराच्या प्रेरणास्रोताचे प्रमुख घटक बनलेले आहेत. एखाद्याची राजकीय सत्ता-शक्ती सहकारी संस्थांच्या जाळ्याची वीण किती भक्कम आहे, यावरून निश्चित होते. म्हणून, राजकारण्यांना सहकार सम्राट, साखरसम्राट आणि शिक्षण सम्राट अशी बिरुदावली लावलेली असते. सहकारी संस्था राजकारणाचे अड्डे बनले आहेत, अशी टीका नेहमी होते आणि ही वस्तुस्थिती आहे, ते नाकारता येणार नाही. सहकारी सत्ता आपल्या हातात ठेवण्यासाठी वाट्टेल ते डावपेच अंमलात आणले जातात.

व्यक्तींच्या गटसमूहांच्या सामान्य हितसंबंधांचे सामाजिक आर्थिक फायदे मांडणे, हे त्या समूहाचे सर्वसामान्य ध्येय असते. म्हणूनच सहकारचेही उद्दिष्ट आर्थिक लाभ असेच असते. जेव्हा सर्वसामान्य ध्येय संपुष्टात येते, तेव्हा गट, समूह किंवा सहकार तेथेच संपतो. एखाद्या गटाने किंवा संस्थेने आपल्या सदस्यांचे सर्वसामान्य हित वाढवले नाही, तर ती संस्था हळूहळू विरून जाते किंवा दुसऱ्या ध्येयवादी नेतृत्वाच्या प्रतीक्षेत राहाते.

सामान्यतः कामकऱ्यांचा असंघटित गट, त्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या सदस्यांच्या शोषणापासून मुक्त होण्यासाठी ते एकत्र काम करतात. ती एक संस्था अथवा सवय बनते. जगातील जवळजवळ सर्वच देशांमध्ये सहकारी कायदे करून अशा गटांना अथवा संस्थांना सार्वजनिक संस्थेचे स्वरूप प्राप्त करून दिलेले आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून भांडवलशाही व्यवस्थेला सहकाराचा एक उत्कृष्ट पर्याय म्हणून पुढे आला. त्यामुळे सर्वच देशात सहकार लवकर पोहोचला. ती एक विकासाची प्रेरणा होती. दुसऱ्या महायुद्धानंतर विकासाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. त्यासाठी संघटनांची आवश्यकता भासली. एकविसाव्या शतकामध्ये नव-संस्थात्मक रूप जन्माला यायला हवे होते, पण तसे झाले नाही आणि तसे घडून येण्यासाठी शासकीय मदतदेखील तोकडी पडली. खासगीकरणाची आणि उदारीकरणाची जबरदस्त लाट आली, त्यामुळे मागणीविरुद्ध पुरवठा प्रेरित धोरणातला संघर्ष पुन्हा उफाळून आला. भारतामध्ये अद्यापही पुरवठाप्रणित धोरणाची अंमलबजावणी होते. सहकार त्याला अपवाद राहिला नाही. या पुढच्या वाटचालीत सहकाराचा संस्थात्मक दृष्टिकोन अमलात आणला पाहिजे, आणि तो मागणी प्रेरित धोरणाचा परिपाक असला पाहिजे.

सहकार ही एक सामाजिक आणि आर्थिक संघटनाची गुण-वैशिष्ट्ये लाभलेली आणि दोन्ही चौकटीची पार्श्वभूमी असलेली संस्था आहे. त्यामुळे त्यामध्ये राजकारण लवकर संचारते. समूह /गट / संघटना जिथे अस्तित्वात येतात, तिथे राजकारण प्रवेशित होतेच. जर असे सामान्य हित अस्तित्वात असेल, तर एखाद्या व्यक्तीची असंघटित कृती, एक तर सामान्य हित पुढे नेण्यास अजिबात अपयशी ठरेल, अथवा योग्य मार्गाने पुढे नेण्यास सक्षम होणार नाही (ओल्सन - १९७१, पृ. ६ एफ). तथापि, संस्थेच्या प्रत्येक सदस्यांचे स्वतःचे व्यक्तिगत हितसंबंध असतात, जे इतर सदस्यांच्या हितापेक्षा वेगळे असतात. त्यामधील

प्रतिस्पर्धी गटाचा स्वभाव व कृतीविरोधी गट म्हणून काम करतो. हा गट संस्थेचे व्यवस्थापन सुरळीत करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. गट किंवा संघटनांच्या सुरळीत कामकाजासाठी अशा प्रतिशक्ती आवश्यक असतात.

गट तयार करण्याचे काही आर्थिक आणि बिगर आर्थिक घटक आहेत. १९८० च्या दशकात सुरतमध्ये झालेल्या सर्वधर्म सभेचा समारोप करताना असे स्पष्ट केले गेले की, सामाजिक आणि आर्थिक संकटातून मुक्त होण्यासाठी संघटना /संस्था स्थापन करणे अधिक हिताचे आहे. त्याप्रमाणे बॉम्बे असोसिएशन, आर्य समाज, ब्राह्मो समाज अशा संस्था उदयाला आल्या. सर्व धर्म सभेचा मूळ उद्देश हा होता की, दख्खनच्या पठारावर नेहमी पडणाऱ्या दुष्काळामुळे रयतेचे फार मोठे नुकसान झाले; पण सरकार त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने त्यावरच्या वैचारिक मंथनाची गरज निर्माण झालेली होती. तत्कालीन परिस्थितीत संस्थांचे अर्थशास्त्र (Economics of Institutions) सर्वच देशातल्या विद्यापीठांमध्ये शिकवला जाणारा विषय होता. संस्था ही एक सामूहिक कृती असल्याने स्वयं-विकास करण्यास त्या मदत करतात. एखाद्या व्यक्तीला भेडसावणाऱ्या प्रत्येक समस्येचे निराकरण सामूहिक कृतीद्वारे केले जाते. संस्थांद्वारे कोणतीही व्यक्ती त्यांच्या वैयक्तिक समस्या सोडवू शकते.

समाजशास्त्रज्ञ आणि अर्थतज्ज्ञांनी अशी पुष्टी केलेली आहे की, तत्त्वज्ञानात्मक आणि वैचारिक तणाव जनसामान्यांचे स्थायी प्रयत्न निर्माण करण्यासाठी पुरेसे नाहीत. गट तयार करण्यात आर्थिक प्रोत्साहन महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. मॅक्स वेबर, एक उल्लेखनीय उदाहरण देतात, ''बाजारपेठेतील (अर्थव्यवस्थेतील) सर्व प्रकारचे व्यक्ती, गट, आर्थिक घडामोडी त्यांच्या स्वतःच्या आदर्श आणि भौतिक हितासाठी हाती घेतले जातात, आणि त्या व्यवस्थितपणे वाहून नेल्या जातात. अशाच पद्धतीच्या आर्थिक घडामोडी कार्पोरेट गटाच्या माध्यमातून पुढे येतात.''

समाजवादी तत्त्वावर आधारित अर्थव्यवस्था संघटित केली गेली तरी, या बाबतीत काही मूलभूत फरक राहाणारच. हितसंबंधांची रचना आणि तत्संबंधित परिस्थिती बदलू शकते. हितसंबंधांचा पाठपुरावा करण्याची आणखी काही साधने असतील; परंतु हा मूलभूत घटक (समूह) पूर्वीइतकाच समर्पक राहील. निव्वळ वैचारिक आधारावर इतरांच्या हिताकडे वळलेली आर्थिक कृती अस्तित्वात आहे. हे अर्थातच खरे आहे, पण स्त्री-पुरुषांचा जनसमुदाय अशा प्रकारे वागत नाही, हे अधिक खरे आहे, आणि ते असे करू शकत नाहीत व कधीही करणार नाहीत हे अनुभवावरून सांगता येईल. बाजारव्यवस्थेत उत्पन्नाच्या बाबतीत जास्तीत जास्त लाभांची सामूहिक आर्थिक घडामोड ही प्रेरक शक्ती असते. म्हणून समाजवादात सहकार आहे आणि बाजार व्यवस्थेतही सहकार आहे. सहकार हा आंतर-बाजार व्यवस्थेतील आर्थिक व सामाजिक समूह /संस्था गटसमूह /गट आहे.

**सामूहिक कृती गट अपयशी का ठरतात?**

समूहाच्या यशासाठी सहकाराचे आचरण आणि काही सामाजिक नियम शिकण्याची क्षमता मानवाने विकसित केलेली आहे. व्यक्तिगत तर्कशुद्ध-कृती ही त्यांच्या अनुभवाद्वारे समाजातील व्यक्तीच्या वर्तनाचा एक जुळता संच किंवा एक सरगम आहे; जी वेगवेगळ्या परिस्थितीत अनुकूल असू शकते. व्यक्ती त्यांच्या तर्कशुद्ध वर्तनात खूप परिपूर्ण आणि विवेकी असतात; पण, जेव्हा सामूहिक कृतीची स्थिती निर्माण होते, तेव्हा सार्वजनिक अपयश प्रत्ययास येते. कदाचित याच कारणामुळे सहकारी साखर कारखान्याचे खाजगीकरण होत असावे.

सर्वसामान्य जनतेचा कल विनामूल्य स्वार होण्याकडे असतो. 'दि लॉजिक ऑफ कलेक्टीव्ह

ॲक्शन' या आपल्या बहुचर्चित पुस्तकात मँकोर ओल्सन (१९६५) यांनी असे स्पष्ट केले आहे की, जेव्हा सामूहिक हित प्रदान करण्याच्या निर्णयाचे व्यक्तिगत दृष्टिकोनातून विश्लेषण केले जाते, तेव्हा इतरांच्या प्रयत्नातून साकारलेल्या सामूहिक कृतीवर मुक्तपणे स्वार होण्यास आणि इष्टतम पातळी प्रदान करण्यास प्रोत्साहन दिले जाते. अर्थात, जर प्रत्येकाने अशा प्रकारचे काम केले तर, संपूर्ण गटाला सामूहिक हिताचा फायदा होईल. पण अशी फारच कमी उदाहरणे आहेत. एखाद्या व्यक्तीमध्ये वैयक्तिक तर्कशुद्धता असेल, तेव्हा तो किंवा ती त्यांच्या जवळच्या मित्रांकडून किंवा नातेवाईकांकडून किंवा जवळच्या विद्वान व्यक्तींकडून सल्ला घेतात. एखादी तर्कशुद्ध व्यक्ती खरोखरच मोठ्या संस्थेला पाठिंबा देते; ज्याद्वारे लॉबिंगचे प्रभावीपणे समर्थन केले जाते. एखादी व्यक्ती त्याच्या / तिच्या निर्णयामध्ये तर्कशुद्ध राहाते. तो / ती त्यांच्या निर्णयांमध्ये क्वचितच अपयशी ठरते. पण, ज्यावेळी सामूहिक विचार केला जातो, त्यावेळी त्यांच्या व्यक्तिगत परिस्थितीवर जास्त परिणाम होत नाही; म्हणून ते सामूहिक तर्कशुद्धतेचे अनुकरण करू शकत नाहीत. तपासणी केल्याशिवाय मुक्तपणे स्वार (फ्री रायडर्स) होण्याचा अथवा न होण्याचा तणाव गटात प्रेरित राहातो. सामूहिक कृतीची भावना कृतीच्या दयाळूपणा अथवा निर्दयीपणावर अवलंबून असते. पण, व्यक्तिगत पातळीवर एखादी व्यक्ती खूप तर्कशुद्ध वाटते. अशा तर्कशुद्धतेच्या अभावामुळे सहकार अपयशी झाल्याचे दिसते. मुळात नेत्यांमध्ये ही तर्कशुद्धता रुजते. म्हणून सहकारामध्ये घराणेशाही आलेली दिसते. अधिकार आणि प्रभाव आपल्या किंवा आपल्या कुटुंबीयांकडे असावा असे सहकारी नेतृत्वास कायम वाटत आलेले आहे. काही प्रसंगी सत्तेचे विकेंद्रीकरण नावालाच होते. रिमोट कंट्रोल मात्र प्रमुख नेत्याकडेच असतो. सहकारी संस्थांचे नेटवर्क आपल्या नियंत्रणात असावे असे प्रमुख नेतृत्वाला वाटते. ज्यावेळी राजकीय समीकरणे बदलतात, त्यावेळी सत्येकडील सहकारी नेतृत्व निर्माण होते. सत्तेच्याविरुद्ध जाणाऱ्या सहकार सम्राटांची वाट लावण्यामध्ये राजकीय सत्ता-केंद्रे खूप कार्यक्षम असतात. त्यावेळी सर्वसामान्य जनता त्या सत्तेला दिसत नाही.

एखादी व्यक्ती एखाद्या संस्थेवर क्वचितच प्रभाव पाडते. परंतु, प्रत्येक व्यक्ती प्रत्येक सुधारणेत आनंद घेऊ शकते, जरी त्याने /तिने त्यात योगदान दिले किंवा नाही, हा प्रश्न गौण राहातो. पण, सामूहिक अथवा व्यक्तिगतरीत्या सर्वोत्तम कृतीमधील संघर्ष अस्तित्वात असला तरी, गटातील प्रत्येक जण कोणत्याही प्रयत्नांशिवाय आणि वेदनांशिवाय जनतेच्या चांगुलपणापासून नफा / फायदा मिळविण्याचा प्रयत्न करीत असतात. वैयक्तिकरीत्या प्रत्येकजण लाभ मिळविण्यासाठी सर्व संभाव्य प्रयत्न करीत असतात. ओल्सनचा सिद्धांत बाजारातील अपयशाचा शोध घेतो. ग्राहकांची व्यक्तिगत तर्कशुद्धता आणि कंपन्यांचा नफा घेण्याचा अट्टाहास, यामुळे सार्वजनिक वस्तूंचा कार्यक्षम उपभोग घेण्यामध्ये व्यक्तींना रस नसतो. जरी कमी खर्चात जास्त फायदा मिळण्याची स्थिती असली तरी. यामध्ये मूळ विरोध असतो, तो कंपन्यांच्या अट्टाहासाविरोधी. पण, विरोध अल्पकाळासाठी राहातो. मूलभूत समस्येमध्ये ही वस्तुस्थिती आहे की, ओल्सनच्या मॉडेलमध्ये आर्थिकदृष्ट्या तर्कशुद्ध वागणाऱ्या आणि सार्वजनिक हिताच्या तरतुदीत योगदान देणाऱ्या व्यक्ती स्वतः लाभ उठविण्यास सक्षम असतील तर ही परिस्थिती निर्माण होते. त्यांना सार्वजनिक वस्तूंच्या उपभोगात व्यक्तिगत रस असतो, त्यांच्या योगदानात रस नसतो. जोपर्यंत सामूहिक कृतीमध्ये लाभ आहे, तोपर्यंत तो गटात राहातो. सार्वजनिक वस्तूंचा फायदा व्यक्तिगतपणे लोकांनी घेतला, पण सार्वजनिक योगदानामध्ये व्यक्तिगत रस सक्षम राहिला नाही. अशा वेळी सहकार अपयशी ठरतो. कारण नेतृत्वाचा फायदा घेण्यासाठी राजकीय

हितचिंतकांचे डावपेच महत्त्वाचे ठरतात. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे सध्याचे अपयश हे या प्रकारच्या वृत्तीमुळे आहे, जे व्यापक परिमाणात कायम आहे.

**सामूहिक कृतीचा पारंपरिक दृष्टिकोन :**

आदिम काळात समूहांची निर्मिती पृथ्वीवरील मानवी अस्तित्वाला त्रास देणाऱ्या नैसर्गिक घटनेमुळे झाली. मानवी अस्तित्वासंबंधीचे स्वामित्व प्रस्थापित करण्यासाठी प्रदेशवार गट/ संघटना / गिल्ड तयार केले गेले. ही परंपरा इतर प्राण्यांमध्येदेखील आढळून येते. त्यासाठी गटाशी लढणे हा मानवी क्रियाकलापांचा एक भाग बनला. पुढे जाऊन त्याचे प्रदेश /देश तयार झाले. हेतू संबंधितांच्या राजकीय अस्तित्वाचा होता. त्यामुळे समूहाच्या आर्थिक सेवा व वस्तूंच्या निर्मितीची संरक्षितता निर्माण होणार होती. संसाधनांची बचत, काटकसर आणि त्यांचा तर्कशुद्ध वापर हे जुन्या काळातील गट / संघटनांचे आर्थिक कार्य होते. जगण्याच्या प्रक्रियेमध्ये आर्थिक प्रेरणा खूप महत्त्वाची बनलेली होती. आपल्या पुढच्या पिढीसाठीच माणूस सतत धडपडत असतो, अनेक धोके तो स्वीकारत असतो. आर्थिक लोभवृत्ती, प्रेरणा आणि त्या संबंधीची प्रक्रिया अनेक धर्माच्या तत्त्वांमध्ये बसत नाही. ते सर्व मिथ्या आहे; अशीच शिकवणूक मिळत असली तरी त्यापासून माणूस परावर्तित झालेला नाही. हीच प्रेरणा घेऊन औद्योगिक क्रांती झाली.

सर्व पारंपारिक सिद्धांत समूहाच्या आकाराकडे पाहात नाहीत. छोट्या आणि मोठ्या गटांमध्ये कोणताही फरक ते करीत नाहीत. प्रत्येक गटाचे मूलभूत चारित्र्य सामान्य असते आणि आपल्या सदस्यांच्या मूलभूत हितसंबंधांना खतपाणी घालत आपले कार्य पूर्ण करण्यासाठी ते तितकेच प्रभावी असतात. पारंपारिक गट-सिद्धांत असे गृहीत धरतात की, खाजगी गट आणि सामूहिक संघटना पूर्णपणे वेगवेगळ्या स्वरूपात त्यांचे हितसंबंध नियंत्रित करतात. पारंपारिक सिद्धांत दोन मूलभूत प्रकारांमध्ये फरक निर्माण करतात. एक नैमित्तिक बदल (कॅज्युअल व्हेरिएंट) आणि दोन औपचारिक बदल. नैमित्तिक बदलामध्ये (कॅज्युअल व्हेरिएंटमध्ये) असे म्हटले आहे की, ''खाजगी संस्था आणि गट सर्वव्यापी आहेत, जे संघटना तयार करण्याच्या आणि त्यामध्ये सामील होण्याच्या मूलभूत मानवी प्रवृत्तीमुळे आहे. या गटाचा नियम, एकत्र कळप करणे आणि इतर कळपाशी लढणे'' असा आहे.

याउलट, औपचारिक सिद्धांताचे नैमित्तिक प्रकार मानवाच्या कोणत्याही अंतःप्रेरणेवर आधारित नाहीत. औपचारिक प्रकाराचे लक्ष्य ''आधुनिक औद्योगिक समाजाच्या उत्क्रांतीवर'' असे आहे. ही उत्क्रांती कौटुंबिक आणि इतर नातेसंबंधांच्या गटांनी सुरू होते, जे आदिम काळातील परिस्थितीत बहुसंख्य गट तयार करतात. विविध जाती, धर्म, पंथ, गावकरी आणि इतर एकसंध गट त्यांच्या समान फायद्यासाठी सहज एकत्र येत असल्याने गट तयार झाले आहेत. पूर्वी नातेसंबंध आणि कौटुंबिक गटाद्वारे प्रदान केलेली सामाजिक कार्ये आत्मसात करण्यासाठी दुय्यम गट हळूहळू उदयास येत होते. असे गट सामान्यतः कामाच्या ठिकाणी तयार केले जातात. हे नवीन गट प्राथमिक गटापेक्षा संवाद आणि महत्त्वाच्या उच्च पातळीपर्यंत पोहोचतात. उदाहरणार्थ, कामगार संघटना, मोठ्या कंपन्या, राज्ये, चर्च किंवा विद्यापीठे दुय्यम प्रकारच्या संघटना आहेत. पारंपारिक दृष्टिकोनाचे औपचारिक प्रकार गटांच्या सार्वत्रिकतेवरही भर देतात. परंतु अशा गटामध्ये सामील होण्याच्या (अथवा सामील करून घ्यावयाच्या) कोणत्याही 'अंतःप्रेरणेने' किंवा 'प्रवृत्ती'पासून सुरुवात करीत नाहीत. त्याऐवजी, सध्याच्या काळातील संघटना आणि गट-संलग्नता त्यांच्या आधीच्या 'आदिम' समाजापैकी आधुनिक औद्योगिक समाजाच्या उत्क्रांतीचा पैलू म्हणून समजावून सांगण्याचा प्रयत्न करतात (ओल्सन, १९६५ पृ. १७). अशा ठिकाणीही दुय्यम

गटांमध्ये पुन्हा गट तयार केले जातात. असे सर्व आंतर-गट आणि गटाअंतर्गत गट अर्थव्यवस्थेच्या अपरिहार्यतेसाठी तयार केले जातात. आणि शेवटी समाज, प्रदेश आणि राष्ट्रे मोठ्या प्रमाणात तयार होतात. हे प्रत्येक ठिकाणी स्वाभाविकपणे चालू राहाते.

कृषी औद्योगिक सहकारी समाज, सहकारी साखर कारखानदारीपासून सुरू झाला. तो अनेक देशांत अनेक क्षेत्रामध्ये पसरलेला आहे. फलप्रामाण्यवादी (Pragmatism) विचारप्रणाली आणि गोपाळ कृष्ण गोखले यांच्या विचारांमध्येदेखील हा दृष्टिकोन पाहायला मिळतो. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी या कल्पनाशास्त्राची व्यावहारिक अंमलबजावणी केली आहे. परिणामी, राज्यातील सहकारी चळवळ, १९०४ पासून सुरू केलेल्या केंद्र प्रायोजित सहकारी चळवळीपेक्षा वेगळी आहे. केंद्रीय सहकारी कायदा ओवेन-प्रायोजित होता. तथापि, राज्य सरकारने व्यावहारिकता तत्त्वांच्या (फलप्रामाण्यवादी) प्रणालीत त्याची अंमलबजावणी केली आहे. प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रभावी नेतृत्वाची गरज आहे. म्हणूनच ग्रामीण भारतात सहकारी नेतृत्व उदयास आले आणि पसरले. तथापि, हे ग्रामीण नेतृत्व राजकीय गटबाजीकडे प्रेरित झाले आहे आणि सहकारी चळवळीचे फायदे मिळवण्यासाठी स्वार्थी झाले आहे. सहकारी चळवळीच्या दृष्टीने ही दयनीय गोष्ट आहे.

**ओल्सनचे मॉडेल :**

कोणत्याही गटाची सामूहिक कृती सार्वजनिक हिताची सेवा करण्याचीच असते. सार्वजनिक वस्तू हे त्यातील एक आहे. अशा वस्तूंच्या उत्पादनाच्या प्रक्रियेत खर्च आणि महसूल विचारात घेतले जातात. सार्वजनिक वस्तूंच्या (Public good) तसेच खाजगी वस्तूंच्या (Private good) वर्तमान उत्पादनासह वर्तमान सार्वजनिक खर्चदेखील निश्चित होतो. तसेच काही परिवर्तनीय खर्च घडवून आणले जातात. याचा अर्थ असा आहे की, पहिले उत्पादन घटक सर्वात महाग आहेत. उत्पादनात वाढ झाल्याने सरासरी खर्च कमी होतो आणि शेवटी किमतीची वळणे 'यू' आकाराची राहातात. नफा हा अशा कोणत्याही क्रियाकलापांचा ब्रीद (मोटो) आहे, जो एकत्रितपणे सदस्यांसाठी केला जातो. मात्र, पुढच्या पिढीचे सदस्य विनामूल्य गटाचे स्वार बनतात. ते सार्वजनिक वस्तूंचे सर्वकालीन लाभार्थी आहेत. एकूण नफ्यात प्रत्येक व्यक्तीचा वाटा, व्यक्तीचे प्रमाण आणि सार्वजनिक हिताचा व्यक्तिगत वापर, यावर अवलंबून असतो. काहींच्या सामूहिक प्रयत्नामुळे इतरांना मुक्तपणे स्वार होता येते. अशा प्रकारचे विनामूल्य स्वार नेहमीच सर्वत्र आढळतात.

समजा, एखाद्या गटामध्ये काही व्यक्ती (1......n) आहेत. त्यांच्याद्वारे सामूहिक हिताच्या ठरावीक आकारमानाच्या प्रमाणात ते उत्पादन करू शकतात. विशेष म्हणजे, गटातील प्रत्येक व्यक्ती (i • N)   i ≥ 0 चे सकल उत्पादन तयार करतात. अशा प्रकारे सामूहिक वस्तूंचे (Γ) उत्पादन एकूण वैयक्तिक योगदानाच्या बेरजेद्वारे केले जाते, Γ = Σi   i सामूहिक वस्तूंच्या सेवनातून एकाद्या व्यक्तीने मिळवलेली उपयोगिता   i (Γ) ने गृहीत धरलेली आहे. जिथे   i' > 0 आणि   i'' ≤ 0 असे गृहीत आहे. व्यक्तीचे वस्तू सेवन उत्पादनाच्या एकूण स्थितीवर अवलंबून असते. प्रत्येक व्यक्ती सामूहिक वस्तूंच्या वापराला वेगळ्या प्रकारे महत्त्व देऊ शकते. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीकडे मोठे भूक्षेत्र असणे, ही केवळ आकाराची बाब असू शकते. ज्याचा फायदा एखाद्या छोट्या क्षेत्राच्या तुलनेने महसुलात एक टक्का कपात केल्यामुळेसुद्धा महसूल जास्त होईल. अर्थात, असेही असू शकते की, लोकांना सामूहिक वस्तूंचे महत्त्व वेगळ्या प्रकारे जाणवते. उदाहरणार्थ, काही शेजाऱ्यांना इतरांपेक्षा जास्त कौतुक वाटेल की, शेजारच्या भागात फिरणाऱ्या एका पोलिसाची अतिरिक्त सुरक्षा त्याना लाभते (ओल्सन, १९६५).

सामूहिक कृती खालील पद्धतीने व्यक्ती आणि गटाला लागू होते: (विकिपीडिया)

$$F_i * \frac{dV_g}{dT} = \frac{dC}{dT}$$

जिथे,

Fi = हा समूहाला लाभाचा दर आहे.

dVg/dT = हा समूह लाभाचा हिस्सा आहे जो व्यक्तीला मिळतो.

dC/dT = म्हणजे सार्वजनिक हिताच्या एकूण खर्चाच्या वाढीचा दर आहे.

याचा अर्थ असा की, समूहाला मिळणाऱ्या फायद्याचा दर, हा व्यक्तीला मिळणारा समूह-लाभ गुणिले व्यक्तिगत हिस्सा, यामुळे सामूहिक वस्तूंची इष्टतम पातळी आढळते, जी सार्वजनिक वस्तूंच्या एकूण खर्चाच्या वाढीच्या दराच्या बरोबरीने असते. हा, फायदा आणि जनतेच्या वस्तूंच्या किंमतीमधील खेळ आहे. महसूल आणि खर्च समान राहातात. दुसऱ्या शब्दांत व्यक्त केले तर, याचा अर्थ असा आहे की, जेव्हा समूहाला लाभाचा दर (dVg/dT dC/dT) पेक्षा जास्त होतो, तेव्हा समूहाला मिळणाऱ्या वाढीच्या प्रमाणात (Fi F1) व्यक्तीला मिळणारा फायदा (विकिपीडिया);

हा असा होतो. $\frac{\frac{dV_g}{dT}}{\frac{dC}{dT}} = \frac{1}{F_i} = \frac{V_g}{V_i}$

जिथे,

1/Fi = हा गट लाभाचा दर आहे.

Vg/Vi = हा एखाद्या व्यक्तीला मिळणाऱ्या गटाचा वाटा आहे.

dVg/dT • dC/dT = समूह लाभाचे गुणोत्तर जे एखाद्या व्यक्तीला सार्वजनिक वस्तूंच्या किंमतीपर्यंत मिळते.

समूह लाभाचे प्रमाण समूह गुणोत्तराच्या किंमतीपेक्षा जास्त असताना सामूहिक वस्तूंचे प्रदान केले जाते.

$$F_i > \frac{C}{V_g}$$

प्रचलित स्थितीसाठी ते समान राहाते.

$$F_i = \frac{V_i}{V_g}$$

साहजिकच, मग एखाद्या व्यक्तीला समूह लाभ मिळणे, हे सार्वजनिक वस्तूंच्या किंमतीपेक्षा जास्त आहे.

$$V_i > C$$

म्हणून असे समजले जाऊ शकते की, समूहातील व्यक्तीला मिळणारा फायदा सार्वजनिक वस्तूंच्या खर्चापेक्षा जास्त राहातो. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, एकूण नफा एकूण खर्चापेक्षा जितका कमीत कमी असेल, तितका एकूण फायदा हा एखाद्या व्यक्तीला मिळणाऱ्या फायद्यापेक्षा जास्त असतो. कारण, तो सामूहिक कृतीचा परिपाक असतो. सामूहिक कृतीमुळे जसा सामूहिक लाभ होतो, तसा व्यक्तिगत लाभ होतो. व्यक्तिगत लाभ स्वत: निर्माण करणे कठीण असते. अर्थात, ते अशक्यदेखील नाही. पूर्वी खाजगी क्षेत्रातील साखर कारखान्यांचे सहकारीकरण झाले. कारण, त्याला सामूहिक कृतीची गरज होती. उसासारख्या कच्च्या मालावर खाजगी क्षेत्राचा हक्क नव्हता. ते परावलंबी झाले होते. सहकारामध्ये ऊसकरी शेतकरी ऊस पुरवठा करणारे असतात; म्हणून सहकारी साखर कारखानदारी देशात (विशेषतः महाराष्ट्रात) बहरली. अलीकडे, हे चित्र उलट झाले आहे. खाजगी कारखानदारांना सहकाराबरोबर स्पर्धा करावी लागली आणि ऊस पुरवठ्याची त्यांना हमी / खात्री झाली. त्यावेळी खाजगी साखर कारखानदारीमध्ये गुंतवणूक वाढली. कारण, उसाखालील क्षेत्र वाढलेले आहे. खासगी साखर कारखान्यांना ऊस पुरवठ्याची हमी मिळाली आहे.

सामूहिक वस्तूंचे प्रमाण सार्वजनिक समूह गुणोत्तराच्या किंमतीपेक्षा अधिक असताना, सामूहिक

वस्तूंचे प्रदान केले जाते. प्रचलित स्थितीत समूह गुणोत्तर समान राहाते. साहाजिकच, मग एखाद्या व्यक्तीला सामूहिक वस्तू मिळणे, म्हणजे सामूहिक वस्तूंच्या किंमतीपेक्षा ते अधिक असते. म्हणून, असे समजले जाऊ शकते की, समूहाला किंवा व्यक्तीला मिळणारा फायदा सार्वजनिक वस्तुंच्या खर्चापेक्षा जास्त राहातो. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास, एकूण लाभ एकूण खर्चापेक्षा जितका जास्त आहे, तितकाच एकूण लाभ एखाद्या व्यक्तीला मिळणाऱ्या लाभापेक्षा जास्त आहे. कारण, तो सामूहिक कृतीचा परिपाक असतो. सामूहिक कृतीमुळे जसा सामूहिक लाभ होतो, तसा व्यक्तिगत लाभही होतो. व्यक्तिगत लाभ निर्माण करणे एखाद्या व्यक्तीला कठीण असते, अर्थात, ते अशक्यदेखील नसते.

सामूहिक कृतीच्या व्यक्तिगत लाभाचे विश्लेषण या ठिकाणी महत्त्वाचे ठरते. कारण, सामूहिक कृती आर्थिक शक्ती निर्माण करतात. त्यातला वाटा गरीब आणि हतबल व्यक्तीला मिळतो. म्हणून ते मुक्त स्वार होताना दिसतात. काही आर्थिक घडामोडी घडवून आणण्यासाठी सामूहिक कृतीची गरज असते. किंबहुना, ती अपरिहार्य ठरते. आर्थिक घडामोडी एखाद्या व्यक्तीला अशक्य असतात, अथवा त्याची त्याला खात्री नसते. कारण, सामूहिक कृतीमध्ये व्यक्तिगत लाभ निर्माण होतात. म्हणूनच शासन नावाच्या सामूहिक गटाला सार्वजनिक लाभाच्या वस्तू व सेवा निर्माण कराव्या लागतात.

सामूहिक कृतीला शिस्तीची गरज असते. ही शिस्त मोडणारे हे मुक्त स्वार झालेले लाभार्थी असतात किंवा ते सामूहिक कृती गटाचे विरोधक असतात. अशा विरोधकांची लोकशाही व्यवहारांमध्ये खूप गरज असते. पण, हा विरोध उस्फूर्त असावा लागतो. अलीकडे राजकीय विरोधामुळे /कृतीमुळे सामूहिक कृती व्यवस्थेला धोका निर्माण झालेला आहे. सहकार आता जगू शकत नाही अशी स्थिती निर्माण झालेली आहे. कारण सहकारातील सामूहिक कृती, शासन अथवा खाजगी क्षेत्र उत्तम प्रकारे अमलात आणू शकतात. तसा खाजगी क्षेत्राला राजकीय पाठिंबा मिळत आहे. त्यामुळे त्यांचा विस्तार झपाट्याने होत आहे. पण, या प्रक्रियेमध्ये एखादी व्यक्तिगत कंपनी अथवा शासन एखादी वस्तू व सेवा (सार्वजनिक) कार्यान्वित करून सामूहिक लाभ निर्माण करू शकतात. या लाभामध्ये सर्व लाभार्थी मुक्तपणे स्वार होताना दिसतात. म्हणजे, सामूहिक कृतीतून सार्वजनिक आणि व्यक्तिगत लाभ निर्माण होतातच; पण एखाद्या व्यक्तिगत कंपनीच्या कृतीतूनसुद्धा सामूहिक लाभ निर्माण होतात. पण, त्या कृतीमध्ये समूहाचा संदर्भ असावा लागतो. म्हणजे, ती विशिष्ट आर्थिक घडामोड समूहाशी निगडित असावी लागते. तात्पर्य, सामूहिक कृतीच्यामागे आर्थिक प्रेरणा (लाभ) असते. आर्थिक लाभ असतो म्हणूनच समूह /गट /संघटना तयार होतात. भारतातील सहकारी संस्थांबाबत हे खरे आहे.

शासन व्यवस्थेने प्रदान केलेल्या सामान्य किंवा सामूहिक लाभांना सार्वजनिक वस्तू म्हणतात. सार्वजनिक वस्तूंची संकल्पना ही सार्वजनिक क्षेत्राच्या अभ्यासातील सर्वात जुनी आणि सर्वात महत्त्वाची संकल्पना आहे. अशा स्वरूपाच्या सामान्य, सामूहिक अथवा सार्वजनिक वस्तूंची व्याख्या कोणत्याही व्यक्तीला नाकारता येत नाही.

सार्वजनिक किंवा सामान्य वस्तू आणि सेवा सामूहिक गटातील सर्व सदस्यांसाठी मुक्तपणे उपलब्ध होतात. गट किंवा संस्थेला ते सामूहिक लाभ करून देतात. आपल्या सदस्यांना सार्वजनिक वस्तू पुरविणे, हे कोणत्याही गट अथवा संस्थेचे मूलभूत उद्दिष्ट असते. ओल्सन यांनी जनतेच्या भल्यासाठीची व्याख्या अशी केली आहे की, जेव्हा एका गटातील एखादा सदस्य वस्तूंचा उपभोग घेतो, तेव्हा, सदर गटातील इतर सदस्यांकडून त्यांना रोखले जाऊ शकत नाही. ओल्सन

असे गृहीत धरतात की, राज्याचे कर, प्रत्येक नागरिकासाठी ऐच्छिक आहे. त्यामध्ये पोलीस संरक्षण, कायदा व सुव्यवस्था किंवा राज्याचा बचाव यासारख्या कारवायापासून कर न भरणाऱ्या काही सदस्यांना दूर ठेवणे व्यवहार्य ठरणार नाही. सामूहिक वस्तूद्वारे बाह्यता आपोआप तयार केली जाते.

सर्वसमावेशक सार्वजनिक वस्तू आणि अन्य सार्वजनिक वस्तू असे सार्वजनिक वस्तूचे आणखी विभाजन करता येते (ओल्सन १९७१, पृष्ठ ३६ एफ). अबाजार किंवा बाजारविरहित (Non-market) परिस्थितीत सर्वसमावेशक सार्वजनिक वस्तू व्यवस्थेमध्ये सामूहिक गट मोठा झाल्यावर वस्तूंची तरतूददेखील विस्तारते. सार्वजनिक वस्तूंच्या बाजारपेठेस अन्य सार्वजनिक वस्तू म्हणतात. यामध्ये विद्यमान गट सदस्य गटाचा आकार कमी करण्याचा प्रयत्न करतात. कारण, तेथे केवळ एका वस्तूपासून मिळणाऱ्या निश्चित स्वरूपातील सकल फायदे मर्यादित असतात.

पारंपारिक सिद्धांतातील गटांचा आकार ओल्सनच्या सिद्धांतात निर्णायक भूमिका बजावतो. लहान गटांना सार्वजनिक वस्तूसह उपइष्टतम तरतूद करण्याची प्रवृत्ती आवडते. परंतु, मोठे गट बऱ्याचदा स्वतःला सामूहिक वस्तू प्रदान करण्यात अपयशी ठरतात. सदस्यांचा एकल हिस्सा लहान असेल, तितका तो इष्टतमपणा स्थित असतो. साहाजिकच, याचा अर्थ असा आहे की, मोठे गट कमी कार्यक्षम असतात. केवळ एखाद्या गटाच्या सदस्यांची संख्या महत्त्वाची नाही तर, प्रत्येक व्यक्तींच्या आकारालाही महत्त्व असते. सर्वाधिक नफा घेत असलेल्या व्यक्ती सार्वजनिक वस्तूंचा मोठा हिस्सा वापरतील. सामान्य सदस्य सार्वजनिक हिताचा उपभोग घेणे पसंत करतात. त्याना 'फ्री रायडिंग' म्हणून ओळखले जाते. अशी प्रवृत्ती नष्ट करणे खूप कठीण असते. लहानांनी मोठ्यांच्या शोषणाची प्रवृत्ती सर्व परिस्थितीत अस्तित्वात असते. जेव्हा सीमांत खर्च किरकोळ फायद्यासाठी तितकाच जास्त असतो, तेव्हाच इष्टतम स्थितीला पोहोचता येते. अशा प्रकारे याचा असा निष्कर्ष निघतो की, लहान गट मोठ्या गटापेक्षा अधिक कार्यक्षम असतात. सहकारी संस्थांचे यशस्वी कामकाजदेखील इष्टतम आकारावर अवलंबून आहे, विशेषतः उत्पादन सहकारी संस्थांमध्ये असे पाहिले जाते.

गट किंवा एकजिनसी स्वरूपाच्या संघटनांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी संघ किंवा महासंघाच्या स्वरूपात अंतर-गट किंवा अंतर-संघटनात्मक संबंध अस्तित्वात येतात. अशा दोन किंवा त्याहून जास्त संस्थांमध्ये सर्व प्रकारच्या माहितीची देवाण-घेवाण करण्याचा आधार सर्वांना उपलब्ध होतो. त्यामुळे निर्माण झालेल्या सहसंबंधांचे अनेक फायदे अपेक्षित किंवा ते व्यावहारिक असतात. असे सर्व व्यवहार धोरणात्मक आणि माहितीच्या फायद्यामध्ये विभागलेले असतात (ओल्सन, १९७१). म्हणूनच, युनियन किंवा फेडरेशनमधील सहकारी संस्था परस्पर सामंजस्याने काम करतात.

सामूहिक कृतीच्या सिद्धांतामधून काही मुद्दे खुल्या स्वरूपात सर्वांना उपलब्ध होतात. मुक्त स्वार (फ्री रायडिंग) कमी करण्यासाठी आणि समूह वर्तन पर्याप्त करण्यासाठी अंतर-गट किंवा अंतर-संघटनात्मक संबंध निर्माण करण्यासाठी काही मुद्द्यांवर सर्वमान्य सहमती असते. असे सहसंबंध एखाद्या व्यक्तीला आगामी फायद्यासाठी सदर गटाला चिकटून राहाण्यास भाग पाडतात. गट एकसंघ राहातो, म्हणून तो कार्यक्षम राहातो. एखाद्या गटाला अधिक सक्रिय ठेवण्यामध्ये पर्याप्तता महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. समूहाच्या बदलत्या आयामासह सार्वजनिक वस्तूमध्ये भर घालणे, हे एखाद्या गटाला अधिक सक्रिय ठेवण्यासाठी काही प्रोत्साहने व प्रलोभने आवश्यक असतात. पण, त्यांच्या अस्तित्वासाठी जगणे हे समूहाचे उद्दिष्ट बनते. ओल्सन यांनी या संदर्भात अनेक निरीक्षणांचा उल्लेख केला आहे.

विविध प्रकारच्या गटासाठी जेव्हा प्रोत्साहने वापरली जातात, तेव्हा ते वेगवेगळ्या प्रकारे वागतात अथवा कार्यरत राहातात. मोठा गट मोठ्या प्रमाणात आर्थिक प्रलोभने देतो. अशा प्रकारचे गट नेहमीच एखाद्या व्यक्तीसाठी गटात सामील होण्यासाठी आकर्षित करतात. सार्वजनिक वस्तूंचे शोषण टाळणे खूप कठीण आहे. कारण, ते सर्वांसाठी उपलब्ध असतात. काही सार्वजनिक वस्तूंमध्ये सकारात्मक बाह्यता निर्माण होते. जेव्हा सार्वजनिक वस्तूंचे बेदरकारपणे शोषण केले जाते, तेव्हा सामान्यांची शोकांतिका अस्तित्वात येते.

सामूहिक कृतीमध्ये वरवरच्या सामान्य समस्या सामान्य ध्येयाचा पाठलाग करतात. सामूहिक कृतीला ते परावृत्त करतात. ओल्सन यांनी असे सुचविले आहे की, निवडक प्रोत्साहनांच्या वापराने मोठ्या गटातील सामूहिक कृती समस्या सोडविल्या जाऊ शकतात. मुक्त स्वरांची (फ्री रायडर्स) समस्या जिथे-जिथे सामूहिक व लोकोपकारी कृती असेल तिथे तिथे असे घडू शकते.

सामूहिक कृती समस्येचे प्रतिनिधित्व एका साध्या गेम थेअरीद्वारे केली जाते. 'कैद्यांची कोंडी' (Prisionars dilemma) बहुविध परिस्थितीची मालिका दर्शविते. जिथे व्यक्तिगत तर्कशुद्धतेमुळे एक निकृष्ठ परिणाम निदर्शनास येतो; तिथे परिणामी मुक्त स्वार किंवा सक्रिय सहभागाची वृत्ती प्रसंगानुरूप बदलते. अशा प्रकारे सामूहिक कृती ही निर्विवादपणे एक समस्या आहे. लोकही सहजासहजी आपल्या कामात सामील होत नाहीत किंवा अलिप्तदेखील राहात नाहीत. पण, खऱ्या जगतातील मानवी जीवनात दोन्ही प्रकरणे अशक्य आहेत. अशा सर्व परिस्थितीवर मात करण्यासाठी नेतृत्वाची भूमिका स्वाभाविकपणे सामूहिक कृतीकडे घेऊन जाते.

कोणत्याही प्रारूपाला संख्येची मर्यादा असते. त्याची एकरूपता संशयास्पद असते, म्हणून त्याला गट नेत्याच्या मार्गदर्शनाची गरज असते. प्रारूपातील नेत्याची भूमिका मात्र दुर्लक्षित राहाते. त्याच्या कर्तृत्वाला वाव नसतो; कारण प्रारूप हेच कर्तृत्व बनते. नेत्याशिवाय कोणताही गट अस्तित्वात येत नाही. प्रारूपामुळे नेत्याचे कार्य सुलभ होते; पण प्रारूपाचा प्रभाव नेत्यावर असावा लागतो. त्याशिवाय नेतृत्व अर्थहीन होत नाही. लहान गटाला मोठ्या गटापेक्षा संघटित करणे सोपे असते. तथापि, समूह आकाराचा परिणाम बहुतेक प्रकरणांमध्ये महत्त्वाचा असतो. मोठ्या गटाच्या यशासाठी व्यक्तिगत योगदानाला कमी महत्त्व दिले जाते. लहान गट, एखाद्या व्यक्तीला सक्रिय होण्याचा आग्रह धरतो. समूहाच्या आकारापेक्षा समूह सदस्यांमधील अंतर-सक्रियतेवर आकलनाची पातळी अधिक अवलंबून असते.

सामूहिक कृती सिद्धांत पुढे जाऊन सामाजिक आणि पेचप्रसंगांमध्ये सहकाराचे स्वरूप समजावून देण्याचा प्रयत्न करतात. परस्पर वचनबद्धता आणि विश्वास म्हणून सामूहिक कृती गटाच्या ओळखीसाठी काही नियम लागू केले जातात. ओस्ट्रम (१९९८, २०००) याला 'सशर्त संचालक' (Conditional Cooperators) आणि 'इच्छुक शिक्षाकार' (Willing Punishers), म्हणतात. म्हणजे प्रयोगशाळेच्या 'विरळ संस्थात्मक वातावरणात' (Sparse Institutional Environment) असलेले 'निकष वापरणारे खेळाडू' (Norm-using Players), सहकाराचे नियम ठामपणे सांगू शकतात, जे 'तर्कशुद्ध अहंकारी' (Rational Egoists) लोकांना अधिक सहकाराबद्दल पटवून देऊ शकतात. विरळ संस्थात्मक वातावरणाअंतर्गत सहकाराचे नियम ठामपणे सांगू शकतात. शिवाय ते 'तर्कशुद्ध अहंकारी' लोकांना अधिक सहकाराबद्दल पटवून देऊ शकतात. हजारो परंपरेसह तुलनेने एकाकी ग्रामीण समुदायात वाढणे आणि राहाणे म्हणजे, अत्यंत सुपरिषित आणि वेळीची चाचणी केलेले नियम असलेला खेळ खेळणे असा होतो. पारंपारिक समुदायांमध्ये सहकार आणि परस्परासंबंधीची एक मजबूत संस्कृती उदयास

येते, अपरिहार्य प्रवृत्ती म्हणून नाही. पण, त्यांच्यातील 'तर्कशुद्ध अहंकारी' समस्येची त्यांना चांगली जाणीव असते.

**निष्कर्ष :**

आज सहकारी चळवळ ही सामाजिक आणि आर्थिक उपक्रमांची संयुक्त सांगड आहे, म्हणून त्याला सामूहिक कृती म्हणतात. हा सामूहिक कृती दृष्टिकोन नवीन सामाजिक-आर्थिक व्यवस्थेत लागू करावा लागेल. आर्थिक उपक्रम जरी सामूहिक कृती असली तरी, सहकार प्रामुख्याने सामूहिक कृती क्षेत्राच्या सिद्धांतांमधून उद्‌भवते; ज्यामध्ये सामूहिक तर्कशुद्धतेकडे सामाजिक-आर्थिक अभिमुखता सिद्धांतांकडे आधाररेषेचा दृष्टिकोन म्हणून चांगल्या प्रकारे विचारपूर्वक मांडलेला आहे आणि म्हणूनच, सहकार मुळात सामूहिक (सामाजिक) कृती (आर्थिक) क्षेत्राचा एक भाग आहे. आधी सूचित केल्याप्रमाणे सामूहिक तर्कशुद्धता सामाजिक निवडीद्वारे सुरू केली जाते आणि प्रेरितही केली जाते. तर, सहकार ही लोकांच्या एकसंध गटाची सामाजिक-आर्थिक संघटना आहे. लहान गटांची कामगिरी चांगली आहे. उदाहरणार्थ, समूह शेती, समूह विपणन, बचत गट, बचत गटांद्वारे केलेली शेती इ. सामायिक जोखीम स्वीकारण्याच्या मन:स्थितीत असलेल्यांना प्राधान्य दिले पाहिजे.

१९ व्या शतकात भांडवलशाही आणि समाजवादी अशा दोन्ही अर्थव्यवस्थांमध्ये संस्थात्मक अर्थशास्त्र अनुग्रहाने अस्तित्वात होते. विसाव्या दशकाच्या उत्तरार्धात अर्थव्यवस्थांचे संमिश्र स्वरूप सुरू करण्यासाठी हे बहुतेक जबाबदार होते. या पार्श्वभूमीवर केवळ भारतातच नव्हे; तर जगभरात सहकार सुरू करण्यात आले. परिणामी, या काळात शोषक भांडवलशाही व्यवस्थेपासून मुक्त होण्यासाठी पर्यायी प्रारूप (मॉडेल) म्हणून सामाजिक निवड एकत्रितपणे सक्रिय केली गेली. परंतु कोणतीही आर्थिक व्यवस्था गरीब लोकांसाठी कार्यात्मक नाही; म्हणूनच, गरिबांनी स्वत: स्व-मदत आणि परस्पर मदतीद्वारे स्वत:ला जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यु. के. मधील कामगारांच्या एका गटाने अशी कुजबुज सुरू केली. याच काळात मध्यम व उच्च मध्यमवर्गीय लोकांनी सहकारी चळवळ सुरू केली होती. आता सहकारात गरिबांचा संबंध राहिला नाही. त्याचा आडवा विस्तार गरिबांशी न जोडता सहकारी राष्ट्रकुल (Cooperative Commonwhealth) म्हणून आणखी तो ओळखला गेला.

राष्ट्रकुल विचारधारा व्यावहारिक तत्त्वज्ञानासाठी सर्वोत्तम ठरली आहे. जवाहरलाल नेहरू आणि त्यांचे समकक्ष राजकीय विचारसरणीवादी राजकीय उपक्रमांद्वारे आर्थिक विकासाच्या व्यावहारिक तत्त्वज्ञानावर विश्वास ठेवून होते. तर, सहकाराचा या तत्त्वज्ञानाचा एक भक्कम पाया आहे, जो दारिद्र्य निर्मूलन आणि सामान्य संकट दूर करण्याकडे केंद्रित आहे. कारण, ही सामूहिक कृती होती, हे उघड आहे की, लोकशाही व्यवस्थेतील राजकारणी 'व्होट बँक' म्हणून सहकाराकडे आकर्षित होत आहेत. विकासाचे राजकारण सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेत जोडले गेले, जे आपण सध्याच्या व्यवस्थेतही सोडवू शकत नाही. आपण ते स्वीकारले पाहिजे.

उदारमतवादी अर्थव्यवस्थांच्या अंतर्गत आर्थिक उपक्रमांमधील स्पर्धेने सहकारी संस्थांना राज्याचा आश्रय देण्याचे आव्हान दिले. परिणामी, ही चळवळ गोंधळाच्या स्थितीत आहे, ज्यामुळे स्वत:च्या पायावर उभे राहाण्यास थोडा वेळ लागू शकतो. एकदा त्यांनी हे आव्हान स्वीकारण्याची तयारी केली की, सहकारी संस्थांना चांगले भविष्य असू शकते. सहकाराचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे नुकसानीच्या स्थितीतही काम करणे, ज्यात खाजगी क्षेत्र काम करू शकत नाही. याचा पुरस्कार करण्यासाठी सदस्यांनी चळवळीशी जुळवून घेणे आवश्यक आहे. सहकारी संस्था या व्यावसायिक

जबाबदाऱ्या पार करण्याऐवजी सामाजिक संस्था आहेत. तथापि, भागधारकांच्या हिताला कसूर करू नये. कॉर्पोरेट गव्हर्नन्सच्या आधुनिक पद्धतीद्वारे सहकारी संस्थांना स्वत:ला सक्षम केले पाहिजे. त्यांनी राज्याच्या मदतीकडे दुर्लक्ष केले पाहिजे.

सहकार ही सामूहिक कृती आहे. ही कृती एकजिनसी गटांची असू शकते. सदस्य सहभागींच्या वाढीस गती देण्यासाठी आर्थिक क्रियाकलापांची आवश्यकता आहे. शिवाय, नेतृत्वाच्या अभावामुळे आणि त्यांच्या न्यूरो इकॉनॉमिक्सच्या अभावामुळे एक प्रणाली म्हणून सहकार कधीही अपयशी ठरत नाही, नेतृत्व अपयशी ठरते. सहकारी संस्थांवरील नियंत्रण काढून टाकले पाहिजे. सहकारी संस्थांवरील सरकारचा पाठिंबा काढून घेतला पाहिजे. सहकार विभाग रद्द करावा. सूचित केल्याप्रमाणे नवीन मार्गांना महत्त्व दिले जाऊ शकते. कारण, इतर विविध घटकांच्या पद्धतीसह आर्थिक क्रियाकलाप बदलत आहेत. आपण बदलले पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. Bardhan Pranab (2004), Scarcity, Conflicts, and Cooperation, MIT Press.

२. Bruno Jossa, (2005), Marx, Marxism and the Co-operative Movement, Cambridge Journal of Economics, Vol. 29, No. 1, Cambridge Political Economy Society.

३. Cole G. D. H. (1944), A Century of Co-operation, George Allen Unwin Ltd. for The Co-operative Union Ltd.

४. Darling Malcolm (1922), Some Aspects of Co-operation in Germany, Italy and Ireland, Govt Printing, Lahore.

५. David Washbrook (unpublished paper), Law and Land in Dry South India, 1870-1930, p.13.

६. Fay (1922), Co-operation at Home and Abroad, P. S. King and Son, Landon.

७. Frederick A. Nicholson (1960), Report Regarding the Possibility of Introducing Land Banks in the Madras Presidency, Bombay, p. 492.

८. Govt. of Great Britain, Parliament, House of Commons (1887), Sessional Papers, Correspondence Respecting Agricultural Banks in India, LXII, Letter from the Collector of Broach to the Bombay Survey and Settlement Commissioner, 21 July 1884, p. 695; Letter from the Secretary of State in Council to the Governor General of India in Council, 23 October 1884, pp. 698.

९. Houghs E. M. (1960), Co-operative Movement in India, Oxford University.

१०. Huss, Bernard, (1924), People's Banks or Use and Value of Co-operative Credit, Natal.

११. Jugale V. B. (1992), Theories of Agricultural Finance, Atlantic Publishers, New Delhi.

१२. Jugale V. B. (1995), Co-operative Credit in Indian Agriculture, Atlantic Publishers, New Delhi.

१३. Jugale V. B. (2009), Towards Village Banking, Serials Publications, New Delhi.

१४. Jugale V. B. and Jugale Y. V. (2014), Competitiveness of Co-operative

Sugar, CSSR, Sangli.
१५. Jugale V. B. and Jugale Y. V. (2019), Agricultural Co-operative Credit in India, Studera Publications, New Delhi.
१६. Musgrave Richard A. (1959). The Theory of Public Finance, NewYork: McGraw-Hill.
१७. Olson, Mancur (1971) 1965, The Logic of Collective Action: Public Goods and the Theory of Groups (Revised ed.), Harvard University Press. ISBN 0-674-53751-3. Description.
१८. Ostrom Elinor (Mar., 1998), A Behavioral Approach to the Rational Choice Theory of Collective Action: Presidential Address, American Political Science Association, 1997, The American Political Science Review, Vol. 92, No. 1, pp. 1-22, Published by: American Political Science Association, DOI: 10.2307/2585925, https://www.jstor.org/stable/2585925, Page Count: 22.
१९. Ostrom Elinor (summer, 2000), Collective Action and the Evolution of Social Norms, The Journal of Economic Perspectives, Vol. 14, No. 3, pp. 137-158, Published by: American Economic Association, https://www.jstor.org/stable/2646923, Page Count: 22.
२०. Schmid, A. Allan (2004). Conflict Co-operation: Institutional Behavioral Economics, Blackwell.
२१. Strickland, C. F., (1922), An Introduction to Co-operation in India. London, Milford; Bombay, Oxford University Press.
२२. Special Committee to the Fabian Colonial Bureau, (Lord Wister Chairman), Co-operation in Colonies: A Special Committee to the Fabian Colonial Bureau, (Lord Wister Chairman) George Allwin and Unwin Ltd. Special thanks to Library, Osmania University, Hydrabad.
२३. World Bank, (2007), Strengthening India's Rural Credit Co-operatives, Appraisal Report No. AB3126. Washington DC, The World Bank.
२४. Wolff Henry (1927), Co-operation in India; London W. Thacker Co., January, 1919 Servants of India Society.

◆

आर्थिक धोरणांची सार्वजनिक चर्चा सहसा सहभागींचे अज्ञान का दाखवते?

**- रॉबर्ट सोलो**

# राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या संदर्भात स्थानिक विद्यापीठ आणि शैक्षणिक संस्थांची भूमिका

**विनायक श्री. देशपांडे** †
**स्नेहा वि. देशपांडे** ††

**प्रस्तावना :**

गेल्या अनेक वर्षांमध्ये अनेक अडचणी आणि अरिष्टांवर मात करून काही लक्षणीय बाबी साध्य करण्यात आपण भारतीय यशस्वी झालो. अत्यंत विपरीत परिस्थितीत प्राप्त झालेले स्वातंत्र्य आपण अबाधित ठेवू शकलो. अनेक संकटांवर मात करून भारताची एकता आणि अखंडता जपविण्यात आणि पंचाहत्तर वर्षांपासून देशाची विविधता संरक्षित राखून त्याचे यथायोग्य जतन करण्यात देखील आपल्याला यश प्राप्त झाले. मजबूत संघीय व्यवस्थेच्या माध्यमाने देशाची आर्थिक प्रगती देखील लक्षणीय स्वरूपात साध्य करता आली. या सर्व उपलब्धींच्या पार्श्वभूमीवर विकासाच्या नंतरच्या टप्प्यावर मात्र दुर्भाग्याने शिक्षणक्षेत्र दुर्लक्षित राहिले हे खेदाने नमूद करावे लागेल. सामाजिक बदल घडवून आणण्यात भारतातील शिक्षणक्षेत्राने आपली भूमिका एके काळी यथायोग्यरीतीने निभावली. परंतु आता मात्र बदल घडवून आणण्यात हे क्षेत्र कमी पडत असून, उलट बदलत्या सामाजिक बदलांशी शिक्षणक्षेत्र जुळवून घेत असल्याचे जाणवते. या क्षेत्राकडे बदल घडविण्याचे माध्यम म्हणून बघितले जात असे. आता मात्र झालेल्या बदलांशी समरस होणे अशी साधारण परिस्थिती निर्माण झाल्याचे शैक्षणिक क्षेत्रात अनुभवास येत आहे.

**संख्यात्मक आणि गुणात्मक शिक्षण**

सभ्यतेचे बौद्धिक प्रणेते विद्यापीठातच सापडायला हवेत आणि त्या अनुषंगाने आवश्यक प्रशिक्षणाची प्रक्रिया विद्यापीठातच पूर्ण व्हावी अशी अपेक्षा वेळोवेळी व्यक्त करण्यात येते. विद्यापीठे ही बौद्धिक साहसांसाठी एकप्रकारची घरकुलेच मानण्यात येतात. शिक्षण हे सामाजिक बदलाचे महत्त्वपूर्ण माध्यम असल्याचे देखील वेळोवेळी सांगण्यात येते. राष्ट्राचे भवितव्य वर्ग खोल्यांमध्ये निर्धारित होते. शिक्षणामुळेच मानवी प्रतिष्ठा प्राप्त होते या विचाराबाबतदेखील शंका उपस्थित करण्याचे कारण नाही. या दृष्टिने शिक्षणक्षेत्रात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक सामाजिक कार्यकर्त्यांच्या अथक प्रयत्नाने शिक्षणाचा प्रसार होण्याची मोठी क्रांती घडून येऊन साक्षरतेत वाढ होण्यास मोलाची मदत झाली. शिक्षणापासून वंचित/दूर राहिलेले शेतकरी, आदिवासी

† कुलगुरू, जी. एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावती. आणि माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद
आजीव सभासद क्र. ४६९, भ्रमणध्वनी : ९८२२७३७७२५, ई-मेल : vinayak.desh1961@gmail.com
†† प्राध्यापक (निवृत्त) व माजी विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ.
आजीव सभासद क्र. ८५२, भ्रमणध्वनी : ९८२२५७६४०४, ई-मेल : svdesh@gmail.com

अशा ८५ टक्के लोकांपर्यंत शिक्षण पोहचविता आले. सर्व शिक्षा अभियानामुळे शिक्षणाचा प्रसार तर झालाच; परंतु त्यासोबतच शिक्षण अर्धवट सोडून बाहेर पडणाऱ्यांची संख्यादेखील लक्षणीयरित्या कमी झाली. या क्रांतीने परिमाणात वाढ घडविली; परंतु या वाढीसोबत गुणवत्ता पूर्ण शिक्षण पुरविण्यात काही मर्यादा आल्यात ही बाब देखील दुर्लक्षित करून चालणार नाही. शालेय शिक्षणाच्या संदर्भातील शैक्षणिक प्रगतीबाबतचा आढावा वेळोवेळी 'प्रथम' आणि 'आसर' सारख्या संस्थांनी आपल्या अहवालाच्या माध्यमाने धोरणकर्त्यांपुढे आणला, त्यांची निरीक्षणे फारशी उत्साहवर्धक नव्हती. शाळा/महाविद्यालये येथे करण्यात येणाऱ्या गुंतवणुकीचे रूपांतर मानवी भांडवलात आवश्यक प्रमाणात होत नाही हे देखील प्रकर्षाने जाणवते. खरे तर भारतीय लोक शिक्षणाकडे वैयक्तिकरित्या फार गांभीर्याने बघतात.

गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टिने दुसऱ्या क्रांतीची आवश्यकता जाणवायला लागली. बहुतेक काम हे शारीरिक श्रमापेक्षा जास्त श्रेष्ठ असे साधारणत: मानण्यात येऊ लागल्याने अर्थव्यवस्थेला आवश्यक असलेले अर्धकुशल कामगार मिळणे दुरापास्त झाले. नव्या शैक्षणिक धोरणाने सध्याच्या शिक्षणव्यवस्थेतील समस्या ओळखल्या, आपण कुठे आहोत याची जाण प्रामाणिकपणे या धोरणाने करून दिली. परंतु या प्रामाणिक धोरणांची, प्रामाणिक अंमलबजावणीदेखील तितकीच महत्त्वाची आहे. शैक्षणिक व्यवस्थेची दुरुस्ती मोठ्या प्रमाणावर करण्याची गरज या शैक्षणिक धोरणाने दर्शविली असून, अत्यंत गांभीर्याने परिस्थितीचे अवलोकन केल्याचे जाणवते. संख्यात्मकतेपासून गुणवत्तापूर्ण दृष्टिकोन असा प्रवास शैक्षणिक क्षेत्राचा होणे या धोरणाच्या संदर्भात अपेक्षित आहे.

**शिक्षणक्षेत्रापुढील आव्हाने**

एकूण १३५ कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात १५ ते ४५ या वयोगटात, ६६% लोक आहेत. तरुणाईला मानवी प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे शिक्षण आणि रोजगार सर्वत्र उपलब्ध करून देणे, हे खरे आव्हान आहे. सध्या उपलब्ध असलेल्या एकूण नोकऱ्यांपैकी येत्या १० वर्षांच्या कालावधीत बदलत्या तंत्रज्ञानामुळे ६५% नोकऱ्या या अस्तित्वातच राहणार नाहीत, असे भाकीत वर्तविण्यात येते. कदाचित त्या नोकऱ्या गायबच होतील की काय अशी भीती देखील व्यक्त करण्यात येत आहे. साधारणपणे २०३५ या वर्षापर्यंत आतापेक्षा दुपटीने आपले भारतीय उच्चशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेतील. सध्या २६% उच्चशिक्षण घेत असून २०३५ पर्यंत ५०% युवक उच्चशिक्षणात येणार असल्याने उच्चशिक्षण प्रदान करणाऱ्या संस्थांच्या संख्येतदेखील वाढ करावी लागेल. तंत्रज्ञान शिक्षण प्रदान करू शकत नाही, हे कोविडच्या काळात अनुभवास आले. ते एक साधन असून साध्य नाही. शेवटी शिकविणारे शिक्षक त्यांचे ज्ञान, त्यांची शिकविण्याची आवड/तळमळ आणि विद्यार्थ्यांप्रति करुणा याच बाबी महत्त्वाच्या ठरतात. भारताचे उच्चशिक्षण प्रमाणबद्ध करण्याकडे आपला कल असावा की दर्जेदार करण्याकडे हा खरा कळीचा मुद्दा आहे. सहज/स्वभावाने ज्यामुळे शिक्षकांवर, पालकांवर ताण येणार नाही, अशी नितळ शिक्षण पद्धत असावी, अशी अपेक्षा आहे. शैक्षणिक क्षेत्रापुढील ही सर्व आव्हाने लक्षात घेता आता केवळ सुधार न आणता परिवर्तन घडवून आणणे हीच काळाची गरज आहे. शिक्षणामुळे नोकरी प्राप्त होऊ शकते आणि शिक्षण जीवनाशी संबंधित आहे हा विश्वास जागृत करणे हे देखील आव्हान उभे ठाकले आहे. साधारणपणे ३४ वर्षांनंतर आलेल्या या नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमुळे ही आव्हाने पेलू शकण्याची ताकद शैक्षणिक क्षेत्रात निर्माण होईल, असा विश्वास निर्माण करण्यात आला आहे.

**नवे शैक्षणिक धोरण: विद्यापीठांची भूमिका**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या ७५ वर्षांच्या काळात आपले राष्ट्र एक आत्मविश्वासी राष्ट्र म्हणून उदयास आले आहे, यात शंका नाही. भारतीय विद्यापीठ व्यवस्था विविधतेने नटलेली आणि मोठ्या प्रमाणावर पसरलेलीदेखील आहे. यात ५४ केंद्रीय विद्यापीठ (महाराष्ट्र १), ४४१ राज्य विद्यापीठ (महाराष्ट्र २५), १२६ अभिमत विद्यापीठ (महाराष्ट्र २१) आणि ३९७ खाजगी विद्यापीठ (महाराष्ट्र २१) अशी साधारणपणे विद्यापीठीय रचना सद्य:स्थितीत अस्तित्वात आहे. विद्यापीठाची संकल्पना आणि उच्चशिक्षण ही सरतेशेवटी सार्वजनिक सेवा आहे या मूलभूत बाबीकडेच दुर्लक्ष होत असल्याचे प्रकर्षाने जाणवते. वस्तू म्हणून शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि या संपूर्ण व्यवस्थेला प्राप्त झालेले बाजाराचे स्वरूप ही खरी तर काळजीची बाब झाली आहे.

ऑस्ट्रेलियाच्या लोकसंख्येपेक्षा आणि इतर १५२ सार्वभौम राष्ट्रांपेक्षा भारतातील उच्चशिक्षण क्षेत्र विस्तृत आणि अफाट आहे. हे क्षेत्र लक्षणीय असण्याचे कारण याचा निव्वळ आकार नसून, सामाजिक क्रांती घडविण्यात या क्षेत्राचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. एकूण वाढत्या शैक्षणिक क्षेत्रात खाजगी शिक्षणसंस्थांचे योगदान दुर्लक्षित करता येणार नाही. तीन चतुर्थांश वाटा या क्षेत्रांनी उचलला आहे. परंतु या क्षेत्रातील शिक्षणव्यवस्था काही अपवाद वगळल्यास व्यावसायिक अभ्यासक्रमांपुरताच मर्यादित राहिला आहे. यात मुख्यत्वेकरून अभियांत्रिकी, वैद्यकीय शिक्षण, शारीरिक उपचार (Physiotherapist), ट्रॅव्हल एजंट असे अभ्यासक्रम मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येतात. सकल नामांकन अनुपात (GER) व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी (Vocational Education) हळूहळू वाढीस लागला आहे (सध्या २.४ टक्के) ही जमेची बाजू निश्चितच आहे. परंतु या वाढीसोबतच पारंपरिक विज्ञान विषयांकडील विद्यार्थ्यांचा ओढा कमी झाला हीदेखील चिंतनीय बाब आहे. कदाचित पहिल्यांदाच भौतिकशास्त्र/रसायनशास्त्र अशा मूलभूत विज्ञान विषयात होणाऱ्या प्रवेशात घट होत असल्याचे दिसते.

सध्या तांत्रिक कौशल्य आणि रोजगार क्षमता यांवर विविध स्तरावर अधिकाधिक लक्ष पुरविण्यात येत आहे. बदलत्या परिस्थितीला सामोरे जाण्यास कौशल्य प्रशिक्षण गरजेचे आहे. परंतु याचा परिणाम शिक्षणाच्या इतर पैलुंवर होता कामा नये. यामुळे शिक्षणाच्या मूळ संकल्पनेलाच तडा लागू शकेल की काय? अशी शंका उपस्थित करण्यास वाव आहे. या संदर्भात प्रशिक्षण आणि शिक्षण यांतील भेद लक्षात घेणे आवश्यक आहे. प्रशिक्षण गरजेचे आहे परंतु ते पुरेसे नाही. माहीत असलेल्या गोष्टींची कार्यक्षमतेने पुनर्मांडणी प्रशिक्षणाच्या साहायाने होते. परंतु शिक्षणाने कल्पकता/सर्जनशीलता विकसित होउन अज्ञात गोष्टींना सामोरे जाणे सुकर होते.

**एक राष्ट्र एक अभ्यासक्रम कितपत योग्य**

देशात कार्यरत असलेल्या विद्यापीठांच्या गुणवत्तेत प्रचंड तफावत आहे, यात वाद नाही. परंतु गुणवत्तेतील असमानता दूर करण्यास प्रमाणीकृत/एकसंघीय शैक्षणिक व्यवस्था हाच एक मार्ग होऊ शकेल आणि समस्येचे निराकरण करता येईल हे मानणे कितपत योग्य होऊ शकेल? विद्यापीठांवर एकरूपता आणण्याचे बंधन कदापि टाकण्यात येऊ नये. वर्गांमध्ये असलेल्या विद्यार्थ्यांच्या विविधतेकडे गांभीर्याने बघून, विद्यापीठनिहाय वेगळेपण लक्षात घेऊन त्याचा आदर करण्याची गरज आहे. विद्यापीठीय प्रमाणीकृत/केंद्रीकृत रचनेवरील भर कदाचित आत्मघातकी ठरण्याची शक्यता नाकारता येणार नाही. विविधता आणि उत्कृष्टता यांत कुठेही विरोधाभास नाही, विद्यापीठांची विशिष्टता दुर्लक्षित न करता विद्यापीठांच्या गुणवत्तेत वाढ करणे ही खरी काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांचे एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात होणारे स्थलांतरण गुणवत्तापूर्ण शैक्षणिक संस्थांच्या अभावामुळे

घडते हे देखील मान्य करावे लागेल.

अस्तित्वात असलेली आपली केंद्रीय विद्यापीठे/ राज्य विद्यापीठे यांना एक अद्वितीय अशी संस्कृती आणि विशेष इतिहास असल्याने त्याचा संबंध स्थानिय भौगोलिक परिस्थितीशी आणि प्रदेशाशी आहे. ज्ञान विकसित करण्याची एक स्वत:ची रचना त्या त्या भागात निर्माण होते. शिकविण्याचे माध्यम, जवळपास राहाणारे नातेवाईक, सामाजिक आणि सांस्कृतिक संधी आणि अनुरुपता असे अनेक घटक लक्षांत घेऊन विशिष्ट विद्यापीठांत/शैक्षणिक संस्थेत विद्यार्थी प्रवेश घेतात. बरेचदा त्यांचा हा निर्णय शैक्षणिक निर्देशकांवर आधारित देखील नसतो. उच्च शिक्षणाची तरतूद करणे ही संपूर्णपणे राज्याची जबाबदारी आहे; परंतु शैक्षणिक धोरणांवर आणि व्यवहारांवर राज्यांनी संपूर्ण नियंत्रण ठेवल्यास शैक्षणिक संस्थांच्या विकासास ते घातक ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. विद्यापीठांची स्वायत्तता टिकवून ठेवण्याच्या दृष्टिने शासनानेच योग्य भूमिका वठविणे गरजेचे आहे.

विविधतेला छेद न देता विद्यापीठांची क्षमता विकसित करण्याचे आव्हान राज्यातील विद्यापीठांना पेलावे लागणार आहे. विद्यापीठांचे/महाविद्यालयांचे एकीकरण आणि आधारभूत संरचनेची वाटणी यावर नवीन शैक्षणिक धोरणात भाष्य करण्यात आले आहे. एकीकरण करून लाभधारकांना सेवा पुरवितांना त्या त्या संस्थांची स्वत:ची संस्कृती आणि त्यांनी केलेले योगदान याची दखल घेऊन त्याचा आदर करणे आवश्यक राहील.

**सामायिक अभ्यासक्रम आणि पत /क्रेडीट हस्तांतरण**

क्रेडीटचे हस्तांतरण करण्यासाठी सामायिक अभ्यासक्रमाची खरोखर आवश्यकता आहे का? या संदर्भात अभ्यासक्रम (Syllabus) आणि प्रमाणीकृत निर्देश (Curriculum) यात भेद करणे संयुक्तिक होईल. विद्यार्थी आणि शिक्षकांमधील संवादाची नियोजित चौकट याचा संबंध curriculumशी असतो. एका अभ्यासक्रमात चर्चेचे/अध्ययनाचे विषय नेमके कोणते राहतील या बाबतचा उल्लेख अभ्यासक्रमाच्या म्हणजेच Syllabus च्या माध्यमाने होऊ शकेल. याचाच अर्थ एकच प्रमाणीकृत निर्देश ज्याला आपण curriculum म्हणतो तो अभ्यासकमाच्या माध्यमाने विविध पद्धतीने हाताळता येईल, त्याला प्रादेशिक संबंधदेखील जोडणे शक्य होईल. सामायिक अभ्यासक्रम असल्यास केंद्रीय किंवा राज्य विद्यापीठांमध्ये सारखाच अभ्यासक्रम राहील. अशा स्थितीत प्रदेशांच्या उदयोन्मुख समस्या लक्षात घेऊन संबंधित विद्यापीठांना स्वत:चा अभ्यासक्रम ठरविणे अवघड होऊ शकेल. स्थानिक व प्रादेशिक प्रश्नांची सांगड विषयाशी घालणे हे महत्त्वपूर्ण कार्य स्थानिक पातळीवरील विद्यापीठांद्वारेच होऊ शकेल. सामायिक अभ्यासक्रम न लावता इतर पद्धतीचा अवलंब करून क्रेडीट हस्तांतरण करता येणे शक्य होईल.

**सामाजिक शास्त्रे आणि भाषेची आव्हाने**

कौशल्य विकास आणि व्यावसायिक शिक्षण यांवर अधिक लक्ष केंद्रीत झाल्यास सामाजिक शास्त्रातील विषयाकडील असलेला विद्यार्थ्यांचा ओढा कमी होऊ शकेल. वैयक्तिक विकासासाठी मानव्यशास्त्रातील विषयांचे महत्त्व नव्या शैक्षणिक धोरणात नमूद केले आहे. परंतु बदलत्या परिस्थितीत पारंपरिक विज्ञान विषयांकडचा ओढा जसा कमी झाला; तसेच सामाजिक शास्त्रातील विषयांच्या बाबतीतदेखील घडले. काही खाजगी विद्यापीठांनी पुढाकार घेऊन उदारमतवादी कला (Liberal Arts) या नावाखाली काही नवे अभ्यासक्रम सुरू केले. याकरिता भरमसाठ शुल्क आकारण्यात येऊ लागले आणि काही विद्यार्थी या शिक्षणाचा लाभदेखील घेऊ शकले. तेथील आधारभूत संरचना आणि शिकविणारी तज्ज्ञ मंडळी याची तुलना पारंपरिक संस्थांशी होऊच शकणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली

आहे. बहुविद्याशाखीय व्यवस्था लागू झाल्यास तांत्रिक विषयांसोबत मानव्य विद्याशाखेतील पारंपरिक विषय जोडण्यात येतील. सध्या सामाजिक शास्त्रातील विषयांमध्ये मराठी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने वाढत असल्याचे निदर्शनास येते; परंतु त्यासोबतच मराठी भाषेतून होणारी ज्ञानाची निर्मिती इंग्रजीच्या तुलनेत बरीच मागे आहे. नव्या शैक्षणिक धोरणामध्ये स्थानिक आणि मातृभाषेला फार महत्त्व देण्यात आले आहे. परंतु प्रादेशिक भाषेतील लिखाण बरेचदा वाङ्मयाच्या चौकटीतूनच बघण्यात/तपासण्यात येते. सामाजिक शास्त्रातील लिखाण प्रादेशिक भाषेत सामोरे आणण्यासाठी संस्थात्मक रचनेची अत्यंत आवश्यकता आहे. महाराष्ट्रात या बाबतीत काही प्रयत्न झाले. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ ही संस्था निव्वळ ज्ञानाचा प्रसार व्हावा या उद्देशाने स्थापन झाली नाही, तर विविध क्षेत्रांत ज्ञानाची निर्मिती करण्यामागे देखील या संस्थेचा उद्देश होता; परंतु फारसे उत्साहवर्धक कार्य या संस्थेच्या माध्यमाने झाले नाही. उच्चशिक्षणासाठी क्रमिक ग्रंथ तयार करण्याची जबाबदारी मराठी ग्रंथनिर्मिती मंडळाकडे सोपविण्यात आली होती; परंतु कालांतराने ही संस्थादेखील डबघाईला आली. महाराष्ट्र राज्यात नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पूर्व तयारी म्हणून संस्थात्मक कोंडी दूर करण्यास प्राधान्य देण्याची गरज आहे. भाषेच्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी धोरणांची आखणी योग्यरीतीने करण्याच्या दृष्टिने विद्यापीठ अनुदान आयोग, विद्यापीठ आणि शैक्षणिक विभाग या तिघांचा सहभाग होणे आवश्यक आहे.

राज्यातील विद्यापीठांमध्ये तसेच केंद्रीय विद्यापीठांमध्ये आपसात सहयोग प्रस्थापित होणे अत्यंत आवश्यक आहे. खाजगी विद्यापीठांचादेखील सक्रिय सहभाग अपेक्षित असल्याने त्यांना अंमलबजावणीच्या प्रक्रियेत सामील करून घेणे हे आवश्यकच राहील.

**राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मानांकन**

ज्ञाननिर्मितीच्या विविध पद्धती अस्तित्वात आहेत, प्रत्येक शैक्षणिक संस्थेचे स्वत:चे वैशिष्ट्य आहे. विद्यापीठ/शैक्षणिक संस्था यांचा प्रादेशिक संबंध लक्षात घेता, प्रदेशाच्या विकासात तसेच स्थानिक प्रश्नांची सोडवणूक करण्यात तेथील शिक्षणसंस्थांचे नेमके योगदान कोणते हा मूल्यांकनाचा महत्त्वाचा निकष असावा. शहरात महाविद्यालय किंवा विद्यापीठ असणे हे तिथल्या प्रशासनाला आणि नागरिकांना उपयुक्त ठरावे. विद्यापीठ ज्या ठिकाणी कार्यरत आहे तेथील भौगोलिक परिस्थितीचा, विद्यार्थ्यांची आर्थिक-सामाजिक परिस्थिती याचा देखील अंतर्भाव मूल्यांकनात करण्यात यावा. तसेच वैज्ञानिक विषयांच्या मूल्यांकनासाठी अवलंबिण्यात येणारी पद्धत इतर विषयांसाठी उपयुक्त ठरणार नाही, हीदेखील बाब ध्यानात घ्यावी लागेल. नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांचे वैयक्तिक मूल्यांकन त्यांच्यातील गुणविशेष लक्षात घेऊन करण्यात यावे असे नमूद केले आहे. तद्वतच संस्थांचेदेखील मूल्यांकन त्या त्या संस्थेच्या कामाचे स्वरूप लक्षात घेऊन विद्यापीठ/संस्थानिहाय प्राचल (Parameters) विकसित करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. मानांकनासाठी उपयोगात आणण्यात येणारे राष्ट्रीय निकष अविकसित भागातील विद्यापीठ आणि शैक्षणिक संस्थांसाठी लावणे कितपत उपयुक्त ठरू शकेल याची पडताळणी करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

**समारोप**

भारतातील उच्चशिक्षण एका निर्णायक बदलाच्या उंबरठ्यावर आहे. राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर शैक्षणिक सेवा पुरविणारे खाजगी क्षेत्र नव्याने उदयास आले. महाराष्ट्र राज्यात २०१७/१८ च्या आकडेवारीनुसार ३६% विद्यापीठ, ६३% महाविद्यालये, ७८% टक्के स्वतंत्र पदवी प्रदान करणाऱ्या संस्था स्वबळावर खाजगी संस्था म्हणून कार्यरत आहेत. याउलट

शासनाच्या अखत्यारित असलेले विद्यापीठ ३५% टक्के, महाविद्यालये १२% आणि स्वतंत्रपणे पदवी प्रदान करणाऱ्या संस्था १३% कार्यरत आहेत. खाजगी क्षेत्राचे वाढते वर्चस्व लक्षात घेता शासनाचा सहभाग महत्त्वाचा राहील. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, खाजगी संस्थांमध्ये कार्यरत शिक्षकांसाठी पेन्शन योजना, खाजगी संस्थांच्या विकासासाठी आधारभूत संरचना निर्माण करण्याच्या दृष्टीने आर्थिक पाठबळ यासारख्या योजना खाजगी संस्थांची स्वायत्तता अबाधित ठेवून शासनाने हाती घेणे गरजेचे आहे. नव्याने निर्माण होणारे विद्यापीठ/ महाविद्यालय यांना प्रोत्साहित करण्यासाठी किमान काही कालावधीकरिता आर्थिक मदत पुरविणे गरजेचे आहे. 'स्थायी स्वरूपी विनाअनुदानित' या संकल्पनेची पुनर्रचना करण्याची आवश्यकता आता नव्याने निर्माण झाली आहे. सार्वजनिक-खाजगी भागीदारी या संकल्पनेला प्रत्यक्षात साकारण्यासाठी अशी व्यवस्था उभारणे ही काळाची गरज आहे. अन्यथा शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी हे आर्थिक आणि सामाजिक न्यायापासून वंचित राहाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. Academics for Creative Reforms (2015), 'What is to be done about Indian Universities?' Economic & Political Weekly Vol L No.24, June 13, 2015.

२. Gavaskar Mahesh (2010), 'Social Science Writing in Marathi' Economic & Political Weekly Vol XLV No.36, Sept., 4 2010.

३. National Education Policy Documents.

४. सोहोनी मिलिंद (२०२२), 'उच्च शिक्षणाची लघुदृष्टी' लोकसत्ता (रविवार विशेष) १०एप्रिल २०२२.

◆

## निवेदन : अर्थसंवाद वर्गणी

अर्थसंवाद अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / व्यावसायिक संस्था/ग्रंथालये यांच्यासाठी **त्रैवार्षिक वर्गणी रु. २०००/- तर पंचवार्षिक वर्गणी रु. ३०००/-** आहे. ही वर्गणी कृपया 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा संपादकांशी संपर्क साधून NEFT (मराठी अर्थशास्त्र परिषद, बँक ऑफ इंडिया, राजारामपुरी, कोल्हापूर. खाते क्र. : 094720110000368, IFSC : BKID0000947) द्वारे पाठवावी. **मनिऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.** सदर वर्गणी कृपया प्रमुख संपादकाच्या पुढील पत्त्यावर कव्हरिंग लेटरसह पाठवावी.

**डॉ. राहुल शं. म्होपरे**

'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२, प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी, दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे, उजळाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर - ४१६ ००४ भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# आभासी चलन : एका नव्या चलन युगाची नांदी

**अनिलकुमार कृ. वावरे** †
**सविता अनिलकुमार वावरे** ††

**प्रस्तावना :**

वस्तुविनिमय पद्धतीपासून मानवी आर्थिक व्यवहारांची झालेली सुरुवात नाणी, चलनी नोटा, वित्त पत्रे, ई-बँकिंग, प्लास्टिक मनी असे करीत करीत आज अगदी 'आभासी चलना'पर्यंत येऊन पोहोचलेली आहे. २१व्या शतकातील अर्थजगतामध्ये आज ब्लॉग चैन तंत्रज्ञानाच्या प्रगतीतून क्रिप्टो करन्सी हा आभासी चलनाचा नवा प्रकार प्रकर्षाने पुढे येत आहे. या क्रिप्टो करन्सीमधील सध्या अत्यंत लोकप्रिय ठरत असलेले 'बिट क्वाईन' म्हणजे नेमके काय? तो ॲसेट (मत्ता) आहे की करन्सी (चलन) आहे, त्याचा निर्माता कोण? त्याची नियामक यंत्रणा कोणती? यामध्ये जर एखाद्याची नियामक यंत्रणा असेल तर कोणती? या चलनाला कायदेशीर व अधिकृत दर्जा आहे का? यामध्ये जर एखाद्याची फसवणूक झाली तर दाद कुठे मागायची? हे आभासी चलन हरवले, गहाळ झाले, चोरीला गेले तर तक्रार कुठे करायची? अशा चलनातील व्यवहारांतून चुकीच्या गोष्टींना वित्तपुरवठा झाला तर? याचे नेमके भवितव्य काय असेल? या व अशा अगणित प्रश्नांचा ऊहापोह प्रस्तुत लेखाद्वारे करण्याचा हा एक प्रयत्न. मात्र या प्रस्तुत प्रश्नांना भिडण्याआधी मानवी अर्थव्यवहारांची ही प्रगती नेमकी कशी होत गेली व आपण आभासी चलनाच्या उंबरठ्यापर्यंत कसे येऊन पोहोचलो त्या पार्श्वभूमीपासूनच त्याची सुरुवात करणे योग्य ठरेल.

**वस्तुविनिमय- चलन ते आभासी चलन व्यवहार-**

मानवी इतिहासातील पैशाचा उगम शोधताना तो अगदी सुरुवातीला 'वस्तुविनिमय' (बार्टर सिस्टम) पद्धतीने चालत. उदा. एखाद्याकडे पुष्कळ गाई आहेत व दुसऱ्याकडे मुबलक धान्य आहे. तर ते आपसात देव-घेव करून आपल्या गरजा पूर्ण करत. मात्र पुढे जस-जसा ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञान याचा विकास झाला व त्यातून भौतिक वस्तू व सेवांची नवनवी प्रारूपे पुढे आली. यांत्रिकी व औद्योगिकीकरणातून उत्पादन, व्यापार, उद्योग वाढीला लागले तसे 'वस्तुविनिमया'तील युक्त संयोगाला खूपशा मर्यादा पडू लागल्या. त्यातून विनिमयाचे व मूल्याच्या संग्रहणाचे साधन म्हणून सोन्या-चांदीच्या मौल्यवान व दुर्मिळ धातुंचा वापर सुरू झाला.

† प्रध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा (स्वायत्त).
आजीव सभासद क्र. ८८०, भ्रमणध्वनी : ९८५०११७२२६, ई-मेल : dranilwavare@gmail.com
†† सहाय्यक प्राध्यापिका, अर्थशास्त्र विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा (स्वायत्त).
भ्रमणध्वनी : ९९२१२९९०३८, ई-मेल : drsavitawavare2511@gmail.com

त्यांची वैविध्यपूर्ण नाणी जगभरात प्रचलनात आली. मात्र दूरवरच्या प्रवासात, व्यापाराला, यात्रेला जाताना अशी सोन्या-चांदीची नाणी सोबत बाळगणे धोक्याचे ठरू लागले. मग हे सोने - चांदी एखाद्या व्यापाऱ्याकडे, सावकाराकडे देऊन तेवढ्या मूल्याची पावती घेतली जाई व दुसऱ्या भागात जिथे जाऊ तेथील व्यापाऱ्यांकडून तेवढ्या किंमतीच्या वस्तू, सेवा वा पैसे घेतले जात, म्हणजे पैशांतील नाण्यांसोबत हुंड्या वा प्रपत्रांचा वापर सुरू झाला.

पुढे औद्योगिक क्रांतीनंतर व्यवहार प्रचंड प्रमाणात वाढले. ते पार पाडण्यामध्ये नाणी असमर्थ ठरू लागली, म्हणून 'कागदी नोटां'चा जन्म झाला. मात्र प्रत्येक देशाकडे जेवढा राखीव सोन्याचा साठा असेल त्याच्या प्रमाणातच चलनी नोटा छापल्या जात. त्याला 'गोल्ड स्टँडर्ड' म्हणतात. पुढे जसजशी कल्याणकारी राज्याची संकल्पना पुढे येत गेली व शासनाला अधिकाधिक वित्ताची गरज भासू लागली, तसे सोन्याच्या राखीव साठ्यावरील आधारलेली पद्धत जावून आता जगभरातील बहुतांश राष्ट्रे आपल्याला हव्या तेवढ्या चलनी नोटा छापू लागले आहेत.

पुढे तर या अमाप वाढलेल्या पैशाचे सहज, जलद व सोयीस्कर विनिमय व्यवहार पार पाडण्यासाठी त्याचे नवनवे प्रकार पुढे आले. ज्यामध्ये इलेक्ट्रॉनिक मनी, प्लास्टिक मनी, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, ए.टी.एम. कार्ड, स्वाईप मशीन, ऑनलाईन पेमेंट करणारे अनेक गेझेटस् उदा. पे-टी एम, गुगल-पे, फोन-पे इ. आणि पूर्वी आपले जे पैसे बँकेच्या खात्यात, खिशात, बॅगेत घराच्या कपाटात राहायचे आता ते इलेक्ट्रॉनिक फॉर्ममध्ये राहायला लागले. यालाच 'ई-बँकिंग' वा 'डिजीटल ट्रान्झेक्शन' असे म्हणतात. या सर्वातली एक मजेशीर बाब म्हणजे आपण आज जरी ई-बँकिंग वा डिजीटल व्यवहार करत असलो, तरी तो जेवढ्या मूल्याच्या पैशाचा होत असतो तेवढ्या मूल्याच्या नाणी व नोटा या छापाव्याच लागतात.

आता या सर्व नाणी व नोटांचा पुरवठा, त्याचे मूल्य इ. बाबी त्या त्या चलनाच्या धारक देशाची नियामक यंत्रणा त्यांना नियंत्रित करीत असते. त्यामुळे अतिरेकी चलनवाढ वा चलनघट होऊ नये इतपतच पैशाचा पुरवठा आणि त्याचे मूल्य स्थिर ठेवण्यावर त्यांचा भर असतो. परिणामी, पैशाच्या मूल्यात होणाऱ्या चढ-उतारांचा व्यावहार्य लाभ कुणालाच उठविता येत नाही. पैशावरचे असे सरकारचे व मध्यवर्ती बँकेचे नियंत्रण जावून पैशाचे सर्व व्यवहार सर्वांना व सर्वांसाठी खुले व्हावेत, यासाठीचे अनेक प्रयत्न जगभरामध्ये सातत्याने सुरू होते. यातूनच 'डिजीटल चलना'च्या पर्यायाची चाचपणी सुरू झाली.

**डिजीटल वा आभासी चलनाचा उगम व विकास:**

सन १९८३ साली डेव्हिड श्चाम या एका अमेरिकन संगणक शास्त्रज्ञाने 'डिजीटल कॅश' ही संकल्पना सर्वप्रथम मांडली. पुढे १९८९ मध्ये त्याने त्याकरता 'आर्मस्ट्रेन' इथे एका कंपनीची स्थापना केली. मात्र ही कंपनी फार काळ चालू शकली नाही. पुढे १९९६ साली 'ई-गोल्ड' नावाची इंटरनेट बेस्ड डिजीटल करन्सी संपूर्ण अमेरिकेत खूप गाजली. त्याची लोकप्रियता एवढी वाढली की, या 'ई-गोल्ड' मधील व्यवहारांवर नियंत्रण ठेवणे अमेरिकन सरकारलाही जमेनासे झाले. परिणामी, २००८ साली अमेरिकन शासनाने त्यावर बंदी आणली. थोडक्यात, सरकारी नियंत्रण नसलेली डिजीटल करन्सी तयार करण्याचे प्रयत्न काही नवे नाहीत तर अनेक वर्षांपासून त्यासाठीचे नवनवीन प्रयोग केले जात आहेत. १९९० पासून तर त्यासाठीच्या तात्त्विक, मूलभूत व प्रायोगिक संशोधनाला देखील प्रारंभ झालेला होता.

पुढे २००८ साली जी आर्थिक घसरण झाली त्यातून वित्तीय व्यवहारांबाबत जग कधी नव्हे एवढे खडबडून जागे झाले. कारण त्यात सीटी बँक, जे.पी. मॉर्गन, लेहमन ब्रदर्स यांसारख्या मोठमोठ्या बँका बुडाल्या.

यातूनच एक अशीही चर्चा पुढे येऊ लागली की, बँकिंग व्यवहारांचे झालेले केंद्रीकरण, त्यातील परस्परावलंबन यातूनच अशी अरिष्टे येत असावीत, याच्याच अभ्यासातून, चिंतनातून २००९ साली 'सातोशी नाकामोटो' यांनी एक व्हाईट पेपर प्रसिद्ध केला. त्यामध्ये त्याने 'ब्लॉक चैन' तंत्रज्ञानाची संकल्पना सर्वप्रथम मांडली व त्याच तंत्रज्ञानावर आधारित 'बिट क्वाईन' या आभासी चलनाची संकल्पना त्यांनी मांडली आणि व्यवहार्य पातळीवर विकसितदेखील केली. २०११ पर्यंत हे 'बिट क्वाईन' संपूर्ण जगभर एक आभासी चलन म्हणून स्थिरावत गेले व २०१३ ला तर 'बिट क्वाईन' फाऊंडेशनची जगभर स्थापना झाली.

आता हे 'बिट क्वाईन' नेमकं कुणी जन्माला घातलं? त्याचं संचालन कोणाकडून केलं जातं? हे आज संपूर्ण जगासाठी मोठं गूढ होऊन बसलंय. बिट क्वाईनचा जन्मदाता म्हणून ज्या 'सातोशी नाकामोटो'चा उल्लेख केला जातो. ती स्त्री आहे की पुरुष? का तो व्यक्तीचा समूह आहे? याची खात्रीशीर माहिती उपलब्ध नाही. २०११ मध्ये 'जोशोव्हा डेव्हीस' या व्यक्तीने 'सातोशी नाकामोटोला' शोधण्याचा चंग बांधला होता. आपल्या शोधकार्यातून त्याने काही संभाव्य व्यक्तींची यादीही प्रसिद्ध केली होती. त्यातून 'डेव्हिड कलीमन' हाच सातोशी नाकामोटा असावा, असाही अंदाज वर्तविण्यात आलेला होता. मध्यंतरी तर हा 'सातोशी नाकामोटो' म्हणजे पाच जपानी बहुराष्ट्रीय कंपन्यांचा समूह असावा व त्यांनी आपल्या प्रत्येकाच्या नावातील एक एक अक्षर घेवून म्हणजे सॅमसंग मधील -'सा', तोषीबा मधील 'तोषी' नाकोशी मधील 'नाका' आणि मोटोरोला मधील 'मोटो' असे त्याचे नामकरण झाले असावे.

'बिट क्वाईन' ही एक आभासी चलनाची संकल्पना आहे. तिचा निर्माता कोण वा नियामक यंत्रणा कोणती या बाबी जरी गूढ असल्या, तरी त्याचे सर्व व्यवहार, त्याच्या नोंदी या 'ओपन लेजर' पद्धतीने ठेवल्या जातात. त्यामुळे जगभरातील असंख्य देशांमध्ये 'बिट क्वाईन' ला एक 'ॲसेट' (मत्ता) म्हणून मान्यता मिळत गेली. मात्र एक 'चलन' म्हणून त्याला अधिकृत वा कायदेशीर मान्यता मिळू शकलेली नाही. कारण बिट क्वाईनला जर चलन म्हणून कायदेशीर वा अधिकृत मान्यता दिली गेली तर त्याच्या व्यवहारांवर, प्राप्त होणाऱ्या उत्पन्नावर कर कसा आकारायचा? हा मोठा प्रश्न राहील. सध्या जरी जगातील विविध देशांनी त्याला 'ॲसेट' चा दर्जा दिला असला तरी, या बिट क्वाईनच्या मूल्यातील सततच्या चढ - उतारांतून जो नफा मिळतो त्यावर 'कॅपिटल गेन टॅक्स' आकारला जातो. मात्र तरीही अशा नफ्यातून मिळणारा पैसा वा संपत्ती, ड्रग्ज,आम्ली पदार्थ, दहशतवाद, गुन्हेगारी इ. मध्ये वापरला जाण्याची दाट शक्यता आहे. हे संभाव्य धोके विचारात घेता येत्या काळात 'बिट क्वाईन' व त्यांचे व्यवहार, त्यातून प्राप्त होणारे उत्पन्न यांना कायद्याच्या कक्षेत आणणे गरजेचे आहे.

**ब्लॉग चैन तंत्रज्ञान व बिट क्वाईनचे संभाव्य धोके :**

सध्याच्या काळात ब्लॉग चैन तंत्रज्ञान व बिट क्वाईन या दोहोंना प्रचंड लोकप्रियता मिळत आहे. त्याच्या या वाढत्या लोकप्रियतेतून जर त्याचा वापर वाढत जात आहे. असेच त्याचे व्यवहार व्यापक प्रमाणात विस्तारत राहिले, तर त्याचे फार मोठे संभाव्य धोकेदेखील भोगावे लागतील. याची दुसरी जमेची बाजू ही देखील आहे की, पूर्वी संगणकाने व सध्या मोबाईल तंत्रज्ञानाने जशी क्रांती घडविली तशीच किंबहुना त्याहीपेक्षा मोठी क्रांती आगामी काळात हे ब्लॉग चैन तंत्रज्ञान घडवून आणेल. 'बिट क्वाईन' ही तर त्याची एक सुरुवात आहे.

ब्लॉग चैन तंत्रज्ञानाने जन्माला घातलेल्या या बिट क्वाईनचे दर सतत वर-खाली होत असतात. २२ मे २०१० मध्ये 'लाजीओ हनेज' नावाच्या फ्लोरिडामधील एका प्रोग्रॅमरनी 'पापागेनो' मधून दोन पिझ्झा विकत घेतले. हे दोन पिझ्झा तेव्हा त्याने स्वतः जवळील

१०,००० बिट क्वाईन देवून खरेदी केले होते. तेव्हा बिट क्वाईनचा जन्म होवून एक वर्ष झाले होते. त्यामुळे डॉलरच्या तुलनेत त्याचे मूल्य खूप कमी होते. मात्र नंतर त्याचे मूल्य वाढत वाढत गेले. इतके की, १५ नोव्हेंबर २०२१ रोजी एका बिट क्वाईनची किंमत ६४,००० डॉलर्स झाली. याचा दुसरा अर्थ असा की, २०१० मधील त्या दोन पिझ्झाची २०२१ मधील बिट क्वाईनमधील किंमत ६४ कोटी डॉलर्स किंवा ४८० कोटी रुपये एवढी असेल. म्हणून जगभरात त्या दिवसाला 'बिट क्वाईन पिझ्झा डे' म्हणून संबोधतात.

आपण जेव्हा 'बिट क्वाईनकडे' गुंतवणुकीसाठीची एक 'ॲसेट' म्हणून पाहातो. तेव्हा त्याच्या मूल्यामध्ये होणारे प्रचंड प्रमाणातील चढ-उतार हा त्यातील संभवणारा मुख्य धोका ठरतो ही बाब काही उदाहरणांनी जास्त स्पष्ट होईल. २००१ साली एक भारतीय तरुण नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने अमेरिकेला गेला. तिथे गेल्यावर त्याचे तिथल्याच एका युवतीवर प्रेम जडले. तिला भेट देण्यासाठी म्हणून त्याने एक अंगठी विकत घेतली. मात्र ती अंगठी तिला द्यायच्या अगोदरच दरम्यानच्या काळात त्याचा प्रेमभंग झाला. त्यामुळे तिच्यासाठी म्हणून घेतलेली ती अंगठी फेकून देण्याच्या मानसिक तयारीत तो होता. मात्र त्याच वेळी कोणीतरी त्याला ती अंगठी २०,००० बिट क्वाईन्स देवून विकत मागितली. मग त्यानेही विचार केला की, 'तसेही आपण ही अंगठी फेकूनच देणार होतो. त्यापेक्षा २०,००० बिट क्वाईन घेऊन विकूयात.' ही घटना घडली ते वर्ष होते २००९. जेव्हा बिट क्वाईनचा नुकताच जन्म झालेला होता. त्यामुळे डॉलर्सच्या तुलनेत त्याचे मूल्यही खूप कमीच होते. त्या तरुणाने नंतर नऊ वर्षांनी म्हणजे २०१८ साली सहजच त्या २०,००० बिट क्वाईनचे मूल्य काय झाले असावे म्हणून पाहिले तर तेव्हा ते ११५६ कोटी अमेरिकी डॉलर्सवर जावून पोहोचले होते. आपले बिग बी अमिताभ बच्चनजी यांनी देखील १.६ कोटी रुपये मूल्याचे बिट क्वाईन्स घेतले होते. नंतर त्याची किंमत ११० कोटी झालेली होती. पुढे ती ६०० कोटी झाली. अर्थात, ती पुन्हा खाली देखील घसरली. २००९ साली एका बिट क्वाईनची किंमत १: १३०९ डॉलर्स होती. त्यामुळे तेव्हा १३०९ बिट क्वाईन दिले की, एक डॉलर मिळायचे. पुढे २०१३ साली याच्या अगदी उलटे झाले, १ बिट क्वाईन देवून १२४० डॉलर्स मिळू लागले. पुढे २०१७ ला १ बिट क्वाईन देवून २०,००० डॉलर्स मिळू लागले. मात्र त्याच वर्षीच्या डिसेंबरमध्ये मात्र हा दर घसरून १३,००० डॉलर्स एवढा खाली आला. पुढे दोनच वर्षांनी जुलै २०१९ ला तो आणखी घसरून १०,००० डॉलरला खाली आला. मात्र लगेच पुन्हा नोव्हेंबर २०२१ मध्ये तो उसळी घेत ६०,००० डॉलरवर जावून पोहोचला.

बिट कॉईन्सच्या मूल्यातील या कमालीच्या चढ-उतारांनी अनेकांना अब्जाधीश बनविले. २०१३ साली कॅमेरॉन आणि टायलर नावाच्या दोघा भावांनी १.१ कोटी किंमतीचे बिट कॉईन्स खरेदी केले. पुढे त्यावर ते २०१७ ला अब्जाधीश बनले. २०१७ ची गोष्ट आहे. टेस्ला या गाडीचा निर्माता एलोन मल्स याने अशी घोषणा केली की, तो आपली टेस्ला गाडी बिट क्वाईन्सवर विकणार आहे. त्याच्या या घोषणेने बिट क्वाईनची मागणी एवढी वाढली की, एका बिट क्वाईनची किंमत ६०,००० डॉलरवर जाऊन पोहोचली. मात्र एलोन लगेच दोनच महिन्यांनी आपला निर्णय मागे घेतला. त्यामुळे बिट क्वाईन ३०,००० डॉलर्सपर्यंत निम्म्याने खाली घसरला. थोडक्यात, २००९ सालापासून बिट क्वाईन हे अत्यंत अस्थिर व व्होलाटाईल राहिलेले आहे. यामध्ये समाधानाची बाब इतकीच की, बिट क्वाईन मूल्य कितीही वाढले वा घटले, तरी त्यातून अतिरेकी भाववाढ, भावघट, चलन फुगवटा अशा समस्या उद्‌भवण्याची शक्यता फारच कमी आहे. कारण बिट क्वाईनच्या निर्मात्यांनी त्यांच्या अलगोरिदम मध्येच निश्चित करून

ठेवलंय की, बिट क्वाईनचा एकूण पुरवठा हा २.१ मिलियन एवढा म्हणजे २.१ कोटी असणार आहे.

**बिट क्वाईनला क्रिप्टो करन्सी का म्हणतात?**

बिट क्वाईनमध्ये संदेश एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठविताना तो मधे कुठे लिक होऊ नये म्हणून जी एक कोड लँग्वेज वापरली जाते त्याला 'क्रिप्टो ग्राफी' असे म्हणतात. म्हणून क्रिप्टो ग्राफी तंत्रज्ञानावर आधारित असलेले आभासी चलन असल्याने बिट क्वाईनला क्रिप्टो करन्सी असे म्हणतात. एका विशिष्ट वेळी कोट्यावधी लोक बिट क्वाईन्सचे व्यवहार करत असतात. त्यांचे हे जे व्यवहार असतात त्यांच्या प्रति दहा मिनिटांमधील संपूर्ण व्यवहारांचा एक ब्लॉग केला जातो आणि अशा प्रत्येक दहा मिनिटांच्या कालावधीतील तयार होणाऱ्या प्रत्येक ब्लॉग्जना एकमेकांशी जोडणारी एक चैन तयार केली जाते, त्यालाच 'ब्लॉग चैन' असे म्हणतात.

यातून असा प्रश्न पुढे येतो की, दर क्षणाला जे लाखो - कोटी लोक बिट क्वाईन्सचे व्यवहार करतात, त्यांच्याप्रति दहा-दहा मिनिटांचे जे ब्लॉग तयार होत जातील त्यांनी व्यवहारातील बिट क्वाईन्सची संख्या केवढी वाढेल. पण बिट क्वाईन्सच्या प्रणेत्यांनीच याचा खुलासा केला आहे. एकूण बिट क्वाईन्सचा होणारा पुरवठा हा फक्त २.१ कोटी इथपर्यंतच मर्यादित राहील व बिट क्वाईन्सचा पुरवठा दर १० मिनिटांना जो केला जातो तेच प्रमाण दर तीन वर्षांनी ५० टक्क्यांनी घटत जाईल. म्हणजे जानेवारी २००९ साली दर दहा मिनिटांना ५० बिट क्वाईन्सचा पुरवठा होत होता. पुढे २०१२ ला तो २५ वर आला, २०१६ मध्ये १२.५ झाला तर ११ मे २०२० रोजी ६.२५ झाला. २०२४ साली तो ३.१२५ होईल. अर्थात, अशाप्रकारे त्याचा पुरवठा जरी घटत गेला तरी त्याचे मूल्य वाढतच राहील. आता याचा जर आपण हिशेब लावला तर दहा-दहा मिनिटाला एक ब्लॉग म्हणजे एका तासात सहा ब्लॉग, यानुसार मग एका दिवसाला किती, महिन्याला किती, वर्षाला किती, चार वर्षाला किती असे गणित मांडत गेलो, तर ही ब्लॉग चैन आपल्याला २१४० सालापर्यंत घेऊन जाते. तेव्हा कुठे २.१ कोटी बिट क्वाईन्स संपतील म्हणजे ब्लॉग चैन तंत्रज्ञानाद्वारे बिट क्वाईन नावाच्या क्रिप्टो करन्सीचे व्यवहार अजून १२० वर्षे चालत राहातील.

दर दहा मिनिटांनी हे जे बिट क्वाईन्स येतात ते गुंतवणूकदाराला ठेवण्यासाठी एक व्हॉलेट उपलब्ध करून दिलेले असते. जे की डिजीटल व्हॉलेट असते. प्रत्येक वापरकर्त्यांचा त्यासाठीचा स्वतंत्र पासवर्ड असतो. एकूण २.१ कोटी बिट क्वाईन्सपैकी ९०% ची मायनींग म्हणजे खरेदी झालेली आहे. २००९ पासून आजअखेर १.८ कोटी बिट क्वाईन्स हे माईन करून झालेत. मात्र यातील हजारो - लाखो बिट क्वाईन्स हे गहाळ झालेत किंवा हरवलेले आहेत. उदा:- युकेमधल्या जेस्म होवेल नावाच्या व्यक्तीने ७,५०० बिट क्वाईन्स विकत घेतले व ते आपल्या हार्ड डिक्समध्ये स्टोअर करून ठेवले व कालांतराने तो ते विसरूनही गेला. आपली हार्ड डिक्स जुनी झाली म्हणून त्याने ती निष्काळजीपणे न पाहाता कचऱ्यात टाकून दिली. पुढे २०१७ ला जेव्हा त्याने कुतुहलापोटी आपण घेतलेल्या बिट क्वाईन्सचे मूल्य पाहिले तेव्हा ते १०० मिलियनवर जावून पोहोचले होते. मात्र आपल्या निष्काळजीपणामुळे तो ते हरवून बसलेला होता.

**बिट क्वाईन्सचे धोके :**

बिट क्वाईन्सचे जसे काही फायदे आहेत; तसेच त्याचे तोटेही आहेत. त्याचे व्यवहार डिस्ट्रीब्युटेड लेजरवर चालतात. त्याला कायद्याचे कोणतेही बंधन नाही. यामध्ये जर फसवणूक झाली तर कुठेही तक्रार करता येत नाही. याचे व्यवहार गुप्तपणे होत असल्याने त्याच्या पैशातून ड्रग्ज, आम्ली पदार्थ यांची तस्करी, गुन्हेगारी, दहशतवाद इ. साठी वापर होऊ शकतो. बिट क्वाईन्सची नक्कल करत आजवर ४ ते ५ हजारांवर क्रिप्टो करन्सीज निर्माण

झाल्या. त्यातील अनेकांची प्रगती झाली व त्या संपुष्टात पण आल्या. असे प्रकार आता तर नित्याचेच झालेत. आभासी चलन जगतात याला पंप आणि डम्प असे म्हणतात.

त्यामुळेच अशा क्रिप्टो करन्सीजमध्ये गुंतवणूक करताना ती खूप सावधपणे केली गेली पाहिजे. आजघडीला जगभरामध्ये जेवढ्या एकूण क्रिप्टो करन्सीमधील व्यवहार चालतात त्यापैकी ६५% वाटा हा एकट्या बिट क्वाईनचा आहे. बाकी इथेरीयम, रिपल, डॉज क्वाईन, काडॉनी, बी.एन.एस, एल.टी.ई अशा लोकप्रिय असलेल्या इतरही काही क्रिप्टो करन्सी आहेत व त्याचे स्वतःचे असे वेगळेपणदेखील आहे. बिट क्वाईन्सचे जे व्यवहार होतात ते कन्फर्म होण्यासाठी खूप वेळ लागतो. मात्र या तुलनेत 'रिपल' नावाच्या क्रिप्टो करन्सीमधील व्यवहार हे फक्त ४ सेकंदाच्या आत कन्फर्म होतात. बिट क्वाईन्सच्या पुरवठ्याची मर्यादा १.२ कोटी एवढीच मर्यादित आहे. मात्र इथन नावाच्या क्रिप्टो करन्सीची उपलब्धता अमर्याद आहे. कारण दरवर्षी त्यात १.८ कोटी क्रिप्टो जमा होतात. बिट क्वाईनचा एक ब्लॉग तयार होण्यासाठी १० मिनिटे लागतात. एल.टी.ई.चा ब्लॉग फक्त अडीच मिनिटात तयार होतो. तर त्याची पुरवठ्याची मर्यादा ८.८ कोटी एवढी आहे. म्हणजे ती बिट क्वाईनच्या चौपट आहे.

विशेष बाब म्हणजे भारतात क्रिप्टो करन्सीचे सर्वाधिक वापरकर्ते आहेत. त्यांची संख्या जवळपास १० कोटी आहे. सन २०२१-२२ मध्ये साडे सात लाख कोटी एवढ्या किंमतीची आर्थिक उलाढाल यामध्ये झालेली होती. त्यामुळे यंदाच्या अर्थसंकल्पात क्रिप्टो करन्सीतून मिळालेल्या नफ्यावर ३०% एवढा कॅपिटल गेन टेक्स लावण्यात आलेला आहे व त्याच्या प्रत्येक व्यवहारांवर १% TDS लावला आहे. आता तर RBI देखील स्वतःचे डिजीटल चलन सुरू करणार आहे. भारतातील या व्यवहारांच्या खालोखाल अमेरिकेत २.७ कोटी नायजेरियात १.३ कोटी आहे. मध्यंतरी RBI ने भारतात क्रिप्टो करन्सीवर बंदी आणण्याचा विचार केला होता. मात्र नंतर सर्वोच्च न्यायालयाने त्याला 'ॲसेटचा' दर्जा दिला. सेल्व्हीडोर सारख्या देशाने तर क्रिप्टोला अधिकृत चलनाचा दर्जा दिलेला आहे. भारतात तर कोरोनाच्या टाळेबंदीत ४००० बिट क्वाईन्सचे मनी लॉडरींग होवून ती परदेशी गेली. आपल्या शेजारील चीनमध्ये तर यावर पूर्ण बंदी आहे.

भारतामध्ये मात्र या बाबतीत २०२२-२३ च्या केंद्रीय अंदाजपत्रकामध्ये बिट क्वाईनसंबंधी जी घोषणा केली गेली, त्यातून संभ्रम निर्माण होण्याची शक्यता अधिक आहे. कारण एका बाजूला आपण क्रिप्टो करन्सीजना फक्त 'ॲसेटचा' दर्जा देतोय, करन्सीचा नाही. मात्र त्याच वेळी केंद्र सरकार त्याच्या व्यवहारांवर TDS आणि नफ्यावर कॅपिटल गेन टॅक्स आकारणार आहे. म्हणजे अप्रत्यक्षरीत्या त्याला अधिकृत स्वीकृती दिल्याचाच हा प्रकार आहे.

दुसरी बाब RBI स्वतःचे आभासी चलन आणणार आहे. मात्र मुळातच काळ्या पैशाच्या रूपात आधीचाच रुपाया कितीतरी प्रमाणात मूळ अर्थकारणातून गायब आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात रुपायाचं मूल्य सावरणं हे आपल्यापुढचं आव्हान आहे. डब्यात गेलेल्या बँकिंग क्षेत्राला पूर्वपदावर आणण्याचं आव्हान आपल्यासमोर आहे. बेसल निकष लागू करून बँकिंग व वित्तीय क्षेत्र तगडे करणे अद्यापही आपल्याला जमलेले नाही. आज आंतरराष्ट्रीय स्तरावर राजकीय अशांतता (रशिया - युक्रेन संघर्ष) वाढल्याने वित्तीय बाजार स्थिरावलेत. अशातच ज्या आभासी चलनाबाबत अमेरिका, चीनसारख्या महासत्तादेखील सावध पवित्रा घेतायेत. भारत मात्र याबाबत एवढा धाडसी का दिसतोय?

यातील सर्वाधिक चिंतेची बाब म्हणजे अमेरिकेतील कलोनीयल पाईप लाईन्समध्ये जेव्हा गळती झाली तेव्हा माफियांनी अमेरिकन सरकारला जी काही खंडणी

मागितली होती ती त्यांनी बिट क्काईन्समध्ये मागितलेली होती. कारण क्रिप्टोतील व्यवहारांचे डीकोडींग करणे खूप कठीण, प्रचंड वेळखाऊ व खर्चिक असते. त्यासाठी अतिउच्च, अतिप्रचंड तंत्रज्ञान व बुद्धिमत्ता लागते. अर्थात, अमेरिकेने आपली सर्व ताकद, कौशल्य पणाला लावून माफियांचा शोध लावला. पण अमेरिका ही एक सुपर पॉवर असल्याने त्यांना हे शक्य झाले. जगातील इतर व विशेषतः गरीब देशांना हे शक्य होणार नाही.

**समारोप :**

चलन व मत्ता यांची सरमिसळ झाली तर काय काय नाट्य घडू शकते, याची अनेक प्रत्यंतरे बिट क्काईनच्या जन्मापासूनच येऊ लागलीय. ज्यांना बिट क्काईन्स वा क्रिप्टो करन्सीतून अमाप संपत्ती मिळेल वा जे तशी मिळवतील ते त्याचा विनियोग कसा, कुठे करतील? त्यांची ही गजान्त संपत्ती कराच्या कक्षेत कशी येणार? सार्वभौम सरकार त्यावर नियंत्रण, देखरेख कसे व किती ठेवणार? यातून संपत्तीचे केंद्रीकरण होणार त्याचे काय? अशा अगणित प्रश्नांना यातून सुरुवात झाली आहे. जगभरातील धोरणकर्ते, संशोधक, अभ्यासक यांच्यापुढे येत्या काळात यावरील प्रश्नांची उकल करण्याचे आव्हान असेल..!

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१) Clork John (2018), What chani dose with Cripto? - Indian express - 21st June 2018

२) Cryptocurrencies (2017) - A Brif Tematic Review - Economic of network Journal social Science Research Network ( SSRN ) August 28, 2017.

३) Dixon Lance (2014) - Building Bitcoin use in South Florida and beyond mani herald Retrieved January 24, 2014.

४) Lan Steadman (2013), Wary of Bitcoin? - Guide to some other crypto currecies - May 7, 2013

५) Marigan Stefy (2014), Majou foul in Bitcoin - The gardian - 22 Jun 2014

६) Namecoin on Git Hub - Retrieved - February 4, 2018

७) Puso Satisha (2019), It need to stop? - Indian Express - 23 Feb 2019.

८) Sindhu A. (2016), It makes diffrent - The Economist - 18 April 2016.

९) Tyagi shaveta Bhatia (2021) Blockchain for Business.

१०) बागल के.सी. (२०१९), क्रिप्टो की उत्कल?, सहारा समय, डिसेंबर, २०१९.

११) आपटे श्रीधर (२०२०), आभासी का भासी?, महाराष्ट्र टाइम्स, ३१ मे २०२०.


◆

पैशाची कमतरता हे सर्व वाईटाचे मूळ आहे.

**- जॉर्ज बर्नार्ड शॉ**

# आर्थिक पाहणी अहवाल २०२१-२२
# परिचय आणि चिकित्सा

**राहुल शं. म्होपरे**[†]
**विद्या रा. म्होपरे** [††]

**प्रस्तावना :**

केंद्रीय अंदाजपत्रक २०२२-२३ संसदेमध्ये दि.१ फेब्रुवारी, २०२२ रोजी केंद्रीय अर्थ व वित्तमंत्री निर्मला सीतारामण यांनी सादर केले. तत्पूर्वी १ दिवस अगोदर म्हणजेच ३१ जानेवारी, २०२२ रोजी वर्ष २०२१-२२ चा आर्थिक पाहणी तथा सर्वेक्षण अहवाल मा. अर्थ व वित्तमंत्री महोदय मॅडमनी संसदेत सादर केला. अंदाजपत्रकाच्या सादरीकरणाच्या पूर्वसंध्येला आर्थिक पाहणी अहवाल संसदेत सादर करण्याची पद्धत पूर्वीपासून रूढ आहे. वर्ष २०२१-२२ चा आर्थिक पाहणी अहवाल केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार डॉ. व्ही. अनंत नागेश्वरन, प्रधान आर्थिक सल्लागार संजीव सन्याल यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तयार केलेला आहे. वर्ष २०२० -२१ चा आर्थिक पाहणी अहवाल एकाच खंडामध्ये मांडण्यात आलेला आहे. मागील साधारणत: आठ ते दहा वर्षांपासून आर्थिक पाहणी अहवालाची मांडणी दोन खंडामध्ये केली जात होती. कदाचित मुख्य आर्थिक सल्लागारांची रिक्त जागा पूर्णवेळेसाठी त्वरित न भरली गेल्यामुळे (सदर जागेवर डॉ. नागेश्वरन यांची पूर्णवेळ नियुक्ती दि.२८ जानेवारी २०२२ ला केलेली आहे.) यावर्षीचा आर्थिक पाहणी अहवाल एकाच खंडामध्ये सादर केला जाण्याची शक्यता लेखकद्वयींना वाटते. कारण आर्थिक पाहणी अहवाल हा सांघिक कामाचा परिपाक असतो. यामध्ये मुख्य आर्थिक सल्लागारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.

अर्थात, अहवालाच्या प्रस्तावनेत दोन खंडांची पृष्ठसंख्या खूपच जास्त होते आणि पहिल्या आणि दुसऱ्या खंडातील प्रकरणांची एकमेकांशी नाळ जोडणे थोडे कठीण होत असल्याने चालू वर्षी एकच खंड प्रकाशित केल्याचे नमूद केले आहे.

वर्ष २०२१-२२ चा आर्थिक पाहणी अहवाल हा नेहमीप्रमाणेच विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी, राजकीय व्यक्ती, आर्थिक प्रश्नांचे अभ्यासक, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते, दक्ष नागरिक आणि विद्यार्थी अशा सर्वच घटकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. अर्थव्यवस्थेतील तथा समाजातील हे सर्वच घटक प्रतिवर्षी आर्थिक पाहणी अहवालाची आतुरतेने वाट पाहात असतात. कारण आर्थिक पाहणी अहवाल म्हणजे

[†] सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग (पदवी व पदव्युत्तर), देवचंद कॉलेज, अर्जूननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर
आजीव सभासद क्र.११९४, भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०, ई-मेल : rahulmhopare@rediffmail.com
[††] वरिष्ठ सहाय्यक, परीक्षा प्रमाद विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
आजीव सभासद क्र. ११९५, भ्रमणध्वनी : ८९७५२१५५७७, ई-मेल : vidyamhopre@rediffmail.com

देशाच्या मागील वर्षाचा आरसा असतो. सदर अहवालात देशाच्या मागील वर्षीच्या अर्थव्यवस्थेचे प्रतिबिंब उमटलेले असते. शेती, सहकार, सेवा, उद्योग अशा अर्थव्यवस्थेच्या विविध पैलूंचे आलेख व सांख्यिकीच्या आधारे सखोल विश्लेषण आर्थिक पाहणी अहवालात केले जाते. आर्थिक पाहणी अहवाल तयार करण्याचे काम साधारणत: ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीपासून सुरू केले जाते. सदर काम करण्यासाठी तज्ज्ञ संशोधक तथा कुशल अन्वेषकांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. अर्थमंत्रालयातील एक अत्यंत कुशल टीम मा. मुख्य आर्थिक सल्लागारांच्या नेतृत्वाखाली आर्थिक पाहणी अहवाल तयार करते. त्यामुळे हा अहवाल अत्यंत विश्वसनीय मानला जातो. प्रस्तुत लेखात लेखकाने वर्ष २०२१-२२ च्या आर्थिक पाहणी अहवालातील काही प्रमुख मुद्द्यांचा ऊहापोह करण्याचा तथा त्यावर भाष्य करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**ब) आर्थिक पाहणी अहवाल - अंतरंग :**

वर्ष २०२१-२२ चा आर्थिक पाहणी अहवाल एकूण ४१३ पृष्ठांचा असून एकूण ११ विविध प्रकरणांमध्ये विभागला गेला आहे. अहवालाच्या मुखपृष्ठावर भारताचा नकाशा दर्शविला असून त्यामध्ये अर्थव्यवस्थेचे विविध पैलू चित्ररूपाने दर्शविलेले आहेत. प्रस्तुत आर्थिक पाहणी अहवालात स्वतंत्ररित्या एकूण २०८ पृष्ठांची एकूण ९३ तांत्रिक जोडपत्रे आणि सांख्यिकी तक्ते दिलेले आहेत. सदर परिशिष्टांचे तथा जोडपत्रांचे विभाजन पुढीलप्रमाणे केलेले आहे.

१) राष्ट्रीय उत्पन्न आणि उत्पादन, २) अंदाजपत्रकीय व्यवहार, ३) मौद्रिक कल, ४) किंमती, ५) ताळेबंद पत्रक, ६) विदेशी व्यापार, ७) बाह्य मदत, ८) मानव विकास निर्देशांक आणि ९) उच्च वारंवारितेचे दर्शक.

सदर परिशिष्टांमध्ये नववा विभाग आर्थिक पाहणी अहवालात नव्याने समाविष्ट करण्यात आलेला आहे. यामध्ये विविध पाच गट तयार करून प्रत्येक गटाचे मासिक उच्च वारंवारिता दर्शक व त्यांची सांख्यिकी नमूद केलेली आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे सलग दुसऱ्या वर्षी आर्थिक पाहणी अहवाल हा कोविड-१९ च्या वातावरणात प्रकाशित आणि सादर केला गेलेला आहे.

प्रस्तुत अहवालातील पहिले प्रकरण हे 'अर्थव्यवस्थेचा आढावा' (State of The Economy) या शीर्षकाचे असून, यामध्ये वर्ष २०२१-२२ मधील भारतीय अर्थव्यवस्थेचा क्षेत्रीय कल, मागणी कल, लसीकरण, सुरक्षा मार्ग, स्थूल आर्थिक स्थैर्य, पुरवठा घटकांमधील सुधारणा, वृद्धी, दृष्टिकोन इ. घटकांचे सविस्तर विश्लेषण सांख्यिकी व आलेखांच्या माध्यमातून केले गेलेले आहे. दुसरे प्रकरण 'वित्तीय विकास' (Fiscal Development) या शीर्षकाचे आहे. सदर प्रकरणात कोविड - १९ प्रार्दुभावानंतरचे वित्तीय धोरण, वर्ष २०२१-२२ मधील वित्तीय निर्देशकांची कामगिरी, केंद्र, राज्य आणि स्थानिक शासनाची दीर्घकालीन वित्तीय धोरणाचा कल, शासकीय खर्चाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना इ. पैलूंचा आढावा घेतलेला आहे. तिसरे प्रकरण 'बाह्य क्षेत्रावर' (External Sector) आधारित असून यामध्ये आंतरराष्ट्रीय आर्थिक स्थिती, भारतीय मालाचा व्यापार विकास, सेवाक्षेत्रातील व्यापार, खाजगी बदल्या, अमूर्त क्षेत्र, चालू आणि भांडवली खात्यावरील शिल्लक, व्यवहारातील आणि परकीय गंगाजळी, विनिमय दरातील बदल, निव्वळ आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीची स्थिती, बाह्यकर्ज अशा विविध घटकांचे सांख्यिकी व आलेखांद्वारे सविस्तर विवेचन केलेले आहे. अहवालाचे चौथे प्रकरण 'मौद्रिक व्यवस्थापन आणि वित्तीय मध्यस्थी' (Monetary Management and Financial Intermediation) या शीर्षकाचे आहे. सदर प्रकरणात धोरणकर्त्यांनी मौद्रिक विकास, तरल मत्ता स्थिती आणि व्यवस्थापन, सरकारी रोखे बाजाराचा विकास, बँकींग क्षेत्र, मौद्रिक कार्यान्वयण

(Transmission) बँक पत वृद्धी, बिगर बँकींग वित्तीय कंपनी क्षेत्र, भांडवल बाजार विकास, विदेशी गुंतवणूकदारांची गुंतवणूक, विमा क्षेत्र, निवृत्ती वेतन क्षेत्र, दिवाळखोरी आणि कर्जबाजारीपणा बील इ. बाबींचा ऊहापोह सांख्यिकीय माहितीच्या आधारे केलेला आहे. आर्थिक पाहणी अहवालातील पाचवे प्रकरण 'किंमती आणि भाववाढ' (Prices and Inflation) यावर आधारित आहे. सदर प्रकरणात जागतिक भाववाढ, देशांतर्गत भाववाढ, भाववाढीचा सद्यस्थितीतील कल आणि त्याचे घटक, गृहकिंमती, औषधनिर्माण किंमती, पुरवठा घटकांचे दीर्घकालीन व्यवस्थापन इ. घटकांवर सांख्यिकी व आलेखांद्वारे प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

आर्थिक पाहणी अहवाल २०२१-२२ मधील सहावे प्रकरण हे 'चिरंतन विकास आणि वातावरणीय बदल' (Sustatinable Development and Climate Change) यावर आधारित आहे. सदर प्रकरणात वर्ष २०२०-२१ मधील भारताची चिरंतन विकासाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यातील प्रगती, पर्यावरण स्थिती, वातावरणीय बदल, चिरंतन विकासासाठी आर्थिक तरतूद, आंतरराष्ट्रीय स्तरावरील चिरंतन विकासासाठी भारताने उचलले पाऊल इ. चिरंतन विकासाच्या विविध अंगांचा परामर्श घेतलेला आहे. अहवालातील सातवे प्रकरण हे 'शेती आणि व्यवस्थापन' (Agriculture and Food Management) या शीर्षकाचे असून यामध्ये वर्ष २०२१-२२ मधील शेतीक्षेत्रातील स्थूल मूल्यवर्धन, परिस्थिती मापन आढावा (Situation Assessment Survey), शेती आधारित क्षेत्रे: पशूपालन, दुग्धोत्पादन, मत्स्यव्यवसाय, शेती संशोधन आणि शिक्षण, अन्नप्रक्रिया उद्योग, अन्न व्यवस्थापन, खते इ. सर्व शेती संबंधित महत्त्वाच्या घटकांवर सांख्यिकी आणि विविध आलेखांच्या माध्यमातून प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. आर्थिक पाहणी अहवालातील आठव्या प्रकरणाचे शीर्षक 'उद्योग आणि पायाभूत सुविधा' (Industry and Infrastracuture) असे आहे. प्रस्तुत प्रकरणात औद्योगिक उत्पादनाचे दर्शक, आठ प्रमुख दर्शक, एकूण स्थिर भांडवल निर्मिती, औद्योगिक पत, औद्योगिक क्षेत्रातील थेट विदेशी गुंतवणूक, केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची कामगिरी, कॉर्पोरेट क्षेत्राची कामगिरी, क्षेत्रनिहाय कामगिरी आणि औद्योगिक क्षेत्राचे प्रश्न, पायाभूत सुविधा अशा औद्योगिक क्षेत्राशी निगडित महत्त्वाच्या बाबींचे विश्लेषण केलेले आहे. अहवालातील नववे प्रकरण 'सेवा' (Services) क्षेत्राशी निगडित आहे. या प्रकरणात सेवाक्षेत्रावर कोविड-१९चा झालेला परिणाम आणि क्रमनिहाय पुनर्प्राप्ती, उच्च वारंवारिता हिस्सा, सेवाक्षेत्रात आलेली थेट विदेशी गुंतवणूक, सेवाक्षेत्रातील व्यापार, प्रमुख सेवा, उपक्षेत्रनिहाय कामगिरी आणि चालू धोरण इ. सेवाक्षेत्राशी संबंधित पैलूंचा सविस्तर ऊहापोह केलेला आहे. दहावे प्रकरण हे 'सामाजिक पायाभूत सुविधा आणि रोजगार' (Social Infrastructure and Employment) या शीर्षकाचे आहे. या प्रकरणात कोविड-१९ च्या काळातील भारताच्या आरोग्य क्षेत्राची कामगिरी, सामाजिक खर्चाचा कल, शिक्षण, कौशल्यविकास, रोजगारीचा कल, आरोग्य, पिण्याचे पाणी आणि स्वच्छता, ग्रामीण विकास इ. प्रमुख घटकांचे आकडेवारी आणि वेगवेगळ्या आलेखांच्या माध्यमातून वर्णन केलेले आहे. आर्थिक पाहणी अहवाल २०२१-२२ चे अखेरचे आणि अकरावे प्रकरण हे 'उपग्रह आणि नकाशा शास्त्राद्वारे विकासाचे चित्रण' (Tracking Development Through Satelite Images and Cartography) या शीर्षकाचे आहे. आर्थिक पाहणी अहवालात पहिल्यांदाच अशा आशयाचे प्रकरण नव्याने समाविष्ट करण्यात आलेले आहे. सदर प्रकरणात सॅटेलाईट इमेजेस आणि नकाशांच्या माध्यमातून विविध घटकांची तुलनात्मक मांडणी केलेली

आहे. यासाठी उपग्रह, ड्रोन, मोबाईल तसेच इतर काही अत्याधुनिक साधनांद्वारे माहिती जमविण्यात आलेली आहे. वीज पुरवठ्याचे भारताच्या विविध भागातील वितरण, लोकसंख्येचे वितरण, आर्थिक कार्यक्रमांचा प्रसार, शहरी-ग्रामीण, राष्ट्रीय महामार्ग, भारतातील वित्तीय पायाभूत सुविधांचा विकास, विमानतळे, व्यापारी बँकांचे जाळे, मेट्रो, निव्वळ पिकाखालील क्षेत्र इ. अर्थव्यवस्थेशी संबंधित असणाऱ्या विविध घटकांची मांडणी सदर प्रकरणात नकाशे आणि उपग्रह इमेजेसच्या मदतीतून करण्यात आलेली आहे. विशेष म्हणजे काही इमेजेस या रात्री काढण्यात आलेल्या आहेत (उदा. भारतातील वीज पुरवठा). यामुळे माहिती अधिक रंजकरित्या समजण्यास मदत होत आहे. याठिकाणी अभ्यासकांनी एक गोष्ट लक्षात घेणे गरजेचे आहे. ती म्हणजे सोयीच्या दृष्टीने या सर्व इमेजेस या द्विमितीय (Two-dimensional) दाखविण्यात आलेल्या आहेत.

**क) आर्थिक पाहणी अहवाल २०२१-२२ : प्रमुख निष्कर्ष :**

वर्ष २०२१-२२ च्या आर्थिक पाहणी अहवालाचा व्यवस्थित अभ्यास केल्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेच्या अनुषंगाने जे काही प्रमुख निष्कर्ष समोर येतात, ते आपणास खालीलप्रमाणे सांगता येतात.

१. नवीन आर्थिक वर्षात (२०२२-२३) राष्ट्रीय सकल उत्पादनाचा वेग तथा विकासदर ८ ते ८.५% राहील, असा अशावाद आहे.

२. वर्ष २०२०-२१ च्या म्हणजेच मागील आर्थिक पाहणी अहवालात २०२१-२२ साठी ११% विकासदराची अपेक्षा वर्तविण्यात आली होती. परंतु वास्तवात तो ९.२% राहिला आहे.

३. वर्ष २०२१-२२ मध्ये देशातील एकूण गुंतवणुकीचे प्रमाण राष्ट्रीय सकल उत्पादनाच्या २९.६% राहिले. मागील सात वर्षातील ही सर्वाधिक गुंतवणूक होती. याद्वारे पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक वाढविण्यात आली.

४. आगामी आर्थिक वर्षात (२०२२-२३) भारतीय अर्थव्यवस्था चीनला मागे टाकून जगातील सर्वात वेगवान विकास साधणारी पहिल्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनेल, अशी ग्वाही देण्यात आली आहे.

५. जागतिक बाजारपेठेत विशेषत: ऊर्जाक्षेत्रांच्या किंमती वाढल्याने भाववाढीचा धोका आगामी काळात निर्माण होवू शकतो. त्यामुळे भाववाढीपासून सावध राहाण्याच्या इशारा अहवालात देण्यात आला आहे.

६. अहवालात बेरोजगारीचे आव्हान असल्याचे नमूद केले आहे. वर्ष २०२१ च्या पहिल्या तिमाहीत बेरोजगारीचे प्रमाण २०% पेक्षा जास्त होते ते चौथ्या तिमाहीत ९.३% झाले होते.

७. कोरोनाचा सर्वाधिक फटका सेवाक्षेत्राला बसला होता. वर्ष २०२०-२१ मध्ये सेवाक्षेत्राची वाढ उणे ८.४% झाली होती. वर्ष २०२१-२२ मध्ये मात्र सेवाक्षेत्रात ८.२% नी वाढ नोंदली गेली आहे.

८. वर्ष २०२०-२१ मध्ये देशातील औद्योगिक क्षेत्राची वाढ उणे ७% होती. यामध्ये वर्ष २०२१-२२ मध्ये भरीव प्रगती होवून या वर्षात औद्योगिक क्षेत्र ११.८% नी विस्तारले आहे.

९. वर्ष २०२१-२२ मध्ये देशाचा कणा असलेल्या कृषिक्षेत्रात ३.२% नी वाढ झाली. मागील वर्षी (२०२०-२१) देखील कृषिक्षेत्रावर कोरोनाचा विशेष नकारात्मक परिणाम झालेला दिसून आला नव्हता. वर्ष २०२१-२२ मध्ये कृषी आणि संलग्न क्षेत्रातील निर्यातीत २३.२% नी वाढ झालेली आहे.

१०. वर्ष २०२०-२१ च्या तुलनेत चालू वर्षी (२०२१-२२) सार्वजनिक खर्चात २९.५% नी वाढ झाली.

याचाच परिणाम म्हणून वर्ष २०२१-२२ (सप्टेंबर अखरे) मध्ये ३८२४ कि.मी. पक्के रस्ते बांधून तयार करण्यात आले.

११. आर्थिक पाहणी अहवालानुसार, देशातील प्रमुख १३ बंदरांची क्षमता मार्च २०१४ अखेर वार्षिक ८७१.५२ दशलक्ष टन होती. हेच प्रमाण मार्च २०२१ अखेर ७९% नी वाढून १५६०.६१ टन झाले आहे.

१२. वर्ष २०२०-२१ मध्ये माहिती - तंत्रज्ञान आणि व्यवसाय प्रक्रिया व्यवस्थापन क्षेत्रातून १.३८ लाख रोजगार निर्मिती झाल्याचे अहवालात नमूद केले आहे.

१३. अहवालानुसार, भारतातील दूरसंचार क्षेत्रात वाढत्या डाटा मागणीमुळे वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये तीव्र स्पर्धा निर्माण झाली आहे. परिणामी, एका बाजूला ग्राहकांचा डाटा खर्च कमी झाला आहे, तर दुसऱ्या बाजूला शिक्षणासह जवळपास सर्वच क्षेत्रांत ऑनलाईन प्रक्रियेमुळे डाटा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. वर्ष २०१८ च्या पहिल्या तिमाहीत दर ग्राहक प्रतिमहिना सरासरी १.२४ जी.बी. डेटाचा वापर होता. हेच प्रमाण वर्ष २०२२ च्या पहिल्या तिमाहीत महिन्याला सरासरी १४.१ जी.बी. एवढे प्रचंड वाढले आहे.

१४. कोरोना काळात जागतिक स्तरावर पोलाद उत्पादनात घट झाली. परंतु भारतात वर्ष २०२१-२२ च्या एप्रिल - ऑक्टोबर कालावधीत पोलाद उत्पादन वार्षिक आधारावर २५% नी वाढून ६.६९ कोटी टन झाल्याचे अहवालात नमूद केले आहे.

१५. भारताच्या एकूण ऊर्जेपैकी ५५% ऊर्जेची गरज कोळशाच्या माध्यमातून भागविली जाते. एप्रिल - ऑक्टोबर २०२१ देशात कोळशाचे उत्पादन १२.२४% नी वाढले. एकूण कोळसा उत्पादन ७१.६० कोटी टन (तात्पुरते) झाले.

१६. अहवालानुसार, ३१ डिसेंबर २०२१ अखेर भारताचा परकीय चलनसाठा ६३३.६ अब्ज डॉलर एवढा होता. जो जगातील चौथ्या क्रमांकाचा चलन साठा आहे. परंतु याच काळात विदेशी कर्जाचे प्रमाणदेखील वाढलेले आहे. सप्टेंबर २०२१ अखेर देशावर ५९३.१ अब्ज डॉलर विदेशी कर्ज आहे.

१७. अहवालात नमूद केल्यानुसार, वर्ष २०२१-२२ च्या पहिल्या नऊ महिन्यांतच निर्यातीचे ४०० अब्ज डॉलर्सचे ठरविण्यात आलेले उद्दिष्ट ७५% पर्यंत पूर्ण झालेले आहे.

१८. वर्ष २०२०-२१ मध्ये पेट्रोलमध्ये इथेनॉल वापरण्याचे प्रमाण ८.१% होते. हे प्रमाण वर्ष २०२२ दरम्यान १०% पर्यंत वाढवून वर्ष २०२५ पर्यंत २०% पर्यंत इथेनॉल प्रमाण नेण्याचे तसेच इ- वाहनांची संख्या वाढविण्याचे अहवालात नमूद केले आहे.

१९. अहवालानुसार, नोव्हेंबर २०२१ अखेरपर्यंत केंद्रीय वित्तीय तूट अर्थसंकल्पाच्या ४६.२% राहिली असून देशाच्या महसुली उत्पन्नात ६५% एवढी विक्रमी वाढ झाली आहे. प्रत्यक्ष कर संकलनात मोठी वाढ होवून प्राप्तीकरात ४७.२% वाढ झालेली आहे.

२०. केंद्र सरकारच्या करेतर उत्पन्नात ८०% वाढ झाल्याचे तसेच खर्चात ८.८% वाढ झाल्याचे अहवालात नमूद केले आहे.

२१. भारतात साडेतीन कोटी लोकांना त्वरित रोजगार देणे गरजेचे असल्याचे अहवालात नमूद केले आहे.

२२. आर्थिक पाहणी अहवालातील धक्कादायक निष्कर्ष म्हणजे कोरोना काळात लॉकडाऊनमुळे स्थलांतरित मजूर आपआपल्या राज्यात परत गेल्याने स्थलांतरित मजुरांचे उगमस्थान असलेल्या बिहार, प.बंगाल, मध्यप्रदेश, ओरिसा, बिहार या राज्यांमध्ये मावळत्या आर्थिक वर्षात मनरेगाची मागणी घटली आहे. तर महाराष्ट्र, पंजाब, कर्नाटक,

तमिळनाडू या उद्योगप्रधान राज्यांमध्ये मनरेगातून रोजगार मागणीचे प्रमाण वाढले आहे.

२३. अहवालात भारताची एकूण निर्यात १६.५% नी वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. सामान्यांकडून शेअर बाजारात गुंतवणूक करण्याचे प्रमाण ४४.७% नी वाढले असून, देशात महागाई आणखी वाढण्याची भीतीदेखील अहवालातून व्यक्त करण्यात आली आहे.

**ड) आर्थिक पाहणी अहवालाची चिकित्सा :**

अशाप्रकारे आर्थिक पाहणी अहवाल २०२१-२२ चा सविस्तर मागोवा घेतल्यानंतर लेखकद्वयींना असे दिसून येते की, या अहवालाद्वारे धोरणकर्त्यांनी अर्थव्यवस्थेच्या सर्वच स्तरांवर अत्यंत चांगली प्रगती झाली असून त्याचे रंजक चित्र जनतेसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु खरे पाहता आर्थिक विकासाचे ८ ते ८.५% वाढीचे भाकीत अहवालाद्वारे जरी व्यक्त केले असले, तरी त्याला देशातील पर्जन्यमान आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील इंधनाच्या नियंत्रित दराची पूर्वअट जोडली आहे, हे अभ्यासकांनी विसरून चालणार नाही. सध्याच्या इंधन दरवाढीचे आस्मानी आणि नवनवीन विक्रम प्रस्थापित करणारे आकडे पाहता विकासदर वाढीचे हे भाकीत हवेतच विरून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अहवालात बेरोजगारी वाढल्याचे फक्त नमूद केले आहे. परंतु बेरोजगाराच्या आकडेवारीची तपशीलवार माहिती देण्यात आलेली नाही. यावरूनदेखील सर्व माहिती लोकांसमोर का ठेवली गेली नाही, असा प्रश्न मनात निर्माण होतो. भारतात साडेतीन कोटी लोकांना त्वरित रोजगार देण्याचे अहवालात नमूद केले आहे. परंतु जर सध्या सेवाक्षेत्राचेच आकुंचन झालेले असेल तर एवढ्या मोठ्या लोकसंख्येला त्वरित रोजगार कसा पुरविला जाणार, याबाबतचे विश्लेषण अहवालात धोरणकर्त्यांनी दिलेले दिसून येत नाही. अर्थात, रस्ते बांधणीचा वेग प्रगती पथावर आहे. परंतु त्याद्वारे देण्यात येणाऱ्या रोजगाराला देखील मर्यादा आहेत.

देशाकडे आजरोजी जगातील चौथ्या क्रमांकाचा विदेशी चलनसाठा (६३३.६ अब्ज डॉलर) असल्याचे नमूद केले आहे. परंतु भारताचे विदेशी कर्ज (५९३.१ अब्ज डॉलर) वजा जाता सदरचा साठा फक्त ४०.५ अब्ज डॉलर एवढाच शिल्लक राहातो. ही गोष्ट देखील तुम्ही- आम्ही सर्वांनीच जाणून घेतली पाहिजे. याबरोबरच आजही भारतातील ५५% ऊर्जेची गरज कोळसा या उर्जा साधनामार्फत पूर्ण केली जाते, हे अहवालात नमूद केले आहे. यावरून देशात अपारंपारिक ऊर्जा साधनांच्या वापराचे आणि निर्मितीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढणे गरजेचे असल्याचे लक्षात येते.

उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन योजनांचा सकारात्मक परिणाम म्हणून या वर्षात औद्योगिक क्षेत्रात चांगली वाढ झाली आहे, ही बाब धनात्मक आहे. याबरोबर पेट्रोल, इथेनॉलचे वाढते दर लक्षात घेऊन भारतात इ-वाहनांची संख्या वाढविण्यासाठी विशेष उत्तेजन दिले जात आहे. यांसारख्या अहवालात नमूद केलेल्या गोष्टी स्वागतार्ह आहेत. भाववाढीची भीती आर्थिक पाहणी अहवालात स्पष्टपणे नमूद केली आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या सर्वच स्तरांवर सावध भूमिका घेणे गरजेचे असल्याचे भाकीतदेखील अहवालात केले गेलेले आहे. जे वास्तवदर्शी आहे हे मान्य करावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. Economic Survey 2021-22- Govt. of India, Ministry of Finance, Deptt. of Economic Affairs, New Delhi, Jan. 2022.

२. http://www.indiabudget.gov.in/economicsurvey/ebook_es2022/index.html-Date : 02/02/2022

३. विविध वर्तमानपत्रे - दै. लोकसत्ता, दै. सकाळ, दै. लोकमत, इकॉनॉमिक टाइम्स इ.- दि.१/२/२०२२.


◆

# भारतातील आर्थिक विषमतेची स्थिती आणि धोरणात्मक पुष्टी

**सुरेश एकनाथ घुमटकर** †
**भाग्यश्री सुरेश घुमटकर** ††

**प्रस्तावना :**

फोर्ब्सच्या अहवालानुसार, भारत जगातील तिसऱ्या क्रमांकावर सर्वाधिक अब्जाधीशांच्या संख्येत आहे. प्रथम क्रमांकावर अमेरिका, तर दुसऱ्या स्थानावर चीन आहे. ऑक्सफॅमच्या अहवालानुसार, भारतात २०२० मध्ये १०२ बीलिनियर होते. एका वर्षामध्ये त्यांच्यात ४० ने वाढ होऊन २०२१ मध्ये १४२ झाले. याच कालावधीत, भारतातील १०% श्रीमंतांकडे राष्ट्रीय संपत्तीच्या ४५% संपत्ती एकवटली, तर पायथ्याच्या ५०% लोकसंख्येकडे केवळ ६% संपत्ती आहे. या वर्षामध्ये अब्जाधीशांची संपत्ती २३.७ लाख कोटीवरून ५३.१६ लाख कोटीपर्यंत वाढली. तर दुसऱ्या बाजूला, भारतात ८० कोटी जनता ही दोन वेळच्या अन्नासाठी सरकारवर अवलंबून आहे. अशी विषमतावादी अवस्था भारतात निर्माण झाली. डॉ. सुरेश तेंडुलकर यांच्या अहवालानुसार, २००४-०५ मध्ये भारतात ३७.२% नागरिक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत होते. रंगराजन समितीच्या अहवालानुसार, २०११-१२ मध्ये भारतात २९.५% नागरिक दारिद्र्यरेषेखाली होते. रंगराजन समितीच्या अहवालात नमूद केल्यानुसार, मागील २ वर्षात भारतात १५ कोटी भारतीय नव्याने दारिद्र्यरेषेखाली गेले. केंद्रीय अर्थसंकल्प २०१९-२० च्या भाषणात भारताच्या तत्कालीन वित्तमंत्री श्रीमती निर्मला सीतारमण यांनी नमूद केल्याप्रमाणे भारतात एक-तृतीयांशपेक्षा अधिक बालके कुपोषित आहेत, तर जगातील कुपोषित बालकांमध्ये प्रति तिसरे बालक भारतीय आहे. म्हणजे, जगातील सर्वाधिक कुपोषित बालके भारतात राहतात. वर्ष २०१७-१८ मध्ये भारतात बेरोजगारीचा दर मागील चार दशकांपेक्षाही अधिक होता. वर्ष २०२० पासून भारतात बेरोजगारीमध्ये कोरोना आणि लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर सातत्याने वाढ होत असलेली दिसून येते. केवळ २०१७-१८ या एका वर्षात ५५ दशलक्ष लोक नव्याने दारिद्र्यरेषेखाली गेले. तर कोरोना कालावधीमध्ये आरोग्य खर्च वाढल्याने ६१ दशलक्ष लोक नव्याने गरीब झाले. अशी परिस्थिती भारतात असताना भारतातील गुजरात, मध्यप्रदेश आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये कामगारांच्या कल्याणासाठी तयार करण्यात आलेले सर्व कामगार कायदे (३ कामगार

† सहाय्यक प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, बलभीम महाविद्यालय बीड.
आजीव सदस्य क्र. १६६९, भ्रमणध्वनी : ८७८८८२४८२०, ई-मेल : gumatkarsuresh@gmail.com
†† संशोधक विद्यार्थिनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
भ्रमणध्वनी क्र. ९४०५४६५६१७, ई-मेल : naiknawarebhagy@gmail.com

कायदे वगळता) १००० दिवसासाठी आणि १२०० दिवसासाठी स्थगित करण्यात आले.

ब्रिटिश कालावधीपासून ते आजच्या अब्जाधीश कालावधीपर्यंत भारतातील आर्थिक विषमतेची स्थिती, कारणे, परिणाम आणि उपाययोजनांचा अभ्यास या लेखात करण्यात आला आहे.

**विषमतावादी व्यवस्था:**

आपल्या देशात भारत आणि इंडिया असे दोन देश असून इंडियाने भारतातील संसाधनांचे शोषण करून भारताला अधिकाधिक गरीब बनविण्याचा प्रयत्न केला आहे आणि ती प्रक्रिया सातत्याने चालू आहे. ''भारताच्या बाबतीत विशेषतः चिंतेची बाब म्हणजे जात, धर्म, प्रदेश आणि लिंग यांच्या ओळींवर आधीच खंडित झालेल्या समाजात आर्थिक विषमता जोडली जात आहे''(प्रो. हिमांशू, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ). 'क्रांती आणि प्रतिक्रांती' या नियमानुसार जगातील बऱ्याच अर्थव्यवस्था भांडवलशाहीकडून साम्यवादी/समाजवादी, मिश्र अर्थव्यवस्थेच्या दिशेने मध्यंतरीच्या काळात वाटचाल करीत होत्या. भारत सरकारने सुरुवातीपासूनच माथा ते पायथा विकासाचा प्रवाह होईल, अशा दृष्टिकोनातून धोरणांची आखणी करून माथ्यावरील नागरिकांचे अधिक कल्याण झाले म्हणजे त्याचा पाझर खालच्या स्तरातील नागरिकांपर्यंत होऊन सर्वांचा विकास होईल हा दृष्टिकोन अंगीकारला. परंतु या दृष्टिकोनातून जगातील अर्थव्यवस्थामध्ये विषमता निर्माण झालेली आहे. या इतिहासाकडे त्यांनी दुर्लक्ष केले. पायथ्याकडून विकासाची दिशा माथ्याकडे गेली, तर खऱ्या अर्थाने देशाचा सर्वांगीण विकास होऊन समतावादी व्यवस्था प्रस्थापित होऊ शकते, असे विचार महात्मा फुलेपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत भारतीय आर्थिक विचारवंतांनी मांडले. परंतु त्याची अंमलबजावणी धोरणात्मक पातळीवर सरकारने केलेली नसल्याने आजची बिकट स्थिती आपणास दिसून येते.

स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच नव्हे तर शेकडो वर्षांपासून भारतात वेगवेगळ्या पद्धतीने विषमतावादी व्यवस्था प्रस्थापित केलेली दिसून येते. कारण, भारतातील समाज व्यवस्थेतील जो गरीब, पीडित आणि मागासवर्गीय समाज आहे त्या समाजाला व भारतातील सर्व स्त्रियांना संपत्ती बाळगण्याचा अधिकार येथील परंपरावादी व्यवस्थेने दिलेला नव्हता. त्यामुळे, आर्थिक विषमता ही भारताची परंपराच आहे असेही येथे म्हणणे अधिक धारिष्ट्याचे ठरणार नाही. संपत्ती सोबतच विकासाचे महत्त्वपूर्ण साधन असलेले 'शिक्षण' घेण्याचा अधिकारही भारतीय परंपरेने स्त्रियांना आणि मागासवर्गीयांना कधीही दिलेला नाही. त्यामुळे, हा वर्ग शतकानुशतके गरीबच राहत गेला व श्रीमंत वर्ग हा अधिकाधिक श्रीमंत होत गेला.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर यामध्ये काही बदल होईल आणि खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य सर्वांना मिळून सर्वांचा सर्वांगीण विकास घडून येईल अशी अपेक्षा स्वातंत्र्य सेनानी आणि समाज क्रांतिकारकांना होती. परंतु आजची स्थिती पाहाता या अपेक्षा पूर्ण झालेल्या दिसून येत नाहीत, तर आर्थिक विषमतेमध्ये अधिकच वाढ झालेली दिसून येते.

**स्वातंत्र्योत्तर काळातील स्थिती:**

भारताने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समाजवादी आणि भांडवलशाही या दोन्हींचा सुवर्णमध्य साधत मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रारूप स्वीकारून अर्थव्यवस्थेत सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून धोरण तयार करण्याचा प्रयत्न केला. असे असले तरीही, भारतात आर्थिक विषमतेची दरी ही कायम होती. काही मोजक्याच औद्योगिक घराण्याकडे देशातील बहुतांश उद्योग एकवटलेले होते. ग्रामीण भागातील जमिनीचे समानीकरण करण्याच्या दृष्टीने सरकारने जरी प्रयत्न केले, तरी त्या पद्धतीचे प्रयत्न शहरी भागातील उद्योगांचे समानीकरण करण्याच्या दृष्टीने केलेले आढळून येत नाही. विकासाच्या दिशेने

वाटचाल करीत असताना अर्थव्यवस्थेत कृषिक्षेत्राकडून औद्योगिक क्षेत्र आणि सेवाक्षेत्राकडे जात असताना औद्योगिक क्षेत्रात आणि सेवाक्षेत्रात मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता वाढली. आर्थिक विषमतेतून मालक वर्ग हा 'नाही रे' वर्गाचे सातत्याने शोषण करीत असतो. यामुळे कल्याणकारी राज्य निर्मितीसाठीच्या संविधानात केलेल्या तरतुदी संदर्भातील पावले अधिक जोमाने सरकारने उचललेली दिसून येत नाहीत.

भारतात १९९० मध्ये दोन अब्जाधीश होते व त्यांची एकूण संपत्ती ३.२ अब्ज डॉलर होती. देशात १९८९-९० मध्ये सर्वाधिक श्रीमंत टाटा तर दुसऱ्या क्रमांकावर बिर्ला आणि तिसऱ्या क्रमांकावर रिलायन्स ग्रुप होता. अतिश्रीमंतांच्या संपत्तीतील वाढीचा सरासरी वार्षिक वृद्धिदर १९७२ ते १९८९-९० या कालावधीमध्ये १६.९% होता तर याच कालावधीत देशाच्या जीडीपीचा वृद्धिदर हा सरासरी ३.५%पर्यंत होता. टाटा उद्योगाची संपत्ती १९८९ मध्ये ८५३१ कोटी रुपये तर दुसऱ्या क्रमांकावरील बिर्ला उद्योगाकडे ८४७३ कोटी रुपये संपत्ती होती. रिलायन्स उद्योग हा तिसऱ्या क्रमांकावर असून त्याकडे ३६०० कोटी रुपये संपत्ती होती. श्रीमंत व्यक्तींच्या संपत्तीतील वृद्धिदर हा जीडीपी वृद्धिदरापेक्षा ४.८२ पट अधिक होता, यावरून असे लक्षात येते की, अर्थव्यवस्थेची परिस्थिती बिकट असली तरी अति श्रीमंतांचे उत्पन्न कमी न होता ते वाढते व गरिबांचे वास्तविक उत्पन्न कमी होत जाते.

भारतातील मोठ्या २० औद्योगिक घराण्याकडे १९६३-६४ मध्ये एकूण संपत्ती १३४६ कोटी रुपये होती. त्यामध्ये वाढ होऊन १९७२-७३ मध्ये २५११ कोटी रुपये झाली. तर, १९८१ मध्ये ७८५७ कोटी रुपये होऊन १९८९-९० मध्ये ४१५८२ कोटी रुपये झाली.

**भारतातील दारिद्र्य आणि बेरोजगारीची १९९० पूर्वीची स्थिती:**

भारतात १९७१ मध्ये बेरोजगारीचा दर १०.४% होता तो १९७७-७८ मध्ये ८.१८% राहून १९८३ मध्ये ८.२८% तर १९८७-८८ मध्ये बेरोजगारीचा दर ६.०९% झाला. संख्येमध्ये विचार केल्यास १९७१ मध्ये भारतात १८.७ दशलक्ष बेरोजगार होते, तर १९८३ मध्ये २१.७६ दशलक्ष बेरोजगारी होती. याच कालावधीत दारिद्र्याचा विचार केल्यास असे दिसून येते की, १९७१ मध्ये भारतात ३२.१ कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली होते. ते १९८३ पर्यंत ३२.३ कोटी पर्यंत वाढले. दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या संख्येत घट होऊन १९८७-८८ मध्ये ३०.७ कोटी भारतीय जनता गरीब होती. दारिद्र्याचे प्रमाण एकूण लोकसंख्येशी पाहाता १९५० मध्ये भारताची एकूण लोकसंख्या ३६ कोटी, तर १९८३ मध्ये ३२.३ कोटी नागरिक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत होते. एका बाजूला भारतातील २० मोठ्या औद्योगिक घरांच्या उत्पन्नामध्ये १६.९ टक्क्याने वाढ होत असताना दुसऱ्या बाजूला देशातील गरिबीमध्ये वाढ होत होती व बेरोजगारीचा दर अधिक होता.

**भारतातील श्रीमंतांच्या संपत्तीची प्रवृत्ती १९९१ नंतर:**

भारतात १९९० मध्ये २ अब्जाधीश होते. भारतात २०१४ पर्यंत अब्जावधीश संख्या ४० तर २०२०-२१ पर्यंत अब्जाधीश १०२ पर्यंत वाढले. मागील एक वर्षाच्या काळात म्हणजे महामारी आणि लॉकडाऊनची परिस्थिती असताना भारतात २०२१-२२ मध्ये केवळ एका वर्षात अब्जाधीशांची संख्या १०२ वरून १४२ पर्यंत पोहोचली.


भारतातील अतिश्रीमंत शंभर व्यक्तींची एकूण संपत्ती २०१२-१३ मध्ये २५०.७ अब्ज डॉलर होती. ती २०१४-१५ मध्ये ३४५.७ अब्ज डॉलरपर्यंत वाढली. तर, २०१८-१९ मध्ये ४९२ पर्यंत वाढली. या १०० व्यक्तींची संपत्ती २०१९-२० मध्ये ४२९.५५ अब्ज डॉलरपर्यंत कमी झाली. त्यानंतर मात्र २०२०-२१ मध्ये

यांची संपत्ती ५१७.५४ अब्ज डॉलरपर्यंत वाढली, तर २०२१-२२ या एका वर्षामध्ये त्यांची संपत्ती ७५५ अब्ज डॉलरपर्यंत वाढलेली आहे. या एका वर्षातील वाढ ४९.७५% होती.

**श्रीमंत १०० व्यक्तींच्या संपत्तीचे जीडीपीशी प्रमाण:**

आकृती क्रमांक-१ मध्ये देशातील सर्वात श्रीमंत १०० व्यक्तींच्या संपत्तीचे जीडीपीशी असलेले प्रमाण दर्शवलेले आहे. यामध्ये असे दिसून येते की, २०१२-१३ मध्ये या शंभर व्यक्तींच्या संपत्तीचे जीडीपीशी असलेले प्रमाण १३.७% होते. ते २०१७-१८ पर्यंत १८.१%पर्यंत वाढले व त्यानंतर २०१८-१९ पर्यंत १४.९६ टक्क्यापर्यंत कमी झाले. परंतु नंतरच्या कोरोना आणि लॉकडाऊनच्या काळामध्ये मागील दोन वर्षात यांचे उत्पन्न २७.१९%पर्यंत वाढले. ज्या कालावधीमध्ये देशातील सर्वसाधारण ८४% जनतेच्या उत्पन्नामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर घट झाली. यासोबतच देशाच्या जीडीपीचा वृद्धिदर ज्या कालावधीमध्ये ऋण राहिला.

**आकृती क्रमांक-१ : (१०० सर्वात श्रीमंतांच्या संपत्तीचे जीडीपीशी % प्रमाण)**




स्रोत: https://www.forbes.com/billionaires/Feb-2022.

या कालावधीमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात या व्यक्तींच्या उत्पन्नाचे प्रमाण वाढलेले दिसून आले.

**अब्जाधीशांच्या संपत्तीतील वाढ:**

भारतातील सर्वात श्रीमंत मुकेश अंबानी यांची संपत्ती २०१४ मध्ये २३.६ अब्ज डॉलर होती ती २०२१-२२ मध्ये ९२.७ अब्ज डॉलरपर्यंत वाढली. याच कालावधीत दुसऱ्या क्रमांकावर गौतम अदानी यांची संपत्ती ७.१ अब्ज डॉलर वरून ७४.८ अब्ज डॉलरपर्यंत वाढली आहे. विशेष म्हणजे अदानी यांची संपत्ती २०२०-२१ मध्ये २५.२ अब्ज डॉलर होती, ती २०२१-२२ मध्ये म्हणजे फक्त एका वर्षामध्ये वाढून ७४.८ अब्ज डॉलर झाली. शिव नदार, राधाकिशन दमानी, सायरस पूनावाला, लक्ष्मी मित्तल, सावित्री जिंदाल, उदय कोटक, पालोनजी मिस्त्री, कुमार बिर्ला यांच्या संपत्तीत क्रमाने वाढ झाली. भारतीय अर्थव्यवस्था आर्थिक संकटात असताना या अब्जाधीशांच्या संपत्तीत एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढ होणे म्हणजे गरिबांकडील उत्पन्नाचा प्रवाह केवळ अतिश्रीमंत १% भारतीयांकडे केंद्रित होणे होय.


देशात बीजेपी प्रणित सरकार आल्यानंतर सर्वाधिक

राधाकिशन दमानी यांच्या संपत्तीत ४०७.१४ टक्क्याने सरासरी वार्षिक वृद्धी झाली. दुसऱ्या क्रमांकावर गौतम अदानी यांच्या संपत्तीत याच कालावधीत १३६.२ टक्क्याने वृद्धी झाली. तर मुकेश अंबानी यांच्या संपत्तीत ४१.५% दराने वृद्धी झालेली आहे. सायरस पूनावाला यांचा क्रमांक चौथा असून सावित्री जिंदाल यांच्या संपत्तीत २५.७९% दराने वार्षिक वृद्धी झालेली आहे.

**आधुनिक भारतातील बेरोजगारी आणि दारिद्र्याची भीषणता:**


एम. एस. स्वामीनाथन यांच्या विधानानुसार, 'दारिद्र्यरूपी समुद्रामध्ये एका बेटावर आपण आनंदाने जगू शकत नाही'. अशीच विषमतावादी परिस्थिती भारतामध्ये सद्यस्थितीत अधिक तीव्रतेने वाढते आहे. नियोजन आयोगाच्या अहवालानुसार, भारतात १९९३-९४ मध्ये ३२० दशलक्ष लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत होते. त्यांचे प्रमाण वाढून २००४-०५ मध्ये ४०७.२ दशलक्ष इतके झाले. सुरेश तेंडुलकर यांच्या मतानुसार, २०११-१२ मध्ये २६९.८ दशलक्ष लोक दारिद्र्यरेषेखाली होते. भारत सरकारने २०११-१२ नंतर दारिद्र्याचे मापन केले नाही. परंतु, दरम्यानच्या कालावधीमध्ये भारतातील नागरिकांना त्यांच्या आरोग्यावर कराव्या लागणाऱ्या अतिरिक्तच्या खर्चामुळे दारिद्र्यात होणाऱ्या वाढीचे प्रमाण मिळवून जे दारिद्र्य समोर येते त्यानुसार, २०१७-१८ मध्ये ३२४.८ दशलक्ष लोक तर २०२०-२१ मध्ये ३८५.८ दशलक्षपेक्षा जास्त लोक दारिद्र्यरेषेखाली होते जे आकृती क्रमांक-२ मध्ये दर्शवलेले आहे. या कालावधीमध्ये भारतात बेरोजगारीचा दर हा अधिक राहिलेला आहे. अहवालानुसार, २०१७-१८ मध्ये भारतात ७.१ % बेरोजगार होते व ही बेरोजगारी मागील पंचेचाळीस वर्षापेक्षा जास्त होती असे नमूद करण्यात आलेले आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अंदाजानुसार, २०२०-२१ या एका वर्षात भारतातील १२० दशलक्ष लोकांचा रोजगार गेला. बेरोजगारी आणि आर्थिक विषमतेसंदर्भात प्रो. लकडावाला यांनी नोंदवलेले मत, 'लोक आळशी आहेत म्हणून उपाशी नाहीत तर लोकांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला व वेळेवर रोजगार मिळत नाही म्हणून उपासमार आहे आणि ही विषमतेत भर घालणारी घटना आहे'. म्हणजे, देशात एका बाजूला अब्जाधीशांची

आकृती क्रमांक-२





स्त्रोत: भारताचा आर्थिक पाहाणी अहवाल २०१९-२०, २०२०-२१

आकृती क्रमांक-३





स्त्रोत: भारताचा आर्थिक पाहाणी अहवाल २०१९-२०, २०२०-२१

आकृती क्र.४ : दरडोई उत्पन्नातील स्त्री-पुरुष विषमता




स्रोत: यु.एन.डी.पी. चा मानव विकास अहवाल-२०१३-१४ ते २०१९-२०.

आकृती क्र. ५ : श्रम सहभाग दर स्त्री-पुरुष विषमता




स्रोत: यु.एन.डी.पी. चा मानव विकास अहवाल-२०१३-१४ ते २०१९-२०.

संख्या वाढत आहे. अब्जाधीशांच्या संपत्तीत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे तर दुसऱ्या बाजूला बेरोजगारी आणि दारिद्र्यमध्ये वाढ होत आहे.

**स्त्री-पुरुष आर्थिक विषमता:**

भारतामध्ये ज्याप्रमाणे जातीयवादी व्यवस्थेतून आर्थिक विषमता निर्माण करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे स्त्री आणि पुरुषांमध्ये हेतूपुरस्सर आर्थिक विषमतेची दरी पुरातन काळापासून तयार करण्यात आलेली आहे. त्याचाच एक भाग म्हणजे भारतात स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवणे, स्त्रियांनी पतीच्या संपत्तीमध्ये अधिकार मागू नये म्हणून पतीच्या मृत्यूनंतर सतीप्रथा सारख्या कुप्रथा भारतीय समाज व्यवस्थेमध्ये सुरू करून स्त्रियांना आर्थिक संपत्तीपासून वंचित केले. भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले तरीही भारतातील स्त्रियांना मात्र आर्थिक स्वातंत्र्य मिळालेले नाही. विशेषतः त्यांना काम करण्याच्या संधी सुद्धा उपलब्ध करुन दिल्या जात नाहीत. भारतामध्ये दरडोई उत्पन्नाचे मापन करत असताना महिलांचे दरडोई उत्पन्न आणि पुरुषांचे दरडोई उत्पन्न अशा पद्धतीने आकडेवारी भारतातील संस्थांद्वारे प्रकाशित केली जात नाही. परंतु यु.एन. डी. पी. या संस्थेने मानव विकास अहवालांमध्ये भारतातील स्त्री आणि पुरुषांच्या दरडोई उत्पन्नाची विषमता नमूद केलेली आहे.

'मानवाच्या संधींचा परीघ वाढत जाणे म्हणजेच मानव विकास होय.' या व्याख्येप्रमाणे स्त्री आणि पुरुषांना समान संधी, कामाच्या समान संधी आणि समान वेतन मिळत असल्यास स्त्री-पुरुष समानता निर्माण होऊ शकते. परंतु भारतात श्रम सहभाग दराचा विचार करता मोठ्या प्रमाणावर स्त्री-पुरुष विषमता दिसून येते. भारतात श्रम सहभाग दर २०१९-२० मध्ये पुरुषांमध्ये ७६.५ होता तर महिलांमध्ये २०.५ त्यापूर्वी २०१८-१९ मध्ये पुरुषांचा श्रम सहभाग दर ७८.८ तर महिलांचा २३.६ होता. इ. सन २०१७-१८ मध्ये सुद्धा पुरुषांचा सहभाग दर ७८.५ तर महिलांचा २७.२ होता. मागील तीन

वर्षांमध्ये पुरुषांचा आणि महिलांचा श्रम सहभाग दर घटलेला दिसून येतो. त्यात पुरुषांच्या तुलनेत महिलांचा सहभाग दर अधिक प्रमाणात घटला हे आकृती क्रमांक-५ वरून दिसून येते.

स्त्री-पुरुषांमधील दरडोई उत्पन्नातील विषमता मोठ्या प्रमाणात असलेली आकृती क्रमांक-४ वरून दिसून येते. ज्याप्रमाणे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावरही ७५ वर्षानंतर सुद्धा भारतात साक्षरतेच्या दरामध्ये महिला आणि पुरुषांमध्ये मोठी दरी आहे, त्यापेक्षाही अधिक विषमता दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत आहे. मानव विकास अहवालात दिलेल्या माहितीनुसार, २०१३-१४ मध्ये महिलांचे दरडोई उत्पन्न २२७७ डॉलर होते, तर पुरुषांचे दरडोई उत्पन्न ७८३३ डॉलर होते. भारतातील पुरुषांच्या उत्पन्नात होणारी वाढ ही महिलांच्या दरडोई उत्पन्नात होणाऱ्या वाढीपेक्षा कितीतरी जास्त आहे. स्त्रियांचे दरडोई उत्पन्न २०२०-२१ मध्ये २३३१ डॉलर तर पुरुषांचे दरडोई उत्पन्न १०७०२ डॉलर होते. महिलांच्या तुलनेत पुरुषांचे दरडोई उत्पन्न २०२०-२१ मध्ये ४.५९ पटीने जास्त आहे ते २०१३-१४ मध्ये ३.४४ पटीने जास्त होते. एकंदरीत, सद्यस्थितीत असलेल्या केंद्र सरकारने केवळ अब्जाधीशांच्या उत्पन्नात वाढ करून सर्वसामान्य नागरिकांच्या उत्पन्नात घट केली. एवढेच नसून स्त्री आणि पुरुषांच्या उत्पन्नातील विषमता १.१५ पटीने वाढविली आहे.

**आर्थिक विषमतेचे संस्थांनी केलेले अभ्यास:**

यु.एन.डी.पी. च्या २०२० च्या मानव विकास अहवालामध्ये नमूद केल्याप्रमाणे, भारतात अतिश्रीमंत १ टक्के जनतेकडे राष्ट्रीय उत्पन्नातील २१.३% हिस्सा जातो तर श्रीमंत १०% व्यक्तींकडे ३०.१% राष्ट्रीय उत्पन्न जाते. राष्ट्रीय उत्पन्नातील केवळ १९.८ % उत्पन्न ४०% गरीब जनतेला मिळते.

भारतीय मानव विकास अहवालानुसार, भारतात कृषी कामगारांमध्ये ४२% प्रमाण स्त्रियांचे असून स्त्रियांकडे एकूण जमिनीच्या २% पेक्षाही कमी जमिनीची मालकी आहे. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या अहवालानुसार, भारतात पुरुष कामगारांना दिला जाणारा मोबदला हा स्त्री कामगारांना दिल्या जाणाऱ्या मोबदल्यापेक्षा ३४% अधिक आहे. ग्लोबल जेंडर विषमता अहवाल २०१८ नुसार, जगातील एकूण १४९ देशांमध्ये भारताचा क्रमांक १४२ वा आहे.

ऑक्सफॅम इंडियाच्या २०२२ च्या पुरवणी अहवालानुसार, भारतात २०२१ मध्ये कमी उत्पन्न असणाऱ्या व एकूण जनतेपैकी ५०% जनतेकडे देशाच्या संपत्तीतील फक्त ६% संपत्ती आहे. देशातील ८४% जनतेचे उत्पन्न याच कालावधीत घटले आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अंदाजानुसार, २०२०-२१ मध्ये भारताचा जीडीपीचा वृद्धिदर -८.७ ते -७.० च्या दरम्यान होता. भारतात २०१७ मध्ये वाढ झालेल्या संपत्तीतील केवळ १% संपत्ती ६७ दशलक्ष गरीब भारतीयांकडे गेली. तर वाढीव संपत्तीतील ७३% संपत्ती अतिश्रीमंत केवळ १% लोकांकडे गेली. भारतात अतिश्रीमंत १०% लोकांकडे देशातील एकूण उत्पन्नाच्या ५७% उत्पन्न जाते.

**बिजनेस टुडे नुसार:**

भारतातील संपत्ती आणि उत्पन्नामधील विषमता कोष्टक क्रमांक १ आणि २ मध्ये दाखविली आहे.

**आर्थिक विषमता वाढीसाठीची अर्थसंकल्पीय तरतूद:**

श्रीमंत व्यक्तींवर आकारला जाणार संपत्ती कर २०१५-१६ च्या अर्थसंकल्पामध्ये संपवण्यात आला. देशात अब्जाधीश लोकांची संपत्ती वाढत असताना आणि अब्जाधीशांची संख्या वाढत असताना संपत्ती कराच्या दरामध्ये वाढ करण्याऐवजी संपत्तीकर नष्ट करणे म्हणजे एका अर्थाने आर्थिक विषमतेला पुष्टी देणे होय. भारतातील अतिश्रीमंत १०% व्यक्तींच्या संपत्तीवर कोरोना कालावधीत अधिकचा कर आकारणी करून आरोग्य,

**कोष्टक क्र. १ : भारतातील संपत्तीतील विषमता २००० ते २०२१**

| वर्ष | श्रीमंत १०% जनतेचा संपत्तीतील वाटा (%) | अतिश्रीमंत १% जनतेचा संपत्तीतील वाटा (%) | पायथ्याच्या ५०% जनतेचा संपत्तीतील वाटा (%) |
|---|---|---|---|
| २००० | ५४.८ | २३.५ | ८.३ |
| २००५ | ५४.७ | २३.६ | ८.६ |
| २०१० | ६१.३ | ३०.३ | ६.९ |
| २०१५ | ६४ | ३१.८ | ६ |
| २०२० | ६३.९ | ३१.७ | ६ |
| २०२१ | ६४.६ | ३३ | ५.९ |

नोट : १०% श्रीमंतांमध्ये १% अतिश्रीमंतांचा समावेश आहे.

स्त्रोत : World Inequality Database.

**कोष्टक क्र. २ : भारतातील २०००ते २०२० मधील उत्पन्न विषमता**

| वर्ष | श्रीमंत १०% चा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा (%) | अतिश्रीमंत १% चा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा (%) | पायथ्याच्या ५०% चा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा (%) |
|---|---|---|---|
| २००० | ४०.९ | १५.५ | १८.५ |
| २००५ | ४६.६ | १९.७ | १६.५ |
| २०१० | ५३.२ | २१.६ | १४.३ |
| २०१५ | ५७.१ | २१.७ | १३.१ |
| २०२० | ५७.१ | २१.७ | १३.१ |

नोट : १०% श्रीमंतांमध्ये १% अतिश्रीमंतांचा समावेश आहे.

स्त्रोत : World Inequality Database.

शिक्षण आणि पायाभूत सोयी-सुविधावर खर्च करायला पाहिजे होता. जो जगातील जवळपास बऱ्याच देशांमध्ये प्रयत्न केला गेला. परंतु भारतात मात्र अशा पद्धतीचा प्रयत्न न करता अप्रत्यक्ष करांची आकारणी करून सर्वसामान्य गरिबांचे उत्पन्न अगोदरच कोरोना कालावधीमध्ये घटलेले असताना त्यांच्यावरच कराची अधिक आकारणी करून पैसा काढून घेण्यात आला. त्यामुळे, भारतात अब्जाधीशांची संख्या वाढत गेली आणि दुसऱ्या बाजूला गरिबांचीही संख्या वाढत जाऊन विषमता मोठ्या प्रमाणात वाढली. अर्जेंटिना या देशाने त्यांच्या देशातील अतिश्रीमंत व्यक्तींवर अतिरिक्त ५.२५% संपत्ती कर आकारून त्यातून २.४ बिलियन यूएस डॉलर इतका पैसा उभारून तो आरोग्य सुविधांवर खर्च केला.

भारतीय अर्थव्यवस्था २०१६-१७ पासून मंदीच्या दिशेने वाटचाल करीत असून सोबतच पेट्रोल आणि डिझेलवर अधिकचे कर आकारून त्यांच्या किंमती वाढल्याने इतर वस्तू आणि सेवांच्याही किंमतीत वाढ झाली. सोबतच २०२० पासून लॉकडाऊनची परिस्थिती असताना ग्राहकांच्या खिशामध्ये पैसा नसताना भारताच्या केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये मागणी वाढीसाठी तरतूद

करण्याऐवजी पुरवठ्याच्या बाजूने अर्थसंकल्प मांडला जाऊन उद्योग जगतातील मोठ्या उद्योजकांना अधिक सोयी सवलतीं देण्यात आल्या. ज्यांचे उत्पन्न सातत्याने वाढत गेले त्यांनाच अधिक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची तरतूद २०२२-२३ च्या अर्थसंकल्पामध्ये दिसून येते. याच वेळी सर्वसाधारण व्यक्तींवर कर दर कमी करण्याऐवजी वाढविला नाही हेच उपकार समजावे, असे भारताच्या वित्तमंत्री श्रीमती निर्मला सीतारमण म्हणतात. आणि दुसऱ्या बाजूला निगम कर १८% वरून १५% पर्यंत कमी केला. त्याचसोबत पेट्रोलची भाववाढ कमी करण्यासाठी प्रयत्न करण्याऐवजी पेट्रोलवर २% अधिकचा भार टाकण्यासाठी तरतूद करून सर्वसाधारण नागरिकांच्या समोर भाववाढीचे संकट उभे करून आर्थिक विषमता वाढीसाठी चालना दिली, असे येथे नमूद करू शकतो.

**भारतातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना:**

भारताचे संविधानमधील कलम ३८(२) मध्ये अशी तरतूद करण्यात आलेली आहे की, ''राज्य हे विशेषतः केवळ व्यक्ती व्यक्ती मध्येच नव्हे तर निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये राहणाऱ्या किंवा निरनिराळ्या व्यवसायांमध्ये गुंतलेल्या लोकसमूहामध्ये देखील उत्पन्नाच्या बाबतीत असलेली विषमता किमान पातळीवर आणण्यासाठी आटोकाट प्रयत्न करेल आणि दर्जा, सुविधा व संधी यांच्याबाबतीत असलेली विषमता नाहीशी करण्यासाठी प्रयत्नशील राहील.'' कलम ४१ नुसार, राज्य ही आपली आर्थिक क्षमता व विकास यांच्या मर्यादेत कामाचा, शिक्षणाचा हक्क आणि बेरोजगारी, वार्धक्य, आजार व विकलांगता यांनी पीडित अशा व्यक्तींच्या बाबतीत आणि काहीही अपराध नसताना हालाखीचे जिणे ज्यांच्या वाट्याला आले आहे. अशा व्यक्तींच्या बाबतीत लोकसहाय्याचा हक्क उपलब्ध करून देण्यासाठी परिणामकारक तरतूद करेल. कलम ४३ हे कामगारांना निर्वाह वेतन इत्यादी संदर्भात असून, कलम ४६, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर दुर्बल घटक यांचे शैक्षणिक व आर्थिक हित संवर्धनाशी संबंधित आहे. कलम ४७ नुसार, जनतेचे पोषणमान व राहाणीमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्याचे कर्तव्य आहे.

भारतात सर्वप्रथम इंग्रजांनी १८१७ मध्ये 'समान नागरी संहिता कायदा' बनवून कायद्यासमोर सर्व भारतीयांना समान दर्जा दिला. त्यापूर्वी समान गुन्ह्यासाठी कायद्यासमोर वर्णानुसार वेगवेगळ्या शिक्षेचे प्रावधान होते. भारतातील महिलांना व मागासवर्गीयांना शिक्षणाचा अधिकार मिळाल्यास त्यांची आर्थिक स्थिती सुधारेल व आर्थिक आणि सामाजिक विषमता कमी होईल या दृष्टिकोनातून १८४८ मध्ये राष्ट्रपिता महात्मा जोतिबा फुले यांनी शाळा सुरू करून सर्वांना शिक्षण खुले केले.

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी २१ सप्टेंबर १९१७ रोजी आपल्या संस्थानात सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा करून संस्थानातील सर्व जनतेस शिक्षणाची उपलब्धता करून दिली. तर, भारत सरकारला प्राथमिक शिक्षण सक्तीचा कायदा बनविण्यासाठी २००९ हे वर्ष उजडावे लागले. त्यानुसार, राज्य सहा ते चौदा वर्षे वयाच्या सर्व बालकांसाठी राज्यास विधिद्वारा निर्धारित करता येईल अशा रीतीने मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद करील. शिक्षण घेतलेल्या मागासवर्गीय मुलांना सरकारी नोकरी मिळत नाही हे पाहून छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी मागासवर्गीयांसाठी ५०% सरकारी नोकरीमध्ये राखीव जागा ठेवण्याचा आदेश काढला. त्याचसोबत २६ जुलै, १९०२ मध्ये कुलकर्णी वतन नष्ट करून त्याऐवजी सर्वसामान्यांना, गरिबांना मिळवता येईल, असे तलाठी पद सुरू केले. महसूल, न्याय व इतर विभागांमधील अस्पृश्य कर्मचाऱ्यांना प्रेमाने व समतेने वागविण्याचा

आदेश २८ फेब्रुवारी, १९१८ मध्ये काढला व समाजात असलेली आर्थिक विषमतेची दरी दूर करण्यासाठी प्रयत्न केले. स्वतंत्र भारतात अशा पद्धतीने परिणामकारक अशी धोरणे बनवून राबवण्यात न आल्यामुळे भारतात मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता वाढलेली दिसून येते.

**सारांशः**

मानवाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य यांच्या किंमतीमध्ये भारतात वाढ होत आहे आणि ह्या बाबी सरकारची जिम्मेदारी न राहता आता खासगीकरणाकडे ढकलल्या जात आहेत. अहवालानुसार, २०२०-२१ आणि २०२१-२२ या केवळ दोन वर्षांमध्ये भारतात १५ कोटी लोक नव्याने दारिद्र्यरेषेखाली ढकलले गेले. शिक्षणाच्या संदर्भात केवळ ४५% बालकांचे प्रवेश सरकारी शाळेमध्ये आहेत. सरकारी शाळांमध्ये केवळ गरिबांच्या मुलांचे प्रवेश आहेत. त्यांना शिकविण्यासाठी शिक्षकांची भरती मात्र सरकारने केलेली नसल्याने या गरीब मुलांना शिक्षण मिळणे दुरापास्त होऊन यांचे भवितव्य धोक्यात आले आहे. दर वर्षाला ६.१ कोटी लोक आरोग्यावरील खर्चामुळे दारिद्र्यरेषेखाली जातात. विशेषतः खाजगीकरणाच्या धोरणामुळे गरीब हा अधिक गरीब होत असताना दिसतो तर गरिबी रेषेच्यावरील नागरिक खासगीकरणामुळे गरिबीमध्ये ढकलला जात आहे. दुसऱ्या बाजूला भारतात अब्जाधीशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून त्यांच्या संपत्तीमध्ये होणारी वाढ ही जीडीपीमध्ये होणाऱ्या वाढीच्या कितीतरी पटीने अधिक आहे.

याच कालावधीत देशातील ८४% सर्वसाधारण जनतेचे दरडोई उत्पन्न घटले आहे. भारतात ८० कोटी जनता अन्नधान्यासाठी सरकारच्या मदतीवर अवलंबून असताना "Government has no Business to be in Business' अशी घोषणा फेब्रुवारी २०१९ मध्ये देशाच्या प्रधानमंत्र्यांनी देणे म्हणजे या ८० कोटी जनतेला पुढील काळात अन्नधान्यासाठी अतिश्रीमंत १०% जनतेचे गुलाम करणे ठरेल. केवळ अन्नधान्य देऊन जनतेची मते विकत घेण्यासाठी उभी करण्यात आलेली ही कृत्रिम व्यवस्था अब्जाधीशांची सरकार आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो. आज भारतात बेरोजगारीचे प्रमाण स्वतंत्र भारताच्या इतिहासात सर्वाधिक झालेले असताना सरकारने रोजगार निर्माण करण्यासाठी नवीन सरकारी गुंतवणूक करण्याऐवजी सरकार निर्गुंतवणूक धोरणावर अधिक भर देत असल्याने व खाजगी उद्योग भांडवलप्रधान तंत्रज्ञानाचा अधिक वापर करीत असल्याने बेरोजगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत जात असून आर्थिक विषमतेची दरी वाढत आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. Chandra Sekhar and Gupta, (2018) What Explains Poverty in India, Notion Press, Chennai.
२. Gaurav Datt and Mahajan, (2018), Indian Economy S. Chand and Company Limited, New Delhi.
३. Lucas Chancel (November 2019), Indian Income Inequality, 1922-2015; from British Raj to Billionaire Raj? The Review of Income and Wealth, 10.111/roiw.12439
४. Shujun Jin, (2018), Analysis on the Change of India's Billionaires and its Reasons E3S Web Conferences 214, 02028 EBLDM 2020.
५. आंबेडकर भीमराव रामजी, (२०२२), भारताचे संविधान, विनिमय पब्लिकेशन्स, मुंबई, पृष्ठ क्रमांक-४८.
६. गायकवाड प्रदीप, (२०१४ ), राजश्री शाहू महाराजांची निवडक भाषणे आणि आज्ञापत्रे, क्षेतीज पब्लिकेशन, नागपूर.
७. घुमटकर सुरेश आणि गोपाल, (२०२१), भारतीय

अर्थव्यवस्था एज्युकेशनल पब्लिशर अँड डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद.

८. तेगमपुरे मारोती, (२०१८), जागतिकीकरण- भारताचा विकास आणि विषमता, अर्थमीमांसा.

**संकेत स्थळे :**

१. Central Government of India Budget Speech (2022), https://www.indiabudget.gov.in/bspeech.php

२. https://www.oxfamindia.org/knowledgehub/workingpaper/inequality-kills-india-supplement-2022

३. Indian Extreme Inequality in Numbers https://www.oxfam.org/en/india-extreme-inequality-numbers.

४. India Has World 3rd Largest highest number of Billionaires, says Forbs Report india-has-worlds-3rd-highest-number-of-billionaires-says-forbes-report/article61917622.ece

५. India very unequal;top 1% own 33% of the country's wealth: World Inequality https://www.businesinesstoday.in

६. Oxfam International, India: Extreme Inequality in Numbers http://oxfam.orgindia-extreme-inequality-in-numbers

७. The Inequality Virus Davos and India Supplement 2021. https://d1ns4ht6ytuzzo.cloudfront.net/oxfamdata/

◆

---

धन्य ते तरुण, कारण त्यांना राष्ट्रीय कर्जाचा वारसा मिळेल.

**- हर्बर्ट हूवर**

---

## निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना व अर्थसंवाद लेखकांना कळविण्यात येते की, कार्यकारिणीच्या ठरावानुसार दि. १ एप्रिल २०२० पासून अर्थसंवाद हा '**तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक**' करण्यात आलेला आहे. त्यामुळे यापुढील काळात अर्थसंवादचे लेख हे तज्ज्ञांकडून परिक्षण करुन घेऊन, गरजेनुरूप त्यामध्ये लेखकांकडून योग्य त्या सुधारणा करुन घेऊनच अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध केले जातील. युजीसीचे बदलते धोरण आणि गुणवत्ता वाढीच्या अनुषंगाने सदर हितावह बदल अर्थसंवादमध्ये करण्यात आलेला आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# ''स्वयंसहायता बचतगट आणि महिला सक्षमीकरण''

**राजू लक्ष्मण आदे** †
**संजीवनी राजू आदे** ††

**प्रस्तावना :**

भारतासारख्या कृषिप्रधान व विकसनशील देशात महिलांचा दर्जा कुटुंबात दुय्यम तथा कनिष्ठ मानला जातो. भारतात पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे कुटुंबातील सर्व आर्थिक, सामाजिक, राजकीय व कौटुंबिक निर्णय पुरुषच घेत असतात. त्यामुळे देशात स्त्रियांची स्थिती काय? ह्या प्रश्नाचे उत्तर जाणून घेताना हुंडाबळी, कुपोषण, स्त्रियांवरील अन्याय-अत्याचार, स्त्रीभ्रूणहत्या, दारिद्र्य हेच निदर्शनास येते. भारतात महिलांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय विकासामुळे पंचवार्षिक योजनाकाळात लक्ष दिले असले, तरी ग्रामीण स्त्रियांच्या सक्षमीकरणाचा खरा मार्ग स्वयंसहाय्यता बचत गटामार्फत उपलब्ध झालेला दिसून येतो. सहाव्या पंचवार्षिक योजनाकाळात ग्रामीण स्त्रियांसाठी आर्थिक व सामाजिक स्वरूपाचे विशेष प्रयत्न केले गेले. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, ट्रायसेम डबाका या कार्यक्रमाद्वारे महिलांच्या विकासासाठी आर्थिक व सामाजिक मदत करण्यात आली. स्त्रियांचे आर्थिक व सामाजिक स्थान आणि महिला सक्षमीकरणासाठी सातव्या पंचवार्षिक योजनेत विशेष कार्यक्रम राबविण्यात आले व ते आजही सुरू आहेत. पंचवार्षिक योजनाकाळात स्वयंसहाय्यता बचत गट व इतर सामाजिक, आर्थिक संघटनांच्या माध्यमातून स्त्रियांना अधिक आर्थिक व सामाजिक सोयी उपलब्ध करून देण्याचे ठरविले गेले.

प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे स्वयंसहाय्यता बचत गटाचे योगदान व महत्त्व तसेच महिला सक्षमीकरणाचा विचार करण्यात आलेला आहे. भारतातील अनेक राज्यांमध्ये स्वयंसहाय्यता बचत गटांच्या माध्यमातून झालेला महिलांचा आर्थिक विकास आश्चर्यजनक आहे. बचत गटाच्या माध्यमातून महिलांचा फक्त आर्थिक प्रश्नच सुटलेला नाही, तर त्याचबरोबर त्यांचा राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि यासारखे विविध लाभ प्राप्त झालेले दिसून येतात. एकंदरीत महिलांच्या राहाणीमानाच्या दर्जात सुधारणा झालेली आढळून येते. प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे महिला सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटाची भूमिका व महत्त्व यावर विश्लेषण करण्यात आले आहे.

† अर्थशास्त्र विभागप्रमुख, ने.हि. महाविद्यालय, ब्रह्मपुरी, ता. ब्रह्मपुरी, जि. चंद्रपूर.
आजीव सदस्य क्रमांक : १७८४, भ्रमणध्वनी : ९४०३१७६३७२ ई-मेल : rajuade76@gmail.com
†† अर्थशास्त्र संशोधिका, ब्रह्मपुरी, ता. ब्रह्मपुरी, जि. चंद्रपूर,
भ्रमणध्वनी : ८२७५२४०६९२, ई-मेल : sanjiwaniade@gmail.com

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये :**

प्रस्तुत शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१) महिला सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटाचे महत्त्व व भूमिका समजून घेणे.

२) प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचा अर्थ समजून घेणे.

३) स्वयंसहाय्यता बचत गटामुळे झालेल्या महिलांच्या प्रगतीचे अध्ययन करणे.

४) स्वयंसहाय्यता बचत गटामुळे महिलांमध्ये झालेल्या परिवर्तनाचे अध्ययन करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत विषयाच्या संशोधनात्मक अध्ययनाकरिता माहितीचे संकलन करण्यासाठी दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये संबंधित विषयाची पुस्तके, ग्रंथ, प्रकाशित लेख, संशोधन अहवाल, मासिके, वार्षिकांक, दैनिक वृत्तपत्रे, वेबसाईट्स इत्यादी साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**स्वयंसहाय्यता बचत गटाची संकल्पना व अर्थ :**

''स्वत:ची मदत स्वत: करण्यासाठी स्वत: केलेल्या बचतीतून आर्थिक व सामाजिक विकासासाठी कमीत कमी दहा व जास्तीत जास्त वीस व्यक्तींनी एकत्र येऊन तयार केलेला समूह म्हणजे स्वयंसहाय्यता बचत गट होय.''

स्वयंसहाय्यता म्हणजे स्वत:ची मदत स्वत: करणे. स्वयंसहाय्यता गट म्हणजे स्वत:ची मदत स्वत: करणाऱ्या लोकांचा संघ किंवा संघटना होय. या गटाकडून स्वयंसहाय्यता कृती केली जाते. केवळ आर्थिक अडचणी सोडविण्यासाठीच नव्हे; तर सामाजिक व सांस्कृतिक कार्याचे आयोजन करण्यासाठी, त्यातील अडचणी सोडविण्यासाठीदेखील केली जाते. परस्परांचे सहकार्य आणि सहभाग, नेतृत्व व कर्तृत्वासह सातत्याने प्रयत्नशील व कार्यरत असणाऱ्या सदस्याच्या गटाला स्वयंसहाय्यता गट म्हणता येईल.

स्वयंसहाय्यता बचत गटास इंग्रजीमध्ये Self Help Group (SHG) असे म्हणतात. असा हा गट कमीत कमी १० किंवा जास्तीत जास्त २० महिला स्वेच्छेने एकाच उद्देशाने एकत्र येऊन स्वत:च्या उन्नतीसाठी बचत जमा करतात. त्या बचतीला बँकेच्या कर्जाची जोड देऊन व्यापार, व्यवसाय व उद्योग महिला करीत असतात. त्यामुळे महिलांच्या आर्थिक, राजकीय व सामाजिक विकास होण्यास मदत होऊन त्या स्वत:च्या पायावर उभ्या राहातात. स्वयंसहाय्यता बचत गटाची मूळ संकल्पना ही बांगलादेशातील डॉ. महंमद युनूस यांच्या मांडलेल्या सूक्ष्म वित्तपुरवठा या संकल्पनेतून उदयास आली. डॉ. महंमद युनूस यांच्या विचारातून प्रेरणा घेऊन दारिद्र्यातील लोकांना तसेच दुर्बल व आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांना दारिद्र्याच्या दृष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून भारतातसुद्धा प्रयत्न केले जात आहे. महाराष्ट्रात स्वयंसहाय्यता बचत गटाच्या उपक्रमामध्ये विविध बँका, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, स्वयंसेवी संस्था, नाबार्ड, सरकारच्या विविध योजना इत्यादींचे योगदान आहे. स्वयंसहाय्यता बचत गटाचे उपक्रम गतिशील झाल्यामुळे विशेषत: महिला सक्षमीकरणात व महिलांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय विकासात स्वयंसहाय्यता बचत गटांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसून येते.

**स्वयंसहाय्यता बचत गटाची पार्श्वभूमी व महिला सक्षमीकरण :**

बांगलादेशात गरिबीचे उच्चाटन करण्यासाठी प्रा. डॉ. महमंद युनूस हे प्रयत्न करीत होते. बांगलादेशात डॉ. महमंद युनूस यांनी बचत गटाचे बीज प्रथमत: रोवले. डॉ. महमंद युनूस यांना गरिबातल्या गरीब लोकांना स्वत:च्या पायावर उभे राहून स्वावलंबी बनण्याचा यशस्वी मार्ग दाखविल्याबद्दल त्यांना शांततेचा

नोबेल पुरस्कार मिळाला व संपूर्ण जगाला त्यांच्या कार्याची ओळख पटली. बांगलादेशातील गरिबी दूर करण्यासाठी व कुटुंब आत्मनिर्भर बनविण्यासाठी डॉ. महंमद युनूस यांनी बचत गट हे माध्यम लोकांच्या हाती सोपविले आहे. याच धर्तीवर भारतामध्ये १९९०च्या दशकात केंद्र सरकार आणि राज्य सरकार, नाबार्ड यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामविकासाच्या योजना राबविल्या जात आहेत.

प्रा. डॉ. महंमद युनूस यांना अर्थशास्त्राचे सिद्धांत व ग्रामीण भागातील वास्तविक स्थिती यामध्ये विसंगती जाणवू लागली. छोट्या-छोट्या रकमेचे कर्जसुद्धा गरीब व्यक्तींच्या जीवनात आर्थिक बदल घडवू शकतात. याचा अनुभव त्यांनी घेतला आणि बांबूपासून टोपल्या बनविणाऱ्या कारागिरांच्या वस्तीत त्यांनी दहा महिलांचा बचत गट स्थापन केला. परंतु त्यांना तारणाशिवाय कर्ज मिळू शकले नाही. तेव्हा प्रा. डॉ. युनूस महंमद यांनी स्वत:च मदत केली. तारणाशिवाय कोणतीही बँक कर्ज देऊ शकत नाही; ह्याची त्यांना जाणीव झाली आणि सन १९८२ मध्ये त्यांनी महिलांचे बचत गट स्थापन करण्यास सुरुवात केली व ह्याच महिलांच्या सहकार्याने सन १९८३ साली बांगलादेशामध्ये ग्रामीण बँकेची स्थापना केली. या बँकेतर्फे स्वयंसहाय्यता बचत गटाचे कार्य सुरू आहे. जगातील अनेक देशांनी बांगलादेशाचा आदर्श घेऊन स्वयंसहाय्यता महिला बचत गट निर्मितीचे कार्य हाती घेतले आणि भारतातही अशा स्वयंसहाय्यता बचत गट स्थापनेस प्रेरणा मिळाली.

स्वयंसहाय्यता गटामुळे गावांमध्ये महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला आहे आणि त्यामुळे बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिक स्वावलंबन प्राप्त झाले. महिलांच्या बचत गटांना बँकांकडून, सरकारकडून अनेक योजना प्राप्त झाल्या आहेत. त्याचबरोबर अनेक योजनांसाठी वेगवेगळी अनुदाने व अल्प व्याजदरात कर्ज उपलब्ध झाली आहेत. या अनुदान व कर्जाच्या माध्यमातून अनेक महिलांनी व महिलांच्या बचत गटांनी वेगवेगळे उद्योग उभारले आहेत. उदा. स्वस्त धान्य दुकान, शाळेतील पोषण आहार, पापड तयार करणे, मसाला तयार करणे, सरकारी कार्यालयातील कँटीन चालविणे, कृषीसाठी लागणाऱ्या अनेक अवजाराकरिता बचत गटांना प्राधान्य देणे, त्याचबरोबर हळद प्रक्रिया उद्योग, दालमिल, दुग्धजन्य पदार्थ अशा अनेक उद्योगांचे काम गटातील महिलांना उपलब्ध करून दिल्यामुळे हजारो महिलांना रोजगार उपलब्ध झाला आहे. त्यातून महिलांची आर्थिक प्रगती व महिलांचे आर्थिक स्वावलंबन होऊन त्यांच्या राहाणीमानाचा दर्जा उंचावला आहे. महिला सक्षमीकरणात प्रामुख्याने महिला स्वयंसहाय्यता बचत गटाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. बचत गटाच्या माध्यमातून प्रत्येक महिला सदस्याचे खाते बँकेत उघडण्यात आले. त्यामुळे महिलांचा बँकेतील सहभाग वाढून बँकेच्या व्यवहाराबद्दलची माहिती महिलांना झाली. त्यामुळे महिलांना बचतीच्या मुख्य प्रवाहात आणता आले. त्यामुळे एकंदरीत देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात साहाजिकच भर पडलेली आहे.

सद्यस्थितीत महाराष्ट्रात २.५ लाखांपेक्षा अधिक बचत गट असून त्याद्वारे ३६ लाख महिला संघटित झाल्या आहेत. स्वयंसहाय्यता बचत गट हे महिलांच्या आर्थिक प्रगतीत महत्त्वाची बाब ठरली आहे. महिलांच्या आर्थिक प्रगतीमुळे त्यांनी राजकीय व सामाजिक नेतृत्वदेखील सिद्ध केले आहे. महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व संघटित झाल्यामुळे त्या सर्वच क्षेत्रात आत्मविश्वासाने वावरू शकतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने सक्षमीकरण घडून येईल.

**स्वयंसहाय्यता बचत गटाचे उद्देश :**

स्वयंसहाय्यता बचत गटाचे प्रमुख उद्देश खालीलप्रमाणे आहेत.

१) स्वयंसहाय्यता बचत गटांद्वारे महिलांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे.

२) महिलांच्या कलागुणांचा विकास करून देशाच्या विकासाला हातभार लावणे.

३) महिलांमध्ये नेतृत्व गुण विकसित करणे.

४) महिलांच्या संघटना तयार करून त्यांच्यात एकतेची भावना निर्माण करणे.

५) महिलांना आर्थिक, सामाजिक व राजकीय ज्ञान प्राप्त करून देणे.

६) महिलांना पोस्ट ऑफिस, बँका, शासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी जाण्याची व बोलण्याची हिम्मत प्राप्त करून देणे.

**स्वयंसहाय्यता बचत गटाची वैशिष्ट्ये :**

स्वयंसहाय्यता बचत गटाची वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

१) स्वयंसहाय्यता बचत गटामुळे लोकांना बचतीची व काटकसरीची सवय लागते.

२) स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिलांचा सामाजिक, आर्थिक व राजकीय दर्जा उंचावतो. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्याचे स्वयंसहाय्यता बचत गट हे एक प्रभावी साधन आहे.

३) स्वयंसहाय्यता बचत गटांचा व्याजदर २ ते ३ टक्के म्हणजे अतिशय कमी असतो.

४) स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून देशातील गरिबी कमी होऊन देशाच्या आर्थिक शक्तीत वाढ होते.

५) स्वयंसहाय्यता बचत गटामुळे महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होता येते.

६) सूक्ष्म वित्तपुरवठा गरिबांना दैनंदिन गरजा भागविण्यासाठी नव्हे; तर गुंतवणूक करून आर्थिक जीवनमान उंचाविण्यासाठी करता येतो.

७) स्वयंसहाय्यता बचत गट हे कायमस्वरूपी वित्त पुरवठा करणाऱ्या एका प्रकारच्या स्थानिक संस्था आहेत.

**महिला सक्षमीकरणाचा अर्थ :**

महिला सक्षमीकरणाच्या विविध बाजू आहेत. त्यामध्ये सामाजिक, आर्थिक व राजकीय सक्षमीकरण इत्यादी. महिलांचे सक्षमीकरण म्हणजे महिलांमध्ये स्वत:च्या क्षमतेची ओळख, आपल्या क्षमतेचा विकास करून सामाजिक, आर्थिक व राजकीय निर्णयाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचा प्रयत्न करणे होय. तसेच मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात आपली ओळख व क्षमता सिद्ध करणे होय.

महिला सक्षमीकरणाचा साधा अर्थ असा आहे की, महिलांनी स्वत:च्या क्षमतेचा विकास करावयाचा व स्वत:वर परिणाम करणाऱ्या घरगुती व सामाजिक निर्णयाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचा प्रयत्न करावयाचा व जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत प्रयत्न होऊ शकणाऱ्या सर्व शक्तीची ओळख करून घेण्याचा प्रयत्न करणे. महिला सबलीकरणाच्या संदर्भात डॉ. सुधा कोठारी म्हणतात की, ''स्वयंसहाय्यता गट हा फक्त महिलांचे आर्थिक सबलीकरण करण्याचे माध्यम आहे; पण ती जादूची कांडी नव्हे.''

**महिला सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटाची भूमिका :**

स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक, सामाजिक व राजकीय सक्षमीकरण दर्शविणाऱ्या काही प्रमुख बाबी पुढीलप्रमाणे आहेत-

१) स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक निर्णय घेण्याची व आर्थिक व्यवहार करण्याची संधी महिलांना प्राप्त झाली.

२) स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून स्वाभिमानाने घराचा उंबरठा ओलांडण्याची संधी महिलांना प्राप्त झाली.

३) स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून संघटित महिलांच्या शक्तीचा समाजाला प्रत्यय आला.

४) स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिला

स्वावलंबी व आत्मनिर्भर झाल्या.

५) स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून समाजात महिलांना सन्मानाची वागणूक मिळाली.

६) स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून सामाजिक व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा सहभाग वाढला.

७) स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून कुटुंबातील आर्थिक प्रश्न सोडविण्यामध्ये महिलांचा सहभाग वाढला.

८) स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे खऱ्या अर्थाने सामाजिक, आर्थिक व राजकीय सक्षमीकरण झाले.

**बचत गटाची कार्यपद्धती :**

स्वयंसहाय्यता महिला बचत गट हे विशेषत: महिलांकडून चालविले जातात. त्यामुळे महिलांच्या सर्वांगीण विकासास हातभार लागतो. स्वत:ची मदत स्वत: करणे यासाठी बचत वाढविण्यासाठी, आर्थिक व सामाजिक विकास करण्यासाठी कमीत कमी १० व जास्तीत जास्त २० व्यक्तींनी एकत्र येऊन बचत गट स्थापन केला जातो. बचत गटाच्या सदस्यामधूनच अध्यक्ष व सचिवाची निवड लोकशाही मार्गाने केली जाते. स्वयंसहाय्यता बचत गटाचे व्यवस्थापन अध्यक्ष व सचिव आणि त्यांना मदत करणारे इतर पदाधिकारी यांच्या साहाय्याने केले जाते. स्वयंसहाय्यता महिला बचत गटाच्या स्थापनेनंतर सर्व सदस्य नियमित दरमहा ठरावीक रक्कम बचत करतात. बचत गटाच्या सर्व सदस्यांची महिन्यातून एकदा सभा आयोजित केली जाते. त्यामध्ये सदस्यांच्या समस्या, बचतीची रक्कम जमा करणे, सदस्यांना कर्ज देणे, तसेच बचत गटाची प्रगती, सामाजिक व आर्थिक समस्या इत्यादी बाबींवर विचार-विनिमय करून धोरणात्मक निर्णय घेतले जातात.

स्वयंसहाय्यता महिला बचत गटाकडून नियमितपणे बचत करून त्यातून गरजू सदस्यांना वाजवी दराने अल्पमुदती कर्जे दिली जातात. स्वयंसहाय्यता महिला बचत गटाची प्रगती विचारात घेऊन त्यांना त्यांच्या बचतीच्या प्रमाणात स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेअंतर्गत व्यवसाय कर्ज व अनुदान उपलब्ध करून दिले जाते. ह्यामध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून तसेच बँकेकडून महत्त्वाची भूमिका निभावली जाते. त्यामुळे महिलांना आर्थिक, सामाजिक व राजकीय दृष्टिकोनातून सक्षम करण्यात मदत होते.

**महिला सक्षमीकरणाचे महत्त्व :**

भारतीय राज्यघटनेत नमूद केल्याप्रमाणे, महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीत सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करणे आणि महिलांना समाजात आदर व सन्मान प्राप्त करून देणे, हा सक्षमीकरणाचा प्रमुख हेतू आहे. जेणेकरून भारतीय समाजात एकतेची व समानतेची वृद्धी होईल. महिलांना राष्ट्रीय जीवनाशी तसेच विकासाच्या मुख्य प्रवाहाशी जोडावयाचे असेल, तर त्यांना त्या प्रकारच्या संधी निर्माण करून देणे, त्या संधीचा लाभ घ्यावा म्हणून त्यांना प्रेरित करणे हा सक्षमीकरणाचा एक उद्देश आहे. यामुळे राष्ट्रीय विकासात महिलांचे योगदान त्या निश्चित करू शकतील. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे जीवनमान उंचवायचे असेल, तर महिलांचे आर्थिक स्वावलंबन होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेतील महिलांचे स्थान व दर्जा आणि त्यातून येणारे मागासलेपणा ही जागतिक समस्या आहे. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक, आर्थिक व राजकीय व्यवस्थेमध्ये स्थान, लाभ, प्रतिष्ठा आणि निर्णय घेण्याची संधी मिळाली पाहिजे, या हेतूने जो विचार पुढे आला तोच महिला सक्षमीकरणाचा विचार मानता येईल.

**महिला सक्षमीकरणाची आवश्यकता :**

महिला सक्षमीकरणाची आवश्यकता पुढील मुद्याद्वारे स्पष्ट करण्यात आली आहे.

१) महिला सक्षमीकरणामुळे स्त्री-पुरुष समानता सर्वच स्तरावर प्रस्थापित होऊन समतोल साधला जाईल.
२) महिलांचे आरोग्य, मानसन्मान वाढविणे, जीवनमान उंचावणे, तसेच महिलांना समाजात निर्भयतेने जगता यावे, याकरिता महिला सक्षमीकरणाची आवश्यकता आहे.
३) देशातील सर्वांगीण साधनसंपत्तीच्या विकासाकरिता महिला सक्षमीकरण होणे गरजेचे आहे.
४) महिलांचे संघटन मजबूत होण्याकरिता तसेच महिलांवरील अन्याय व अत्याचार, गुन्हेगारी दूर होण्याकरिता महिलांचे सक्षमीकरण होणे आवश्यक आहे.
५) स्त्री घटकांना मानसिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय विकासाकरिता महिला सक्षमीकरणाची आवश्यकता आहे.
६) राजकीय क्षेत्रातील दुर्गुणांचा नाश करण्याकरिता व निकोप राजकीय क्षेत्रात प्रवेश करण्याकरिता महिला सक्षमीकरण होणे गरजेचे आहे.

**महिला बचत गटांची प्रगती :**

भारतासारख्या कृषिप्रधान देशात महिला उद्योजकतेचा विचार केल्यास तो अगदी नगण्य दिसून येतो. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात महिला हळूहळू औद्योगिक क्षेत्रात सहभागी होत आहेत. शहरी व ग्रामीण क्षेत्रातील महिला उद्योजकता विकसित करण्यात बचत गटाचे फार मोठे योगदान आहे. स्वावलंबी, आत्मविश्वासपूर्ण आणि स्वत:च्या पायावर उभी राहिलेली व आर्थिक, सामाजिक व राजकीयदृष्ट्या सक्षम महिला ही खऱ्या अर्थाने देशाच्या आर्थिक विकासात आपले योगदान नक्कीच देईल. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यात महिला बचत गटाचा मोलाचा वाटा आहे. बचत गटाच्या माध्यमातून अनेक प्रकारचे व्यवसाय उभे केले आहेत. उदा. लोणचे, पापड व इतर घरगुती खाद्यपदार्थ बनविणे, ज्वेलरी मेकींग, सॅनिटरी, नॅपकीन, दुग्धव्यवसाय, वाचनालये, पाळणाघर, उपहारगृहे, मेस अशा विविध प्रकारच्या सेवा, उत्पादन, व्यवसायाची सुरुवात अनेक महिला बचत गटांनी केली आहे. तसेच महिला बचत गटातील व्यवसायातून तयार होणाऱ्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमांद्वारे विक्रीसाठी प्रयत्न होत आहेत. त्यासाठी सरकारसुद्धा प्रयत्नशील आहे. वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळे मेळावे, ग्राहकपेठा उपलब्ध करून देण्याचे माध्यम म्हणून सरकार कार्यरत असते. अलीकडेच शासनाच्या वतीने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी बचत गटांनी बनविलेल्या वस्तूंचे, खाद्यपदार्थाचे मोठे प्रदर्शन महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये भरविण्यात आले. यामध्ये वेगवेगळ्या व्यवसायातील महिला बचत गटांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला व कोट्यावधी रुपयाची उलाढाल या प्रदर्शनानिमित्त झाली. या प्रदर्शनाच्या आयोजनासाठी केंद्र सरकार व राज्य सरकारमार्फत काही निधी राखीव ठेवला जातो.

आज भारताच्या विविध राज्यांमध्ये अनेक महिला बचत गट हे विविध उत्पादने तयार करून न थांबता त्यांची ब्रँड नावासह विक्री करीत आहेत. तसेच प्रक्रिया उद्योगाकडील बचत गटाची वाटचाल वेगाने होत आहे. काही महिला फळांवर प्रक्रिया करून त्यापासून अनेक उत्पादने तयार करून विशिष्ट नावाने ट्रेडमार्क रजिस्ट्रेशनसहित माल बाजारपेठेत आणण्यात यशस्वी झाल्या आहेत. तसेच ई-पोर्टलच्या मदतीने महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनाच्या विक्रीसाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्याची व्यवस्था नुकतीच शासनाने जाहीर केलेली आहे. ऑनलाईन मार्केटिंगमध्ये बघितल्यास महिला बचत गटांनी तयार केलेल्या अनेक नावीन्यपूर्ण वस्तू व पारंपारिक पदार्थ यांना भरपूर वाव आहे. संपूर्ण महाराष्ट्रात अडीच लाखांपेक्षा अधिक बचत गट असून ३६ लाख महिला स्वयंसहाय्यता बचत गटाद्वारे संघटित झाल्या आहेत.

कोकण विभागातील बचत गटांची संख्या अठरा हजारांपेक्षा जास्त आहे. महाराष्ट्रामध्ये स्वयंसहाय्यता बचत गटाच्या उपक्रमात गडचिरोली जिल्ह्याचा प्रथम क्रमांक असून पुणे जिल्ह्याचा तिसरा क्रमांक लागतो. पुणे जिल्ह्यातील चैतन्य संस्था, खेड यांचा नामोल्लेख केला जातो. तसेच ग्रामीण महिला बालविकास संस्था, पुणे, ही संस्था स्वयंसहाय्यता उपक्रमाबाबत अग्रेसर आहेत. नागरी भागात अन्नपूर्णा महिला मंडळाचे कार्य कौतुकास्पद आहे. भारतात सन २०२२ मध्ये ७४,७९,५६२ एवढी स्वयंसहाय्यता बचत गटांची एकूण संख्या असून त्यापैकी जवळपास ८०% महिलांना सरकारच्या माध्यमातून संघटित करून महिलांना गतिशील करण्यात आले. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील स्वयंसहाय्यता बचत गटांची आकडेवारी पाहाता महाराष्ट्रात सन २०२२ मध्ये ५,४६,५८८ एवढी स्वयंसहाय्यता बचत गटांची एकूण संख्या असून त्यापैकी जवळपास ९०% महिला स्वयंसहाय्यता बचत गटांची संख्या आहे. यावरून असे लक्षात येते की, संपूर्ण भारतात तसेच महाराष्ट्र राज्यात सरकारने महिला स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणावर विशेष भर दिला आहे.

एकंदरीत महाराष्ट्रात स्वयंसहाय्यता बचत गट हे महिलांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय सक्षमीकरणास सहाय्यक ठरत आहेत व महिला उद्योजकतेमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होऊन महिला सक्षम बनत आहेत.

**भारतातील स्वयंसहाय्यता बचत गटाची वाटचाल :**

भारतात स्वातंत्र्यानंतर देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासाकरिता विविध पंचवार्षिक योजनाकाळात दारिद्र्य निर्मूलन योजनांच्या माध्यमातून रोजगार निर्मितीवर भर देण्यात आला. याच काळात राबविण्यात आलेली एकात्मिक ग्रामीण विकास योजना सर्वात प्रथम सूक्ष्म वित्त पुरवठा करणारी योजना होती. त्यानंतर देशात दारिद्र्य निर्मूलन व महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविण्यात आल्या. मात्र त्या फारशा उपयुक्त ठरल्या नाहीत. म्हणून ग्रामीण व शहरी भागात दारिद्र्य निर्मूलन व महिला सक्षमीकरणाचे प्रभावी माध्यम म्हणून स्वयंसहाय्यता बचत गटांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतामध्ये स्वयंसहाय्यता बचत गटाचे उपक्रम सन १९८५ मध्ये (MYRADA) म्हैसूर पुनर्निधारण आणि विकास एजन्सी (मायराड) संस्थेने सुरू केली. मायराडच्या माध्यमातून स्वयंसहाय्यता बचत गटाची निर्मिती होत असताना भारतामध्ये सन १९९२ मध्ये नाबार्डतर्फे 'Asia Pacific Rural and Agricultural Credit Association'च्या साहाय्याने स्वयंसहाय्यता बचत गटाची संकल्पना राबविण्यास सुरुवात केली. सन १९९२ मध्ये नाबार्डने ५०० स्वयंसहाय्यता बचत गटांची बँकेशी जोडणी केली. त्यास सन १९९३ मध्ये रिझर्व्ह बँकेने तत्त्वत: मान्यता दिली.

भारतात महाराष्ट्र, राजस्थान, तामिळनाडू, केरळ ही राज्ये आघाडीवर असून नाबार्डच्या माध्यमातून आंध्रप्रदेश, तामिळनाडू, अरुणाचल प्रदेश या राज्यांमध्ये महिला बचत गटाची सुरुवात झाली. तर १९९६ मध्ये रिझर्व्ह बँकेने स्वयंसहाय्यता बचत गटांना बँकेशी संलग्न असणाऱ्या गटांना प्राधान्यक्रमाने कर्जपुरवठा करण्याचा प्रयत्न केला. तसेच रिझर्व्ह बँकेने व्यापारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व सहकारी बँकांना 'बँक जोडणी' कार्यक्रमात सहभागी होण्याचे निर्देश दिले आहेत. स्वयंसहाय्यता बचत गटांसाठी सन १९९८ पासून केंद्रीय अर्थसंकल्प आणि राज्य सरकारच्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

**स्वयंसहाय्यता बचत गटाच्या प्रमुख समस्या :**

१) स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्य एकमेकांच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करीत नाही. त्यामुळे सदस्यांमध्ये अकार्यक्षमता अधिक दिसून येते.

२) काही स्वयंसहाय्यता बचत गटात कर्ज थकबाकीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याचे दिसून येते.

३) स्वयंसहाय्यता बचत गटातर्फे कर्ज वाटप करताना वशिलेबाजी, जवळचा किंवा लांबचा नातेवाईक असा भेद केला जातो.

४) काही स्वयंसहाय्यता महिला बचत गटाचे कामकाज नियमितपणे चालत नाही. दरमहा नियमित सभाही घेतल्या जात नाही. तसेच कागदपत्रे, रेकॉर्ड, हिशेब व्यवस्थितपणे ठेवले जात नाही.

५) स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्यांकडून नियमितपणे बचत जमा होत नाही. अनेकदा त्यामध्ये दिरंगाई केली जाते.

६) स्वयंसहाय्यता बचत गटाच्या नियमित मासिक सभेला काही सदस्य जाणीवपूर्वक उपस्थित राहात नाही. त्यामुळे बचत गटाच्या विकासावर विपरीत परिणाम होतो.

७) स्वयंसहाय्यता बचत गटाच्या कामानिमित्त वेळोवेळी बँक, शासकीय कार्यालये, अधिकारी, प्रशासकीय कार्यालयात जावे लागते. त्यामुळे जाण्या-येण्याच्या खर्चात वाढ होते.

८) स्वयंसहाय्यता बचत गट चालविणे दिवसेंदिवस खर्चीक होत असून, उत्पन्न कमी आणि खर्च जास्त अशी अवस्था निर्माण होत आहे.

९) स्वयंसहाय्यता बचत गटाच्या सभा बरेचदा अवेळी आणि अयोग्य ठिकाणी घेतल्या जातात त्यामुळे सदस्य गैरहजेरीचे प्रमाण वाढते.

१०) काही स्वयंसहाय्यता बचत गटावर आकस्मिक संकटे, नैसर्गिक आपत्ती, मानवनिर्मित आपत्ती येते. त्यामुळे बचत गटातील सदस्यांचे मोठे नुकसान होते. अशाप्रसंगी नुकसान भरपाई देणारी यंत्रणा अस्तित्वात नाही.

**स्वयंसहाय्यता बचत गटाच्या समस्या निवारणार्थ उपाययोजना :**

१) स्वयंसहाय्यता बचत गटाच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी संबंधित बँकांवर टाकली पाहिजे. संबंधित बँकांनी सर्व प्रकारची मदत बचत गटांना केली पाहिजे.

२) दुर्बल स्वयंसहाय्यता बचत गटांना शासनाकडून आर्थिक सहाय्य दिले पाहिजे.

३) स्वयंसहाय्यता महिला बचत गटाच्या अनेक समस्या आहेत. त्या सोडविण्यासाठी संवाद आणि चर्चा इत्यादी माध्यमांतून प्रयत्न केला पाहिजे.

४) स्वयंसहाय्यता महिला बचत गट तोट्यात जाणार नाहीत यासाठी बचत गटांना मार्गदर्शन आणि सल्ला उपलब्ध करून दिला पाहिजे.

५) सरकारने स्वयंसहाय्यता बचत गटाच्या समस्या सोडविण्यासाठी एखादी यंत्रणा उभारली पाहिजे.

६) स्वयंसहाय्यता बचत गटाची थकबाकी वाढणार नाही यासाठी सरकारकडून प्रयत्न झाले पाहिजे, त्यासाठी कडक नियम बनविले पाहिजे.

**निष्कर्ष :**

अशाप्रकारे भारतात सुरू झालेल्या स्वयंसहाय्यता बचत गटामुळे संपूर्ण भारतातील दारिद्र्याचे निर्मूलन करून स्वयंरोजगाराच्या संधी तसेच महिलांमध्ये स्वावलंबनाची जाणीव निर्माण करून ग्रामीण व शहरी भागातील महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय दर्जात सकारात्मक परिणाम होऊन त्यांच्या दर्जात सुधारणा होत आहे. त्यामुळे महिलांचा सर्वांगीण विकास होऊन महिला सक्षमीकरणात भर पडत आहे. तसेच स्वयंसहाय्यता बचत गटामुळे ग्रामीण व शहरी भागातील महिलांचे अस्तित्व चार भितींच्या आत न राहाता पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून बँकेच्या व्यवहारापासून बचत गटाचे संघटन, उद्योग व उत्पादन नियंत्रण इत्यादी सर्व बाबतीत महिला सक्षमपणे कार्य करीत आहेत. त्याचप्रमाणे महिला आपल्यासमोर येणाऱ्या अनेक

अडचणींवर मात करून सामाजिक, आर्थिक व राजकीय सुधारणा घडवून आणण्यात यशस्वी होत आहेत. त्यामुळेच स्वयंसहाय्यता महिला बचत गटामुळे महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय दर्जावर सकारात्मक परिणाम झालेला दिसून येतो. तसेच स्वयंसहाय्यता बचत गटामुळे गरजू व दारिद्र्य रेषेखालील महिलांना आर्थिक आधार मिळाला आहे. म्हणूनच स्वयंसहाय्यता महिला बचत गट म्हणजे खरोखरच महिला सक्षमीकरण आहे, असे म्हणणे यथार्थ ठरते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. आढाव विलास 'महिला सबलीकरण' - पुणे विद्यापीठ मुद्रणालय, पुणे-२००९.

२. गोटे शुभांगी - महिला सबलीकरण स्वरूप व समस्या - वरद पब्लिकेशन्स, औरंगाबाद-२००४.

३. गोडबोले गाविंद (प्रा. महंमद युनूस अनुवाद) - बचत गटाच्या माध्यमातून गरिबी मुक्त विश्वाची निर्मिती, सामाजिक व्यवहार आणि भांडवलशाहीचे भवितव्य - साकेत प्रकाशन प्रा. लि., औरंगाबाद-२००९.

४. ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार वार्षिक रिपोर्ट - २०१२-१३ (पृष्ठ-२३).

५. चौधरी राजेश, 'महिला बचत गट हस्तपुस्तिका'- चौधरी पब्लिशिंग, पुणे-२०१०.

६. जाधव टी. एस. - स्वयंसहाय्यता बचत गट गरिबों की बैंक - किर्ती बहुउद्देशीय सेवा संस्था, लातूर -२००८.

७. तेली आर. बी. - मायक्रोफायनान्स इन इंडिया - अक्षरवेध प्रकाशन, कोल्हापूर-२०१४.

८. मंगनाळे, प्रा. जगताप - महिला बचत गट आणि ग्रामीण विकास - मुक्तरंग प्रकाशन, लातूर.

९. मुलाणी एम.यु. - अल्पबचत नियोजन (बचत गट) डायमंड पब्लिकेशन्स, पुणे-२००६ (पृष्ठ-४२).

१०. मुलाणी एम. यु. - स्वयंसहाय्यता बचत गट : संकल्पना, स्वरूप आणि वैशिष्ट्ये, योजना - डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, ऑक्टो. - २००७.

११. महिला बचत गट मार्गदर्शिका - चौधरी लॉ पब्लिशर्स, जळगाव.

१२. सामंत मेघा पूरव - मायक्रोफायनान्स आणि महिला सक्षमीकरण-समाज प्रबोधन पत्रिका, जाने.-मार्च २००९.

१३. शर्मा रमा, मिश्रा एस. के. - महिला सशक्तीकरण - अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली-२०१०.

१४. Vidyawarta peer Reviewed international Refered Journal – Shri Vyankatesh Arts, Commerce & Science College Deulgaon Raja, Dist. Buldhana – Harshawardhan publication pvt. Ltd. Beed – September – 2019.


**संकेत स्थळे:**


१. http://nrlm.gov.in/shgReport.do? - 22/02/2022

२. http://www.ipekpp.com-27/02/2022


◆

सर्व प्रगती अनिश्चित आहे कारण एका समस्येचे निराकरण करतानाच आपल्यासमोर दुसरी समस्या उभी राहते.

**- मार्टिन लूथर किंग**

# शाश्वत कृषिविकास : महिला सबलीकरणाची एक संधी!

**दिपक गो. चव्हाण** †
**कल्पना दि. चव्हाण** ††

**प्रस्तावना :**

'भारतातील स्त्री-सशक्तीकरण' हा दीर्घकाळ चालू असणारा प्रयोग अजूनही आपले अपेक्षित यश प्राप्त करू शकलेला नाही आणि म्हणूनच दरवर्षी त्याच-त्या योजनांचे अनावरण व दिन साजरे करून मनस्वी समाधानी व्हावे लागते. सदरचा लेख हा महिला सक्षमीकरणाच्या प्रवाहात दुर्लक्षित राहिलेल्या अशा एका महत्त्वाच्या क्षेत्राविषयी चर्चा करणारा असून, प्रामुख्याने या क्षेत्रात महिलांचे सबलीकरण होणे अधिक गरजेचे होते, तेच क्षेत्र दुर्लक्षित राहिल्याचे सूचित करतो. भारतीय कृषिक्षेत्र हा भारतीय अर्थव्यवस्थेचाच नव्हे; तर संपूर्ण भारतीय संस्कृतीचा कणा आहे. अशा कृषिक्षेत्रात मात्र महिलांचे अपेक्षित सबलीकरण होताना दिसून येत नाही. महिला सक्षमीकरणाशिवाय देशाच्या संपूर्ण विकासाची कल्पनाच करता येऊ शकत नाही. भारतातील एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ६३% लोकसंख्या ही आपल्या उपजीविकेसाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे कृषिक्षेत्रावर अवलंबून आहे. यापैकी ७९% संख्या ही फक्त महिलांची आहेत आणि यामुळेच कृषिक्षेत्रावर अवलंबून असणाऱ्यात महिलांचे सबलीकरण करणे ही संपूर्ण महिला सक्षमीकरणाच्या ध्येयप्राप्तीची पूर्वअट आहे, असे मानावे लागेल.

कृषी जणगणना २०१०-११ च्या अहवालानुसार, भारतात फक्त १२.७८% महिलांच्या नावे शेतजमीन आहे. याउलट कृषी मजुरांमध्ये पुरुषांच्या तुलनेत महिलांची संख्या अधिक आहे. महिलांकडे स्वत:च्या मालकीची शेतजमीन नाही, यामुळे त्यांचे सबलीकरण व सर्वांगीण विकास प्रभावित होत आहे. वास्तविक पुरुष जेव्हा बाहेर कामासाठी स्थलांतरण करतात तेव्हा शेतीची सर्व जबाबदारी स्त्रियांकडे असते; परंतु त्या जमिनीची मालकी मात्र तिच्याकडे नसते. महिलांकडे शेत जमीन नाही, यामुळे त्यांचे सबलीकरण व सर्वांगीण विकास प्रभावित करते. भारतातील कृषिक्षेत्राची वृद्धी ही जरी संख्यात्मक ध्येयाची प्राप्ती होताना दर्शवत असली, तरी शाश्वततेच्या पातळीवर सदरची बाब ही पडताळून पाहावी लागेल. कृषिविकास जर शाश्वत असेल तरच त्याच्याशी संबंधित सर्व घटक हे आपला विकास साधू शकतील जसे की महिला सबलीकरण.

† सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, संत राऊळ महाराज महाविद्यालय, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
आजीव सभासद क्र. : १८५८, भ्रमणध्वनी : ९९२३३७७६३२, ई-मेल : dipeco100@gmail.com
†† संशोधक विद्यार्थिनी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
भ्रमणध्वनी : ९७६५८९८४०२, ई-मेल : kalpanapatil2016@gmail.com

**तक्ता. क्र. १ : भारतातील महिलांचा कृषी व बिगर-कृषिक्षेत्रातील सहभाग**

| अ. क्र. | वर्ष | कृषि क्षेत्रातील महिला श्रमिक / कामगार (प्रती १००० श्रमिक) | बिगर-कृषिक्षेत्रातील महिला श्रमिक / कामगार (प्रति १००० श्रमिक) |
|---|---|---|---|
| १ | १९९३-९४ | ८६२ | १३८ |
| २ | १९९९-०० | ८५४ | १४६ |
| ३ | २००४-०५ | ८३३ | १६७ |
| ४ | २००९-१० | ७९४ | २०६ |
| ५ | २०११-१२ | ७४९ | २५१ |

स्त्रोतः कृषि जनगणना, विविध आवृत्या

वरील आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की, भारतातील कृषिक्षेत्रातील महिलांची संख्या ही सातत्याने घटते आहे. असे असले तरी ग्रामीण भागात महिला शेतकरी व शेतमजुराचे प्रमाण हे ७०%पेक्षा अधिक आहे. त्यामुळेच ग्रामीण भारतातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्या अबलंबून असणाऱ्या कृषिक्षेत्राचा शाश्वत विकास होणे गरजेचे आहे.

स्त्रियांच्या पराधीनतेला व परावलंबित्वाला कारणीभूत असणारा महत्त्वाचा घटक म्हणजे त्यांचे आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर असणारे अवलंबित्व होय. जोपर्यंत स्त्री ही आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणार नाही तोपर्यंत तिला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होणार नाही, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यावेळी मांडले होते आणि आजच्या परिस्थितीत त्यांचे हे मत किती वास्तववादी आहे, याची कल्पना येते.

**महिला सबलीकरण एक संकल्पना :**

महिला सबलीकरण ही एक बहुआयामी संकल्पना असून कोणत्याही एका परिभाषेच्या आधारे ती स्पष्ट करणे शक्य होणार नाही. महिला सबलीकरण ही एक प्रक्रिया असून ज्याद्वारे जागरूकता, क्रियाशीलता व नियंत्रण यामुळे व्यक्ती आपल्या जीवनात निर्णय घेण्यास स्वतंत्र होतो. ढोबळ मानाने महिला सक्षमीकरणाचे प्रमुख तीन निकष ग्राही धरले जातात. जसे की, आर्थिक, सामाजिक व प्रातिनिधिक (राजकीय प्रतिनिधित्व) या अनुषंगाने महिला सक्षमीकरणाचे परिशीलन करणे उपयुक्त ठरते.

भारतातील स्त्री-पुरुष विषमता ही अनेक ठिकाणी आढळून येते. जसे की साक्षरता, मालमत्ता अधिकार, प्राधान्यता, नेतृत्व, परंतु कृषीसारख्या अनेक समस्यांनी ग्रासलेल्या व नवनवीन आव्हाने झेलणाऱ्या क्षेत्रात महिलांची संख्या मोठी आहे. यामुळे कृषिक्षेत्रातील महिलांचे सबलीकरण हे संपूर्ण महिला सक्षमीकरणाच्या ध्येयप्राप्तीस अधिक पूरक आहे. कृषिशाश्वतता ही महिला सशक्तीकरणास उपयुक्त असून व्यापक पातळीवर महिलांचे आर्थिक, सामाजिक व नेतृत्व (राजकीय) सबलीकरण शक्य होईल. प्रस्तुत लेख हा शाश्वत कृषी विकासाच्या आधारे महिला सक्षमीकरणाचे ध्येय कशाप्रकारे साध्य केले जाऊ शकते, या बाबतची चर्चा करणारा आहे.

**भारतातील महिला सबलीकरणाचा संक्षिप्त आढावाः**

भारतीय महिला या अनेक क्षेत्रांत आपल्या उत्तुंग क्षमतांचे दर्शन घडविताना दिसत असल्या, तरी वैयक्तिक पातळीवरचे हे यश सामूहिक पातळीवर मात्र लागू

होताना दिसत नाही. निश्चितच भारतीय महिला सक्षमीकरणाच्या दिशेने पुढे सरसावल्या असून, पूर्वीपेक्षा अधिक सबल होताना दिसत आहेत. ग्रामीण क्षेत्रात मात्र महिला सक्षमीकरण हे बहुतेक करून कृषिक्षेत्राशी निगडित आहे आणि येथील परिस्थिती मात्र वरीलप्रमाणे नाही. कृषिक्षेत्रातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी आधी कृषिक्षेत्राचे सक्षमीकरण होणे क्रमप्राप्त आहे आणि त्यामुळेच शाश्वत कृषिविकासाद्वारे महिला सक्षमीकरणाचे उद्दिष्ट साध्य करणे अधिक उपयुक्ततावादी व प्रासंगिक वाटते. तत्पूर्वी आपण तक्ता क्र. २ मधील आकडेवारीच्या आधारे भारतातील महिलांच्या बाबतीत घडणाऱ्यात नोंदणीकृत गुन्ह्यांच्या आकडेवारीचा विचार करू. ज्याद्वारे आपणास सक्षमीकरणाचे वास्तव अधिक स्पष्टपणे मांडता येईल.

तक्ता क्र. २ मधील महिलांबाबत दर्शविण्यात आलेली आकडेवारी ही जरी सरकारची नोंदणीकृत व अधिकृत आकडेवारी असली, तरी सदर आकडेवारी म्हणजे पाण्यावरचे बर्फ आहे. एकूण समोर न आलेली आकडेवारी ही त्या पाण्याखालील बर्फाच्या आकाराप्रमाणेच आहे. असे असले तरी वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, भारतातील महिलांबाबत गुन्ह्यांचे प्रमाण अजूनही अपेक्षेप्रमाणे कमी झालेले नाही, हे महिलांच्या अशक्तीकरणाचेच द्योतक आहे. यामुळे भारतात व प्रामुख्याने कृषिक्षेत्रात महिलांचे सबलीकरण हे अपेक्षेप्रमाणे साध्य झालेले नाही. भारतात महिलांच्याबाबतीत घडत असलेल्या गुन्ह्यांच्या संख्येवरून महिला सबलीकरणास अजून मैलाचा दगड सर करावयाचा असल्याचे लक्षात येते आणि यासाठी कृषिक्षेत्रातील महिलांचा प्राधान्याने विचार करून संपूर्ण सक्षमीकरणाचे उद्दिष्ट साध्य करणे, हे अधिक समर्पक ठरेल.

**शाश्वत कृषिविकासाद्वारे महिला सबलीकरण:**

कृषिव्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे व हा कणा समर्थपणे ज्यांनी आपल्या मनगटावर पेलला आहे ते मनगट हे फक्त पुरुषाचेच नाही, तर स्त्रियांचेही आहे. शाश्वत कृषिविकासामध्ये असे अपेक्षित आहे की, वर्तमान कृषिविकास साध्य करताना भविष्यातील पिढ्यांची आपली गरज पूर्ण करण्याची क्षमता प्रभावित होणार नाही किंवा घटणार नाही. महिला सबलीकरणाप्रमाणे शाश्वत कृषिविकासाचेही तीन आयाम

**तक्ता. क्र. २ भारतीय महिलांबाबत नोंदणीकृत गुन्हे**

| अ. क्र. | घटना | वर्ष | | |
|---|---|---|---|---|
| | | २०१८ | २०१९ | २०२० |
| | | (गुन्हांची संख्या) | | |
| १. | गर्भपात | २१३ | २२१ | २३९ |
| २. | हुंडाबळी | ७२७७ | ७११५ | ६६९९ |
| ३. | बालविवाह | १३५२२ | १५६१५ | ११९०४ |
| ४. | आत्महत्या | ५०३७ | ५००९ | ५०४० |
| ५. | बलात्कार | ३३३५६ | ३२३३३ | २८०४६ |
| ६. | ॲसिड हल्ला | १३१ | १५० | १०५ |

स्त्रोत: Crime Against Women Report- २०१८.२०१९.२०२० (https://ncrb.gov.in/en)

आहेत. ज्याशिवाय तो शक्य नाही. जसे की, आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय घटक. याठिकाणी आपण आर्थिक व सामाजिक घटकाचा विचार करू या. ज्याद्वारे महिला सक्षमीकरण हे ध्येय साध्य करता येईल.

**आर्थिक शाश्वतता व सबलीकरण :**

शाश्वत आर्थिक विकासासाठी महिला सक्षमीकरण ही पूर्वअट आहे. कृषिक्षेत्राच्या आधारे महिलांचे आर्थिक पातळीवर सबलीकरण हे अधिक सुलभ आहे. वर्तमानस्थितीत जमीनधारक व शेतमजूर स्त्रियांची संख्या वाढत आहे. पुरुषांचे कृषिक्षेत्रातून बिगर-कृषिक्षेत्रात होणारे स्थलांतर हे यामागचे प्रमुख कारण आहे. शाश्वत कृषिमधील प्रमुख आयाम हे आर्थिक पातळीवर शाश्वतता प्राप्त करणे हे असून, असे ध्येय साध्य झाल्यास कृषिक्षेत्राशी संबंधित महिलांचे सक्षमीकरण होण्यामध्ये अधिक सुलभता येईल. यासाठी सरकारने कृषीच्या शाश्वतीकरणाच्या योजना आखणे व त्या प्रभावीपणे राबवणे गरजेचे आहे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणामध्ये प्रामुख्याने किमान जीवन जगण्यासाठीचे पर्याप्त उत्पन्न, अन्नधान्याची उपलब्धता या बाबींचा समावेश होतो. ज्याद्वारे महिला आपले दैनंदिन जीवन समाधानाने जगू शकतील. तसेच आपल्या भावी पिढीसाठी बचत व गुंतवणूकही करू शकतील.

**सामाजिक शाश्वतता व सबलीकरण :**

मनुष्य हा समाजशील प्राणी असल्याने अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजेइतकीच महत्त्वाची गरज आहे ती म्हणजे सामाजिक शाश्वतता. स्त्रियांना समाजामध्ये नेहमीच दुय्यम स्थान देण्यात आलेले आहे. कृषिक्षेत्र व स्त्रिया यांच्यामध्ये अनेक बाबतीत साम्य आहे. दोन्हीही या मानवजातीच्या उद्धारक आहेत; परंतु स्त्रियांना विशेष करून कृषिक्षेत्रात असणाऱ्यात स्त्रियांना सामाजिक प्रतिष्ठा, हक्क व योग्य दर्जा प्राप्त करावयाचा असेल, तर सर्वप्रथम त्या ज्या क्षेत्राशी संबंधित आहेत त्या कृषीचे सक्षमीकरण म्हणजेच शाश्वतीकरण होणे गरजेचे आहे. महिलांच्या सामाजिक सबलीकरणाचे अनेक मार्ग कृषी विकासाच्या पोटातून जातात. जसे स्त्रियांनी जमिनीची मालकी धारण करणे, सातत्यपूर्ण उत्पादन प्राप्त करणे, कृषिआधारित व्यवसाय करणे. ज्यामुळे उत्पन्न प्राप्त होऊन स्त्रियांचा सामाजिक दर्जाही उंचावतो.

**नेतृत्वशाश्वतता व सबलीकरण :**

कृषिक्षेत्र हे प्रयोगशील क्षेत्र असल्याने यामध्ये सातत्यपूर्ण प्रयोग सुरू असतात. महिला या कृषिक्षेत्राच्या आधारे आपल्या नेतृत्वगुणांचे कसब तपासून पाहू शकतात. सामूहिक गटांच्या माध्यमातून एकत्र येऊन समूह नेतृत्व करणाऱ्याच अनेक महिलांची उदाहरणे आपल्यासमोर आहेत. यामुळेच कृषिक्षेत्रातील महिलांचे अनेक गटसमूह, संस्था यांच्या आधारे त्यांच्यातील नेतृत्व गुणांचा विकास होतो. परंतु यासाठी कृषिक्षेत्र हे शाश्वत पद्धतीने विकसित होणे गरजेचे आहे, तरच या क्षेत्राशी संबंधित महिलांचे सक्षमीकरण अगदी सहजतेने होईल. व्यवस्थेतील इतर क्षेत्राच्या मानाने कृषिक्षेत्र हे महिलांच्या नेतृत्व या आयामाच्या विकासासाठी अधिक पोषक आहे. त्यामुळेच महिलांमधून सक्षम नेतृत्व तयार होण्यासाठी व सबलीकरणाचे ध्येय साध्य करण्यासाठी शाश्वत कृषी विकासाचे उद्दिष्ट दृष्टिक्षेपात आणणे नितांत गरजेचे आहे.

**शाश्वत कृषिविकास प्राप्तीचे मार्ग:**

महिला सबलीकरण व शाश्वत कृषिविकास यामधील आंतरसंबंध सविस्तरपणे पाहिल्यानंतर आता मूळ प्रश्न उरतो तो म्हणजे शाश्वत कृषी विकासाच्या प्राप्तीचा मार्ग कोणता व तो कशाप्रकारे साध्य करावयाचा हे यापुढे आपण समजावून घेऊया. प्रामुख्याने शाश्वत कृषीच्या प्राप्तीसाठी ती अवलंबून असणाऱ्या आर्थिक, नैसर्गिक व सामाजिक घटकांचा विचार करणे गरजेचे आहे. भारतासारख्या कृषिप्रधान देशात जिथे कृषिव्यवसाय हा खाजगी व्यवसाय आहे; परंतु याच्याशी संबंधित अनेक घटक हे सार्वजनिक तसेच नैसर्गिक

बाबींवर अवलंबून आहेत. जसे की, कृषी अनुदान, किमान आधारभूत किंमत, विमा अशा अनेक बाबी या शासकीय म्हणजेच सार्वजनिक घटकावर अवलंबून आहेत, तर शेतीसाठी आवश्यक असणारी संसाधने ही मुखत्वे करून निसर्गावर अवलंबून आहेत. त्यामुळेच अशा अशक्य त्रयींचे संतुलन साधून शाश्वत विकास साध्य करणे, हे अत्यंत कठीण आहे. यासाठीच शासन-समाज-संघटन या त्रिसूत्राचा वापर करून शाश्वत कृषिविकासाबरोबर महिला सक्षमीकरण साध्य करणे, ही काळाची गरज आहे, असे म्हणावे लागेल.

**अ) कृषिक्षेत्रामधील आर्थिक शाश्वतता:**

आर्थिक शाश्वतता ही प्रामुख्याने कृषिक्षेत्राच्या आर्थिक बाबींशी संबंधित आहे. भारत सरकारने २०१५-१६ नंतर कृषी जनगणना न केल्याने प्रतिशेतकरी कृषिक्षेत्रातून मिळणारे उत्पन्न व तत्सम बाबींची अलीकडील आकडेवारी उपलब्ध नाही. असे असले, तरी काही स्थूल अर्थशास्त्रीय घटकांच्या आधारे कृषिच्या आर्थिक शाश्वततेची कल्पना येऊ शकते. स्थूल देशांतर्गत उत्पन्न हे आर्थिक प्रगतीच्या मापनासाठी सर्वमान्य असे साधन आहे. कृषी व कृषिपूरक क्षेत्राकडून देशाच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये (GDP) केली जाणारी स्थूल मूल्यवृद्धी ही २०११-१२ ते २०२०-२१ या दरम्यान उणे झाल्याचे दिसून येत.


**तक्ता. क्र. ३ : कृषी व कृषिपूरक क्षेत्राची स्थूल देशांतर्गत उत्पन्नामधील स्थूल मूल्यवृद्धी**

| अ. क्र. | वर्ष | कृषी व कृषिपूरक क्षेत्राचा GDP मधील हिस्सा टक्केवारीत | |
|---|---|---|---|
| | | स्थिर किंमतीनुसार (२०११-१२) | चालू किंमतीनुसार |
| १. | २०११-१२ | ६.४ | १८.५ |
| २. | २०१२-१३ | १.५ | १८.२ |
| ३. | २०१३-१४ | ५.६ | १८.६ |
| ४. | २०१४-१५ | -०.२ | १८.२ |
| ५. | २०१५-१६ | ०.६ | १७.७ |
| ६. | २०१६-१७ | ६.३ | १७.९ |
| ७. | २०१७-१८ | ३.४ | १७.२ |
| ८. | २०१८-१९ | २.७ | १६.१ |
| ९. | २०१९-२० | २.८ | १६.५ |
| १०. | २०२०-२१ | ३.४ | १७.८ |

स्रोत: कृषी सांख्यिकी व अंदाजपत्रक २०२२-२०२३

वरील तक्ता क्र. ३ वरुन हे स्पष्ट होते की, मागील दशकात चालू व स्थिर किंमतीनुसार भारतीय कृषिक्षेत्राचा देशाच्या स्थूल देशांतर्गत उत्पन्नातील हिस्सा हा घटलेला आहे. कृषिक्षेत्राच्या या घटलेल्या हिश्श्यात वाढ झाल्याशिवाय आर्थिक कृषिक्षेत्राशी संबंधित घटकांना आर्थिक शाश्वतता प्राप्त होणार नाही. यासाठी सरकारने कृषिक्षेत्राशी संबंधित पायाभूत सेवा-सुविधांचा विकास करणे गरजेचे आहे. कृषिला शाश्वत कृषी बनविण्यासाठी

**आकृती क्र. १ कृषी व कृषिपूरक क्षेत्राची स्थूल देशांतर्गत उत्पन्नातील स्थूल मूल्यवृद्धी**




सेंद्रिय कृषिक्षेत्राचा विस्तार करावा लागेल. कृषी उत्पादनातील उत्पादन खर्च घटल्यास लाभाचे प्रमाण वाढेल, यासाठी छोट्या व अल्पभूधारक शेतकऱ्यांना समूहशेतीकडे आकर्षित करावे लागेल. ज्यामुळे शाश्वत कृषिविकासाबरोबर महिला सक्षमीकरणाचे उद्दिष्टही साध्य करता येईल.


आकृती क्र. १ मध्ये कृषी व कृषिपूरक उद्योगांचे देशाच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील स्थूल मूल्यवृद्धी दर्शविलेली आहे. मागील दशकात चालू व स्थिर किंमतीनुसार मूल्यवृद्धी अत्यंत अल्प आहे (चालू किंमतीनुसार उणे आहे) यावरून हे स्पष्ट होते की, ६०%पेक्षा अधिक लोकसंख्या ज्या क्षेत्रावर अवलंबून आहे त्यापासून होणारी मूल्यवृद्धी न्यून असून वेळीच यावर उपाय योजावे लागतील.

**ब) कृषिक्षेत्रामधील नैसर्गिक / पर्यावरणीय शाश्वतता:**

पर्यावरण हा शेतीचा आत्मा आहे. आजही भारतातील जवळपास ७०% कृषिक्षेत्र हे निसर्गावर अवलंबून आहे. अलीकडील आधुनिक कृषी पद्धतींमुळे विशेषत: रासायनिक खते, कीटकनाशके, पीकपद्धती यामुळे कृषिची नैसर्गिक / पर्यावरणीय शाश्वतता घटत चालली आहे. पुढील एका उदाहरणावरून आपण हे समजावून घेऊ. आकृती क्रमांक २ मध्ये भारतातील रासायनिक खतांच्या वापराचा कल दर्शविलेला आहे ज्यावरून आपल्याला कृषिक्षेत्रातील अशाश्वततेचा अंदाज येऊ शकेल.

आकृती क्र. २ नुसार, मागील दोन दशकात भारतातील कृषिक्षेत्रामध्ये रासायनिक खते, कीटकनाशके यांच्या वापराचा कल सातत्याने वाढताना दिसून येतो आहे. सदरचा कल हा कृषिक्षेत्राची अशाश्वतता वाढवणारा आहे यामुळेच सरकारने सेंद्रिय शेतीच्या विस्ताराला चालना देऊन शेतीशी संबंधित घटकांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. याचबरोबर सर्व शेतकऱ्यांनी ही आपल्या दैनंदिन कृषिकार्यात सेंद्रिय घटकांना प्राधान्य द्यावे. जेणेकरून त्यांची शेती ही शाश्वत राहील, ज्यायोगे सर्व घटकांचे व विशेष करून महिलांचे सबलीकरण करणे सहज शक्य होईल.


आकृती क्र. २ : भारतातील कृषिक्षेत्रात रासायनिक खते व कीटकनाशकांच्या वापराचा कल




**ब) कृषिक्षेत्रामधील सामाजिक शाश्वतता:**

भारतातील कृषिक्षेत्राचा लोकांच्या सामाजिक बाबींशी अत्यंत जवळचा संबंध आहे. कृषिउत्पादनामुळे जरी शेतकऱ्याची आर्थिक गरज पूर्ण होत असली, तरी सामाजिक गरजांच्या पातळीवरही शाश्वत कृषिविकासाचे परीक्षण होणे गरजेचे आहे. कृषिक्षेत्राच्या सामाजिक शाश्वततेत प्रामुख्याने शेतकऱ्यांशी संबंधित सामाजिक बाबी जे की दारिद्र्य, अन्नधान्याची उपलब्धता, सामाजिक प्रतिष्ठा, जीवनमान यांसारख्या घटकांचा समावेश होतो. यापैकी जीवनमान हा घटक महत्त्वाचा असून यासंदर्भात पुढील आकृती हे चित्र योग्यरीत्या स्पष्ट करेल.

आकृती क्र. ३ : भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या



आकृती क्र. ३ नुसार भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येत अल्पशी घट दिसत असली, तरी हे प्रमाण दरवर्षी दहा हजाराच्या घरात आहे. म्हणजेच अजूनही कृषिक्षेत्राद्वारे जीवनमानाची पर्याप्त पातळी गाठणे सर्वांना शक्य झालेले नाही. भारतातील शेतकरी आत्महत्या ह्या या क्षेत्राच्या अशाश्वततेचे दर्शन घडवतात. यासाठीच सरकारने सामाजिक सक्षमीकरण वाढवणे गरजेचे आहे. यासाठी कृषिपिकविमा योजनेचा विस्तार करणे, सर्व शेतकऱ्यांना जीवनविमा, अपघातविमा अशा प्रकारचे विमा कवच प्रदान करणे. महिला सबलीकरणासाठी महिला शेतकऱ्यांना विशेष सवलती प्रदान करणे. शाश्वत कृषिद्वारे लिंग समानतेचे उद्दिष्टही या निमित्ताने गाठता येईल.

वरील कृषिउपायांचा अवलंब करून भारतीय कृषिला शाश्वत कृषी बनवणे शक्य आहे; परंतु यासाठी फक्त शासकीय उपायांपुरतेच मर्यादित न राहाता प्रत्येक शेतकऱ्याने व्यक्तिगत पातळीवर अनेक उपाय अंगिकारले पाहिजेत. जसे की,

- दैनंदिन कृषिव्यवस्थापन (शेती करण्याची पद्धती) ही पर्यावरण पूरक असली पाहिजे. जी आपली प्राथमिकता आहे.
- कृषि व्यवसायात घेतले जाणारे सर्व निर्णय हे फक्त आर्थिक निकषांचा विचार करून न घेता त्याबरोबर सामाजिक व पर्यावरणीय घटकांचाही विचार होणे गरजेचा आहे.
- कृषीची स्थावर मालमत्ता व एकूण उत्पन्नापैकी किमान अर्धे उत्पन्न हे स्त्रीच्या मालकीचे असले पाहिजे. जेणेकरून महिला सबलीकरणाचे आर्थिक उद्दिष्ट तरी साध्य होईल.
- या व्यतिरिक्त समाजामध्ये प्रयोगशील महिला शेतकऱ्यांचा उचित सन्मान झाला पाहिजे. तसेच इतर महिला शेतकऱ्यांना कृषिव्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. ज्यामुळे त्यांचा सक्रिय सहभाग वाढेल व स्वत:ची ओळख निर्माण करता येईल.

**समारोप :**

भारतासारख्या लोकशाही व्यवस्थेत महिला सबलीकरणाचे ध्येय आजतरी साध्य होताना दिसत नाही. नोकरी व्यवसायात संख्येने अल्प असणाऱ्या व आर्थिक सधनताप्राप्त काही महिला गटाला वगळता खूप मोठा स्त्रीसमूह हा आपल्या मूलभूत हक्कांपासून वंचित आहे. भारतातील सर्वात मोठ्या खाजगी क्षेत्रात म्हणजे कृषिक्षेत्रात अशा महिलांचे प्रमाण खूप अधिक आहे. ज्या सबल नाहीत अशा महिलांची सरकारने सर्वप्रथम वेगळी जनगणना करणे गरजेचे आहे. विशेष करून कृषिक्षेत्राशी संबंधित असणाऱ्या महिलांची आर्थिक, सामाजिक व अधिकार क्षमता या पातळीवर सक्षमता मोजणे व सातत्याने त्याचे अवलोकन करणे गरजेचे आहे. ज्यायोगे जगातील सर्वात मोठ्या लोकशाही प्रधान व्यवस्थेचे हे ध्रुवीकरण (स्त्री-पुरुष असमानता) होणार नाही. शाश्वत कृषिक्षेत्राच्या साहाय्याने आपल्याला महिला सबलीकरण करण्याची व महिलांना खऱ्या अर्थाने न्याय व संधीची समानता देण्याची संविधानाची वचनबद्धता पाळता येईल.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


- Bhuyan, P. M. (2020). Women empowerment: Issues and challenges. PalArch's Journal of Archaeology of Egypt/Egyptology, 17(6), 2393-2398.
- Department of Agriculture, Cooperation Farmers' Welfare, Annual Report 2020-21, Ministry of Agriculture Farmers' Welfare Government of India Krishi Bhawan, New Delhi-110 001.
- Duflo, E. (2012). Women empowerment and economic development. Journal of Economic

literature, 50(4), 1051-79.

- Economic Survey of India, 2021-22 Statistical Appendix
- Ghosh, M., Ghosh, A. (2014). Analysis of women participation in Indian agriculture. IOSR J. Human. Soc. Sci, 19(5), 1-6.
- Gupta, Niti, Shanal Pradhan, Abhishek Jain, and Nahya Patel. 2021. Sustainable Agriculture in India 2021: What We Know and How to Scale Up. New Delhi: Council on Energy, Environment and Water.
- Mishra, A. D. (2014). Women empowerment: issues and challenges. Indian journal of public administration, 60(3), 398-406.
- Mandal, K. C. (2013). Concept and Types of Women Empowerments. In International Forum of Teaching Studies (Vol. 9, No. 2).
- Patil D. B., (2015). Women empowernment: Historical review and Background. International Multidisciplinary E-Journal,Vol-IV, Issue-XI page. 71-77.
- Rahman, M. (2013). Women's empowerment: Concept and beyond.
- Santra, S. K., Kundu, R. (2001). Women's empowerment for sustainable agriculture development. Manage Extension Research Review, 11, 35-39.
- Subhashini, S. (2018). A theoretical study on issues and challenges of women empowerment in Indi. International Research Journal of Engineering and Technology, 5(4), 2688-2691.
- Sharaunga, S., Mudhara, M., Bogale, A. (2019). Conceptualisation and measurement of women's empowerment revisited. Journal of Human Development and Capabilities, 20(1), 1-25.
- Singh, S., Singh, A. (2020). Women Empowerment in India: A Critical Analysis. Tathapi, 19(44), 227-253.
- Tembhre, M. (2018, March). Challenges and Prospects of Women Empowerment in India. In Women Science Congress, 105th Indian Science Congress (pp. 16-20).
- Thanikaivel, M., Priya, K., Elayamplayam, T., & Nadu, T. (2018). Economic empowerment of women In India. International Journal of Technical Research Science, 3(7), 251-253.

◆

**निवेदन : अर्थसंवाद**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल तर त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा; मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# मानव विकास निर्देशांक

**बाळासाहेब सुधाकर वाकचौरे** †
**तृप्ती बाळासाहेब वाकचौरे** ††

**प्रस्तावना :**

मानव विकास म्हणजे लोकांना मिळणाऱ्या संधीचा परीघ मोठा करण्याची प्रकिया होय. म्हणजेच मानवाचा केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, मानसिक, सांस्कृतिक अशा सर्व बाजूंनी विकास होणे होय. मानवाच्या सर्वच व्यवहाराचे अंतिम उद्दिष्ट मानव विकास हेच असते. हे जरी सत्य असले, तरी त्याचे मोजमाप करणे तेवढी सोपी प्रकिया नाही. सन १९९०मध्ये संयुक्त राष्ट्रविकास कार्यक्रम यांनी पहिला मानव विकास अहवाल प्रकाशित केला. या अहवालात मानव विकास म्हणजे काय? मानव विकास निर्देशांक कसा मोजायचा? तो कसा तयार करावा याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. मानव विकास निर्देशांक तयार करण्याचे कार्य अर्थतज्ज्ञ मेहबुब उल हक यांनी केले. तर भारतीय अर्थतज्ज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांच्यामुळे त्यास शास्त्रीय स्वरूप प्राप्त झाले. या निर्देशांकाचे एकूण मूल्य ० ते १ च्या दरम्यान असून निर्देशांक जेवढा १ या अंकाच्या जवळ असेल तेवढा देशाचा विकास चांगला असले.

आर्थिक विकास आणि वृद्धी या दोन संकल्पनेपेक्षा मानव विकास ही संकल्पना अधिक व्यापक स्वरूपाची आहे. मानव विकास संकल्पनेत आर्थिक वृद्धी आणि विकास संकल्पनेशिवाय इतर महत्त्वपूर्ण निर्देशाकांचा विचार केला जातो. त्यामध्ये प्रामुख्याने सरासरी आयुर्मान, शालेय शिक्षणाची अपेक्षित वर्षे, शिक्षणासाठी शालेय शिक्षणाची वर्षे व दरडोई सकल राष्ट्रीय उत्पन्न इत्यादी घटकांचा समावेश होतो. याउलट आपण पाहिले तर आर्थिक वृद्धीमध्ये फक्त उत्पन्नाचाच विस्तारित स्वरूपाने विचार केला जातो. मानवी विकास हा आर्थिक विकास आणि उत्पन्नाचा विनियोग त्याचबरोबर काही बिगर आर्थिक घटकांवर देखील अवलंबून असतो. देशाच्या आर्थिक विकासासाठी मानवी संसाधन हा फार महत्त्वपूर्ण घटक आहे. मानवी संसाधनांची व्याप्ती ही राष्ट्रातील लोकसंख्या, शिक्षण आणि रोजगार या घटकांशी निगडित आहे.

† सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, डॉ. बी.एस. पुरंदरे कला, श्रीमती एस.जी. गुप्ता वाणिज्य व श्रीमती एस.ए. मिठाईवाला विज्ञान महाविद्यालय लोणावळा.
आजीव सभासद क्र. १७१७, भ्रमणध्वनी : ९९७०२२६००९, ई-मेल : balasaheb.wakchaure88@gmail.com
†† सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, तळेगाव, दाभाडे
भ्रमणध्वनी : ८४५९९९५४१५, ई-मेल : truptigujar1990@gmail.com

**उद्दिष्ट्ये :**

१. मानवी विकास संकल्पनेचा आढावा घेणे.
२. भारतातील आणि जागतिक मानवी विकासाची स्थिती जाणून घेणे.
३. लोकसंख्या व मानव विकास निर्देशांक अभ्यासणे.
४. मानव विकास निर्देशांक व तो ठरविणारे पैलू अभ्यासणे.

**मानव विकास निर्देशांक :**

मानव विकास निर्देशांक हा देशाच्या सामाजिक आणि आर्थिक परिणाम लोकांचे आरोग्य शैक्षणिक स्थिती आणि त्यांचे जीवनमान यावर आधारित असतो. प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ मेहबुब उलहक, गुस्ताव रॅनिश, डॉ. अमर्त्य सेन आणि लॉर्ड मेघानंद देसाई यांनी मिळून १९९० मध्ये मानव विकास निर्देशांकाची निर्मिती केली. ज्याचा वापर संयुक्त राष्ट्रविकास कार्यक्रमाद्वारे देशाच्या विकासाचे मोजमाप करण्यासाठी केला जातो. प्रत्येक वर्ष संयुक्त राष्ट्रविकास कार्यक्रम व त्यांच्या वार्षिक अहवालात जाहीर केलेल्या आकडेवारीच्या आधारे देशाची मानवी विकासाची क्रमवारी लावली जाते. सन २०२० च्या मानव विकास अहवालामध्ये १८९ देशांच्या यादीमध्ये भारताचा १३१ वा क्रमांक लागतो. या क्रमांकाचा आधारे भारताला मध्यम मानव विकासात स्थान मिळाले आहे. यापूर्वी भारताचे स्थान १२९ क्रमांकाचे होत. यामध्ये सुधारणा होण्याऐवजी उलट २ क्रमांकांनी घसरल्याचे दिसून येते.

**मानव विकास निर्देशांक पैलू :**

**१. लोकांचे आरोग्य**

मानवाचा विकास झाला म्हणजे त्यांचे आरोग्य चांगले, उत्तम असायला हवे. हे आकडेवारीमध्ये मोजण्याचा निकष निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार हे सरासरी आयुर्मान २५ ते ८५ वर्षे यामध्ये मोजले जाते.

**२. लोकांचे ज्ञान**

मानवाचा विकास झाला म्हणजे लोकांच्या ज्ञानात होणारी वाढ होय. हे मोजण्यासाठी प्रौढ साक्षरता दर व संयुक्त पट नोंदणी प्रमाण या निकषांचा अनुक्रमे २/३ व १/३ महत्त्व देवून निर्देशांक काढण्यात येतो.

**३. चांगले राहाणीमान**

हा दर्जा लोकांच्या वस्तू व सेवा यांच्या उपभोगावर अवलंबून असतो. हे मोजण्यासाठी देशांतर्गत स्थूल दरडोई उत्पन्न हा निकष विचारात घेतला जातो. हे १०० ते ४०००० डॉलर यामध्ये मोजण्यात येतो.

**जीवनाची गुणवत्ता मोजण्यासाठी आणखीन काही पैलू :**

- पोषण (कुपोषण नसणे).
- मुलाचे शिक्षण व लग्न वय.
- जन्म वजन (नवीन जन्माच्याबाबत).
- स्वातंत्र्य व मानवी हक्क.
- पुरेसे व पिण्याचे स्वच्छ पाणी.
- कचरा, सांडपाणी यांची व्यवस्था.
- स्वच्छतागृहांची सोय.
- स्वस्त व नजीक आरोग्यसेवा.
- स्त्रियांचे कौटुंबिक सामाजिक स्वातंत्र्य.
- खेळ, करमणूक, आनंदाची संधी असणे.
- परिसर व पर्यावरण निरोगी व सुरक्षित असणे.
- बचत व आर्थिक सुरक्षितता.
- सामाजिक सलोखा व भीतीमुक्त समाज.
- सुगम आणि स्वच्छ प्रशासन.

**मानव विकास निर्देशांक व जगातील निवडक देशांचे स्थान :**

संयुक्त राष्ट्रविकास कार्यक्रमाद्वारे प्रसारित करण्यात आलेल्या २०२०च्या मानव विकास अहवालानुसार, निवडक देशांतील मानव विकास आकडेवारी तक्ता क्र. १ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्र. १ : जागतिक मानव विकासाची सद्यस्थिती २०२०**

| अ.नं. | देश | मानव विकास निर्देशांक मूल्य (२०१९) क्रमांक | उच्च मानव विकास निर्देशांक |
|---|---|---|---|
| १ | नॉर्वे | ०.९५४ | १ |
| २ | आयर्लंड | ०.९४६ | २ |
| ३ | स्वित्झर्लंड | ०.९४२ | ३ |
| ४ | जर्मनी | ०.९३९ | ४ |
| ५ | हाँगकाँग | ०.९३९ | ५ |
| ६ | ऑस्ट्रेलिया | ०.९३८ | ६ |
| | | मध्यम मानव विकास निर्देशांक | |
| ७ | भुतान | ०.९५४ | १२९ |
| ८ | भारत | ०.६४५ | १३१ |
| ९ | बांगलादेश | ०.६३२ | १३३ |
| १० | नेपाळ | ०.६०२ | १४२ |
| ११ | पाकिस्तान | ०.५५७ | १५४ |
| | | कमी मानव विकास निर्देशांक | |
| १२ | सिएरा लियोन | ०.४५२ | १८२ |
| १३ | माली | ०.४३४ | १८४ |
| १४ | दक्षिण सुदान | ०.४३३ | १८५ |
| १५ | चाड | ०.३९८ | १८७ |
| १६ | सेंट्रल ऑफ्रीकन रिपब्लिक | ०.३९७ | १८८ |
| १७ | नायजर | ०.३९४ | १८९ |

(स्त्रोत- संयुक्त राष्ट्रविकास कार्यक्रम मानव विकास निर्देशांक अहवाल २०२०)

तक्ता क्र. १ मध्ये मानव विकासाच्या क्रमवारीत जगातील १८९ देशांमध्ये भारताचा १३१वा क्रमांक आहे. यामध्ये तीन प्रकारात वर्गवारी केली असून, याद्वारे जगातील देशांचे विकसित, विकसनशील व अविकसित या प्रकारात वर्गीकरण करण्यासाठीदेखील उपयोग केला जातो. यामध्ये उच्च मानव विकास निर्देशांक असलेली पाच राष्ट्रे पुढीलप्रमाणे नॉर्वे ०.९५४, आयर्लंड ०.९४६, स्वित्झर्लंड ०.९४२, जर्मनी ०.९३९, व हाँगकाँग ०.९३९ या राष्ट्राचा समावेश होतो, तर मध्यम मानवी विकास असणारी निवडक आशिया खंडातील राष्ट्रे पुढीलप्रमाणे भुतान ०.६५४, भारत ०.६४५, बांगलादेश ०.६३२, नेपाळ ०.६०२ व पाकिस्तान ०.५५७ यांचा समावेश होतो. तर सर्वात कमी मानवी विकास निर्देशांक असलेली राष्ट्रे अनुक्रमे सिएरा लियोन ०.४५२, माली ०.४३४, दक्षिण सुदान ०.४३३, चाड ०.३९८, सेंट्रल आफ्रीकन रिपब्लिक ०.३९७ व नायजर ०.३९४ या राष्ट्रांचा समावेश होतो.

### तक्ता क्र. २ भारतातील मानव विकास निर्देशांक

| अ. नं. | राज्य व केंद्रशासित प्रदेश | मानव विकास निर्देशांक मूल्य (२०१९) क्रमांक | उच्च मानव विकास निर्देशांक |
|---|---|---|---|
| १ | केरळ | ०.७८२ | १ |
| २ | चंदीगड | ०.७७६ | २ |
| ३ | गोवा | ०.७६३ | ३ |
| ४ | लक्षद्वीप | ०.७५१ | ४ |
| ५ | दिल्ली | ०.७४६ | ५ |
| ६ | अंदमान निकोबार | ०.७४१ | ६ |
| ७ | पाँडेचरी | ०.७४० | ७ |
| ८ | हिमाचल प्रदेश | ०.७२५ | ८ |
| ९ | पंजाब | ०.७२४ | ९ |
| १० | सिक्कीम | ०.७१७ | १० |
| ११ | तामिळनाडू | ०.७०९ | ११ |
| १२ | दीव - दमण | ०.७०८ | १२ |
| १३ | हरियाणा | ०.७०८ | १२ |
| १४ | मिझोराम | ०.७०४ | १४ |
| | | **मध्यम मानव विकास निर्देशांक** | |
| १ | महाराष्ट्र | ०.६९७ | १५ |
| २ | मणिपूर | ०.६९७ | १५ |
| ३ | जम्मू-काश्मीर | ०.६८८ | १७ |
| ४ | उत्तराखंड | ०.६८३ | १८ |
| ५ | कर्नाटक | ०.६८३ | १९ |
| ६ | नागालँड | ०.६७९ | २० |
| ७ | गुजरात | ०.६७२ | २१ |
| ८ | तेलंगणा | ०.६६९ | २२ |
| ९ | दादर नगर हवेली | ०.६६३ | २३ |
| १० | अरुणाचल प्रदेश | ०.६६१ | २४ |
| ११ | त्रिपुरा | ०.६५८ | २५ |
| १२ | मेघालय | ०.६५८ | २६ |
| १३ | आंध्रप्रदेश | ०.६४९ | २७ |
| | | **कमी मानव विकास निर्देशांक** | |
| १ | पश्चिम बंगाल | ०.६४१ | २८ |
| २ | राजस्थान | ०.६२८ | २९ |
| ३ | आसाम | ०.६१३ | ३० |
| ४ | छत्तीसगड | ०.६११ | ३१ |
| ५ | ओडीसा | ०.६०६ | ३२ |
| ६ | मध्यप्रदेश | ०.६०३ | ३३ |
| ७ | झारखंड | ०.५९९ | ३४ |
| ८ | उत्तरप्रदेश | ०.५९६ | ३५ |
| ९ | बिहार | ०.५७४ | ३६ |

(स्त्रोत- मानव विकास निर्देशांक अहवाल २०१९)

**भारतातील मानव विकास निर्देशांक :**

भारतातील राज्य व केंद्रशासित प्रदेशनिहाय मानव विकास निर्देशांक तक्ता क्र. २ मध्ये तीन प्रकारात वर्गीकरण केलेला आहे.

तक्त्यामध्ये भारतातील वेगवेगळी घटक राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचा मानव विकास दर्शविला असून, उच्च मानव विकास असणारी एकूण ८ घटकराज्ये व ६ केंद्रशासित प्रदेश आहे. सर्वाधिक मानव विकास असणारे राज्य केरळ ०.७८२ असून या राज्याचा प्रथम क्रमांक लागतो. तर चंदीगड ०.७७६, गोवा ०.७६३ लक्षद्वीप ०.७५१ व दिल्ली ०.७४६ असून पहिल्या पाचमध्ये दोन घटकराज्ये व तीन केंद्रशासित प्रदेशांचा समावेश होतो. तर मध्यम मानव विकास निर्देशांक असणारी एकूण १२ घटकराज्ये व एक केंद्रशासित प्रदेश आहे. महाराष्ट्र राज्याचा समावेशदेखील मध्यम मानव विकास असणाऱ्या वर्गामध्ये होतो. यामध्ये महाराष्ट्राचा मानव

विकास निर्देशांक ०.६९७ असून त्याचा १५वा क्रमांक लागतो. तर जम्मू आणि काश्मीर ०.६८८, कर्नाटक ०.६८३, गुजरात ०.६७२, मेघालय ०.६५८ व आंध्रप्रदेश ०.६४९ इत्यादी महत्त्वपूर्ण राज्ये आणि दादर व नगर हवेली ०.६६३ या केंद्रशासित प्रदेशांचा समावेश होतो.

कमी मानव विकास निर्देशांक म्हणजेच ज्याचे मानव निर्देशांक मूल्य ०.६४५ पेक्षा कमी आहे. अशा एकूण ९ घटकराज्यांचा समावेश होतो. यामध्ये पश्चिम बंगाल ०.६४१, राजस्थान ०.६२८, आसाम ०.६१३, छत्तीसगड ०.६११, ओडीसा ०.६०६, मध्यप्रदेश ०.६०३, झारखंड ०.५९९, उत्तर प्रदेश ०.५९६ व सर्वात कमी मानव विकास निर्देशांक मूल्य असणाऱ्या बिहार ०.५७४ या राज्यांचा समावेश होतो.

अशाप्रकारे भारतातील केरळ राज्याचा मानव विकास निर्देशांकात प्रथम क्रमांक लागतो, तर बिहार या राज्याचा सर्वात शेवटी म्हणजे ३६ वा क्रमांक लागतो. भारतातील केंद्रशासित सात प्रदेशांपैकी सहा प्रदेशांचा उच्च मानव विकास वर्गात समावेश होतो, तर केवळ एक दादर नगर हवेली याच्याच फक्त मध्यम मानव विकास असणाऱ्या वर्गामध्ये समावेश होतो. यावरून असे दिसून येते की, भारतातील केंद्रशासित प्रदेशांचा मानव विकास चांगला आहे.

**महाराष्ट्रातील मानव विकास अहवाल २००२ :**

हा राज्याचा मानव विकासाची परिस्थिती दर्शविणारा पहिला प्रयत्न होता. त्यामध्ये प्रामुख्याने दारिद्र्य, समानता, शिक्षण, आरोग्य व पोषण इत्यादी घटकांचा विचार केला होता. त्यानंतर राज्याने मानव विकास संबंधित निर्देशांकात भरीव प्रगती केलेली आहे. त्यासाठी पुढील उपाययोजना राबविल्या.

१. महाराष्ट्र राज्य मानव विकास अहवाल २००२ नुसार महाराष्ट्र राज्याचा मानव विकास निर्देशांक ०.५८ एवढा होता.
२. मराठवाड्यातील प्रत्येक व राज्यातील काही जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक सरासरीपेक्षा खूपच कमी होता.
३. अतिमागस जिल्ह्याचा मानव विकास वाढविण्यासाठी राज्य सरकारने २९ जून २००६ मध्ये महाराष्ट्र मानव विकास मिशन गठीत केले.
४. या अंतर्गत २५ तालुके व १२ जिल्ह्यांचा त्यामध्ये समावेश करण्यात आला.
५. मानव विकास निर्देशाकांत वाढ होण्यासाठी दरडोई उत्पन्न, आरोग्य, दारिद्र्य निर्मूलन, शिक्षण सुविधा यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.

आजही महाराष्ट्राचा विचार करता मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक या शहरांचा विकास अधिक प्रमाणात होऊन तेथील मानव विकास उच्च आहे, तर महाराष्ट्रातील काही जिल्ह्याचा मानव विकास खूप कमी आहे.

**निष्कर्ष :**

१. मानव विकास हा आर्थिक विकासाचा महत्त्वाचा भाग आहे.
२. भारताच्या मानवी विकासाचे मूल्य ०.६४५ एवढे असून, भारताचा मध्यम मानवी विकास असणाऱ्या राष्ट्रांमध्ये समावेश होतो.
३. १९९० ते २०२० या तीस वर्षांच्या काळात भारताचे मानव विकासाचे मूल्य ०.३०१ वरून ते वाढत ०.६४५ म्हणजेच दुप्पट झाले आहे.
४. मानव विकास निर्देशांकात नॉर्वे प्रथम क्रमांकावर आहे, तर नायजर हे राष्ट्र सर्वात शेवटच्या स्थानावर आहे.
५. मानव विकास निर्देशांकात सुधारणा होण्यासाठी देशाचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे.
६. भारतातील केरळ या राज्याचा मानव विकास सर्वाधिक चांगला आहे.

७. भारतातील केंद्रशासित प्रदेशांचादेखील मानव विकास अधिक चांगला असल्याचे दिसून येते.

८. महाराष्ट्र राज्याचा मध्यम मानव विकास वर्गात समावेश होतो.

९. बिहार या राज्याचा सर्वात कमी मानव विकास असल्याचे निदर्शनास येते.

१०. सन २००२ मध्ये महाराष्ट्र राज्याने पहिला मानव विकास अहवाल सादर केला.

११. सन २००२ मध्ये महाराष्ट्रातील सर्वात कमी मानव विकास गडचिरोली जिल्ह्याचा होता, तर गरीब जिल्हा धुळे व श्रीमंत मुंबई शहर होते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. मनोज कुमार, २०१३, आर्थिक मानव संसाधन विकास, अर्जून पब्लिसिंग हाउस.

२. मिश्रापूरी, भारतीय अर्थव्यवस्था, हिमालय पब्लिशिंग हाउस, नवी दिल्ली.

३. Dhamdhere S.V. Indian & Global Econamic Development.

४. Human Development in Maharashtra bhakri saman & Gopalji, (2005) New Delhi.

५. Human Development Report 2020.


**संकेत स्थळे :**


१. www.undp.org.in

२. https://en.wikipedia.org/wiki/Human_Development_Index

३. https://en.wikipedia.org/wiki/Economy_of_India

४. https://www.studycircleonline.com

५. https://mrmwikiedia.org

६. https://arogya.maharashtra.com


◆

सरकारला महागाई इतके इतर कोणीही कमकुवत करू शकत नाही.

**- जे. के. गालब्रेथ**

## निवेदन - अर्थसंवाद

अर्थसंवादच्या सर्व वर्गणीदार शैक्षणिक संस्था, व्यावसायिक संस्था, ग्रंथालयांना कळविण्यात येते की, मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणी व सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार १ एप्रिल, २०२० पासून अर्थसंवादची त्रैवार्षिक वर्गणी २००० रु. व पंचवार्षिक वर्गणी ३००० रु. करण्यात आलेली आहे. ज्या वर्गणीदार सदस्यांनी यापूर्वीच जुन्या दराने रक्कम पाठवली आहे त्यांनी फरकाची रक्कम त्वरित पाठवून देवून सहकार्य करावे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# वसई तालुक्यातील भूमिहीन शेतमजूर महिलांची सामाजिक-आर्थिक स्थिती

**संजय फु. फड** †
**सुचिता सं. फड** ††

**प्रस्तावना :**

भारतातील कृषी व्यवसायास आजही अर्थव्यवस्थेचा कणा संबोधिले जाते. कारण आर्थिक पाहणी २०२१-२२ नुसार, कृषी आणि कृषी संलग्न कार्ये यांचा सकल मूल्यवर्धिता (GVA) मधील हिस्सा १८.८% असून आर्थिक पाहाणी २०२०-२१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, देशातील जवळपास ५४.६% रोजगार कृषी क्षेत्रात प्राप्त होतो. प्राचीन काळापासून भारतातील लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था कृषिप्रधान असून, शेती व्यवसायाच्या विकासातून ग्रामीण विकासाला दिशा देण्याचा प्रयत्न करणारे राज्य म्हणून महाराष्ट्र हे भारतात आघाडीवर असल्याचे दिसते.

मानवी इतिहासात महिलांचा कृषी व कृषी आधारित व्यवसायातील सहभाग प्राचीन काळापासून महत्त्वाचा राहिला आहे. ग्रामीण भागातील महिलांचे जागतिक स्तरावर एक महत्त्वपूर्ण स्थान असून महिला घरातील सर्व कामे करून शेतीमधील विविध प्रकारची कामे जसे पेरणी, कापणी व तत्सम कामे करताना दिसून येतात. जागतिकीकरण होऊनही अलीकडच्या काळात कृषी व्यवसायात काम करणाऱ्या महिलांची आर्थिक व सामाजिक स्थितीत फारशी सुधारणा झालेली दिसत नाही. कृषी व्यवसायात महिलांची भूमिका महत्त्वपूर्ण असूनही त्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. आजही महिला शेतमजूर या मुख्य प्रवाहात दिसून येत नाहीत. प्रस्तुत लेखात वसई तालुक्यातील भूमिहीन शेतमजूर महिलांची सामाजिक-आर्थिक स्थिती प्रस्तुत केली आहे आणि ती पूर्णतः प्राथमिक माहितीवर आधारित आहे.

**भूमिहीन शेतमजुरांच्या व्याख्या:**

- पहिली शेतमजूर चौकशी समिती (१९५०-५१) च्या मते, 'शेतमजूर म्हणजे असे मजूर की, जे मजुरीसाठी शेतीमध्ये पिकांचे उत्पादन करण्यासाठी काम करतात. तसेच त्यांना वर्षभरातून निर्णय दिवसांपेक्षा जास्त दिवस शेतीमध्ये काम करावे लागते.'
- राष्ट्रीय श्रम आयोग २००२ नुसार, 'भूमिहीन शेतमजूर म्हणजे असे शेतमजूर की, त्यांच्याकडे शेती

† सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई.
आजीव सदस्य क्रमांक: १८५९, भ्रमणध्वनी क्रमांक: ९७७३५३९५९७, ई-मेल: sanjayphad@gmail.com
†† एम. ए. अर्थशास्त्र, (माजी विद्यार्थिनी) अण्णासाहेब वर्तक कला महाविद्यालय, वसई रोड (पश्चिम).
भ्रमणध्वनी क्रमांक: ९४०४५५९४३५, ई-मेल: suchitasphad@gmail.com

करण्यासाठी स्वतःच्या मालकीची जमीन नसते, अशा शेतमजुरांना भूमिहीन शेतमजूर असे म्हणतात.'

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:**

१. भूमिहीन महिला शेतमजुरांची शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक स्थितीविषयीची माहिती जाणून घेणे.

२. भूमिहीन शेतमजूर महिलांचा राहाणीमानाचा दर्जा जाणून घेणे.

३. भूमिहीन शेतमजुरांना प्राप्त विविध शासकीय योजनांच्या लाभांविषयी अभ्यास करणे.

४. भूमिहीन शेतमजूर महिलांच्या समस्यांना अभ्यासणे व त्यांच्या सोडवणुकीसाठी उपाय सुचविणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन वर्णनात्मक स्वरूपाचे असून, यात वसई तालुक्यातील भूमिहीन शेतमजूर महिलांची सामाजिक-आर्थिक स्थिती संदर्भातील वास्तविक तथ्यांचे विवेचन संशोधकांनी केले आहे. वसई तालुक्यातील एकूण ९,४७४ महिला शेतमजुरांपैकी कळंब (मोगरवाडी) येथील १९, शिरवली येथील २१ आणि करण्जोन येथील १० अशी एकूण ५० शेतमजूर महिला प्रतिसादकांची गैर संभाव्यता नमुना प्रकारातील सोयीस्कर नमुना पद्धतीचा वापर करून नमुना निवड केलेली आहे. एकूण ५० शेतमजूर महिला प्रतिसादकांची मुलाखत आणि अनुसूचीद्वारे प्राथमिक माहिती संकलित केली आहे. प्राथमिक आणि दुय्यम माहितीच्या वापरातून संकलित केलेल्या माहितीचे साधे संख्याशास्त्रीय साधने जसे प्रमाण, टक्केवारी आणि सरासरी यांचा वापर करून विश्लेषण केले आहे.

**संशोधन साहित्याचा आढावा:**

गोरे (२०१५) यांनी त्यांच्या 'भूमीहीन शेतमजूर स्त्रियांचा समाजशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा' या शोधप्रबंधामध्ये भूमिहीन शेतमजूर स्त्रियांच्या वैवाहिक, कौटुंबिक, शैक्षणिक, आर्थिक व आरोग्य विषयक समस्यांचा अभ्यास केलेला आहे. त्यांच्या अभ्यासानुसार, भूमिहीन शेतमजूर महिलांच्या आर्थिक स्थितीसंदर्भात ६१.५०% महिला कर्जबाजारी आहेत. तसेच स्त्री-पुरुषांना समान कामासाठी समान वेतन दिले जात नाही. कामाच्या ठिकाणी शेतमजूर महिलांना आवश्यक सेवासुविधा जसे कामाच्या ठिकाणी जाण्यासाठी वाहनांची व्यवस्था किंवा अपघात होऊ नये म्हणून कोणतीही साधने पुरवली जात नाहीत. शेतमालकाकडून शेतमजूर महिलांचे आर्थिक शोषण होते. कारण हंगाम नसतो तेव्हा शेतमालक देईल तेवढ्या मजुरीवर त्यांना काम करावे लागते. तसेच काही शेतमालकांनी त्यांच्या मजुरीचे पैसे बुडवले आहेत, असे नमूद केले आहे. शेतमजूर महिलांना कुटुंबात निर्णय घेण्याचा अधिकार नाही. त्याचप्रमाणे स्वतःचे कमवलेले पैसे खर्च करण्याचे स्वातंत्र्यदेखील नाही. २३% महिलांचे प्राथमिक स्तरावर तर २०% महिलांचे शिक्षण माध्यमिक स्तरावर आहे. ५३% महिला निरक्षर आहेत. शेतमजूर महिलांवर धर्माचा प्रभाव आहे. त्याचप्रमाणे त्यांच्यात अंधश्रद्धेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. भूमिहीन शेतमजूर महिलांची आर्थिक स्थिती हालाखीची आहे. आरोग्यविषयक समस्या मोठ्या प्रमाणात आहेत.

शिंदे (२०१०) यांनी 'शेतमजूर महिलांच्या घामाला हवे जादा दाम' या सदराखाली शेतमजूर महिलांच्या स्थितीवर प्रकाश टाकला आहे. त्यांच्या मते, महिला शेतमजुरांना शेतकऱ्यांद्वारे दुय्यम वागणूक मिळताना दिसून येते. कारण पुरुष शेतमजुरांपेक्षा त्यांना कमी वेतन देण्यात येते. एका बाजूने सर्व क्षेत्रांमध्ये महिला पुरुषांच्या बरोबरीने स्थान प्राप्त करत आहेत. त्यांना इतर क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीने वेतन देण्यात येते. परंतु मराठवाडा, विदर्भ, कोकण महाराष्ट्रातील सर्वच भागांत महिला शेतमजुरांना दुय्यम स्थान मिळत आहे. सारख्याच कामालाही स्त्री-पुरुषांना वेगवेगळे वेतन दिले जाते.

शेतमजुरांबाबत कायद्याची अंमलबजावणी करताना कामगार आयुक्त कार्यालयाकडून दुर्लक्ष करण्यात येते. ठाणे जिल्ह्यात स्त्री-पुरुष शेतमजुरांच्या कामाचे तास सारखेच आहेत. हंगामामध्ये काही भागात शेतमजुरांना मजुरीसह जेवण, न्याहारी दिली जाते. कारण त्यामुळे वेगाने काम होते. पेरणीच्या सुरुवातीस शेतमजुरांना चांगला मजुरी दर प्राप्त होतो. पण नंतर पाऊस कमी झाल्याने मजुरीच्या शोधात त्यांना भटकंती करावी लागते. पुरुषांच्या बरोबरीनेच काम करूनही त्यांना पुरुषापेक्षा कमी मजुरी प्राप्त होते. सारांश स्वरूपात ते मांडतात की, महिला आणि पुरुष शेतमजुरांच्या कार्यक्षमतेमध्ये भिन्नता असल्याने वेतन भेद दिसून येतो.

**संशोधनाचे निष्कर्ष:**

भूमिहीन शेतमजूर महिला कामगारांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक समस्यांचा अभ्यास करण्यासाठी वसई तालुक्यातील कळंब (मोगरवाडी), शिरवली आणि करण्जोन या तीन गावांमधून निवड केलेल्या एकूण ५० शेतमजूर महिलांकडून मुलाखत अनुसूचीद्वारे संकलित केलेल्या माहितीच्या आधारे विश्लेषण आणि अर्थविवेचन करून पुढील निवडक निष्कर्ष आणि सूचना मांडल्या आहेत.

**कौटुंबिक सर्वसाधारण माहिती :**

- एकूण भूमिहीन शेतमजूर महिलापैकी ६४% महिला या २१ ते ४० वयोगटातील आहेत, १६% प्रतिसादकांचे वय २० पेक्षा कमी आहे तर २०% प्रतिसादकांचे वय ४० ते ६० दरम्यान आहे. वैवाहिक स्थितीबाबत ८४% शेतमजूर महिला या विवाहित आहेत, ४% विधवा तर १२% अविवाहित आहेत. ५०% शेतमजूर महिलांच्या घरात पाच ते सहा सदस्य आहेत, ७ ते ८ सदस्य असणारी १८% कुटुंबे आहेत. ३८% शेतमजूर महिलांच्या मुलांची संख्या ही दोन आहे, तर २०% शेतमजूर महिलांच्या मुलांची संख्या तीन आहे
- ५०% शेतमजूर महिलांच्या पतीचा व्यवसाय हा शेतमजुरी आहे, तर इतर महिलांचे पती कंपनीत मजुरी (१४%), करार मजुरी (३%), चपराशी (ग्रामपंचायत) (३%), चपराशी (नगरपालिका) (७%), दुकानात मजुरी (२%), मासेमारी (७%), तर उर्वरित घरीच असल्याचे दिसून आले. आजार किंवा वार्धक्यामुळे १४ % महिलांचे पती घरीच असतात. ३०% शेतमजूर महिलांचे पती/वडील व्यसन करताना आढळून आले.
- शेतमजूर महिलांच्या कौटुंबिक समस्येबाबत असे आढळून आले की, १८% शेतमजूर महिलांना त्यांचा नवरा हा मारझोड करतो. ६% शेतमजूर महिलांचे पती त्यांनी मिळवलेले उत्पन्न हिसकावून घेतात. २% शेतमजूर महिलांची सासू त्यांचा छळ करते. १४% शेतमजूर महिलांना इतर समस्या आहेत, तर ६०% शेतमजूर महिलांना कोणत्याच प्रकारची कौटुंबिक समस्या नाही.
- भूमिहीन शेतमजूर महिलांचे उत्पन्न आणि त्यांच्या पतीच्या उत्पन्नाचा एकत्रित विचार करता सर्वसाधारणपणे असे दिसून आले की, शेतमजूर महिलांच्या घराच्या वार्षिक उत्पन्नात शेतमजूर महिलांचा वाटा सरासरी ३९% आहे.

**शैक्षणिक माहिती:**

- शेतमजूर महिलांच्या शिक्षणाच्या पातळीबाबत असे आढळून आले की, ५२% शेतमजूर महिला या अशिक्षित आहेत, १८% शेतमजूर महिलांनी माध्यमिक शिक्षण घेतले आहे. २६% शेतमजूर महिलांनी प्राथमिक शिक्षण घेतले आहे, तर केवळ ४% शेतमजूर महिलांनी उच्च माध्यमिक शिक्षण घेतले आहे. त्यांच्या मुलांच्या शाळेच्या प्रकाराबाबत असे दिसून येते की, ६८% शेतमजूर महिलांचे अपत्य हे शासकीय शाळेत जातात, तर ३२% शेतमजूर महिलांची अपत्ये हे खाजगी शाळेत जातात.

**कामाशी संबंधित माहिती :**

- रोजगारासाठी २६% शेतमजूर महिलांना

कामासाठी आपले गाव सोडून दुसऱ्या गावात स्थायिक व्हावे लागले, तर ७४% शेतमजूर महिलांना त्यांच्या गावात रोजगार मिळतो. शेतमजुरीच्या संदर्भात ५४% शेतमजूर महिलांना दैनंदिन दोनशे रुपये मजुरी मिळते, तर ४२% शेतमजूर महिलांना दीडशे रुपये मजुरी मिळते व केवळ ४% महिलांना तीनशे रुपये मजुरी मिळते. ९६% महिला शेतमजूर या दैनंदिन रोजगार करताना आढळून आल्या तर केवळ ४% महिलांना गुत्तेदारी पद्धतीने रोजगार प्राप्त होतो, असे आढळून आले.

- रोजगाराच्या उपलब्धतेबाबत ३६% शेतमजूर महिलांना प्रत्येक महिन्यामध्ये १५ ते २० दिवस रोजगार प्राप्त होतो. दहा ते पंधरा दिवस काम मिळणाऱ्या महिलांचे प्रमाण २४% आहे. २०% महिलांना पाच ते दहा दिवसच काम मिळते. वीस ते पंचवीस दिवस काम मिळणाऱ्या महिलांचे प्रमाण हे १८% आहे, तर पाच दिवसांपेक्षा कमी काम मिळणाऱ्या महिलांचे प्रमाण २% आहे. शेतमजूर महिलांना हंगामात काम जास्त प्रमाणात मिळते तर इतर वेळी त्यांना काम कमी स्वरूपात मिळते. निरीक्षणावरून असे दिसून आले की, कळंब गावामध्ये पाण्याच्या उपलब्धतेमुळे कामाची उलब्धता जास्त दिवस आहे. परंतु मजुरी दर १५० रुपयेच आहे, तर याउलट शिरवली गावामध्ये दैनंदिन मजुरी दर तुलनेने जास्त म्हणजे २०० रुपये आहे. परंतु पाण्याच्या अभावामुळे रोजगार खूप कमी दिवस उपलब्ध असतो.

- रोजगाराच्या समाधानाबाबत ५८% महिला मिळणाऱ्या रोजगाराबाबत समाधानी आहेत, तर ४२% महिला समाधानी नाहीत. शेतमजूर महिला करत असलेल्या कामाच्या प्रकाराबाबत ७४% महिलांना शेतमजुरी व्यतिरिक्त इतर कोणतेही काम नाही, तर केवळ २६% महिला शेतमजुरीसोबत इतर कामे करताना आढळून आल्या.

- महिलांना प्राप्त उत्पन्न बाळगण्याच्या अधिकाराबत ७८% शेतमजूर महिला या त्यांनी मिळवलेले उत्पन्न स्वतःकडे ठेवतात, तर २२% महिला या मिळालेले उत्पन्न पती अथवा वडिलांकडे देतात, असे आढळून आले.

**राहणीमानाचे स्वरूप:**

- भूमिहीन शेतमजूर महिलांच्या घराच्या स्थितीबाबत असे दिसून आले की, ८०% शेतमजूर महिलांची घरे की पत्र्याची आहे, तर १६% महिलांची घरे कौलारू पद्धतीची आहेत म्हणजेच कच्ची आहेत तर केवळ ४% शेतमजूर महिलांची घरे ही सिमेंटच्या स्लॅबची आहेत.

- पाण्याच्या सुविधेबाबत असे दिसून आले की, ९४% शेतमजूर स्त्रियांचा पाण्याचा स्रोत हा विहीर अथवा कुपनलिका आहे, तर केवळ ६% महिलांच्या घरी नळाची सुविधा उपलब्ध आहे. आजही २८% शेतमजूर महिलांच्या घरी स्वतःचे मीटर नाही, त्यांना विजेसाठी शेजाऱ्यांवर अवलंबून राहावे लागते. उज्वला योजना सर्व देशभर पसरली असतानादेखील आजही ३०% शेतमजूर महिला चुलीवर स्वयंपाक करतात. याचाच अर्थ त्यांच्याकडे गॅसची सुविधा उपलब्ध नाही. भारतात सर्वत्र स्वच्छ भारत अभियान चालू असताना देखील ४६% शेतमजूर महिलांच्या घरी शौचालयाची सुविधा उपलब्ध नसल्याचे दिसून आले.

**आर्थिक माहिती:**

- बँक खात्याच्या संदर्भात,२२% महिलांचे अजूनही कोणत्याच बँकेत खाते नाही. ५४% शेतमजूर महिला या बचत गटात बचत करतात. १०% महिला या बँकेत बचत करताना दिसून आल्या, तर ३६% शेतमजूर महिला इतर खासगी ठिकाणी बचत करतात.

- कर्जाच्या बाबतीत, ८०% भूमिहीन शेतमजूर महिलांनी कोणत्याच प्रकारचे कर्ज घेतले नाही, तर केवळ २०% शेतमजूर महिलांनी शिक्षण (३), व्यवसाय (२), मुलाच्या लग्नासाठी (२), गृहउपयोगी वस्तूंसाठी (२), वैद्यकीय खर्चासाठी (१) कर्ज घेतले आहे.

४०% शेतमजूर महिलांनी बचतगटातून कर्ज घेतले आहे. ३०% शेतमजूर महिलांनी बँकेतून, २०% शेतमजूर महिलांनी वित्त कंपन्यांकडून तर केवळ १०% शेतमजूर महिलांनी नातेवाईकांकडून कर्ज घेतले आहे.

- जीवन विम्याच्या बाबतीत केवळ ६% शेतमजूर महिलांकडे जीवन विमा आहे.

**आरोग्याशी संबंधित माहिती:**

- आजारी पडल्यास ८०% भूमिहीन शेतमजूर महिला व त्यांची कुटुंबे शासकीय रुग्णालयात जातात, तर केवळ २०% शेतमजूर महिला व त्यांचे कुटुंबीय हे खासगी रुग्णालयाचा वापर करतात. प्रसूतीच्या ठिकाणाबाबत असे दिसून आले की, ४१ महिलांच्या प्रसूतीपैकी २४% शेतमजूर महिलांची प्रसूती घरी झाली आहे. ५४% शेतमजूर महिलांची प्रसूती ही शासकीय रुग्णालयात झाली आहे, तर केवळ ४ शेतमजूर महिलांची प्रसूती ही खाजगी रुग्णालयात झाली आहे.

**शासकीय योजनांच्या लाभासंदर्भात माहिती :**

- ८०% भूमिहीन शेतमजूर महिलांकडे पिवळ्या रंगाचे तर १४% भूमिहीन शेतमजूर महिलांकडे केशरी रंगाचे शिधापत्रक आहे. उर्वरित ६% शेतमजूर महिलांकडे कोणत्याही प्रकारचे शिधापत्रक नाही.

- शासनाच्या विविध योजना जसे घरकुल योजना, उज्वला योजना, शौचालय योजना आणि निराधार पेन्शन योजनांचा लाभ भूमिहीन शेतमजूर महिलांनी घेतला आहे. सर्वात जास्त घरकुल योजनेचा लाभ भूमिहीन शेतमजूर महिलांनी घेतला आहे. ३६% भूमिहीन शेतमजूर महिलांना शासनाच्या घरकुल योजना आणि शिधापत्रक, १२% उज्वला (गॅस) योजना आणि शिधापत्रक, ४% शौचालय योजना आणि शिधापत्रक, २% निराधार पेन्शन योजना आणि शिधापत्रक, ३६% भूमिहीन शेतमजूर महिलांना केवळ शिधापत्रक तर १०% प्रतिसादकांनी कोणत्याही योजनेचा लाभ मिळाला नाही, असे नमूद केले.

- आजही ८६% भूमिहीन शेतमजूर महिलांकडे शासनाचे रोजगार हमी योजनेची कार्यपत्रिका (जॉब कार्ड) नाही. रोजगार हमी योजनेची कार्यपत्रिका असलेल्या महिलांची माहितीवरून असे आढळते की, त्यांना याचा अत्यल्प लाभ झाला आहे. ७ कार्यपत्रिका असलेल्या महिलांपैकी २ महिलांना २ दिवस काम आणि २ महिलांना १० दिवस काम मिळाले आहे. याचाच अर्थ बहुतेक शेतमजूर महिलांकडे रोजगार हमी योजनेची कार्यपत्रिका नाही आणि ज्यांच्याकडे आहे त्यांना त्याचा अत्यल्प लाभ झाला आहे.

- ८८% शेतमजूर महिलांना शासनाकडून विविध प्रकारच्या मदतीची अपेक्षा आहे, तर १२% शेतमजूर महिला या शासनाबाबत उदासिन झाल्या आहेत. त्यांना शासनाकडून कोणत्याच प्रकारच्या मदतीची अपेक्षा नाही.

**भूमिहीन शेतमजूर महिलांची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सूचना :**

भूमिहीन शेतमजूर महिलांचा सामाजिक, आर्थिक स्थितीविषयक अभ्यासानंतर प्राप्त निष्कर्ष अनुसार भूमिहीन शेतमजूर महिलांचे जीवनमान आणि त्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा व्हावी, यासाठी प्रस्तुत संशोधनाच्या आधारे काही सूचना संशोधकांनी केलेल्या आहेत.

१. भूमिहीन शेतमजूर महिलांना स्वतःच्या मालकीची शेती नसल्यामुळे त्यांना रोजगारासाठी पूर्णतः इतरांच्या शेतावर अवलंबून राहावे लागते. त्यासाठी भूमिहीन कुटुंबांना सरकारने गायरान जमिनीचे वाटप केले पाहिजे.

२. भूमिहीन शेतमजूर महिलांना अत्यंत कमी मजुरी दिली जाते. त्यामुळे किमान मजुरी कायद्याप्रमाणे त्यांना मजुरी दिली पाहिजे.

३. भूमिहीन शेतमजूर महिलांना मोठ्या प्रमाणात हंगामी स्वरूपाची कामे मिळतात. हंगाम संपल्यानंतर त्यांच्याजवळ कोणत्याही प्रकारचे काम उपलब्ध नसते.

शासनाने त्यांना रोजगार हमी योजनेची कार्यपत्रिका (जॉब कार्ड) दिली पाहिजे व त्यांना बिगर हंगाम काळात रोजगार उपलब्ध करून दिला पाहिजे.

४. शेतमजूर महिलांची एक समस्या आढळून आली. ती म्हणजे शेतमजूर महिलांना घरकुल सुविधा उपलब्ध झाली; परंतु त्यांना शौचालयाला जागा उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्याकडे शौचालय उपलब्ध नाहीत त्यामुळे त्यांना शौचालयासाठी जागा दिली पाहिजे.

५. बऱ्याच मुलींना गावात माध्यमिक शाळा उपलब्ध नसल्यामुळे त्यांना शाळा सोडावी लागली. त्यासाठी शासनाने सर्व गावांमध्ये किमान दहावीपर्यंतचे शिक्षण उपलब्ध करून दिले पाहिजे.

६. भूमिहीन शेतमजूर महिलांना शेतात काम उपलब्ध नसताना रिकाम्या वेळी काम उपलब्ध करून देण्यासाठी गावात छोटे छोटे लघु उद्योग सुरू केले पाहिजेत. जेणेकरून त्यांना रोजगार उपलब्ध होईल आणि शेतमजूर महिलांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. Kalamb Village Population (2011). Census India 2011. Retrieved from: https://www.censusindia2011.com/maharashtra /thane/vasai/kalamb-population.html

२. Karanjon Village Population (2011). Census India 2011. Retrieved from: https://www.censusindia2011.com/maharashtra/thane/vasai/karanjon-population.html

३. Shirvali Village Population (2011). Census India 2011. Retrieved from: https://www.censusindia2011.com/maharashtra/thane/vasai/shirvali-population.html

४. Vasai Taluka Data (2011). Census India 2011. Retrieved from: https://www.censusindia.co.in/subdistrict/vasai-taluka-thane-maharashtra-4164.

५. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२०-२१ आणि २०२१-२२.

६. कुलकर्णी, भुजंगराव (१९९८), मराठवाड्याचा विकास अभ्यास व चिंतन. पद्मा प्रकाशन, औरंगाबाद.

७. कौर, रामनदीप (२०११), रोल ऑफ वुमन इन ॲग्रिकल्चर सेक्टर इन पंजाब. शोधगंगा. Retrieved from: http://shodhganga.inflibnet.ac.in/handle/10603/28758.

८. गोरे (२०१५), भूमिहीन शेतमजूर स्त्रियांचा समाजशास्त्रीय अभ्यास: विशेष संदर्भ लातूर ज़िल्हा. शोधगंगा. Retrieved from: http://hdl.handle.net/10603/78505

९. शिंदे संजय (२०१०), शेतमजूर महिलांच्या घामाला हवे जादा दाम. दैनिक सकाळ.


◆

---

शेती हा आमच्या सगळ्यांच्या बुद्धीचा प्रयत्न आहे. कारण अखेरीस ती खरी संपत्ती, चांगली नैतिकता आणि आनंदी बनवते.

**- थॉमस जेफर्सन**

---

# अर्थसंवाद
# (खंड ४५, २०२१-२२)

## अ) लेख सूची


| क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | कार्ल मार्क्सची २१ व्या शतकातील प्रस्तुतता | ३ |
| २. | सावधान!.... माल्थस जागा झालाय | ९ |
| ३. | भारतातील सोन्याच्या किमतीतील बदलाची आणि सोन्यातील गुंतवणुकीच्या विविध गुंतवणूक साधनातील गुंतवणूक प्रवृत्तीचा अभ्यास | १६ |
| ४. | आंबा आणि आंबा प्रक्रियायुक्त पदार्थांच्या निर्यातीतून परकीय चलन प्राप्ती | २५ |
| ५. | सार्वजनिक अंदाजपत्रक सिद्धांत आणि व्यवहार : केंद्रीय आणि महाराष्ट्र अंदाजपत्रक २०२१-२२ | ३५ |
| ६. | महाराष्ट्राच्या कृषी स्मशानाची राजकीय अर्थव्यवस्था : विदर्भ व मराठवाड्यातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्याग्रस्त दोन जिल्ह्यांचा जनगणना अभ्यास (जानेवारी २०१४ - डिसेंबर २०१७) | ४५ |
| ७. | पुस्तक परिचय : ब्रेकींग थ्रू | ७४ |
| ८. | अर्थ शब्दांची वाट पाहे... : काही नवीन आर्थिक संज्ञा | ७९ |
| ९. | अर्थ शब्दांची वाट पाहे... : हिस्टेरेसिस | ८० |
| १०. | भारतातील 'गरिबी हटाव' उद्घोषणेची पन्नाशी : एक अवलोकन | ८३ |
| ११. | आर्थिक राष्ट्रवाद ते आत्मनिर्भर भारत | ९६ |
| १२. | भारताच्या भाववाढ नियंत्रण धोरणातील नवीन बदल | १०९ |
| १३. | कोविड - १९ चा भारतीय कृषी व्यवस्थेवर होणारा परिणाम आणि कृषी व्यवस्थेला सावरण्यासाठी व्यूहरचनात्मक उपाय योजना | ११६ |
| १४. | अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक कल्याणाचे साहित्यिक विचार | १२३ |
| १५. | समतोल औद्योगिक विकासासंबंधी विदर्भ - मराठवाडा आंतरविभागीय समितीचा अहवाल - एक अभ्यास | १२९ |
| १६. | पुस्तक परिचय : भारतावरील आर्थिक संकट | १३६ |
| १७. | अर्थ शब्दांची वाट पाहे... : कोरोना लिटरसी | १३९ |
| १८. | प्रतिक्रिया-प्रतिवाद : महाराष्ट्राच्या कृषी स्मशानाची राजकीय अर्थव्यवस्था... | १४० |
| १९. | प्रतिक्रिया-प्रतिवाद : सावधान..! माल्थस जागा झालाय | १४५ |
| २०. | अर्थशास्त्रातील २०२१ चे नोबेल पुरस्कार विजेते अर्थतज्ज्ञ | १४९ |

| | | |
|---|---|---|
| २१. | वि. म. दांडेकर : आदर्श अर्थशास्त्री | १५७ |
| २२. | बुडत्या (कर्जा)ला बॅड बँकेचा आधार | १६७ |
| २३. | सांगली जिल्हा परिषद शाळा- प्राथमिक शिक्षणावरील खर्च,<br>सर्व शिक्षा अभियान आणि शिक्षण हक्क कायदा २००९ | १७२ |
| २४. | भारतातील वित्तीय समावेशन: धोरण आणि<br>वास्तवाचे विश्लेषण | १७९ |
| २५. | पुणे शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती आणि शेतकरी बाजार यांचा<br>तुलनात्मक अभ्यास | १८३ |
| २६. | पुस्तक परिचय : कृषी संजीवके | १९४ |
| २७. | आभासी चलनाचे मोहजाळ | १९७ |
| २८. | अर्थ शब्दांची वाट पाहे... : होमो सॅपियन्स (Homo Sapiens) | २०० |
| २९. | वाद-प्रतिवाद-संवाद : अर्थसंवाद, एप्रिल-जून २०२१ च्या अंकामधील<br>'महाराष्ट्राच्या कृषी स्मशानाची राजकीय अर्थव्यवस्था...' या लेखावरील<br>जुलै-सप्टेंबर २०२१ च्या अंकामधील प्रतिक्रियेवरील प्रतिभाष्य | २०२ |
| ● | संपादकीय | **२१५** |
| ३०. | सोन्याची चित्तरकथा | २१८ |
| ३१. | १९ व्या शतकातील काही भारतीय अर्थतज्ज्ञांचे<br>शेतीविषयक विवेचन | २३० |
| ३२. | सामूहिक कृती सिद्धांत आणि सहकार | २४० |
| ३३. | राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या संदर्भात स्थानिक विद्यापीठ<br>आणि शैक्षणिक संस्थांची भूमिका | २५४ |
| ३४. | आभासी चलन : एका नव्या चलन युगाची नांदी | २६० |
| ३५. | आर्थिक पाहणी अहवाल २०२१-२२<br>परिचय आणि चिकित्सा | २६७ |
| ३६. | भारतातील आर्थिक विषमतेची स्थिती आणि<br>धोरणात्मक पुष्टी | २७३ |
| ३७. | ''स्वयंसहायता बचतगट आणि महिला सक्षमीकरण'' | २८४ |
| ३८. | शाश्वत कृषिविकास : महिला सबलीकरणाची एक संधी! | २९३ |
| ३९. | मानव विकास निर्देशांक | ३०२ |
| ४०. | वसई तालुक्यातील भूमिहीन शेतमजूर महिलांची<br>सामाजिक-आर्थिक स्थिती | ३०८ |
| ● | संदर्भ सूची | ३१४ |

# अर्थसंवाद
# (खंड ४५, २०२१-२०२२)

**ब) लेखक सूची**


| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | श्रीनिवास खांदेवाले | ३ |
| २. | विजय मारुती कुंभार | ९ |
| ३. | हरी पंढरी वंगरवार | १६ |
| ४. | कृष्णा शंकर शहाणे | २५ |
| ५. | पी. एस. कांबळे | ३५ |
| ६. | ज्ञानदेव तळुले | ४५ |
| ७. | संतोष दास्ताने : पुस्तक परिचय | ७४ |
| ८. | शि. ना. माने : अर्थ शब्दांची वाट पाहे... | ७९ |
| ९. | जे. एफ. पाटील : अर्थ शब्दांची वाट पाहे... | ८० |
| १०. | राजाराम पाटील | ८३ |
| ११. | प्रशांत हरमकर | ९६ |
| १२. | राजकुमार वाईंगडे | १०९ |
| १३. | सुरेश श्रावण पाटील, नितीन प्रकाश जैन | ११६ |
| १४. | कारभारी भालचंद्र काशिनाथ | १२३ |
| १५. | अरुण तवार, बेलुरे विशाल चंद्रशेखर | २९ |
| १६. | जे. एफ. पाटील : पुस्तक परिचय | १३६ |
| १७. | शि. ना. माने : अर्थ शब्दांची वाट पाहे... | १३९ |
| १८. | संतोष दास्ताने : प्रतिक्रिया-प्रतिवाद | १४० |
| १९. | भरतकुमार सोलापूरे : प्रतिक्रिया-प्रतिवाद | १४५ |
| २०. | काशिनाथ रामचंद्र चव्हाण | १४९ |
| २१. | संतोष दास्ताने | १५७ |
| २२. | अविनाश कुलकर्णी | १६७ |
| २३. | प्रशांत यशवंत फडणीस | १७२ |
| २४. | श्रीकृष्ण महाजन | १७९ |
| २५. | रामदास गादगे, धोंडीराम पवार | १८३ |
| २६. | आण्णा काका पाटील : पुस्तक परिचय | १९४ |
| २७. | जे. एफ. पाटील | १९७ |
| २८. | शि. ना. माने : अर्थ शब्दांची वाट पाहे... | २०० |

| | | |
|---|---|---|
| २९. | ज्ञानदेव चि. तळुले : वाद-प्रतिवाद-संवाद | २०२ |
| ● | राहुल शं. म्होपरे प्रमुख संपादक | २१५ |
| ३०. | जे. एफ. पाटील, कमल जे. पाटील | २१८ |
| ३१. | दि. व्यं. जहागिरदार, मुक्ता दि. जहागिरदार | २३० |
| ३२. | वसंतराव जुगळे, योजना वसंतराव जुगळे | २४० |
| ३३. | विनायक श्री. देशपांडे, स्नेहा देशपांडे | २५४ |
| ३४. | अनिलकुमार वावरे, सविता अनिलकुमार वावरे | २६० |
| ३५. | राहुल शं. म्होपरे, विद्या रा. म्होपरे | २६७ |
| ३६. | सुरेश एकनाथ घुमटकर, भाग्यश्री सुरेश घुमटकर | २७३ |
| ३७. | राजू लक्ष्मण आदे, संजीवनी राजू आदे | २८४ |
| ३८. | दिपक चव्हाण, कल्पना दि. चव्हाण | २९३ |
| ३९. | बाळासाहेब सुधाकर वाकचौरे, तृप्ती बाळासाहेब वाकचौरे ३०२ | |
| ४०. | संजय फड, सुचित सं. फड | ३०८ |


# अर्थसंवाद


| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **प्रतिक्रिया-प्रतिवाद-संवाद** | |
| १८. | महाराष्ट्राच्या कृषी स्मशानाची राजकीय अर्थव्यवस्था... | १४० |
| १९. | सावधान..! माल्थस जागा झालाय | १४५ |
| २९. | अर्थसंवाद, एप्रिल-जून २०२१ च्या अंकामधील 'महाराष्ट्राच्या कृषी स्मशानाची राजकीय अर्थव्यवस्था...' या लेखावरील जुलै-सप्टेंबर २०२१ च्या अंकामधील प्रतिक्रियेवरील प्रतिभाष्य | २०२ |
| २७. | आभासी चलनाचे मोहजाळ | १९७ |
| | **पुस्तक परिचय** | |
| १. | ब्रेकींग थ्रू | ७४ |
| १६. | भारतावरील आर्थिक संकट | १३६ |
| २६. | कृषी संजीवके | १९४ |
| | **अर्थ शब्दांची वाट पाहे...** | |
| ८. | काही नवीन आर्थिक संज्ञा | ७९ |
| ९. | हिस्टेरेसिस | ८० |
| १७. | कोरोना लिटरसी | १३९ |
| २८. | होमो सॅपियन्स (Homo Sapiens) | २०० |

| | | |
|---|---|---|
| | **प्रतिक्रिया-प्रतिवाद-संवाद** | |
| १८. | संतोष दास्ताने | १४० |
| १९. | भरतकुमार सोलापूरे | १४५ |
| २९. | ज्ञानदेव चि. तळुले | २०२ |
| २७. | जे. एफ. पाटील | |
| | **पुस्तक परिचय** | |
| १. | संतोष दास्ताने | ७४ |
| २. | जे. एफ. पाटील | १३६ |
| ३. | आण्णा काका पाटील | १९४ |
| | **अर्थ शब्दांची वाट पाहे...** | |
| ८. | शि. ना. माने | ७९ |
| ९. | जे. एफ. पाटील | ८० |
| १७. | शि. ना. माने | १३९ |
| २८. | शि. ना. माने | २०० |


**अर्थसंवाद अंकाचा तपशील : खंड - ४५**

| क्र. | अंक | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| १. | एप्रिल-जून २०२१ | ८० |
| २. | जुलै-सप्टेंबर २०२१ | ६६ |
| ३. | ऑक्टोबर-डिसेंबर २०२१ | ६६ |
| ४. | जानेवारी-मार्च २०२२ | १०८ |

जगातील सर्वात कठीण गोष्ट म्हणजे उत्पन्नकर समजणे होय.

**-अल्बर्ट आईन्स्टाईन**

मी बाँड नाही तर मी एक चालता बँकर आहे.

**- रघुराम राजन**

# अर्थसंवाद - तज्ञ परीक्षक सूची

अर्थसंवादच्या खंड ४५ मधील अंक १ ते अंक ४ मधील लेखांचे परीक्षण खालील तज्ञांनी केलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. श्रीनिवास खांदेवाले | - नागपूर |
| २. | डॉ. जे. एफ. पाटील | - कोल्हापूर |
| ३. | डॉ. दि. व्य. जहागीरदार | - अमरावती |
| ४. | डॉ. सौ. मुक्ता जहागीरदार | - अमरावती |
| ५. | डॉ. संतोष दास्ताने | - पुणे |
| ६. | डॉ. विनायक देशपांडे | - नागपूर |
| ७. | डॉ. राजस परचुरे | - पुणे |
| ८. | डॉ. अनिल सुर्यवंशी | - बार्शी |
| ९. | डॉ. एस. एस. कळमकर | - आनंद, गुजरात |
| १०. | डॉ. आर. एस. सोळुंके | - औरंगाबाद |
| ११. | डॉ. आर. वाय. माहोरे | - नागपूर |
| १३. | डॉ. पी. एस. कांबळे | - कोल्हापूर |
| १४. | डॉ. सुहास आव्हाड | - संगमनेर |
| १५. | डॉ. सुरेश ढाके | - भुसावळ |
| १६. | डॉ. विकास सुकाळे | - नांदेड |
| १७. | डॉ. भरत सोलापूरे | - मंडणगड |
| १८. | डॉ. सुभाष पाटील | - पुणे |
| १९. | डॉ. संतोष कदम | - मंद्रुप |
| २०. | डॉ. मारोती तेगमपुरे | - अंबड |
| २१. | डॉ. आर. जी. टाले | - नागपूर |
| २२. | डॉ. संजय धनवटे | - कारंजा |
| २३. | डॉ. के. के. पाटील | - अर्धापूर |
| २४. | डॉ. तेजस्विनी मुडेकर | - कोल्हापूर |
| २५. | डॉ. आर. जी. रसाळ | - लोणी |
| २६. | डॉ. राहुल शं. म्होपरे | - अर्जूननगर |

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

**(फॉर्म ४, नियम ८ नुसार)**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना - ४३१२०४ |
| २. | नियतकाल | : | त्रैमासिक |
| ३. | मुद्रकाचे नाव | : | मारोती वि. तेगमपुरे |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | 'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना - ४३१२०४ |
| ४. | मुद्रण स्थळ | : | भारती मुद्रणालय, ८३२ ई, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर ४१६ ००१ फोन : (०२३१) २६५४३२९ |
| ५. | प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र. ३ प्रमाणे |
| ६. | संपादकाचे नाव | : | राहुल शंकरराव म्होपरे |
| ७. | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | 'सर' निवास, री. स. नं. ३३/क/२, प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी, दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे, उजळाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर, पिन : ४१६ ००४ |
| ८. | मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा : सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम.एन. रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र. ६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूलजवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. ३२३ समोर, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१ |

मी मारोती वि. तेगमपुरे असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

**मारोती वि. तेगमपुरे**
मुद्रक व प्रकाशक

# अर्थसंवादसाठी
## हार्दिक शुभेच्छा

**डॉ. अनिल कृ. वावरे**
सातारा

**डॉ. जयश्री दि. भंगाळे**
भुसावळ

**डॉ. वर्षा क. नेहे**
भालोड

**डॉ. कृतिका खंदारे**
औरंगाबाद

**डॉ. शशिकांत शिंदे**
बार्शी

**प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी**
इस्लामपूर

**प्राचार्य डॉ. कैलास व प्रा. सौ. रत्ना निंबाळकर**
कल्याण

**डॉ. कुमुदिनी भा. जोगी**
अचलपुर

**डॉ सुरेश घुमटकर**
बीड

**प्रा. एम. जी. पाटील**
मिरज

**डॉ. विठ्ठल ठावरी**
भिसी

**शी. ना. माने**
सातारा

**डॉ. भास्कर ह. जंगले**
दौंड

**प्राचार्य ढगे एस. के.**
पुणे

**रविंद्र दा. इच्छे**
असेगाव पूर्णा

**डॉ. संतोष कदम**
मंद्रुप

**डॉ. क्रांती बोरावके**
पुणे

**विशाल वा. मळेकर**
कोरपन

**डॉ. वनिता चौरे**
चांदूरबाजार

**डॉ. उषा पाटील**
उमरखेड

**डॉ. आशिष कृ. महातळे**
चंद्रपूर

**प्राचार्या डॉ. मंगला जंगले**
भुसावळ

**डॉ. अमृता अ. सूर्यवंशी**
पुणे

**प्रा. डॉ. शिवाजी सांगळे**
औरंगाबाद

**डॉ. छाया करकरे**
नांदेड

**डॉ. एस. यु. मंडले**
लातूर

**प्राचार्या सुषमा देशमुख**
अमरावती

**डॉ. एम. एन. शिंदे**
इस्लामपूर

**डॉ. महेंद्र व्ही. मेटे**
अमरावती

**डॉ. आर. जी. रसाळ**
प्रवरानगर

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

# ॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥



मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य

## कै. प्राचार्य डॉ. तानाजी निवृत्ती साळवे

(जन्म दि.१० जुलै १९६८ मृत्यू दि.२४ मे २०२१)

प्रा.डॉ. संगिता तानाजी साळवे
कन्या कु.गौरी तानाजी साळवे
श्री. अविनाश म्हावरे (मेहूणे)

प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे
प्राचार्य डॉ. संजीव लाटे
प्राचार्य डॉ. तुषार शितोळे

मूल्य : रु. १०/- (सभासदांकरिता विनामूल्य)
भारती मुद्रणालय, कोल्हापूर